# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**सत्र–५ पेपर ९** DSE - E 73

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र–१

International Economics-I

**सत्र–६ पेपर १४** DSE - E 198

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र–२

International Economics-II

**बी. ए. भाग–३ : अर्थशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२

बी. ए. (आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र) भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-77-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिति ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र

अध्यक्ष – **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. डी. सी. तळुले**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. बाळासो पांडुरंग पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. निवास जाधव**
  राजा शिव छत्रपती आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
  महागांव, जि. कोल्हापूर
- **डॉ. एस. एम. भोसले**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
  अक्षय, बी–६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
  सम्राट नगर, कोल्हापूर
- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
  राजर्षी शाहू आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
  जि. कोल्हापूर
- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
  आर्टस अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
  जि. सांगली
- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
  डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
  कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)
- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील–बुद्धिहाळकर**
  सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर
- **डॉ. संजय शंकरराव रुपे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी बी. ए. भाग ३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमानुसार सत्र-५ व ६ पेपर क्र. ९ व १४ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र हे पुस्तक लिहिले आहे. अर्थशास्त्र या विषयातील विविध अभ्यासू व अनुभवी लेखकांनी वेगवेगळे घटक या पुस्तकांमध्ये लिहिले आहेत. या पुस्तकातील विषयाच्या विविध संकल्पना, सिद्धांत व आर्थिक नियोजन यांची मांडणी सोप्या व दर्जेदार भाषेत करून हा विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. बहि:स्थ विद्यार्थ्यांना या विषयातील विविध संकल्पना, सिद्धांत व धोरणे समजण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके व आकृत्या काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात बी. ए. भाग-३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी असलेल्या आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र सत्र-५ व ६ पेपर क्र. ९ व १४ या बदललेल्या सुधारीत अभ्यासक्रमाची एकूण आठ घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सत्र ५ साठी व्यापार आणि व्यापार सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ, विनिमय दर, जकाती आणि कोटा तर सत्र ६ साठी व्यापारतोल आणि व्यवहारतोल, भारताचा १९९१ पासूनचा विदेशी व्यापार, भारतातील विदेशी भांडवल, आंतरराष्ट्रीय संस्था आणि भारत यांची सविस्तर मांडणी केलेली आहे.

बहि:स्थ विद्यार्थ्यांना विषयाचे त्वरीत व मुद्देसूद आकलन व्हावे यासाठी घटकांची मांडणी एका विशिष्ठ पद्धतीने म्हणजेच उद्दिष्टे, प्रास्ताविक, विषय विवेचन, सारांश, पारिभाषिक शब्द तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न व टीपा दिलेल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटी अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे दिलेली आहेत. या पुस्तकाची मांडणी आणि विवेचन विद्यार्थ्यांना विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाचा वापर करणाऱ्या सर्व विद्यार्थी व शिक्षक वर्गाला आमची नम्र विनंती अशी की त्यांनी त्यांच्या सूचना प्रकाशक वा संपादकांकडे जरूर पाठवाव्यात. पुढील आवृत्ती अधिक बिनचूक, अद्ययावत व उपयुक्त करण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी यांना मन:पूर्वक धन्यवाद. या पुस्तकाच्या सर्व घटक लेखकांनी आपले घटक वेळेत पूर्ण केल्याबद्दल संपादक या नात्याने कृतज्ञ आहोत.

**■ संपादक ■**


**डॉ. राहूल एस. म्होपरे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

**डॉ. बी. पी. पाटील**
यशवंतराव चव्हाण आर्टस ॲण्ड
कॉमर्स कॉलेज, उरुण-इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र**

बी. ए. भाग-३ अर्थशास्त्र पेपर ९ व १४

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र-५ घटक क्रमांक | सत्र-६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १ | - |
| **डॉ. निलेश गुरव**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २, ४ | - |
| **डॉ. डी. के. घडलिंग**<br>विलिंग्डन कॉलेज, सांगली, जि. सांगली | ३ | - |
| **डॉ. अनिल सत्रे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली | - | १, २ |
| **डॉ. कबीर वाघमारे**<br>आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | - | ३, ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. राहूल एस. म्होपरे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

**डॉ. बी. पी. पाटील**
यशवंतराव चव्हाण आर्टस अ‍ॅण्ड
कॉमर्स कॉलेज, उरुण-इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | पेपर–९ : सेमिस्टर–५ | |
| १. | व्यापार आणि व्यापार सिद्धांत | १ |
| २. | आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ | २९ |
| ३. | विनिमय दर | ५२ |
| ४. | जकाती आणि कोटा | ७१ |
| | पेपर–१४ : सेमिस्टर–६ | |
| १. | व्यापारतोल आणि व्यवहारतोल | ९९ |
| २. | भारताचा १९९१ पासूनचा विदेशी व्यापार | १२० |
| ३. | भारतातील विदेशी भांडवल | १३९ |
| ४. | आंतरराष्ट्रीय संस्था आणि भारत | १५६ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी (क्र. ९ व १४) एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# व्यापार आणि व्यापार सिद्धांत

# (Trade and Trade Theoris)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

 १.२.१ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व

 १.२.२ अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार : साम्य आणि भेद

 १.२.३ रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

 १.२.४ हेकश्चर – ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## १.० उद्दिष्टे (Objectives) :

व्यापार आणि व्यापार सिद्धांत या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील घटकांची माहिती मिळते.

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व समजेल.

२) अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार या दोन्ही मधील साम्य आणि फरक अभ्यासता येईल.

३) रिकार्डोच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांताची माहिती मिळेल.

४) हेक्चर-ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत अभ्यासता येईल.

## १.१ प्रास्ताविक ( Introduction) :

मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी प्राचीन काळापासून मानव वस्तूची देवाण-घेवाण करत आहे. व्यापार म्हणजेच वस्तू व सेवांची देवाण-घेवाणीचा व्यवहार होय. जगामध्ये औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळामध्ये स्थानिक पातळीवर देशांतर्गत भागामध्ये केला जात होता. मात्र औद्योगिक क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय व्यापाराला मोठ्या प्रमाणात सुरूवात झाली. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ विविध देशातील नागरिकांना होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापार खुला व मुक्त व्हावा म्हणून अनेक प्रयत्न केले आणि ते यशस्वी झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी आणि मानवी कल्याणात वाढ व्हावी म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्माण होणारे विविध प्रश्न सोडविण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' ही अर्थशास्त्राची महत्त्वपूर्व शाखा बनली आहे.

जगातील अनेक देशांनी जागतिकीकरणाच्या धोरणाचा स्विकार केल्यामुळे आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही अर्थशास्त्रातील उपयोजित शाखा आहे. जागतिक पातळीवरील बदलत्या घडामोडींचा आर्थिक व्यवहारावर सातत्याने परिणाम होत असतो. त्यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केला जातो. २० व्या शतकापर्यंत युरोपियन देश आणि अमेरिका आर्थिक बाबतीत जगातील इतर देशाच्या तुलनेत पुढे होती. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ विकसित देशांना अधिक मिळत होते आणि विकसनशील देश तर अविकसित देशांना आर्थिक समस्या निर्माण होत होत्या. त्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात त्या समस्यांचा अभ्यास करून उपाय शोधले जातात. प्रस्तुत घटकामध्ये आपणास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामधील साम्य आणि फरक, रिकार्डोच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत आणि हेकश्चर-ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांताचा अभ्यास करावयाचा आहे.

## १.२ विषय विवेचन (Analysis of the Unit) :

### १.२.१ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व

### (Importance of the study of International Economics) :

जगामध्ये औद्योगिक क्रांतीनंतर वसाहतवादी साम्राज्यांमध्ये जी वाढ झाली त्यांचा मुख्य उद्देश व्यापारात वाढ करणे हा होता. सन १७६० च्या दरम्यान इंग्लंडमध्ये घडलेल्या औद्योगिक क्रांतीचा एक मुख्य परिणाम म्हणजे मागणीपूर्व उत्पादनाची सुरूवात होय. उत्पादन प्रक्रियेमध्ये विज्ञान तंत्रज्ञान आणि कारखाना पद्धतीचा वापर केल्यामुळे युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढले. गरजेपेक्षा अधिक झालेल्या उत्पादनाला बाजारपेठ

मिळविण्यासाठी जगामध्ये साम्राज्यवाद वाढीला चालना मिळाली. या सर्व गोष्टीचा आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीला अनुकूल परिणाम झाला. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये नव्याने अनेक प्रश्न निर्माण झाले. नविन निर्माण झालेल्या प्रश्नाची उत्तरे आधीच्या व्यापारवादी आणि सनातनवादी अर्थशास्त्रामध्ये नव्हती. त्या प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी विसाव्या शतकात 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' ही अर्थशास्त्राची नविन शाखा निर्माण झाली. सर रॉय हेरॉल्ड यांच्या मते आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा संबंध त्या सर्व आर्थिक व्यवहाराशी आहे. जे देशाच्या भौगोलिक सीमा ओलांडून विविध कंपन्या, व्यापारी, वित्तीय संस्था, सरकारे यांच्या मध्ये वस्तू व सेवाविषयक व्यवहार होतात त्यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रामध्ये केला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर जग अधिकाधिक मुक्त व्यापाराकडे वळले. त्यामुळे जगामध्ये आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे महत्त्व वाढत गेले. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रामध्ये देशांतगर्त व्यापाराचाही अभ्यास केला जातो. अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अनेक गोष्टीत साम्य असले तरी अनेक बाबतीत फरक/भेद असल्याचे दिसते. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामधील फरकाचे मुद्दे लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापारामधील प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रामध्ये अनेक अर्थतज्ञांनी सैद्धांतिक विश्लेषण केले आहे.

देशाच्या सीमा ओलांडून जो व्यापार केला जातो त्याला आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात. देशाच्या आयात आणि निर्यातीत झालेली वाढ किंवा घट, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे देशाच्या अर्थकारणावर होणारे परिणाम, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य, विनिमय दर, व्यापारशर्ती, जकात, कोटा आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित इतर घटकांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केला जातो.

**२) आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक सहकार्याचा अभ्यास :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मुळाशी श्रमविभागणीचे तत्व आहे. प्रत्येक देशाचे भौगोलिक स्थान, नैसर्गिक साधनसंपत्ती, हवामान, जमीन आणि वातावरण भिन्न-भिन्न असते. त्यामुळे त्या देशातील नागरिकांच्या सर्व गरजा त्याच देशामध्ये पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे आपल्या देशातील नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुसऱ्या देशांची मदत घ्यावी लागते. एखाद्या वस्तूची आपल्या देशात उत्पादन होत असताना दुसऱ्या देशात उत्पादन खर्च कमी आहे म्हणून ती आयात केली जाते आणि ती आयात किफायतशीर असते. आपल्या देशात कमी उत्पादन खर्चात उत्पादन होणाऱ्या वस्तूची निर्यात करून लाभ मिळविला जातो. तात्पर्य, अधिकाधिक आंतरराष्ट्रीय व्यापारसंबंधी सहकार्यामध्ये मानवजातीचे कल्याण आहे. विकसित, विकसनशील आणि अविकसित देशामध्ये कच्च्या आणि पक्क्या मालाची आयात-निर्यात, माहिती-तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण, यंत्रसामग्री आणि सेवाचे सहकार्य होते. त्यातून विविध सहकार्याचे समूह तयार झाले. जी ७ देशाचा गट, युरोपीय आर्थिक समुदाय, सार्क, अंक्टाड, अशियान हे समूह निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक द्विपक्षीय, बहुपक्षीय, बहुविध करार अस्तित्वात येतात. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक सहकार्याचा अभ्यास केला जातो.

### ३) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सैद्धांतिक विश्लेषण :

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येण्याची कारणमिमांसा, आंतरराष्ट्रीय व्यापारास पूरक असणाऱ्या गोष्टी, धोरणे या संदर्भात अर्थतज्ञांकडून सैद्धांतिक मांडणी केली जाते. अनेक अर्थ तंज्ज्ञांनी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या विकासामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. सर्वप्रथम ॲडम स्मिथ यांनी निरपेक्ष खर्च संकल्पनेच्या साह्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत मांडला. ॲडम स्मिथ यांच्या सिद्धांतांची संकल्पना घेऊन रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च संकल्पनेच्या साह्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत मांडला. त्यामध्ये त्यांनी सांगितले. ज्या देशामध्ये ज्या वस्तूचा तुलनात्मक उत्पादन खर्च कमी आहे. त्यांचे उत्पादन करावे आणि त्यांची निर्यात करावी, तसेच ज्या वस्तूचा तुलनात्मक खर्च जास्त आहे त्यांची आयात करावी. रिकार्डोच्या मते, वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येतो. हॅवलर यांनी वैकल्पिक खर्च संकल्पनेच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत मांडला. जे. एस. मिल यांनी अन्योन्य मागणीचा सिद्धांत मांडला. त्यामध्ये व्यापारशर्ती कशा ठरतात हे स्पष्ट केले. हेक्चर ओहलिन यांनी मांडलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताला आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिद्धांत म्हणतात. त्यांनी आपल्या सिद्धांतात दोन देशातील वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक का असतो यांची कारणे दिली आहेत. त्यामध्ये उत्पादन घटकांची विपुलता व दुर्मीळता आणि वस्तूच्या उत्पादन घटकाची असणारी भिन्न गरज यांचा समावेश होतो. टॉसिंग, लिंडार, क्रेविस आणि इतर अर्थतज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत मांडले आहेत.

### ४) सामाजिक लाभाचे मूल्यमापन :

जगातील प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झाले आहेत. देशांतर्गत अनुकूल स्थिती लक्षात घेऊन विशिष्ट वस्तू व सेवांच्या निर्मितीसाठी विशेषीकरण करता येते. निर्यातीत वाढ आणि आयात पर्यायीकरण करून अधिक परकीय चलन प्राप्त करता येते. ज्या देशाकडे मुबलक प्रमाणात परकीय चलनसाठा असतो. तेथे लोकांच्या आर्थिक-सामाजिक कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. दारिद्र्य निर्मूलन, रोजगार वृद्धी, आर्थिक समानता, प्रादेशिक-आर्थिक विषमतोल कमी करणे इत्यादी संदर्भात अपेक्षित परिणाम साधणे शक्य होते. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे होणाऱ्या सामाजिक-आर्थिक लाभाचे मूल्यमापन देशाच्या पातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तुलनात्मकरित्या करणे हा आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा मुख्य विषय आहे.

### ५) आर्थिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास :

औद्योगिक क्रांतीनंतर जगातील अनेक देशांचा आर्थिक विकासाचा क्रम बदलला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर कृषीप्रधान अर्थव्यवस्थेकडून उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरू झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली. जगामधील प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झाला. मात्र आंतरराष्ट्रीय व्यापाराचे अनुकूल फायदे सर्व देशांना झाले नाहीत. अनेक देशांना अनेक वेळा प्रतिकूल व्यापारशर्तींना सामोरे जावे लागले. त्यांना नकारात्मक परिणामाला तोंड द्यावे लागले. असे असले तरी जागतिक व्यापार वाढीचा लाभ अनेक देशांना झाला. अनेक देशांनी स्वस्त आयात, नविन बाजारपेठा, नवे तंत्रज्ञान इत्यादीमुळे उत्पादनात वाढ

करून जलद आर्थिक विकास साधने शक्य झाले. अमेरिका, इंग्लंड, जपान, जर्मनी, फ्रान्स आणि रशिया सारख्या देशांनी वेगाने विकास केला. त्यावेळी कोणती आर्थिक धोरणे राबविली. आयात-निर्यात धोरण कसे राबविले यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केला जातो.

**६) टंचाईच्या प्रश्नावर उपाययोजना :**

अनेक देशांची भौगोलिक आणि नैसर्गिक प्रतिकूलता यामुळे तर काही देशांमध्ये लोकसंख्या वाढ, कमी विकास दर, अयोग्य नियोजन अपूर्ण बाजारपेठा यासारख्या कारणांमुळे वस्तू उपलब्धतेमुळे टंचाई निर्माण होते. अशा स्थितीत देशातील वस्तुंच्या किमती वाजवीपेक्षा अधिक झाल्याने अल्प उत्पन्न गटातील लोकांना त्रास होतो. अशावेळी आवश्यक वस्तूंची इतर देशांकडून आयात करून टंचाईच्या प्रश्नावर मात करता येते. एखादा देश त्यांच्याकडील अतिरिक्त मालाची दुसऱ्या देशांना निर्यात करून तेथील टंचाई दूर करू शकतो. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे टंचाईच्या काळात आयात-निर्यात विषयक संधी व शक्यतांची कल्पना येते.

**७) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या विविध संकल्पनाचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय व्यापारातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी आणि व्यापार सुकर होण्यासाठी सैद्धांतिका विश्लेषणाशिवाय महत्त्वपूर्ण संकल्पनांची माहिती व अभ्यास होणे आवश्यक असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने व्यापारशर्ती व प्रकार, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्यांचे मोजमाप, विनिमय दर आणि त्यांचे प्रकार, अवमूल्यन, उर्ध्वमूल्यन, मूल्यऱ्हास, विदेशी व्यापार गुणक, व्यापारतोल, व्यवहारतोल, मुक्त व्यापार व संरक्षित व्यापार, चलनाची परिवर्तनीयता, जकाती, कोटा, विनिमय नियंत्रण, विदेशी भांडवल, थेट विदेशी गुंतवणूक, प्रादेशिक गट आणि प्रादेशिक सहकार्य इत्यादी संकल्पनांचा अभ्यास करणे गरजेचे असते. आतापर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अनुभव आणि समस्या लक्षात घेऊन विविध अर्थतज्ञांनी अशा महत्त्वपूर्ण संकल्पना स्पष्ट करून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राची व्याप्ती समृद्ध केली आहे. जागतिक व्यापारात वाढ होण्यासाठी त्यामुळे मदत झाली.

**८) व्यापारविषयक करार, नियम व अटीचा अभ्यास :**

जगामधील विविध देश आपल्या गरजा लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे करार करीत असतात. व्यापारविषयक करार, नियम आणि अटींवर देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय घटकांचा प्रभाव पडत असतो. दुसऱ्या महायुद्धामध्ये जगामधील आंतरराष्ट्रीय व्यापार कमी झाला असल्यामुळे तो वाढावा म्हणून जागतिक व्यापार वाढीसाठी १९४७ ला व्यापार व जकातीविषयक सर्वसाधारण करार (गॅट) स्थापन केला. सन १९०५ पर्यंत गॅट कराराने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व व्यापार वाढविला. १ जानेवारी १९९५ ला गॅटची जागा जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनी घेतली. जागतिक व्यापार संघटनेच्या सभासदांना संघटनेने घालून दिलेल्या नियम व अटीचे पालन करावे लागते. त्यामुळे बाजार प्रवेश, आयातकर घट, निर्यात अनुदान घट, देशांतर्गत अनुदानात घट, पेटंट व सार्वजनिक वितरण प्रणाली या नियमाचे पालन करावे लागते. त्याचबरोबर द्विपक्षीय, बहुपक्षीय व प्रादेशिक स्तरावर स्थापन झालेल्या व्यापारगटांच्या कराराचे पालन करावे लागते.

व्यापारविषयक नियम, अटी आणि कराराचे कोणते संभाव्य परिणाम सदस्य देशांच्या अर्थव्यवस्थेवर होतात? जागतिक व्यापारावर कोणते परिणाम होतात. अशा घटकांचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

**९) मुक्त स्पर्धात्मक व्यापाराच्या तत्वाचा अभ्यास :**

१७ व्या शतकात व्यापारवाद्यांनी राष्ट्रीय संपत्तीच्या वाढीसाठी व्यापाराचे महत्त्व स्पष्ट केले. पुढे ॲडम स्मिथ, रिकार्डो इ. सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत सोपे व शास्त्रीय विवेचन करून व्यापारवाढीचे समर्थन केले. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होत गेली. परंतु मुक्त व स्पर्धात्मक व्यापाराच्या मार्गामध्ये वसाहतवादी साम्राज्यातील संघर्ष, संरक्षित व्यापार धोरण, परस्पर सहकार्याचा अभाव यामुळे अडथळे येत असत. पहिल्या महायुद्धानंतर युरोपातील देशांमध्ये राजकीय संघर्ष टोकाला गेला आणि परकीय व्यापारात मोठी घसरण झाली. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीसाठी दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले. जकात व व्यापारविषयक सर्वसाधारण करार, जागतिक व्यापार संघटना या आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीच्या पूरक ठरणाऱ्या संस्थांची स्थापना झाली. त्यामुळे मुक्त व स्पर्धात्मक व्यापाराला सुरूवात झाली. भारतासारख्या अनेक विकसनशील देशांनी संरक्षित व्यापाराचे धोरण अवलंबले. सन १९८० नंतर अनेक देशांनी मुक्त व्यापार धोरणाचा स्विकार केला. मुक्त व्यापाराची गरज व महत्त्व अनेक देशांना समजले. जागतिक आर्थिक वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले.

**१०) उत्पादन रचना निश्चित करण्यास उपयुक्त :**

एखाद्या देशाने आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभाग नोंदविल्यामुळे त्या देशातील वस्तूंना नविन बाजारपेठ उपलब्ध होते. त्यामुळे वस्तूंची मागणी वाढून देशातील साधनसामग्री, मनुष्यबळ आणि कच्च्या मालाचा पर्याप्त वापर होतो. निर्यातवाढीच्या प्रयत्नाबरोबर आयात पर्यायीकरण धोरणाचा वापर करून देशाच्या उत्पादन रचनेला आकार देता येतो. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कोणत्या वस्तूला मागणी आहे हे लक्षात घेऊन उत्पादन करणे शक्य होते. मुख्य उत्पादनास पूरक असणाऱ्या वस्तू व सेवांची माहिती घेऊन उत्पादन रचना ठरविता येते. त्याचबरोबर ज्या गरजेच्या वस्तू आपल्या देशात उत्पादित होत नाहीत त्यांची आयात करता येते. श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचे तत्व आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झालेल्या देशांना योग्य पध्दतीने वापरून आपल्या देशातील उत्पादन रचना निश्चित करता येते. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासात उत्पादन रचना निश्चितीचे महत्व समजते.

**११) आंतरराष्ट्रीय संस्थांचा अभ्यास :**

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून प्रयत्न केले. जागतिक व्यापारातील सदस्य देशातील विश्वासार्हता वाढावी म्हणून व्यापार व जकातविषयक सर्वसाधारण करार (गॅट) निर्माण करण्यात आला. गॅट कराराच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीला चालना दिली. गॅटची जागा जागतिक व्यापार संघटनेने घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर पुनर्रचना आणि विकासाचे कार्य करण्यासाठी

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेची स्थापना केली. त्यानंतर जागतिक बँकेच्या सहयोगी संस्था स्थापन केल्या होत्या. सार्क, अशियान, ब्रिक्स, युरोपियन संघ, अंक्टाड, जी-८, जी-२० व व्यापार विषयक संस्था स्थापन झाल्या होत्या. या संख्यांची स्थापना, कार्य, परिणाम या घटकांचा आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो.

**१२) जागतिक उत्पादनात वाढ :**

विविध देशातील औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनवाढीबरोबर नवनविन बाजारपेठांची निर्मिती झाली. त्यानंतर देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन करण्याऐवजी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील गरजांना प्राधान्य दिले जाते आणि अधिक उत्पादन केले जाते. उत्पादनात वाढ केल्यामुळे श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचा अवलंब करता येतो. त्यामुळे दर्जेदार आणि कमी उत्पादन खर्चात उत्पादन होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाल्यामुळे दारिद्र्य, कुपोषण, उपासमार, शोषण इ. समस्या सुटण्यास मदत होते. जागतिक उत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा अभ्यास केला जातो.

वरील सर्व मुद्यांच्या साह्याने आपणास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व लक्षात येते. सध्या आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची विकसित व महत्त्वपूर्ण शाखा आहे.

**१.२.२ अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार-साम्य आणि भेद :**

व्यक्ती आणि संस्थांच्या परस्पर गरजांची पूर्तता करणे हे वस्तु विनिमयाचे उद्दिष्टे आहे. वस्तू विनिमय म्हणजे व्यापार होय. विशिष्ट उत्पादनात विशेषीकरण केलेल्या उत्पादकांनी, संस्थांनी घडवून आणलेल्या वस्तू व सेवांचा विनिमय म्हणजे व्यापार होय. जेव्हा व्यापार देशाच्या सीमेच्या आत होत असतो तेव्हा त्याला अंतर्गत व्यापार असे म्हणतात. त्यामध्ये राज्याराज्यातंर्गत, विभागाविभागात, जिल्ह्याजिल्ह्यात व्यापार होतो. देशाच्या सीमा ओलांडून जेव्हा व्यापार केला जातो तेव्हा त्याला आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात. एक देश दुसऱ्या देशाबरोबर वस्तू व सेवांचा व्यापार करतो तेव्हा त्याला आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू व सेवांचा विनिमय होत असतो. आधुनिक काळामध्ये पैसा मध्यस्थाचे कार्य करीत असला तरी शेवटी वस्तू व सेवाच्या रूपातच मुल्याची देवाण-घेवाण होत असते

अनेक घटकात अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये साम्य असते. बर्टील ओहलिन म्हणतात, आंतरराष्ट्रीय व्यापार हा अंतर्गत व्यापाराचाच भाग आहे. परंतु इतर अर्थतज्ञांना हे मत मान्य नाही. कारण बऱ्याच गोष्टीत अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये भेद आहे. खालील घटकांच्या साह्याने आपण अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारमधील साम्य आणि भेद अभ्यासावयाचा आहे.

**अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार साम्य :**

**१) व्यक्ती, संस्था व सरकारचा सहभाग :**

अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार या दोन्ही व्यापारामध्ये व्यक्ती, संस्था आणि सरकारचा

सहभाग असतो. अंतर्गत व्यापारामध्ये व्यक्तीचे वस्तू व सेवांची देवाणघेवाण करण्यावर भर असतो तर आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये संस्थांची वस्तू व सेवांचा व्यापार करण्यावर भर असतो. सरकार आपल्या गरजेच्या वस्तूची अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातून खरेदी करत असते.

**२) वस्तू व सेवांचा व्यापार :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू व सेवांची देवाणघेवाण केली जाते. यामध्ये गहू, तांदूळ, फळे, भाजीपाला, लोखंड, पोलाद, लॅपटॉप, संगणक यासारख्या वस्तू तर मानवी संसाधने, तंत्रज्ञान, इंजिनिअर, डॉक्टर यांच्या सेवा घेतल्या जातात.

**३) श्रमविभागणी :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये श्रमविभागणीचे तत्व महत्त्वाचे असते. एखाद्या विशिष्ट प्रदेशातील भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती विचारात घेऊन उत्पादन केले जाते. उदा. महाराष्ट्रातील कोकणात हापूस आंबे, काजू, नारळ, सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात ज्वारी, सांगोला तालुक्यात डाळींब, सातारा जिल्ह्यातील वाई, पाचगणीमध्ये स्टॉबेरी, पाचवड भागात हळद अशा प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते. त्याचप्रमाणे देशा-देशामध्ये ही नैसर्गिक परिस्थितीनुसार वस्तुचे उत्पादन घेतले जाते. उदा. आखाती देशात इंधनतेलाचे उत्पादन घेतले जाते. अमेरिकेमध्ये भांडवलप्रधान वस्तुचे उत्पादन घेतले जाते. भारतामध्ये श्रमप्रधान वस्तुचे उत्पादन घेतले जाते. यामधून अतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येतो.

**४) नफा प्राप्ती :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यक्ती व संस्था यांचे मुख्य उद्दिष्ट नफा प्राप्ती असते. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये गरजांची पूर्तता करण्यासाठी व्यापार केला जात नाही तर नफा मिळविण्यासाठी केला जातो. ज्या ठिकाणी वस्तूला जास्त मागणी आहे त्या ठिकाणी जास्त किंमतीला वस्तू विकून जास्त नफा मिळविला जातो. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात टंचाईच्या स्थितीचा लाभ व्यापारी पूरेपूर घेतात आणि नफा मिळवितात.

**५) केंद्रीकरण व विशेषीकरण :**

अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये केंद्रीकरण व विशेषीकरणाची प्रवृत्ती आढळून येते. एखाद्या प्रदेशात विशिष्ट पिकासाठी अनुकूल हवामान व इतर पोषक परिस्थिती आढळून आली तर त्या प्रदेशात त्या विशिष्ट पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. देशांतर्गत उपभोगापेक्षा जादा उत्पादनाची व इतर बाजारपेठांत विक्री करून उत्पन्न मिळविले. इतकेच नव्हे तर केंद्रीकरण व विशेषीकरणामुळे विशिष्ट प्रदेश नावारूपाला येतात.

उदा. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील तासगांव तालुक्यात द्राक्षे तर सोलापूरातील सांगोला तालुक्यात डाळींब व कोकणात हापूस आंबा, काजू, नारळ ही पीके प्रामुख्याने घेतली जातात. अशा फळांची निर्यात घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापारास उत्तेजन मिळते. म्हणजेच अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रथम विशेषीकरण होते

आणि त्यानंतर केंद्रीकरण झालेले दिसते. त्यामुळे देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर अर्थव्यवस्था विकसित होतात.

**६) किमान उत्पादन खर्च :**

अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तूंचा उत्पादन खर्च कमीत कमी करण्यावर उत्पादकाचा भर असतो. एखाद्या वस्तूंचे उत्पादन एकाच देशातील दोन प्रदेशात किंवा दोन भिन्न-भिन्न देशात घेतले जात असेल तर तुलनात्मकरित्या उत्पादन खर्च कमी आहे. त्या ठिकाणी उत्पादन खर्च कमी होतो. कमीत कमी उत्पादन खर्च असणाऱ्या वस्तूचे उत्पादन केल्यास देशाला त्यांचे लाभ/फायदे होतात. म्हणून कमीत कमी उत्पादनखर्चाचे तत्व अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वाचे मानले जाते.

**७) किंमत यंत्रणा :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये किंमत यंत्रणेत महत्त्वाचे स्थान आहे. कोणत्या वस्तूचे उत्पादन घ्यावे, वस्तूचे उत्पादन किती घ्यावे आणि वस्तूचे उत्पादन कसे घ्यावे हे किंमत यंत्रणेद्वारे ठरते. वस्तूंची किंमत विचारात घेऊन ग्राहक वस्तू खरेदी करतो. उत्पादन आणि विक्रेते वस्तुंची किंमत विचारात घेऊन उत्पादन आणि निर्यातविषयक धोरण ठरविते म्हणून अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात किंमत यंत्रणेची भूमिका महत्त्वाची असते.

**८) ऐच्छिक व्यापार :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार ऐच्छिक असतो. या दोन्ही व्यापारात सक्ती नसते. वस्तूचे खरेदीवर व विक्रेते यांच्यामध्ये गरजेनुसार सहमतीने व्यापार चालतो.

**९) परस्परावलंबनातून सहकार्य :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापार करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था परस्परावलंबी असतात. खरेदीदार आणि विक्रेते हे दोन्ही पक्ष लाभाच्या दृष्टीनेच व्यापार करीत असले तरी दोघांमध्ये परस्परावलंबन असल्यानेच सहकार्याची भूमिका तयार होते.

**१०) आर्थिक सहकार्य :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आर्थिक सहकार्य प्रस्थापित करण्यावर भर दिला जातो. अंतर्गत व्यापारात देशातील व्यापारी व व्यापारविषयक संस्था अधिकाधिक सहकार्य वाढीस मदत करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध व्यापार गट, गॅट करार, जागतिक व्यापार संघटना, सार्क, अशियान आणि युरो बाजार यासारख्या संघटना आर्थिक व व्यापारवाढीस अधिक सहकार्य वाढविण्यावर भर देत आहेत. म्हणून काळानुसार अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत चालावा म्हणून विविध व्यापारविषयक करार केले जातात आणि त्यांचे काटेकोर पालन करून व्यापारवृद्धी आणि आर्थिक विकास केला जातो.

वरील सर्व मुद्दे विचारात घेतले असता अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये बऱ्याच गोष्टीमध्ये साम्य दिसून येते.

**अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक/भेद :**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. कारण आंतरराष्ट्रीय व्यापार हा दोन देशामध्ये होत असतो त्यामुळे अंतर्गत व्यापाराच्या तुलनेत आर्थिक, सामाजिक, भौगोलिक आणि राजकीय दृष्टीने भिन्न असतो. दोन देशातील चलन, व्यापारशर्ती, नैसर्गिक परिस्थिती, व्यापार धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या तुलनेमध्ये अंतर्गत व्यापारात अतिशय संकुचित असतो. म्हणून अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरकाचे खालील मुद्दे विचारात घेऊन विश्लेषण केले आहे.

**१) उत्पादन घटकांच्या गतीशीलतेत फरक :**

देशांतर्गत भागात जेवढे उत्पादन घटक गतिशील असतात तेवढे आंतरराष्ट्रीय पातळीवर नसतात. देशांतर्गत भागात उत्पादन घटक गतीशील असल्याने देशातील विविध प्रदेशात उत्पादन होणाऱ्या वस्तू व सेवांच्या उत्पादन खर्चात फारसा फरक राहत नाही. वेगवेगळ्या देशात विविध भाषा, चालीरिती, धर्म, कुटुंबप्रेम, देशप्रेम, आंतरराष्ट्रीय बंधने, कायदेशीर बंधने इत्यादी कारणांमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन घटक कमी गतीशील असतात. त्यामुळे एकसारख्या वस्तूचा उत्पादन खर्च वेगवेगळ्या देशात वेगळा येतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन घटकांची गतीशीलता वाढली आहे. परंतु प्रसंगानुरूप विविध देशांनी त्यावर अनेक बंधने घातली आहेत. उत्पादन घटकांच्या गतिशीलतेमध्ये फरक पडल्यामुळे विविध देशातील एकाच वस्तूच्या उत्पादन खर्चामध्ये फरक पडतो. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा स्वतंत्रपणे अभ्यास करावा लागतो.

**२) नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीत फरक :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक हा प्रामुख्याने विविध देशांच्या नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीतील फरकामुळे निर्माण होतो. जगातील विविध देशांना लाभलेले नैसर्गिक, भौगोलिक स्थान, हवामान, वातावरण, पर्जन्यमान, खनिजे, मातीचा प्रकार, मातीची उत्पादकता, सपाटी भाग, डोंगराळ भाग आणि जलसिंचनाची उपलब्धता याबाबतीत फरक असतो. देशाची भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती विचारात घेऊन विशिष्ट देश वस्तू व सेवांच्या उत्पादनामध्ये विशेषीकरण करतो.

उदा. भारतात मनुष्यबळ मुबलक आहे तर भांडवलाची टंचाई आहे. याउलट अमेरिकेमध्ये भांडवल मुबलक आहे तर मनुष्यबळाची टंचाई आहे. भारतामध्ये श्रमप्रधान वस्तूचे उत्पादनात तर अमेरिकेमध्ये भांडवलप्रधान वस्तूचे उत्पादनामध्ये विशेषीकरण केले जाते. ज्या वस्तूचा उत्पादन खर्च कमी आहे त्या वस्तूचे उत्पादन घेऊन निर्यात केली जाते आणि परकीय चलन मिळविले जाते. ज्या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त असतो त्या वस्तूंची आयात केली जाते.

**३) उत्पादन तंत्र व भांडवली संसाधनातील फरक :**

अंतर्गत व्यापारात उत्पादन तंत्र आणि भांडवली साधने एकसारखी असतात. मात्र विविध देशामध्ये उत्पादन तंत्र आणि भांडवली साधनाची स्थिती भिन्न असते. विकसित देशांमध्ये आधुनिक उत्पादनतंत्र आणि स्वस्त व मुबलक भांडवलपुरवठा उपलब्ध असतो. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रमाची बचत होऊन कमी उत्पादन खर्चामध्ये दर्जेदार उत्पादन होते. परंतु अविकसित देशांमध्ये तंत्रज्ञान आणि भांडवलाची कमतरता असते त्यामुळे वस्तूच्या उत्पादनात अडथळे येतात. त्यामुळे अविकसित देशांना विकसित देशांवर अवलंबून राहावे लागते. विविध देशामधील उत्पादन तंत्र आणि भांडवली साधनामधील फरकामुळे उत्पादन खर्च आणि दर्जामध्ये फरक निर्माण होतो. म्हणून अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक निर्माण होतो.

**४) नियंत्रणे व निर्बंधाचे स्वरूप :**

अंतर्गत व्यापारामध्ये कमी व लवचिक स्वरूपाचे निर्बंध आणि नियंत्रणे असतात. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अनेक बंधने असतात. प्रत्येक देशाचे आयात निर्यातीबाबतचे धोरण वेगळे असतात. अंतर्गत व्यापारामध्ये स्वदेशी उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण आखले जाते. अलिकडच्या काळामध्ये जागतिक व्यापार संघटना व सार्क संघटना यासारख्या संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. आयात-निर्यात परवाना, जकात व कोटा पद्धती, निर्यात सवलती अशा धोरणांमुळे अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक करावा लागतो.

**५) भिन्न बाजारपेठा :**

अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारातील बाजारपेठांचे स्वरूप भिन्न-भिन्न असते. अंतर्गत व्यापारातील बाजारपेठेमध्ये भाषा, चालीरिती, परंपरा, वजनमापे, व्यापारविषयक कायदे व आवडी-निवडी इत्यादी बाबतीत सुसूत्रता आढळते. तर आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये विविध देशामध्ये भाषा, चालीरिती, परंपरा, आवडी-निवडी, उपभोग प्रवृत्ती, मालाचा दर्जा, किंमत, वजनमापे, कायदे आणि आयात-निर्यातीचा कोटा याबाबतीत फरक असतो. त्यानुसार प्रत्येक देशात व्यापाराची नियमावली तयार केली जाते. त्या नियमावलीनुसार व्यापार केला जातो. त्यामुळे अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक करणे गरजेचे आहे.

**६) सरकारी धोरणामधील फरक :**

अंतर्गत व्यापारात आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सरकारच्या व्यापारविषयक धोरणाचा अधिक प्रभाव पडतो. अंतर्गत व्यापारविषयक धोरण ठरविताना सरकार कामगारांचे वेतन व आनुषांगिक लाभ, करविषयक धोरण, व्यापारविषयक सवलती, आर्थिक धोरणविषयक बाबी निश्चित करीत असते. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक व्यापारामधील सरकारी धोरणामध्ये प्रामुख्याने उत्पादनाचे स्वरूप, उत्पादन खर्च, बाजारपेठा मिळविण्याची स्पर्धा, डंपींग, जकाती, कोटा या सारख्या गोष्टींचा विचार केला जातो. त्यामुळे अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक केला जातो.

**७) चलन भिन्नता :**

अंतर्गत व्यापार फक्त एकाच चलनामध्ये चालतो. मात्र आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये विविध चलनांचा वापर केला जातो. प्रत्येक देशाचे चलन वेगवेगळे असते. उदा. भारतात रूपया, इंग्लंडमध्ये पौंड, अमेरिकेत डॉलर, जपानमध्ये येन आणि चीनमध्ये युआन इत्यादी. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये चलन विविधता असल्यामुळे किंमती ठरविताना गुंतागुंत निर्माण होते. आंतरराष्ट्रीय व्यापार करताना प्रत्येक देशाला आपल्या चलनाचा दुसऱ्या देशाच्या चलनासंदर्भात विनिमय ठरवावा लागतो. त्याचबरोबर प्रत्येक देशाचे चलनविषयक धोरण व चलनपद्धती वेगवेगळी असते. त्यामुळे अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक निर्माण होतो.

**८) वाहतूक खर्चातील फरक :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्यासाठी वाहतूक खर्च करावा लागतो. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वाहतूक खर्च भिन्न-भिन्न असतो. अंतर्गत व्यापारातील वाहतूक खर्च हा आंतरराष्ट्रीय व्यपाराच्या तुलनेमध्ये कमी असतो. वाहतूकीचे अंतर, वाहतुकीचे नियम व कर यांचा वाहतूक खर्चावर परिणाम होतो. अंतर्गत व्यापाराच्या तुलनेमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारात धोक्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाहतूक खर्च वाढतो.

**९) उत्पादन खर्चातील फरक :**

अंतर्गत व्यापारात विविध प्रदेशात एकाच वस्तूच्या उत्पादन खर्चात फारसा फरक नसतो. विविध देशातील नैसर्गिक व भौगोलिक स्थिती, हवामान, वातावरण, तंत्रज्ञान, पर्जन्यमान, जमिनीची सुपीकता आणि उत्पादन घटकांची उपलब्धता इत्यादी कारणामुळे एका प्रकारच्या वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक निर्माण होतो. त्यामुळे अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील उत्पादन खर्चामध्ये फरक निर्माण होतो

**१०) व्यापारापासून मिळणाऱ्या लाभात फरक :**

अंतर्गत व्यापारापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापारातून मिळणाऱ्या लाभांचे प्रमाण अधिक असते. म्हणून विशेषीकरण आणि उत्पादन खर्च कमी ठेवून प्रत्येक देश निर्यात वाढीसाठी उत्पादनात वाढ करतो. विशिष्ट वस्तूंची आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी व मागणीची लवचिकता विचारात घेऊन निर्यातदार देश आयातदार देशांचे शोषण करतात. अशाप्रकारे लाभ अंतर्गत व्यापारात निर्माण होत नाहीत. म्हणून अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक निर्माण होतो.

वरील घटकांव्यतिरिक्त राजकीय प्रणाली, व्यवहाराचे स्वरूप, व्यापारी कायदे, व्यापारविषयक धोरण या घटकांचा विचार करता अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये फरक निर्माण होतो.

### १.२.३ रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत :

ॲडम स्मिथ यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मूळ सिद्धांत मांडला. ॲडम स्मिथ यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताला शास्त्रीय बैठक देण्याचे काम डेव्हिड रिकार्डो यांनी केले. डेव्हिड रिकार्डो यांनी सन

१८१७ मध्ये लिहिलेल्या 'Principles of Political Economy' या पुस्तकात तुलनात्मक उत्पादन खर्चाचा सिद्धांत मांडला. या सिद्धांतालाच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातनवादी सिद्धांत म्हणतात. या सिद्धांतामध्ये जे. एस. मिल, केन्स, बॅस्टेबल, प्रा. टॉसिंग, प्रा. हॅबर्लर यांनी सुधारणा केल्या. रिकार्डोच्या मते, दोन देशामध्ये व्यापार निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण त्या देशांमध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनखर्चातील तुलनात्मक फरक होय. ॲडम स्मिथने आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताची मांडणी करताना निरपेक्ष खर्च तत्वाचा वापर केला. त्यामध्ये सुधारणा करून रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च-लाभ तत्वांचा वापर करून आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत मांडला. रिकार्डोच्या मते, ज्या वस्तूचा तुलनात्मक उत्पादन खर्च कमी आहे, त्या वस्तूच्या उत्पादनात वाढ करून निर्यात करावी आणि ज्या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे त्या वस्तूची आयात करावी.

**गृहीते :**

१) दोन देश आणि दोन वस्तूचे उत्पादन केले जाते.

२) श्रम हाच एकमेव उत्पादनाचा घटक असतो. श्रम एकजिनसी असतात.

३) आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वाहतूक खर्च नसतो.

४) श्रम व्यापार आणि वस्तू बाजारामध्ये पूर्ण स्पर्धा असते.

५) दोन्ही देशामध्ये खुल्या व्यापारी धोरणाचा स्वीकार केला जातो.

६) उत्पादन घटक देशात गतिशील असतात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गतिहीन असतात.

७) दोन्ही देशामध्ये पूर्ण रोजगार असतो.

८) दोन्ही देश आर्थिकदृष्ट्या समान पातळीवर असतात.

९) दोन्ही देशातील दोन्ही वस्तूच्या उत्पादनात स्थिर उत्पादन फलाचा अनुभव येतो.

१०) उत्पादन तंत्रात बदल होत नाही.

११) दोन्ही देशातील दोन्ही वस्तूंची मागणी स्थिर असते.

डेव्हिड रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांताची मांडणी करताना वस्तूंच्या उत्पादनासाठी येणाऱ्या श्रमखर्चाचाच प्रामुख्याने विचार केला आहे. रिकार्डोच्या मते, जगातील विविध देशाच्या उत्पादन घटकांमध्ये विविधता आढळते. देशाच्या लोकसंख्येच्या आकारमानावर श्रमाची उपलब्धता अवलंबून असते. उत्पादन घटकाच्या उपलब्धतेनुसार वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक आढळून येतो. भौगोलिक श्रमविभागणीच्या तंत्राचा अवलंब केला असता आंतरराष्ट्रीय व्यापाराची निर्मिती होऊन त्यांचे लाभ मिळतात.

रिकार्डोच्या मते, दोन्ही देशामधील वस्तूंच्या उत्पादन खर्चाबाबतीत तीन पद्धती किंवा प्रकार आढळून येतात. उत्पादन खर्चातील समान फरक, उत्पादन खर्चातील निरपेक्ष फरक आणि उत्पादन खर्चातील तुलनात्मक

फरक हे आहेत. त्यांचा खालीलप्रमाणे सविस्तर अभ्यास करू.

**१) उत्पादन खर्चात समान फरक :**

ज्यावेळी दोन्ही देशातील उत्पादित वस्तूंच्या उत्पादन खर्चात समान फरक असतो. तेव्हा कोणत्याही देशाला लाभ होत नसल्याने आंतरराष्ट्रीय व्यापार होत नाही. खालील तक्त्यामध्ये याचे विश्लेषण केले आहे.

| देश | उत्पादन खर्च | तांदूळ (क्विंटल) | गहू (क्विंटल) | उत्पादन खर्च गुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| भारत | ५० श्रम दिवस | १० | ५ | २:१ |
| श्रीलंका | ५० श्रम दिवस | ८ | ४ | २:१ |

वरील कोष्टकातील उदाहरणामध्ये ५० श्रम दिवस उत्पादन खर्चामध्ये भारतात १० क्विंटल तांदूळ किंवा ५ क्विंटल गहू उत्पादन होते. तर श्रीलंका देशात ५० श्रम दिवसाच्या उत्पादन खर्चामध्ये ८ क्विंटल तांदूळ किंवा ४ क्विंटल गव्हाचे उत्पादन होते. भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशांमध्ये उत्पादन खर्च गुणोत्तर २:१ आहे. दोन्ही देशाचे उत्पादन खर्च गुणोत्तर समान असल्यामुळे व्यापारातून कोणालाही लाभ होणार नाही त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार होणार नाही.

**२) उत्पादन खर्चात निरपेक्ष फरक :**

एखाद्या देशाला एका वस्तूच्या उत्पादनात दुसऱ्या देशापेक्षा तुलनेने निरपेक्ष लाभ होतो आणि दुसऱ्या देशाला दुसऱ्या वस्तूच्या उत्पादनात निरपेक्ष लाभ होतो. अशावेळी दोन्ही देशात व्यापार सुरू होतो. खालील कोष्टकाच्या आधारे विश्लेषण करू.

| देश | उत्पादन खर्च | तांदूळ (क्विंटल) | गहू (क्विंटल) | उत्पादन खर्च गुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| भारत | ५० श्रम दिवस | १० | ५ | १:१/२ |
| श्रीलंका | ५० श्रम दिवस | ५ | १० | १:२ |

वरील कोष्टकातील उदाहरणामध्ये ५० श्रम दिवस उत्पादन खर्चामध्ये भारतात १० क्विंटल तांदूळ किंवा ५ क्विंटल गव्हाचे उत्पादन होते. तर श्रीलंकेमध्ये ५० श्रम दिवसाच्या उत्पादन खर्चामध्ये ५ क्विंटल तांदूळ किंवा १० क्विंटल गव्हाचे उत्पादन होते. भारतातील उत्पादन-खर्च गुणोत्तर १ क्विंटल तांदूळ = १/२ क्विंटल गहू तर श्रीलंकेमधील १ क्विंटल तांदूळ = २ क्विंटल गहू आहे. तांदूळ आणि गहू उत्पादनातील दोन देशातील उत्पादन

खर्चात निरपेक्ष फरक आहे. म्हणून दोन्ही देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येईल.

**३) उत्पादन खर्चात तुलनात्मक फरक :**

जेव्हा एखाद्या वस्तूच्या उत्पादनामुळे विशिष्ट देशाला तुलनात्मक लाभ होतो. म्हणजे इतर देशांच्या तुलनेमध्ये ज्या वस्तूच्या उत्पादनाचा खर्च स्वदेशात कमी होतो. अशा वस्तूचे उत्पादन वाढवून निर्यात करावी. इतर देशांच्या तुलनेमध्ये ज्या वस्तूंचा उत्पादन खर्च जास्त येतो. त्या वस्तूची आयात करावी. अशावेळी दोन्ही देशांना आंतरराष्ट्रीय व्यापाराचा फायदा होतो. खालील कोष्टकाच्या साह्याने विश्लेषण करून स्पष्टीकरण करू.

| देश | उत्पादन खर्च | तांदूळ (क्विंटल) | गहू (क्विंटल) | उत्पादन खर्च गुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| भारत | ५० श्रम दिवस | २० | २० | १:१ |
| श्रीलंका | ५० श्रम दिवस | १० | २० | १:२ |

वरील कोष्टकातील उदाहरणामध्ये ५० श्रम दिवस उत्पादन खर्चामध्ये भारतात २० क्विंटल तांदूळ किंवा २० क्विंटल गव्हाचे उत्पादन होते. तर श्रीलंकेमध्ये ५० श्रम दिवसाच्या उत्पादन खर्चामध्ये १० क्विंटल तांदूळ किंवा २० क्विंटल गव्हाचे उत्पादन होते. भारतातील उत्पादन-खर्च गुणोत्तर १ क्विंटल तांदूळ = १ क्विंटल गहू आहे तर श्रीलंकेमधील १ क्विंटल तांदूळ = २ क्विंटल गहू आहे. तांदूळ आणि गहू उत्पादनातील दोन्ही देशातील उत्पादन खर्चात तुलनात्मक फरक आहे. म्हणून दोन्ही देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येईल. भारताने तांदूळ उत्पादन व श्रीलंकेने गहू उत्पादनावर आपले लक्ष केंद्रित केल्यास दोन्ही देशांना कमी उत्पादन खर्चात तांदूळ आणि गहू उत्पादन घेणे किफायतशीर ठरेल. कारण तुलनात्मक उत्पादन खर्चाचा विचार करता भारताचा दर एकरी तांदळाचा उत्पादन खर्च कमी असून श्रीलंकेचा गव्हाचा उत्पादन खर्च कमी आहे. म्हणून भारताने तांदळाचे उत्पादन व श्रीलंकेने गहू पिकाचे उत्पादन घेतले तर दोन्ही देशांना ते लाभदायक ठरेल. भारताने तांदळाचे उत्पादन महत्तम प्रमाणात घेऊन गरजेपेक्षा अधिक तांदळाची श्रीलंकेला निर्यात करावी व त्या मोबदल्यात श्रीलंकेकडून गहू आयात केल्यास दोन देशात व्यापार सुरू होऊन तो लाभदायक ठरेल .

**टिकात्मक परीक्षण :**

रिकार्डोने आपला तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत वरीलप्रमाणे मांडला असला तरी या सिद्धांतामध्ये अनेक उणिवा आढळून येतात. या सिद्धांतावर करण्यात येणाऱ्या टीका पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

**१) श्रमखर्चाचे अवास्तव गृहीत :**

रिकार्डोचा तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत हा मूलत: श्रममूल्य खर्चावर आधारीत आहे. तथापि वस्तूच्या उत्पादन खर्चाची गणना करताना केवळ श्रम हा घटक विचारात घेऊन चालत नाही तर इतर उत्पादन घटकांचाही विचार करावा लागतो. रिकार्डोने केवळ श्रमखर्चाचा विचार या सिद्धांतात केला असल्याने तो अव्यवहार्य आहे.

**२) उत्पादन घटकांच्या गतिशीलतेचे गृहीत :**

टीकाकारांच्या मते, उत्पादनाचे सर्व घटक देशांतर्गत दृष्टीनेही पूर्णत: गतिशील नसतात. भारतासारख्या खंडप्राय देशात मजूर एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात किंवा एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात सहजासहजी जाण्यास तयार नसतो. त्यामुळे सदोष गृहीतावर आधारीत असा हा सिद्धांत अव्यवहार्य आहे.

**३) स्थिर उत्पादन फलाचे गृहीत :**

रिकार्डोने आपल्या सिद्धांताची मांडणी करताना श्रम हा उत्पादन घटक वापरात आणताना स्थिर उत्पादन फलाचा अनुभव येतो असे गृहीत धरले आहे. परंतु आधुनिक काळामध्ये उत्पादन क्षेत्रात स्थिर उत्पादन फलाबरोबर वाढत्या आणि घटत्या उत्पादन फलाचा नियम अनुभवास येतो. ही गोष्ट रिकार्डोने लक्षात घेतलेली नाही. त्यामुळे या सिद्धांताचे महत्त्व मर्यादित झाले आहे.

**४) वाहतूक खर्चाकडे दुर्लक्ष :**

रिकार्डोच्या मते, उत्पादन क्षेत्रात वाहतूक खर्च फारसा महत्त्वाचा नसतो. तथापि सद्य:स्थितीत कोणत्याही वस्तूंच्या उत्पादन खर्चाची मोजणी करताना 'वाहतूक खर्च' महत्त्वाचा ठरतो. इतकेच नव्हे तर वाहतूक खर्चातील बदलांमुळे उत्पादन खर्चात बदल होऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकारही त्या प्रमाणात बदलू शकतो. ही बाब रिकार्डोने लक्षात घेतली नाही.

**५) पूर्ण रोजगाराचे अव्यवहार्य गृहीत :**

रिकार्डोने आपल्या सिद्धांतात दोन देशात पूर्ण रोजगार असतो हे गृहीत धरले आहे. तथापि आज जगातील कोणत्याही देशात पूर्ण रोजगाराची परिस्थिती आढळून येत नाही. ही बाब सिद्धांताची व्यवहार्यता मर्यादित करते.

**६) पूर्ण स्पर्धेचे अवास्तव गृहीत :**

रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत वस्तू व घटक बाजारात पूर्ण स्पधा असते या गृहीतावर आधारीत आहे. तथापि सध्या जगातील कोणत्याही अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धेचे अस्तित्त्व आढळून येत नाही. त्यामुळे अपूर्ण अथवा मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या आजच्या काळात हा सिद्धांत निरूपयोगी ठरतो.

**७) उत्पादन तंत्रतील बदलांकडे दुर्लक्ष :**

रिकार्डोने तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांतात दोन देशातील उत्पादन तंत्रात बदल होत नाहीत असे गृहीत धरले आहे. मात्र आधुनिक काळात २१ वे शतक हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे शतक मानले जाते. त्यामुळे तंत्रज्ञानातील बदल हे सातत्याने घडून येतात. त्याचा परिणाम उत्पादन खर्चावर होऊन तुलनात्मक खर्चाची पातळी बदलते. या बाबीकडे रिकार्डोने दुर्लक्ष केले.

**८) मुक्त व्यापार धोरणाच्या मर्यादा :**

रिकार्डोने आपल्या सिद्धांत मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन केले आहे. परंतु आधुनिक काळामध्ये जगात जागतिक व्यापार संघटना, सार्क, जी- ८, जी- २० देशांनी व्यापार विषयक धोरणामध्ये विविध नियम तयार केले आहेत त्यांचे पालन सभासद देशांना करणे बंधनकारक आहे. म्हणजेच २१ व्या शतकामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार हा पूर्णपणे मुक्त राहिलेला नाही. या बाबीकडे रिकार्डोने दुर्लक्ष केले आहे.

**९) दोन देशांची आर्थिक स्थिती :**

दोन देश आर्थिकदृष्ट्या समान पातळीवर असतात. या गृहीतावर रिकार्डोने आपला सिद्धांत मांडला आहे. तथापि कोणतेही दोन देश समान आर्थिक परिस्थितीत नसतात. त्यामुळे उत्पादन खर्चातील तफावत व मागणीची लवचिकता या दोन देशात व्यापारविषयक आकारमान निश्चित करणाऱ्या घटकांकडे दुर्लक्ष करून चालत नाहीत. ही बाब रिकार्डोने लक्षात घेतलेली दिसून येत नाही.

अशाप्रकारे रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांतावर जरी वरीलप्रमाणे अनेक टीका करण्यात येत असल्या तरी दोन देशातील तुलनात्मक खर्च आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या निर्मितीस चालना देतो ही बाब आपणास दुर्लक्षिता येणार नाही.

**१.२.४ हेकश्चर-ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत :**

रिकार्डो यांनी मांडलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतामध्ये अनेक दोष होते. हेकश्चर आहेलीन सिद्धांत हा रिकार्डोचा सिद्धांत नाकारत नाही. मात्र त्यातील दोष दूर करून त्यास पूरक विश्लेषण करतो. रिकार्डोच्या सिद्धांतामध्ये दोन देशातील वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक का होतो याचे उत्तर मिळत नाही. परंतु हेकश्चर-ओहलिन सिद्धांतात ते मिळते. सन १९३३ मध्ये बर्टिल ओहलिन यांनी "Inter-regional and International Trade" हा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. या ग्रंथात हा सिद्धांत मांडला. परंतु या सिद्धांताची मूळ कल्पना अर्थशास्त्रज्ञ हेकश्चर यांनी लिहिलेल्या "The Effect on foreign Trade on Distribution of Income" या लेखात मांडली होती. म्हणून या सिद्धांताला हेकश्चर-ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत असे म्हणतात. ऑस्ट्रियन पंथियांनी लिहिलेल्या मूल्य सिद्धांताच्या साहाय्याने अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्पष्टीकरण करता येते असे ओहलिनचे मत होते. या सिद्धांताला आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिद्धांत, सामान्य संतुलन सिद्धांत, परस्परावलंबित्व सिद्धांत, उत्पादन घटक विपुलता सिद्धांत, उत्पादन घटक प्रमाणाचा सिद्धांत आणि हेकश्चर-ओहलिन प्रमेय म्हणतात.

''जो देश भांडवलप्रधान असतो तो देश भांडवलप्रधान वस्तूची निर्यात करतो आणि जो देश श्रमप्रधान असतो तो देश श्रमप्रधान वस्तूची निर्यात करतो.''

**गृहीते :**

१) २x२x२ प्रतिमान आहे. (दोन देश, दोन वस्तू आणि दोन उत्पादन घटक)

२) वस्तू आणि उत्पादन घटक बाजारामध्ये पूर्ण स्पर्धा असते.

३) उत्पादन घटक बाजारात पूर्ण रोजगार असतो.

४) विविध प्रदेशामध्ये उत्पादन घटक संपन्नतेमध्ये संख्यात्मक भिन्नता असते. परंतु गुणात्मक भिन्नता नसते म्हणजेच उत्पादन घटक एकजिनसी असतात.

५) दोन वस्तूच्या उत्पादन फलनामध्ये उत्पादन घटकाची भिन्न-भिन्न गरज असते.

६) वेगवेगळ्या वस्तूचे उत्पादन फलन वेगवेगळे असते. परंतु दोन्ही देशात एका वस्तूचे उत्पादनफलन एकच असते.

७) देशांतर्गत उत्पादनघटक गतिशील असतात परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर गतिहीन असतात.

८) आंतरराष्ट्रीय व्यापारात वाहतूक खर्च नसतो.

९) आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या दोन्ही देशात मुक्त व्यापार धोरण असते.

१०) दोन्ही देशात वस्तूच्या उत्पादनात स्थिर उत्पादन फलाचा नियम लागू पडतो.

११) दोन्ही देशात उपभोक्त्याची मागणी, आवडी-निवडी, सवय आणि चव समान आहेत.

१२) स्थिर तांत्रिक प्रगती असते.

१३) वस्तू उत्पादनातील उत्पादन घटकाची गरज स्थिर असते त्यात बदल होत नाही.

हेकश्चर ओहलिन यांनी दोन देशातील वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक असण्याची पुढील दोन कारणे सांगितली आहेत.

**१) उत्पादन घटकांच्या किंमतीत सापेक्ष फरक :**

अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उत्पादन खर्च गुणोत्तरात फरक असण्याचे पहिले कारण म्हणजे उत्पादन घटकांच्या किंमतीत असणारा सापेक्ष फरक हे आहे. वेगवेगळ्या देशात भूमी, श्रम आणि भांडवल या उत्पादन घटकांच्या किंमती भिन्न-भिन्न असतात. उत्पादन घटकांच्या किंमती भिन्न-भिन्न असण्याचे कारण म्हणजे उत्पादन घटकाची सापेक्ष विपुलता आणि दुर्मिळता आहे. उदा. भारतात श्रम विपुल आहेत म्हणून भारतात श्रमस्वस्त आहेत तर अमेरिकेत भांडवल विपुल आहेत म्हणून तेथे भांडवल स्वस्त आहे आणि श्रम महाग आहेत.

**२) उत्पादन घटकांच्या गरजांमध्ये फरक :**

आंतरराष्ट्रीय उत्पादन खर्च गुणोत्तरात फरक असण्याचे दुसरे कारण म्हणजे उत्पादन घटकांच्या गरजांमध्ये फरक हे आहे. अन्नधान्याच्या उत्पादनाकरिता जमिनीच्या जास्त भागाची गरज असते तर त्यातुलनेत भांडवलाची गरज कमी असते. याउलट औद्योगिक उत्पादनाकरिता भांडवलाची गरज जास्त असते तर जमिनीची गरज कमी

असते. अशाप्रकारे वस्तूंच्या उत्पादनाकरिता उत्पादन घटकांची गरज भिन्न-भिन्न असते.

वरील दोन कारणांमुळे दोन देशातील दोन वस्तूंच्या विनिमय गुणोत्तरात फरक असतो.

**घटक घनता –**

हेकश्चर-ओहलिन सिद्धांतामध्ये दोन वस्तूंपैकी एका वस्तूचे उत्पादन श्रमप्रधान आणि दुसरी वस्तू भांडवलप्रधान असते.

**कोष्टक – १**

**दर एकक/नग उत्पादनासाठी वापरलेली आदाने**

| वस्तू | श्रम | भांडवल | भांडवल श्रम गुणोत्तर |
|---|---|---|---|
| अन्नधान्य | ८ | २ | १:४ |
| कापड | ४ | ८ | १:१/२ |

वरील कोष्टकात अन्नधान्याच्या एका नगाचे उत्पादन करण्यासाठी ८ नग श्रम आणि २ नग भांडवलाची गरज असते. कापडाच्या एका नगाचे उत्पादन करण्यासाठी ४ नग श्रम आणि ८ नग भांडवलाची गरज असते. अन्नधान्य उत्पादनासाठी भांडवलाच्या तुलनेमध्ये श्रम हा घटक जास्त वापराला जातो. अन्नधान्य उत्पादनासाठी १ नग भांडवलाबरोबर ४ नग श्रम वापरले जातात. म्हणून अन्नधान्य उत्पादन श्रमप्रधान आहे. कापड उत्पादनासाठी श्रमाच्या तुलनेमध्ये भांडवल हा घटक जास्त वापरला जातो. कापड उत्पादनासाठी १ नग भांडवलाबरोबर १/२ नग श्रम वापरले जाते. म्हणून कापड उत्पादन भांडवलप्रधान आहे.

**घटक विपुलता (Factor Abundance) :**

एखाद्या देशाला उत्पादन घटकांची नैसर्गिक देणगी विपुलतेने मिळते. उत्पादनघटकांच्या भौतिक विपुलता आणि आर्थिक विपुलता असे दोन प्रकार विपुलतेचे आहेत.

**१) उत्पादन घटकांची भौतिक विपुलता :**

विविध देशामधील प्रत्येक उत्पादन घटकाच्या भौतिक संख्येची तुलना करून दोन देशांची सापेक्ष घटक विपुलता जेव्हा व्यक्त केली जाते तेव्हा ती भौतिक विपुलता असते. उदाहरणार्थ. भारतामध्ये दर नग भांडवलामागे श्रमाची उपलब्धता अमेरिकेतील भांडवल श्रम गुणोत्तरापेक्षा अधिक असेल तर भारतामध्ये अमेरिकेच्या तुलनेत श्रमाची विपुलता आहे. भौतिक विपुलता ही भांडवल-श्रम गुणोत्तरावर अवलंबून असते.

**२) उत्पादन घटकांची आर्थिक विपुलता :**


वेतन-नफादराची तुलना करून आर्थिक विपुलता ठरविली जाते. जर भारतामधील वेतन-नफा दर

अमेरिकेतील वेतन–नफादरापेक्षा कमी असेल तर भारतामध्ये श्रम हा उत्पादन घटक अधिक स्वस्त आहे तसेच भारतामध्ये श्रम हा उत्पादनघटक आर्थिकदृष्ट्या विपुलतेने उपलब्ध आहे.

**हेकश्चर–ओहलिन सिद्धांताची मांडणी :**

एखाद्या देशामध्ये जो उत्पादन घटक विपुलतेने उपलब्ध असेल तो उत्पादन घटक जास्त वापरून उत्पादन केलेल्या वस्तूची निर्यात केली जाते. कारण एखाद्या देशामध्ये ज्या उत्पादन घटकात विपुलता आहे त्या उत्पादन घटकाचा जास्त वापर करून वस्तूचे उत्पादन केले जाते त्या वस्तू उत्पादनात देशाला तौलनिक लाभ मिळतात.

**आकृतीच्या साह्याने स्पष्टीकरण –**





वरील आकृतीमध्ये भांडवलाची विपुलता असलेला देश भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करतो आणि श्रमप्रधान वस्तूंची आयात करतो. श्रमाची विपुलता असलेला देश भांडवलाची विपुलता असलेल्या देशाकडून भांडवलप्रधान वस्तूंची आयात करतो आणि श्रमप्रधान वस्तूंची निर्यात करतो.

**उत्पादन घटकांच्या किंमतीच्या साह्याने घटक विपुलतेचे विश्लेषण :**

हेकश्चर–ओहलिन सिद्धांतामधील गृहितानुसार अमेरिका देशात भांडवल तुलनेने स्वस्त असेल तर अमेरिका देश भांडवलाची विपुलता असलेला देश आहे. भारतामध्ये श्रम तुलनेने स्वस्त असतील तर भारत देश श्रम विपुलता असलेला देश आहे. ज्या देशात ज्या घटकांची विपुलता आहे. त्या घटकाचा जास्त वापर करून उत्पादन केलेली वस्तू तो देश निर्यात करतो. हे आपण पुढील आकृतीच्या साह्याने स्पष्ट करू.

**आकृतीच्या साह्याने स्पष्टीकरण –**




**अमेरिका आणि भारतामधील कापडाचे उत्पादन :**

वरील आकृतीमध्ये अक्ष अक्षावर श्रम आणि अय अक्षावर भांडवल मोजले आहे. ‘अअ’ आणि ‘बब’ हे दोन समउत्पादन वक्र आहेत. ‘$क_{०}क_{०}$’ ‘$क_{१}क_{१}$’ आणि ‘$क_{२}क_{२}$’ या किंमतरेषा आहेत. ‘अअ’ या समउत्पादन वक्रावर भांडवल आणि श्रमाच्या नगाचे विविध संयोग वापरले असता एक नग कापडाचे उत्पादन होते तर ‘बब’ या समउत्पादन वक्रावर भांडवल व श्रमाच्या विविध नगाचा वापर केला असता एक नग अन्नधान्याचे उत्पादन होते. ‘$क_{०}क_{०}$’ ही अमेरिका देशामधील सापेक्ष घटक किमती दाखविणारी घटक किंमतरेषा आहे. या घटक किंमत रेषेच्या उतारावरून असे दिसून येते की, अमेरिकेमध्ये भांडवल हा घटक श्रमाच्या तुलनेमध्ये स्वस्त आहे. ‘अअ’ हा समउत्पादन वक्र कापडाच्या एका नगाचे उत्पादन करतो असे गृहीत धरले आहे. या स्थितीत एक नग कापड उत्पादनासाठी श्रमाच्या ‘अभ’ तर भांडवलाच्या ‘अय’ एवढ्या नगाचा वापर अमेरिकेत केला जाईल. घटक किंमत रेषा ‘$क_{०}क_{०}$’ दाखवते की ‘अथ’ इतक्या भांडवलाच्या नगाचे मूल्य ‘अभ’ इतक्या श्रमाच्या नगांएवढे आहे.

भारतात देखील तंत्रज्ञानाची पातळी समान असल्याने या समउत्पादन वक्राने दर्शविलेल्या कापडाच्या एका नगाच्या उत्पादनात ‘क१क१’ या किंमत रेषेस ‘इ’ बिंदूपाशी उत्पादन केले जाईल. भारतात भांडवल हा घटक श्रमाच्या तुलनेत महाग आहे. हे ‘क१क१’ किंमरेषेवरून दिसून येते.

**अमेरिका आणि भारत देशातील अन्नधान्याचे उत्पादन :**

अन्नधान्याच्या एका नगाचे उत्पादन दाखविणारा समउत्पादन वक्र ‘बब’ हा आहे. अन्नधान्य ही वस्तू कापडाच्या तुलनेत श्रमप्रधान असल्याचे समउत्पादन वक्राच्या स्थितीवरून दिसून येते.

अमेरिकेमध्ये घटक किंमत रेषा ‘$क_{०}क_{०}$’ ही ज्या बिंदूत ‘बब’ या समउत्पादन वक्रास स्पर्श करते त्याठिकाणी अमेरिका अन्नधान्य उत्पादन करेल. भारत देशाची ‘$क_{१}क_{१}$’ किंमतरेषा आहे. तिला समांतर असणारी ‘$क_{२}क_{२}$’ ही किंमतरेषा काढली आहे. ती ‘बब’ समउत्पादन वक्राला स्पर्श करते. या बिंदूवरून भारतात ‘$अय_{१}$’ भांडवलाच्या आणि ‘$अक्ष_{१}$’ श्रमाच्या मात्रा वापरून ‘फ’ बिंदूत एक नग कापडाचे उत्पादन केले जाते.

**अमेरिकेमधील भांडवल आणि श्रमाच्या सापेक्ष किमती :**

अमेरिकेमधील भांडवल व श्रमाच्या सापेक्ष किंमती ‘$क_{०}क_{०}$’ या घटक किंमतरेषेवरून समजतील. त्यानुसार अमेरिकेमध्ये ‘अप’ भांडवलाच्या नगाचे मूल्य ‘$अक्ष_{१}$’ श्रमाएवढे आहे.

भारतात ‘अत’ भांडवल उत्पादन मूल्य ‘अन’ श्रमाच्या नगा एवढे आहे. १ नग कापड उत्पादनाचा भारतामधील खर्च भांडवलाच्या संदर्भात ‘अत’ एवढा आहे. भांडवलाच्या नगात जर १ नग कापडाचा भारतामधील उत्पादन खर्च मोजला तर ‘अट’ इतका असेल.

भारतामध्ये अत > अट किंवा (भांडवलाच्या नगातील कापडाचा उत्पादन खर्च) > (भांडवलाच्या नगातील अन्नधान्याचा उत्पादन खर्च)

म्हणून भारतात अन्नधान्याच्या उत्पादनात विशेषीकरण करून अन्नधान्याची निर्यात केली जाईल.


एक नग कापडाच्या उत्पादनाचा भांडवलाच्या संदर्भातील उत्पादन खर्च ‘अप’ एवढा असेल आणि एक नग अन्नधान्याच्या उत्पादनाचा भांडवलाच्या संदर्भातील उत्पादन खर्च देखील तेवढाच असेल.

उत्पादन घटकांच्या सापेक्ष किंमती विचारात घेतल्या असता भांडवल हा घटक अमेरिकेमध्ये भारतापेक्षा स्वस्त आहे. म्हणून अमेरिकेमध्ये कापडाचे उत्पादन करणे सापेक्षतेने स्वस्त आहे. तर अन्नधान्याचे उत्पादन करणे भारताला सापेक्षतेने स्वस्त/फायदेशीर होईल. म्हणून अमेरिका भारताला कापडाची निर्यात केली जाईल आणि भारत अमेरिकेला अन्नधान्याची निर्यात करेल.

**भौतिकदृष्ट्या घटक विपुलता :**

समजा अमेरिकेला भौतिकदृष्ट्या भांडवल विपुलता तर भारताला श्रम विपुलता आहे. कारण अमेरिकेमधील भांडवल श्रम गुणोत्तर भारतापेक्षा अधिक आहे. अमेरिकेमध्ये भांडवलाच्या ‘$य_{१}$’ नग तर श्रमाच्या ‘$क्ष_{१}$’ नग उपलब्ध आहेत. भारतात भांडवलाच्या ‘$य_{२}$’ व श्रमाच्या ‘$क्ष_{२}$’ नग उपलब्ध आहेत. अमेरिकेत भांडवलाच्या श्रमाच्या तुलनेत अधिक नग उपलब्ध असल्यामुळे भांडवलप्रधान वस्तूच्या उत्पादनात अनुकूलता आहे.

वरील आकृतीमध्ये ‘अक्ष’ अक्षावर अन्नधान्य या श्रमप्रधान वस्तू आणि ‘अय’ अक्षावर कापड या




भांडवलप्रधान वस्तूचे उत्पादन दाखविले आहे. 'भब' भारताचा उत्पादन शक्यता वक्र आणि 'मप' अमेरिकेचा उत्पादन शक्यता वक्र आहे. आकृतीमधील 'अर' ही रेषा कापड आणि अन्नधान्य उत्पादनाचे प्रमाण समान दर्शविते.

समजा अमेरिका आणि भारत कापड व अन्नधान्य या दोन्ही वस्तूच्या समान नगाचे उत्पादन करणार असतील तर हे उत्पादन 'अर' या रेषेवरील अशा बिंदूपाशी होईल की ज्या ठिकाणी '$क_१क_१$' व '$क_२क_२$' या किंमत रेषा दोन देशांच्या उत्पादन शक्यता वक्राला स्पर्श करून जातील. अमेरिका आणि भारतासाठी हे बिंदू अनुक्रमे 'क्ष' आणि 'स' हे असतील '$क_१क_१$' ही किंमत रेषा असे दाखवते की अमेरिकेत कापड स्वस्त आहे तर किंमतरेषा '$क_२क_२$' असे दाखविते की अन्नधान्य ही वस्तू कापडापेक्षा भारतात जास्त स्वस्त आहे. म्हणून अमेरिका भांडवलप्रधान देश भांडवलप्रधान कापड वस्तूची निर्यात करेल आणि भारत श्रमप्रधान देश श्रमप्रधान अन्नधान्य वस्तूची निर्यात करेल.

**टिकात्मक परीक्षण :**

**१) दोन देश आणि दोन वस्तू आणि दोन उत्पादनघटक प्रतिमान :**

हेकश्चर-ओहलिन यांनी अनेक गृहीतावर आधारीत मांडलेले दोन आणि दोन आणि दोन प्रतिमान आहे. परंतु स्वत: ओहलिनने आपल्या गणितीय परिशिष्टामध्ये अनेक प्रदेश, अनेक वस्तू आणि अनेक उत्पादन घटक विस्तारीत केले आहेत. म्हणून दोन देश, दोन वस्तू आणि दोन उत्पादन घटक प्रतिमानाला मर्यादा पडतात.

**२) उत्पादन घटक एकजिनसी नसतात :**

हेकश्चर-ओहलिन सिद्धांतामध्ये असे गृहीत धरले आहे की, दोन्ही देशामध्ये उत्पादन घटक एकजिनसी असतात आणि उत्पादन घटक संपन्नता गुणोत्तराचे मापन करता येते. परंतु वास्तवामध्ये दोन्ही देशातील उत्पादनघटक एकजिनसी नसतात. एक प्रकारचा उत्पादनघटक अनेक प्रकारात असतो. उदा. श्रम उत्पादन घटक हा कुशल आणि अकुशल श्रम अशा प्रकारात असतो.

**३) स्थैतिक सिद्धांत :**

सनातनवादी सिद्धांताप्रमाणेच हेकश्चर-ओहलिन सिद्धांतपण स्थैतिक आहे प्रवाही नाही.

**४) उत्पादन तंत्रज्ञान समरूप नसते :**

हेकश्चर-ओहलिन यांनी असे गृहीत धरले होते की, दोन्ही देशामधील प्रत्येक वस्तू उत्पादन तंत्रज्ञान समरूप असते. परंतु दोन्ही देशामधील एक वस्तू उत्पादन तंत्रज्ञान वेगवेगळे असते. अशावेळी हेकश्चर-ओहलिन यांनी सांगितल्याप्रमाणे व्यापार होत नाही.

**५) स्थिर उत्पादन फल अस्तित्त्वात नसते :**

हेकश्चर-ओहलिन सिद्धांतामध्ये उत्पादनात स्थिर उत्पादन फल अस्तित्त्वात असते असे गृहीत धरले आहे. परंतु वास्तवात उत्पादनामध्ये स्थिर उत्पादन फल अस्तित्त्वात येत नाही तर ऱ्हासमान उत्पादन फल अस्तित्त्वात येतो.

**६) आवड आणि मागणी समान नसते :**

हेकश्चर-ओहलिन सिद्धांतात दोन्ही देशामधील लोकांच्या आवडी आणि वस्तूच्या मागणीमध्ये समानता असते असे गृहीत धरले आहे. विविध उत्पन्नगटातील व्यक्तीचीपण आवड आणि मागणी समान असते. परंतु वास्तवात आवड आणि मागणी समान नसते. विकसित देशातील आणि अविकसित देशातील व्यक्तीची आवड आणि मागणी वेगवेगळी असते.

**७) वाहतूक खर्च व्यापारावर परिणाम करतो :**

हेकश्चर-ओहलिन सिद्धांतात दोन्ही देशात व्यापार होताना वाहतूक खर्च करावा लागत नाही असे गृहीत धरले आहे. परंतु वास्तवात शक्य नाही कारण दोन्ही देशामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यासाठी वाहतूक खर्च करावा लागतो. त्याचबरोबर वाहनामध्ये माल भरणे आणि उतरण्यासाठी ही खर्च करावा लागतो यांचा किंमतीवर परिणाम होतो. यांचाही विचार केला नाही.

**८) आंशिक संतुलन विश्लेषण :**

हॅबर्लरने हेकश्चर-ओहलिन सिद्धांतावर टिका करून असे म्हटले की, हेकश्चर-ओहलिन आपल्या

सिद्धांतात एक व्यापक सामान्य संतुलन विकसित करण्यामध्ये असफल झाला त्यामुळे ते एक आंशिक संतुलन विश्लेषण आहे.

**९) लिओटिन्फचा विरोधाभास :**

लिओटिन्फ यांनी अमेरिकेच्या विदेशी व्यापाराचा अभ्यास करून हेकश्चर-ओहलिन सिद्धांत अमेरिकेच्या विदेशी व्यापाराला लागू पडत नाही.

हेकश्चर-ओहलिन सिद्धांतानुसार ज्या देशात भांडवल विपुल आहे तो देश भांडवलप्रधान वस्तूंची व ज्या देशात श्रम जास्त आहे तो देश श्रमप्रधान वस्तूंची निर्यात करेल. परंतु लिओटिन्फ यांनी अमेरिकेच्या विदेशी व्यापाराचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, अमेरिका हा जरी भांडवलप्रधान देश असला तरी अमेरिके तर्फे श्रमप्रधान वस्तूंची निर्यात होत आहे व भांडवलप्रधान वस्तूंची आयात होत आहे.

**१०) अवास्तव गृहीते :**

हेकश्चर-ओहलिन सिद्धांत मांडताना पूर्ण स्पर्धा, पूर्ण रोजगार, मुक्त व्यापार धोरण, देशांतर्गत उत्पादनघटक गतिशील असतात. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर गतिहीन असतात आणि स्थिर तांत्रिक प्रगती ही गृहीते अवास्तव आहेत.

**१.३ सारांश :**

मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी प्राचीन काळापासून वस्तूची देवाण-घेवाण होत आहे. व्यापार म्हणजेच वस्तू व सेवांची देवाण-घेवाणीचा व्यवहार होय. व्यापार औद्योगिक क्रांतीपूर्वी काळामध्ये स्थानिक पातळीवर देशांतर्गत भागामध्ये केला जात होता. मात्र औद्योगिक क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय व्यापाराला मोठ्या प्रमाणात सुरूवात झाली. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ विविध देशातील नागरिकांना होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापार मुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्माण होणारे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची महत्त्वपूर्ण शाखा निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वापरल्या जाणाऱ्या संकल्पनांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये असणारे साम्य आणि फरक माहिती असणे गरजेचे आहे. अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यामधील साम्यमध्ये व्यक्ती, संस्था व सरकारचा सहभाग, वस्तू व सेवांचा व्यापार श्रम-विभागणी, नफा प्राप्ती, केंद्रीकरण व विशेषीकरण, किमान उत्पादन खर्च, किंमत यंत्रणा, ऐच्छिक व्यापार, परस्परावलंबनातून सहकार्य आणि आर्थिक सहकार्य या घटकांचा समावेश होतो. तर अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामधील फरकामध्ये उत्पादन घटकांच्य गतिशीलतेमधील फरक, उत्पादन खर्चातील फरक व व्यापारापासून मिळणाऱ्या लाभात फरक या गोष्टींचा समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास करण्यासाठी आपणाला आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा अभ्यास करणे गरजेचे असते. सन १८१७ मध्ये रिकार्डोनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक उत्पादनखर्चाचा सिद्धांत

मांडला. रिकार्डोच्या मते, दोन देशामध्ये व्यापार सुरू होण्याचे महत्त्वाचे कारण त्या देशांमध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन खर्चातील तुलनात्मक फरक होय. रिकार्डोच्या मते, ज्या वस्तूचा तुलनात्मक उत्पादन खर्च कमी आहे. त्या वस्तूच्या उत्पादनात वाढ करून निर्यात करावी आणि ज्या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे त्या वस्तूची आयात करावी. रिकार्डोच्या सिद्धांतामध्ये दोन देशातील वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक का होतो यांचे उत्तर मिळत नाही. परंतु हेकश्चर-ओहलिन सिद्धांतात ते मिळते. हेकश्चर-ओहलिन सिद्धांतानुसार जो देश भांडवलप्रधान असतो तो देश भांडवलप्रधान वस्तूची निर्यात करतो आणि जो देश श्रमप्रधान असतो तो देश श्रमप्रधान वस्तूची निर्यात करतो. हेकश्चर-ओहलिन यांनी दोन देशातील वस्तूच्या उत्पादन खर्चात फरक असण्याची उत्पादन घटकांच्या किंमतीत सापेक्ष फरक आणि उत्पादन घटकांच्या गरजांमध्ये फरक ही कारणे आहेत.

**१.४ पारिभाषिक शब्द :**

**१) अंतर्गत व्यापार :**

जेव्हा व्यापार देशाच्या सीमेच्या आत होत असतो तेव्हा त्याला अंतर्गत व्यापार असे म्हणतात.

**२) आंतरराष्ट्रीय व्यापार :**

देशाच्या सीमा ओलांडून जेव्हा व्यापार केला जातो तेव्हा त्याला आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात.

**३) घटक विपुलता :**

देशाला एखाद्या उत्पादन घटकांची नैसर्गिक देणगी मिळालेली असते त्याला घटक विपुलता म्हणतात.

**४) विनिमय दर :**

ज्या विशिष्ट दराने दोन देशाच्या चलनाची अदलाबदल होते त्या दराला विनिमय दर असे म्हणतात.

**५) वस्तु विनिमय :**

परस्परांच्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी वस्तुंची देवाणघेवाण करण्याची पद्धत म्हणजे वस्तु विनिमय होय.

**६) विशेषीकरण :**

एकाच वेळी अनेक वस्तुंच्या उत्पादनावर भर देण्याऐवजी सोईस्कर अशा एखाद्या विशिष्ट वस्तुच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्याचे धोरण म्हणजे विशेषीकरण होय.

**१.५ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडा.**

१) देशाच्या सीमा ओलांडून जो व्यापार होतो त्याला ------ म्हणतात.

अ) आंतरराष्ट्रीय व्यापार ब) अंतर्गत व्यापार

क) विभागीय व्यापार ड) यापैकी नाही

२) अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार हा ------ वर आधारित असतो.

अ) कार्यक्षमता ब) उत्पादनप्रमाण क) श्रमविभागणी ड) यापैकी नाही

३) ------ व्यापारावर फारशी नियंत्रणे व निर्बंध असत नाहीत.

अ) आंतरराष्ट्रीय ब) अंतर्गत क) विदेशी ड) यापैकी नाही

४) देशांतर्गत व्यापारामध्ये तुलनेने वाहतूक खर्च ------ असतो.

अ) समान ब) जास्त क) कमी ड) यापैकी नाही

५) रिकार्डो यांनी स्मिथचे निरपेक्ष लाभ तत्व ------ मान्य केले.

अ) अंशत: ब) पूर्णत: क) अ आणि ब ड) यापैकी नाही

६) अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेतू ------ हा असतो.

अ) आर्थिक सहकार्य वाढविणे ब) गतिशीलता वाढविणे

क) प्रचंड उत्पादन ड) नफा मिळविणे

७) रिकार्डोने तुलनात्मक उत्पादन खर्च सिद्धांत ------ सिद्धांतावर आधारीत आहे.

अ) श्रम मूल्य ब) खंड क) मूल्य ड) यापैकी नाही

**१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) आंतरराष्ट्रीय व्यापार २) श्रमविभागणी ३) अंतर्गत ४) कमी ५) अंशत: ६) नफा मिळविणे ७) श्रम मूल्य

**१.७ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा लिहा.**

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व

२) अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार साम्य

३) अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार फरक

४) अंतर्गत व्यापार

५) आंतरराष्ट्रीय व्यापार

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट करा.

२) रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत स्पष्ट करा.

३) हेकश्चर-ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत स्पष्ट करा.

४) रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.

**१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.**


१) झामरे ग. ना. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

२) झिंगन एम. एन. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, वृंदा पब्लिकेशन्स प्रा.लि. दिल्ली.

३) ढमढेरे - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

४) रसाळ रा. अ. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे.

५) बापट ल. ग. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) मोडक शं. के. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

७) वावरे घाटगे - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.

८) भोसले काटे - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


***

# घटक – २
# आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ
# ( Gains from International Trade )

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ, त्यांचे मोजमाप

२.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक वाढीचे इंजिन

२.२.३ व्यापारशर्ती-अर्थ, संकल्पना आणि उपाययोजन

२.२.४ व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## २.० उद्दिष्टे (Objectives) :

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील गोष्टीची माहिती मिळते.

१) आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ विशद करता येईल.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभांचे मोजमाप करण्याच्या पद्धती समजतील.

३) आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक वाढीचे इंजिन आहे हे स्पष्ट करता येईल.

४) व्यापारशर्तीची संकल्पना समजेल.

५) व्यापारशर्तीचे विविध प्रकार समजतील.

६) व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक लक्षात येतील.

**२.१ प्रास्ताविक (Introduction) :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तूच्या उत्पादनात आणि उपभोगात वाढ होणे म्हणजे पण आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभच आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातनवादी सिद्धांत हा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभावर आधारित आहे. ॲडम स्मिथच्या मते, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दोन्हीही पातळीवरील श्रमविभागणी आणि विशेषीकरणाच्या लाभामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ प्राप्त होतात. कारण उत्पादन खर्चात निरपेक्ष फरक असतो. रिकार्डोचे असे मत होते की, आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तूच्या मात्रा आणि एकूण लाभामध्ये वाढ होते. देशातील उत्पादनाच्या ऐवजी वस्तूची आयात केल्यामुळे खर्चात जी बचत होते तेवढाच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ असतो. जे. एस. मिल यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे विश्लेषण करण्यासाठी अन्योन्य मागणीचा वापर केला.

इंग्लंड देशाचा आर्थिक इतिहास अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की, इंग्लंड देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार सर्वात जास्त होता तेव्हा त्यांचा आर्थिक विकासाचा दर जास्त होता. म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापार हा आर्थिक वृद्धीचे इंजिन आहे. एका देशातील वस्तू दुसऱ्या देशातील वस्तूशी ज्या दराने देवाणघेवाण होते त्या दराला व्यापारशर्ती असे म्हणतात. व्यापारशर्तीमध्ये अनुकूल व्यापारशर्ती आणि प्रतिकूल व्यापारशर्ती असे मुख्य प्रकारा पडतात. सदर घटकामध्ये आपणास आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्यांचे मोजमाप, आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक वृद्धीचे इंजिन, व्यापारशर्तीचे प्रकार आणि व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक अभ्यासायचे आहेत.

**२.२ विषय विवेचन :**

**२.२.१ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्यांचे मोजमाप :**

आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिक बजावतो. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विविध देशामध्ये वस्तूच्या देवाण-घेवाणीत वाढ होते आणि वस्तूच्या मागणीत वाढ होते. याउलट जे देश आंतरराष्ट्रीय व्यापारापासून दूर आहेत त्यामध्ये विकासाच्या बाबतीत मागासलेपणा वाढतो. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास या दोन्ही घटकांत धनात्मक संबंध असतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे वर्गीकरण स्थितीशील आणि गतिशील लाभ असे केले जाते. देशामधील उत्पादन घटकांच्या उपलब्धतेमुळे आणि उत्पादन खर्चातील फरकामुळे स्थितीशील लाभ मिळतात. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशांच्या आर्थिक विकासामुळे गतिशील लाभ मिळतात. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ खालीलप्रमाणे आहेत.

**१) उत्पादन खर्चात वाढ :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये ज्या देशात वस्तू स्वस्त मिळते त्या देशातून ती वस्तू आयात केली जाते. वस्तूच्या उत्पादनासाठी अनुकूल असणारे घटक ज्या देशात उपलब्ध आहेत त्या देशात त्या वस्तूचा उत्पादन खर्च घटतो.

**२) निर्यातीत वाढ :**

विशिष्ट देशात विशिष्ट भौगोलिक व आर्थिक परिस्थितीमुळे विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनाचे केंद्रीकरण होते. त्यातून उत्पादनात विशेषीकरण होते. त्या वस्तूच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल आणि आनुषंगिक घटक उपलब्ध होतात. विशिष्ट वस्तूच्या उत्पादनाचे संशोधन केले जाते. त्यामुळे कमी उत्पादन खर्चात उत्कृष्ट दर्जाचा माल उत्पादित होतो. वस्तूच्या किंमती कमी होतात. त्यामुळे अशा वस्तूच्या निर्यातीत वाढ होते.

**३) विशेषीकरणाचे लाभ :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विशिष्ट देशात विशिष्ट वस्तूंचे उत्पादन होते. त्यामुळे त्या वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरणाचे लाभ मिळतात. त्यामुळे वस्तूचा उत्पादन खर्च घटतो. वस्तूच्या किंमती घटतात. विशेषीकरणाचे लाभ आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असणाऱ्या सर्वच देशांना मिळतात.

**४) बाजारपेठांचा विस्तार :**

देश आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये प्रवेश करतो तेव्हा देशातील वस्तूंना आपल्या देशातील बाजारपेठाबरोबर इतर देशातील बाजारपेठा वस्तूच्या विक्रीसाठी उपलब्ध होतात. देशात ज्या वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन होते त्या वस्तूंची निर्यात करता येते. यातून बाजारपेठांचा विस्तार होऊन आर्थिक विकासाला प्रेरणा मिळते.

**५) विकासास चालना :**

विकसनशील आणि अविकसित देशांना आर्थिक विकासाला आवश्यक असणारे घटक आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे मिळतात. आर्थिक विकासासाठी लागणारे तंत्रज्ञान, भांडवल, यंत्रसामग्री आणि कच्चा माल आयात केला जातो. तर आपल्या देशातील कृषी उत्पादने कच्चा माल, खनिज वस्तू आणि मनुष्यबळाची निर्यात करून परकीय चलन मिळते. यामधून विकसनशील आणि अविकसित देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळते.

**६) उत्पादन घटकांना योग्य मोबदला :**

ज्या ठिकाणी उत्पादन कार्यक्षमतेने होते त्या ठिकाणी जगामधील विविध देशातून श्रम, भांडवल, खनिज-संपत्ती, कच्चा माल आणि संयोजक उपलब्ध होतात. अशा घटकांचा कार्यक्षमतेने आणि योग्य प्रकारे वापर आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे होतो. त्यामुळे उत्पादन घटकांना योग्य मोबदला मिळतो.

**७) उत्पादन घटकांची गतिशीलता वाढते :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे ज्या ठिकाणी उत्पादन घटकांची जरूरी आहे आणि जास्त मोबदला मिळतो त्याठिकाणी उत्पादन घटक उपलब्ध होतात. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे ज्या देशात उत्पादन घटकांचा अतिरिक्त पुरवठा आहे त्या देशातून उत्पादन घटकांची कमतरता असणाऱ्या देशात उत्पादन घटकांचा पुरवठा होतो. उत्पादन घटकांची गतिशीलता वाढल्याने उत्पादन घटकांच्या मागणी-पुरवठ्यात समतोल साधला जातो.

**८) रोजगार वृद्धी :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील उद्योगांना आवश्यक असणारा कच्चा माल, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध होते. निर्यातीमुळे देशातील उत्पादन, कच्चा माल, श्रम आणि संयोजक यांना मागणी वाढून त्यांच्या रोजगारात वाढ होते. आयात आणि निर्यात या दोन्हीमुळे उत्पादनात वाढ होते. उत्पादन घटकांना रोजगार मिळतो. देशातील विविध प्रकारच्या साधनसामग्रीचा वापर वाढतो. रोजगारात वाढ झाल्यामुळे देशातील उत्पन्न, बचत आणि गुंतवणुकीत वाढ होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

**९) मक्तेदारी कमी होते :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे जगातील विविध देशातून विविध प्रकारच्या दर्जेदार वस्तू, आकर्षक वस्तू कमी किंमतीत मिळतात. त्यामुळे देशातील मोजक्या उद्योगपती, व्यापारी आणि भांडवलदाराची मक्तेदारी कमी होते.

**१०) नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत :**

देशाला दुष्काळ, महापूर, भूकंप, चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तीत आयातीमुळे अन्नधान्य, औषधे, कापडे आणि इतर आवश्यक गोष्टी मिळतात. युध्दकाळात शस्त्रास्त्र, दारुगोळा, रणगाडे, विमाने इ. उपलब्ध झाल्याने देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करता येते. सरकारला आपत्तीच्या काळात, शांतता आणि सुव्यवस्था राखता येते.

**११) कल्याणात वाढ :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे जगातील सर्वच देशांना विविध प्रकारच्या वस्तू स्वस्त, दर्जेदार आणि पुरेशा प्रमाणात मिळतात. देशांना स्वत: ज्या वस्तू उत्पादित करता येत नाहीत अशा वस्तू परदेशातून आयात करता येतात. यामुळे लोकांच्या राहणीमानात वाढ होते. लोकांच्या कल्याणात वाढ होते.

**१२) व्यापारचक्रावर नियंत्रण :**

देशात चलनवाढीची परस्थिती असेल तर देशाला आयातीद्वारे आवश्यक असणाऱ्या वस्तू मिळविता येतात. म्हणून वाढणाऱ्या किंमत पातळीवर नियंत्रण ठेवता येते. चलनवाढीच्या काळात निर्यातीद्वारे अतिरिक्त उत्पादन देशात पाठविता येते. म्हणून वस्तूंचा पुरवठा योग्य प्रमाणात राहतो. यातून किंमतपातळीवर नियंत्रण येते. यातून देशाला आर्थिक स्थैर्य मिळते.

वरीलप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ आहेत.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे मोजमाप (Measurement of Gains for International Trade):**


जेकब वाइनर यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मापन करण्यासाठी तुलनात्मक खर्चात फरक, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ आणि व्यापारशर्ती यांचा वापर केला जातो असे सांगितले.

### १) रिकार्डो दृष्टीकोन (Ricardo's Approach) :

रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च लाभाच्या सिध्दांतानुसार देशात ज्या वस्तूचा उत्पादन खर्च तुलनात्मक कमी आहे त्या वस्तूची निर्यात करावी आणि ज्या वस्तूचा उत्पादन खर्च तुलनात्मक जास्त आहे त्या वस्तूची आयात करावी. अशा प्रकारे देश आपल्या साधनसंपत्तीबाबत विचार करतो. उत्पादन घटकांवर केलेल्या खर्चापेक्षा जास्त उत्पादन घटक अपेक्षित असतात. वस्तूचे उत्पादन स्वत: केल्यानंतर अपेक्षित उत्पन्न मिळते.

प्रो. फिंडले यांनी सन १९७० मध्ये लिहिलेल्या Trade and Specialisation या पुस्तकात रिकार्डोच्या सिध्दांताच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे मापन केले आहे.

**आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण :**




वरील आकृतीत आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु होण्यापूर्वीची स्थिती देशाचा उत्पादन शक्यता वक्र 'क ब' आहे. 'क ब' उत्पादन शक्यता वक्रावर 'इ' या बिंदूत संतुलन होते. आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रवेश केल्यानंतर 'ड ब' रेषेच्या उताराने देशाचे आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर ठरते. समजा 'ड ब' रेषेवरील 'फ' बिंदूत संतुलन होते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ मोजण्यासाठी आपणास 'फ' बिंदूतून जाणारी आणि 'क ब' रेषेला समांतर रेषा काढावी लागेल. (समजा 'फ' बिंदूतील उत्पादन देशात होते) नविन क$_{१}$ ब$_{१}$ रेषा येईल. त्या रेषेच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ 'ब ब$_{१}$' पर्यंतचे वस्तूचे उत्पादन आहे.

माल्थसने फिंडले यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभमापन विश्लेषणावर टीका केली. माल्थसच्या मते, फिंडले यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभ मापनाची अतिरंजीत मांडणी केली आहे. माल्थसच्या मते, जेव्हा


देशांतर्गत उत्पादन शक्यता वक्र सरकून क१ ब१ होईल तेव्हा संतुलन बिंदू 'फ' नसेल. 'ड ब' च्या तुलनेत 'क१ ब१' मधील किंमती निर्यात वस्तू 'क्ष' वस्तूला अधिक अनुकूल असतील. त्यामुळे उपभोक्ता 'फ' बिंदूच्या ऐवजी 'क१ ब१' रेषेवर 'फ' बिंदूच्या डाव्या बाजूला संमती देतील. शेवटी 'ड ब' वरील व्यापाराचा लाभ ब ब१/अ ब गुणोत्तर मध्ये श्रमामध्ये वाढ करुन मोजला जाणार नाही. यांचे कारण 'ड ब' वरील बदल 'क१ ब१' रेषेवरील 'फ' बिंदूच्या डाव्या बाजूला चांगला अनुमान आहे.

फिंडले, यांनी सामूहीक समवृत्ती वक्राचा वापर करुन रिकार्डोच्या आंतरराष्ट्रीय व्यापार लाभाच्या मापनामध्ये सुधारणा केली. श्रमामध्ये एवढी वाढ केली जाईल की उत्पादन शक्यता वक्र क१ ब१ ऐवजी क० ब० पर्यंत येईल. समवृत्ती वक्र 'स म' वरील 'ग' बिंदू उपभोक्ता निवड करेल. व्यापार सुरु झाल्यानंतर 'फ' बिंदूत जेवढी उपयोगिता मिळत होती तेवढीच 'ग' बिंदूतपण मिळते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारा लाभ ब ब०/ब ब हा ब ब१/ अब च्या तुलनेत जास्त असेल. या मापन पध्दतीमुळे माल्थसने केलेल्या टिकेचे निरसन होते.

**२) मिलचा दृष्टीकोन (Mills Approach) :**

जे.एस. मिल यांनी अन्योन्य मागणी सिध्दांताच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे आणि लाभाच्या वितरणाचे विश्लेषण केले आहे. मिलच्या मते, अन्योन्य मागणीच्या सहाय्याने व्यापारशर्ती ठरतात. व्यापारशर्तींच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि लाभाचे वितरण ठरते. व्यापारशर्तींच्या सहाय्याने दोन देशातील वस्तू विनिमय/वस्तू देवाण घेवाणीचा दर लक्षात येतो. तसेच आयात वस्तूच्या तुलनेत निर्यात वस्तूचे गुणोत्तर व्यापारशर्ती स्पष्ट करते.

**आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण :**



वरील आकृतीत व्यापाराच्या लाभाचे वितरण मार्शल एजवर्थ प्रस्ताव वक्राने स्पष्ट केले आहे. 'अ ब' प्रस्ताव वक्र अमेरिका आणि 'अ क' प्रस्ताव वक्र भारत देशाचा आहे. 'अ प' आणि 'अ र' क्रमश: अमेरिका आणि भारत देशातील 'क्ष' आणि 'य' वस्तूच्या उत्पादनाचा देशांतर्गत स्थिर खर्च-गुणोत्तर आहे. वास्तवात या रेषा दोन्ही देशातील व्यापारशर्ती ठरवितात. परंतु 'इ' बिंदूत व्यापाराची वास्तविक व्यापारशर्ती आहे, की ज्या ठिकाणी 'अ क' आणि 'अ ब' एकमेकांना छेदतात. 'अ ट' रेषा 'इ' बिंदू मध्ये व्यापाराची संतुलित शर्ती ठरविते.

अमेरिका देशामध्ये खर्च, गुणोत्तर 'य' वस्तूच्या 'ड स': 'क्ष' वस्तूच्या 'अ ड' नग असे आहे. परंतु व्यापारातून 'य' वस्तूचे 'ड इ' नग प्राप्त होतात. त्यामुळे य वस्तूचे 'स इ' नग एवढा लाभ होतो. भारत देशामध्ये खर्च गुणोत्तर 'य' वस्तूच्या 'ड क' नग : क्ष वस्तूच्या 'अ ड' नग असे आहे. परंतु व्यापारातून 'य' वस्तूचे 'ड इ' नगाच्या मोबदल्यामध्ये अमेरिका 'क्ष' वस्तूच्या 'अ ड' नग आयात करतात. 'य' वस्तूच्या 'इ फ' नगचा लाभ होतो. अशा प्रकारे दोन्ही देशांना आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ होतो.

**उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्टीकरण :**

अमेरिका देशात दोन श्रम नगाच्या सहाय्याने 'क्ष' वस्तूचे १० नग आणि 'य' वस्तूचे १० नग उत्पादन होते. भारत देशात दोन श्रम नगाच्या सहाय्याने 'क्ष' वस्तूचे ६ नग आणि 'य' वस्तूचे ८ नग उत्पादन होते. देशांतर्गत विनिमय गुणोत्तर (देशांतर्गत व्यापारशर्ते) अमेरिका देशात १क्ष=१य वस्तू आहे तर भारतात १क्ष=१.३३य वस्तू गुणोत्तर आहे. अमेरिका आणि भारत देशातील देशांतर्गत विनिमय गुणोत्तरावरुन १क्ष=१य किंवा १.३३ य यांच्यामध्ये व्यापारशर्ती ठरतील.

परंतु वास्तविक विनिमय गुणोत्तर अन्योन्य मागणीवर अवलंबून असते. अमेरिका देशातील 'य' वस्तूची मागणीची लवचिकता ताठर/अलवचिक असेल तर व्यापारशर्ती १क्ष=१य च्या जवळ असतील. व्यापारशर्ती भारत देशाला अनुकूल आणि अमेरिका देशाला प्रतिकूल असतील. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा भारताला अधिक लाभ आणि अमेरिकेला कमी लाभ होईल. दुसरी शक्यता अमेरिका देशातील 'य' वस्तूची मागणी अधिक लवचिक आहे. त्यावेळी व्यापारशर्ती १क्ष=१.३३ य वस्तूच्या जवळ असेल. अशावेळी व्यापारशर्ती अमेरिकेला अनुकूल आणि भारताला प्रतिकूल असतील त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अमेरिकेला जास्त फायदा आणि भारताला कमी फायदा/लाभ होईल.


**३) आधुनिक दृष्टीकोन (Modern Approach) :**

आधुनिक व्यापार सिध्दांतामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ विनिमय लाभ आणि विशेषीकरण लाभ असे वेगळे केले आहेत. मागणी आणि पुरवठ्याच्या सहाय्याने हे विश्लेषण बंद अर्थव्यवस्थेच्या सामान्य संतुलनाच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे. यामध्ये रुपांतरण वक्राला सामूहिक समवृत्ती वक्र स्पर्श करतो आणि उपभोग आणि उत्पादन वस्तूचा पर्यायात सीमांत पर्यायता दर हा देशांतर्गत व्यापारशर्ती किंवा वस्तू किंमत गुणोत्तराबरोबर समान असतो. जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु होतो तेव्हा विनिमयापासून पण लाभ होतो आणि विशेषीकरणापासून पण लाभ होतो. जेव्हा संतुलन स्थापन होते आणि हे लाभ अधिकतम होतात. तेव्हा उत्पादनाचा नविन सीमांत रुपांतरण

दर आणि उपभोगाचा नविन सीमांत पर्यायता दर आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर किंवा व्यापारशर्ती बरोबर असतो. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून पहिल्यापेक्षा अधिक उत्पादन आणि उपभोग होतो. उत्पादक आणि उपभोक्त्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ मिळतात.

**आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण :**

वरील आकृतीच्या 'फ ब' हा रुपांतरण वक्र आहे जो अर्थव्यवस्थेतील पुरवठा बाजूचे प्रतिनिधित्व करतो.




'स म०' सामूहिक समवृत्ती वक्र आहे. तो अर्थव्यवस्थेतील मागणी बाजू स्पष्ट करते. बंद अर्थव्यवस्था (आंतरराष्ट्रीय व्यापार नसताना) असतना 'इ' बिंदू संतुलन होते. कारण 'इ' बिंदूत 'फ ब' आणि 'स म०' वक्र एकमेकांना स्पर्श करतात. आणि देशांतर्गत व्यापारशर्ती आणि वस्तू किंमत गुणोत्तर 'प' रेषेबरोबर आहे.

जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु होते. तेव्हा आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर (व्यापारशर्ती) देशांतर्गत किंमत गुणोत्तर (देशांतर्गत व्यापारशर्ती) पेक्षा वेगळे असते. आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर 'प१' ने दर्शविले आहे तर देशांतर्गत किंमत गुणोत्तर रेषा 'प' पेक्षा अधिक सरळ रेषा आणि उंच आहे. यांचा अर्थ आंतरराष्ट्रीय पातळीवर 'य' वस्तूच्या तुलनेत 'क्ष' वस्तूच्या किंमती वाढत्या आहेत. आंतरराष्ट्रीय किंमत रेषा 'प१' वर उपभोक्ता समवृत्ती

वक्र 'स म$_{०}$' वरील 'इ' बिंदूतील संतुलनाच्या अधिक वरच्या सामूहिक समवृत्ती वक्र 'स म$_{१}$' वरील बिंदू 'च' वर संतुलित होतो 'इ' बिंदू पासून 'च' पर्यतचा लाभ हा विनिमयाचा लाभ किंवा उपभोगाचा लाभ आहे. हा लाभ उत्पादनात कोणताही बदल न करता झाला आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये 'क्ष' वस्तूच्या किंमती वाढतात. त्यामुळे उत्पादक 'स' वस्तूचे उत्पादन वाढवितात आणि 'य' वस्तूचे उत्पादन कमी करतात. त्यांचा परिणाम रूपांतरण वक्रावरील उत्पादनाचा बफ 'इ' बिंदूपासून 'न' बिंदू पर्यंत सरकते. ज्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय किंमत रेषा 'प$_{२}$' 'फब' न बिंदूत वक्राला स्पर्श करते. दुसऱ्या शब्दात उत्पादनाचा सीमांत रूपांतरण दर 'न' बिंदूमध्ये आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर रेषेबरोबर होतो. आंतरराष्ट्रीय व्यापारशर्तीचे नविन गुणोत्तर रेषा 'प$_{२}$' ही 'प$_{१}$' आहे. कारण 'प$_{१}$' किंमत रेषेला 'प$_{२}$' समांतर आहे. 'न' बिंदूमध्ये देश 'य' वस्तूची 'क च$_{१}$' आयातीच्या मोबदल्यामध्ये 'क्ष' वस्तूची 'क न' निर्यात करतो.

'ब' वस्तू उत्पादनात विशेषीकरण केल्यामुळे त्यांचा परिणाम उपभोग 'स म$_{१}$' समवृत्ती वक्रावरील 'च' बिंदूपासून सरकून 'स म$_{२}$' समवृत्ती वक्रावरील 'च$_{१}$' वर जातो. 'च$_{१}$' बिंदूमध्ये उपभोक्त्याला 'क्ष' आणि 'य' वस्तूचा अपेक्षापेक्षा जास्त उपभोग घेतो. 'च' पासून 'च$_{१}$' बिंदू पर्यंतचा लाभ हा विशेषीकरणाचा लाभ म्हणून मोजला जातो. 'च$_{१}$' बिंदूत सीमांत पर्यायता दर आणि आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर बरोबर होते. त्यामुळे 'न' आणि 'च$_{१}$' बिंदूत आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सर्वात जास्त लाभ आहे. कारण उत्पादनाचा सीमांत रूपांतरण दर आणि उपभोगाचा सीमांत पर्यायता दर दोन्हीही आंतरराष्ट्रीय किंमत गुणोत्तर 'प$_{२}$' बरोबर असते. स्वतंत्र व्यापारापासून जे एकूण लाभ होतात ते उपभोग आणि उत्पादन लाभाची बेरीज असते. ते अभ्यासण्यासाठी 'स म$_{०}$' ते 'स म$_{२}$' या समवृत्ती वक्रावरील कल्याणात वाढ होत हे दाखविले आहे.

### २.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक वाढीचे इंजिन (International Trade as an Engine of Economic Growth) :

जगातील सनातनवादी आणि नवसनातनवादी तसेच आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासून आर्थिक वृद्धीला चालना मिळते अशी मते मांडली. त्यांच्या मते, व्यापार हा वृद्धीचा प्रेरक आहे. आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यापार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत तसेच ते परस्परावलंबी आणि परस्परपूरक आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार प्रादेशिक व्यापार आणि अंतर्गत व्यापार असे व्यापारामध्ये फरक केला जातो. कोणत्याही व्यापार हा अर्थव्यवस्थेला फायदेशीर असतो. व्यापार म्हणजे आर्थिक विकासाचे दिशा देणारे होकायंत्र आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक वृद्धीचे इंजिन आहे. हे अनेक देशाच्या आर्थिक इतिहासावरून लक्षात येते. ज्यावेळी आंतरराष्ट्रीय व्यापार वेगाने होत होता त्यावेळी त्या देशाचा आर्थिक विकासाचा दर जास्त होता. असे लक्षात येते. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झाल्यानंतर वस्तूच्या विक्रीसाठी संपूर्ण जगाची बाजारपेठ उपलब्ध होते. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. इंग्लंडची अंतर्गत बाजारपेठ लहान होती. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे इंग्लंडच्या वस्तूंना जगाची बाजारपेठ उपलब्ध झाली. इंग्लंडमधील औद्योगिक उत्पादनांना लागणारा कच्चा माल आणि अन्नधान्य मिळू लागले. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे इंग्लंडच्या उत्पादन, रोजगार आणि उत्पन्नामध्ये वाढ झाली. इंग्लंडच्या गुंतवणूक आणि बचतीत आणि नफ्यात वाढ झाली. या सर्व घटकांमुळे

इंग्लंडचा आर्थिक विकास झाला. प्रा. हॅबलर व कर्नक्रॉस यांच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापार हे विकासाचे इंजिन आहे. सर डेनिस रॉबर्टसन यांच्या मते, आंतरराष्ट्रीय व्यापार हे आर्थिक विकासाचे यंत्र आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास**

**१) औद्योगिक उत्पादनात वाढ :**

वस्तूचे उत्पादन करण्यासाठी श्रम, भांडवल, संयोजक, कच्चा माल, यंत्रसामग्री, इंधने आणि इतर घटकांची गरज असते. परंतु काही देशामध्ये सर्व उत्पादन घटक उपलब्ध नसतात तेव्हा त्या देशातील उत्पादकाला आंतरराष्ट्रीय व्यापारातून उत्पादन घटक उपलब्ध होतात. त्यामुळे देशाचा औद्योगिक विकास होतो. औद्योगिक उत्पादनात वाढ होते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे जागतिक बाजारपेठ उपलब्ध होते. त्यातून आपल्या वस्तूची मागणी वाढते. वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी वस्तूचे उत्पादन वाढविले जाते. औद्योगिक उत्पादनात वाढ होते.

**२) बाजारपेठांचा विस्तार :**

देशामधील अंतर्गत बाजारपेठ लहान असेल तर उत्पादन घटकांचा वापर पूर्णपणे करता येत नाही. परंतु देश आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी झाल्यास जगाची संपूर्ण बाजारपेठ आपल्या वस्तूला उपलब्ध होते. त्यामुळे देशातील उत्पादन घटकांचा पर्याप्त वापर करुन वस्तूचे उत्पादन वाढविता येते. उत्पादन वाढ आणि बाजारपेठेचा विस्तार यामुळे आर्थिक विकासाला मदत होते.

**३) दर्जात्मक वस्तू :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशादेशामध्ये स्पर्धा वाढते. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या स्पर्धेत आपल्या वस्तू टिकण्यासाठी आपल्या वस्तूचा दर्जा वाढविणे गरजेचे असते. त्यामुळे उत्पादक वस्तूचे उत्पादन करण्यासाठी तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्य आणि इतर घटकांचा वापर करुन वस्तूचा दर्जा वाढवितात. त्याच बरोबर स्पर्धेत टिकण्यासाठी किंमती कमी करतात.

**४) साधनसामग्रीचा पर्याप्त वापर :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झाल्यामुळे देशातील साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होतो. संरक्षित व्यापार धोरण असल्यानंतर देशातील फक्त वस्तूची मागणी असते. त्यामुळे वस्तूचे उत्पादन कमी केले जाते त्यामुळे साधनसामग्रीचा/उत्पादन घटकांचा पूर्णपणे वापर होत नाही. देश आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झाल्यानंतर वस्तूची बाजारपेठ विस्तारते व वस्तूची मागणी वाढते. वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी वस्तूचा पुरवठा वाढवावा लागतो. पुरवठा वाढविण्यासाठी उत्पादन घटकांना मागणी वाढून त्यांना काम मिळते. त्यातून साधनसामग्रीचा पर्याप्त वापर वाढतो.

**५) तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्यांचा वापर :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे व्यापाराबरोबरच तंत्रज्ञान आणि व्यवस्थापकीय कौशल्यपण देशात येतात. देशातील

लोक आपल्या देशातून दुसऱ्या देशात जाऊन तांत्रिक ज्ञान प्रशिक्षण आणि शिक्षण घेऊन येतात. त्यांचा वापर आपल्या देशात केला जातो. दुसऱ्या देशातील उद्योजक स्वतंत्रपणे आणि देशातील उद्योजकांच्या सहाय्याने उद्योग निर्मिती करु शकतात. या सर्वातून तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्यांचा विस्तार होतो. त्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळते.

**६) विदेशी गुंतवणुकीत वाढ :**

आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. परंतु अविकसित देशात बचत कमी असते. ती पण सोने, स्थावर मालमत्ता इ. अनुत्पादक घटकात गुंतवितात. त्यामुळे अविकसित देशात आर्थिक विकासाला भांडवल पुरवठा नसतो याउलट विकसित देशात भांडवल मोठ्या प्रमाणात असते. परंतु त्यावर परतावा कमी मिळतो त्यामुळे अविकसित देशामध्ये भांडवल गुंतवणूक करणे फायदेशीर होते. विदेशी गुंतवणूकीमुळे देशातील विकासाला मदत होते. आर्थिक विकासाला लागणारे पैसारुपी भांडवल आणि वस्तूरुपी भांडवल आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे मिळते. भांडवल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, व्यवस्थापकीय कौशल्य या गोष्टी विदेशी गुंतवणूकीमधून मिळतात. देशाच्या आर्थिक विकासाला मदत होते.

**७) आर्थिक विकासाचा दर वाढतो :**

देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार वेगाने वाढतो तेव्हा देशाचा आर्थिक विकासाचा दर ही वेगाने वाढतो. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापाराचा वेग कमी झाला असता आर्थिक विकासाचा दर घटतो. जगातील वेगवेगळ्या देशाच्या आर्थिक इतिहासावरुन हे सिध्द झाले आहे. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात इंग्लंडचा आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये सम संबंध होता. इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा वेग जास्त असताना आर्थिक विकासाचा दर ही वेगाने होता.

वरीलप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे.

**२.२.३ व्यापारशर्ती (Terms of Trade) :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात ज्या मूल्यावर वस्तूंची देवाण-घेवाण होते त्याला व्यापारशर्ती किंवा आंतरराष्ट्रीय विनिमय गुणोत्तर असे म्हणतात. व्यापारशर्ती म्हणजे एका देशाच्या वस्तूच्या मोबदल्यात दुसऱ्या देशातील वस्तूचा विनिमय होतो. देशाच्या निर्यात किंमती आणि आयात किंमतीमधील संबंध स्पष्ट करतो. व्यापारशर्ती देशात निर्धारित होणाऱ्या बाजारमूल्यापेक्षा वेगळ्या असतात.

आयात केलेल्या वस्तूच्या मोबदल्यात निर्यात केलेल्या वस्तू किती प्रमाणात मिळतात ते प्रमाण किंवा दर म्हणजे व्यापारशर्ती होय.

दोन देशामधील आयात वस्तू आणि निर्यात वस्तूच्या विनिमय दरास व्यापारशर्ती असे म्हणतात.

कोणत्याही देशाच्या निर्यात वस्तूचे मूल्य आणि आयात वस्तूचे मूल्य यातील संबंधाला व्यापारशर्ती म्हणतात.

$$\text{व्यापारशर्ती} = \frac{\text{एकूण आयातीचे मूल्य}}{\text{एकूण निर्यातीचे मूल्य}}$$

**अनुकूल व्यापारशर्ती (Favourable Terms of Trade) :**

जेव्हा देश निर्यात करीत असलेल्या वस्तूच्या मोबदल्यामध्ये जास्त वस्तूची आयात करीत असेल किंवा देश आयात करीत असलेल्या मोबदल्यामध्ये कमी वस्तूची निर्यात करीत असेल तर तेव्हा त्या व्यापारशर्ती अनुकूल व्यापारशर्ती असे म्हणतात.

उदा : अमेरिका भारताला ५००० मिटर लिनन कापड निर्यात करीत असेल त्या मोबदल्यात भारत अमेरिकेला १००० मिटर लोकरी कापड निर्यात करीत असेल तर व्यापारशर्ती भारताला अनुकूल आहेत.

**प्रतिकूल व्यापारशर्ती (UnfavourableTerms of Trade) :**

जेव्हा देश निर्यात करीत असलेल्या वस्तूच्या मोबदल्यामध्ये कमी वस्तूची आयात करीत असेल किंवा देश आयात करीत असलेल्या मोबदल्यामध्ये जास्त वस्तूची निर्यात करीत असेल तर तेव्हा त्या व्यापारशर्तीला प्रतिकूल व्यापारशर्ती असे म्हणतात.

उदा : अमेरिका भारताला ५००० मिटर लिनन कापड निर्यात करीत असेल तर त्या मोबदल्यात भारत अमेरिकेला १०००० मिटर लोकरी कापड निर्यात करीत असेल तर व्यापारशर्ती भारताला प्रतिकूल असतात.

एखाद्या देशाला व्यापारशर्ती अनुकूल आहेत म्हणजे त्या देशाबरोबर व्यापार करणाऱ्या दुसऱ्या देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल आहेत. सामान्यपणे विकसित देशाला व्यापारशर्ती अनुकूल असतात आणि विकसनशील आणि अविकसित देशाना प्रतिकूल असतात. कारण विकसनशील देशाकडून ज्या वस्तूंची आयात होत त्या वस्तूंची मागणी अलवचिक असते आणि मागणीची तीव्रता जास्त असते. व्यापारशर्तीचे महत्त्व पुढील मुद्दयांच्या आधारे सांगता येईल.

१) आंतरराष्ट्रीय व्यापारात कोणत्या देशाला अधिक लाभ होतो. कोणत्या देशाला कमी लाभ होतो आणि कोणत्या देशाला तोटा होतो हे व्यापारशर्तीवरून लक्षात येते.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप करता येते.

३) व्यापारशर्तीच्या सहाय्याने परकीय चलनाची किंमत समजते.

४) व्यापारशर्ती सरकारला आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ठरतात.

५) व्यापारशर्तीच्या सहाय्याने देशाच्या निर्यात समतेच्या तुलनेत आयात समतेत कोणते बदल होतात हे समजते.

६) आयात आणि निर्यात वस्तू मिश्रणाने निर्माण झालेली गुंतागुंत सोडविण्यासाठी व्यापारशर्ती उपयोगी ठरतात.

**व्यापारशर्तीच्या संकल्पना/प्रकार :**

**अ) निव्वळ वस्तू व्यापारशर्ती (Non Borter Terms of Trade) :**

टॉसिंग आणि विनर यांनी निव्वळ वस्तू व्यापरशर्तीची संकल्पना मांडली. निव्वळ वस्तू व्यापारशर्तीची संकल्पना मोठ्या प्रमाणात वापरली जाते. या व्यापारशर्तीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातून मिळणाऱ्या लाभामध्ये होणाऱ्या बदलांची कल्पना येते.

''देशाच्या निर्यात किंमतीचा निर्देशांक आणि आयात किंमतीचा निर्देशांक यांचे गुणोत्तर म्हणजे निव्वळ वस्तू व्यापारशर्ती होय.''

सूत्र

$$NBTT = \frac{PX}{PM} X 100$$

या सूत्रात

NBTT = निव्वळ वस्तू व्यापारशर्ती

PX = निर्यात वस्तू किंमत निर्देशांक

PM = आयात वस्तू किंमत निर्देशांक

विशिष्ट कालावधीत व्यापारशर्तीत किती प्रमाणात बदल झाला हे मोजण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो.

$$NBTT = \frac{P^{X1}}{P^{M1}} X \frac{P^{X0}}{P^{M0}}$$

या सूत्रामध्ये

NBTT = निव्वळ वस्तू व्यापारशर्ती

$P^{X1}$ = चालू वर्षातील निर्यात वस्तू किंमत निर्देशांक

$P^{X0}$= आधार वर्षातील निर्यात किंमत निर्देशांक

$Pm_1$ = चालू वर्षातील आयात वस्तू किंमत निर्देशांक

$Pm_0$= आधार वर्षातील आयात वस्तू किंमत निर्देशांक

आधार वर्षातील निर्यात आणि आयात किंमत निर्देशांक समान असून त्यांचे मूल्य १०० मानले जाते.

उदा. २००५ ते २००९ या कालखंडात देशाच्या निर्यात किंमत निर्देशांक १६० आणि आयात किंमत निर्देशांक १२० झाला, तर निव्वळ वस्तू व्यापारशर्तीचे मूल्य किती येईल.

$$NBTT = \frac{Px_1}{Pm_1} : \frac{Px_0}{Pm_0}$$

$$NBTT = \frac{160}{120} : \frac{100}{100} \quad 1.33:1$$

वरील सूत्रतील उत्तरानुसार निर्यात वस्तूंच्या किंमत निर्देशांकात जास्त देशाला ३३% व्यापारशर्ती अनुकूल झालेल्या आहेत.

**आ) स्थूल वस्तू व्यापारशर्ती** (Gross Barter Terms of /Trade) **:**

निव्वळ वस्तू व्यापारशर्तीतील दोष लक्षात घेऊन टॉसिंग यांनी स्थूल वस्तू व्यापारशर्तीची संकल्पना मांडली. स्थूल वस्तू व्यापारशर्तीमध्ये वस्तूंच्या किंमती ऐवजी वस्तूंच्या परिमाणाचा विचार केला आहे. निर्यात व आयात वस्तूंच्या किमतीत बदल झाल्यामुळे एकूण मूल्यावर जो परिणाम होतो तो नाहीसा करण्याचा उद्देश स्थूल व्यापारशर्तीत आहे.

'देशाच्या आयात-निर्यात वस्तूंच्या परिमाणाचे गुणोत्तर म्हणजे स्थूल वस्तू व्यापारशर्ती होय.'

$$GBTT = \frac{Qm}{Qx} \times 100$$

सूत्रामध्ये

GBTT = स्थूल वस्तू व्यापारशर्ती

Qm = आयातीचे एकूण परिमाण

Qx = निर्यातीचे एकूण परिमाण

विशिष्ठ कालावधीत स्थूल वस्तू व्यापारशर्तीत जो बदल येतो तो खालील सूत्राच्या सहाय्याने सांगता येईल.

$$GBTT = \frac{Qm_1}{Qx_1} : \frac{Qm_0}{Qx_0}$$

या सूत्रामध्ये

GBTT = स्थूल वस्तू व्यापारशर्ती

$Qm_1$ = चालू वर्षातील आयातीचे परिमाण

$Qx_1$ = चालू वर्षातील निर्यातीचे परिमाण

$Qm_0$ = आधार वर्षातील आयातीचे परिमाण

$Qx_0$ = आधार वर्षातील निर्यातीचे परिमाण

जर व्यापारामध्ये समतोल असेलतर निव्वळ आणि स्थूल व्यापारशर्ती समान असतात. व्यापारातील समतोल नसेल तर निव्वळ आणि स्थूल व्यापारशर्ती वेगवेगळ्या असतात. चालू वर्षात स्थूल वस्तू व्यापारशर्तीत वाढ झाली असेल तर स्थूल वस्तू व्यापारशर्ती अनुकूल असते. याचा अर्थ आधार वर्षातील निर्यात परिमाणापेक्षा आयात परिमाण जास्त असतात.

**इ) उत्पन्न व्यापारशर्ती** (Income Terms of Trade) :

उत्पन्न व्यापारशर्तीची संकल्पना जी.एस. डॉरन्स यांनी मांडली. निव्वळ वस्तू व्यापारशर्तीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने उत्पन्न व्यापारशर्ती ही संकल्पना मांडली. उत्पन्न व्यापारशर्तीवरुन देश आयातीची किंमत निर्यातीद्वारे फेडू शकते, की नाही यांची कल्पना येते.

'निव्वळ वस्तू व्यापारशर्ती आणि निर्यात आकारमानाचा निर्देशांक यांचा गुणाकार म्हणजे उत्पन्न व्यापारशर्ती होय.'

उत्पन्न व्यापारशर्तीमुळे देशाच्या निर्यातक्षमतेच्या तुलनेमध्ये आयात क्षमतेत बदल होतो हे समजते.

सूत्ररूपाने

$$ITT = Qx\left(\frac{Px}{Pm}\right)$$

ITT = उत्पन्न व्यापारशर्ती

Qx = निर्यात परिमाण निर्देशांक

Px = निर्यातीची किंमत

Pm = आयातीची किंमत

उत्पन्न व्यापारशर्तीच्या निर्देशांकामध्ये वाढ होते तेव्हा देशाची निर्यात वस्तूच्या बदल्यात वस्तू आयात करण्याची क्षमता वाढते. म्हणून उत्पन्न व्यापारशर्तीला 'देशाची आयातक्षमता' असेही म्हणतात.

**ई) एक घटक व्यापारशर्ती (Single Factoral Terms of Trade) :**

वायनर यांनी निव्वळ वस्तू व्यापारशर्तीमधील दोष दूर करण्यासाठी एक घटक व्यापारशर्ती संकल्पना मांडली. यासाठी त्यांनी निर्यात वस्तूच्या उत्पादन खर्चाचा म्हणजेच उत्पादकतेचा निर्देशांक तयार केला. हा निर्देशांक निर्यात वस्तूच्या उत्पादनाचा सरासरी तांत्रिक गुणक ह्या स्वरुपामध्ये तयार केला जातो.

एक घटक व्यापारशर्ती प्रकारामध्ये निर्यात वस्तूच्या किंमतीचा निर्देशांक व आयात वस्तूंच्या किमतीचा निर्देशांक यांची तुलना केली जाते. निर्यात वस्तूंच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांच्या उत्पादकतेमधील बदलाचा विचार केला जातो.

सूत्रामध्ये

$$Ts = Tc.Fx = \frac{Px.fx}{Pm}$$

$$\left(\therefore Tc = \frac{Px}{Pm}\right)$$

Ts = एक घटक व्यापारशर्ती

Tc = निव्वळ वस्तू व्यापारशर्ती

fx = निर्यात वस्तू उत्पादकता निर्देशांक

जेव्हा एखाद्या देशातील निर्यात उद्योगाची उत्पादकता सुधारते. तेव्हा त्या देशाची व्यापाराची एक घटक व्यापारशर्ती सुधारतात.

**उ) द्वि घटक व्यापारशर्ती (Double Factoral Terms of Trade) :**

स्वदेशातील उत्पादन घटकापासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंचा विदेशी वस्तूंबरोबर विनिमय होतो. त्यामध्ये विदेशी घटकांच्या किती मात्रा अंतर्भूत यांचा विचार करण्यासाठी वायनर यांनी द्विघटक व्यापारशर्ती संकल्पना मांडली.

$$Td = Tc \ \frac{fx}{fm} = \frac{Px}{Pm} \ \frac{fx}{fm}$$

$$\left(\therefore Tx = \frac{Px}{Pm}\right)$$

Td = द्विघटक व्यापारशर्ती

P*x*/Pm = वस्तू व्यापारशर्ती

f*x* = निर्यात वस्तू उत्पादकता निर्देशांक

fm = आयात वस्तू उत्पादकता निर्देशांक

द्विघटक व्यापारशर्ती मध्ये निर्यात वस्तूंच्या किमतीचा निर्देशांक आणि आयात वस्तूंच्या किंमतीचा निर्देशांक यांची तुलना केली जाते. निर्यात वस्तूसाठी वापरल्या जाणाऱ्या व दुसऱ्या देशातून आयात वस्तूंसाठी वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांच्या उत्पादकतेतील बदलाचा विचार केला जातो.


वायनर यांच्या मते द्विघटक व्यापारशर्ती निर्देशांक हा देशाला निरपेक्ष लाभ किती मिळतो हे दर्शविणाऱ्या निर्देशांकाऐवजी लाभाची आंतरराष्ट्रीय विभागणी कशाप्रकारे होते हे दर्शवितो.

**व्यापारशर्तीचे निर्धारण (Determination of Terms of Trade) :**

जेव्हा दोन देश आणि दोन वस्तूमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येत असतो तेव्हा व्यापारशर्ती ह्या निर्यात वस्तूच्या किंमती आणि आयात वस्तूच्या किंमती यांच्यातील गुणोत्तरानुसार ठरतात. एका देशाची निर्यात ही दुसऱ्या देशाची आयात असते तेव्हा एका देशाच्या व्यापारशर्ती दुसऱ्या देशाच्या व्यापारशर्तीच्या उलट असतात. समजा जर्मनी आणि इंग्लंड देश आहेत. जर्मनीमध्ये लिननचे उत्पादन होते आणि इंग्लंडमध्ये कापडाचे उत्पादन होते. जर्मनी आणि इंग्लंड एकमेकाबरोबर व्यापार करतात. जर्मनीच्या व्यापारशर्ती $P_L/P_C$ आहेत आणि इंग्लंडच्या व्यापारशर्ती $P_L/P_C$ आहेत. जेव्हा त्याच्यामधील किंमत गुणोत्तर संतुलित असते तेव्हा त्यांच्यामध्ये व्यापारशर्ती निर्धारित होतात.

$$\frac{P_L}{P_C} = \frac{P_C}{P_L} = 1$$

**आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण :**



वरील आकृतीत व्यापारशर्तीचे निर्धारण कसे होते हे स्पष्ट केले आहे. आकृतीमध्ये OE हा इंग्लंड आणि OG हा जर्मनीचा प्रस्ताव वक्र आहे. इंग्लंड आणि जर्मनीचा प्रस्ताव वक्र एकमेकांना A बिंदूत छेदतात. त्या ठिकाणी व्यापारशर्तीचे संतुलन होते. OT वक्रावरील उतारातून व्यापारशर्तीचे निर्धारण होते. OT वक्र रेषा दोन्ही वस्तूची सापेक्ष किंमत रेषा आहे. OT किंमतरेषा एक बरोबर आहे. $Px/Pm=Pc/Pl=OC/OL=1$ इंग्लंडची आणि $Px/Pm=Pl/Pc=OL/OC=1$ जर्मनीची किंमतरेषा आहे. OT या किंमतरेषेवर OC नग कपडे इंग्लंड जर्मनीला निर्यात करते. तर जर्मनी इंग्लंडला OL नग लिननची निर्यात करते. OC नग कपडे आणि OL नग लिनन हे समान आहेत. इंग्लंड आणि जर्मनी द्वारे क्रमश: कपडे आणि लिननची मागणी आणि पुरवठा OT किंमतरेषेबरोबर असतो. त्यामुळे व्यापारशर्ती संतुलित असतात.

OT संतुलित किंमत रेषेवर जर्मनी आणि इंग्लंड दोन्ही देश कपडे आणि लिननचा व्यापार करतात. $OT_1$ किंमत रेषेवर OE इंग्लंडचा प्रस्ताव वक्राला $A_2$ बिंदूत छेदत. अशाप्रकारे $OT_2$ किंमत रेषेला जर्मनीचा OG प्रस्ताव वक्र $A_1$ बिंदूत छेदतो. $A_1$ बिंदूत किंमत गुणोत्तर $OC_2/OL_2$ (= $OL_1/OC_1$) आहे. या किंमत रेषेवर इंग्लंड $OC_2$ नग निर्यात करेल आणि त्याच्या बदल्यात जर्मनी कडून $OL_2$ नग आयात करेल. दुसऱ्या बाजूला $A_1$ बिंदूवर किंमत गुणोत्तर $OL_1/OC_1$ आहे. यामध्ये जर्मनी $OL_1$ नग लिनन इंग्लंडला निर्यात करेल आणि त्याच्या बदल्यात इंग्लंडहून $OC_1$ नग कपडे आयात करेल. परंतु जर्मनीकडून $OL_1$ नग लिननची निर्यात इंग्लंडकडून आयात होणाऱ्या $OL_2$ नगापेक्षा अधिक आहे. लिननच्या मागणी पेक्षा जास्त असल्यामुळे जर्मनी लिननची किंमत कमी करेल आणि मागणी वाढेल. वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी जर्मनी आपल्या लिननचा पुरवठा OG प्रस्ताव वक्राबरोबर $A_1$ बिंदूच्या वर वाढवित नेले जाईल जो पर्यतA बिंदूपर्यत पोहचत नाही. अशा प्रकारे $A_2$ बिंदूवर इंग्लंड $OC_2$ नग कपडे जर्मनीला निर्यात करेल जी $OC_1$ नगापेक्षा जास्त आहे. ज्याला जर्मनी आयात करायला तयार आहे. शेवटी कपड्याची मागणी पुरवठ्यापेक्षा अधिक असल्यामुळे कापडाची किंमत घटेल त्यामुळे जर्मनीची मागणी वाढेल. वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी इंग्लंड आपला OE प्रस्ताव वक्र $A_2$ बिंदूच्या वर वाढवेल जोपर्यत A बिंदूपर्यत पोहचत नाही. अशा प्रकारे संतुलित व्यापारशर्त OT किंमत रेषेवर/किंमत गुणोत्तरावर पुन्हा संतुलित होईल, आणि लिनन आणि कपडे यांची आयात आणि निर्यातीची मात्रा समान होईल.

### २.२.४ व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक (Factors Influencing Terms of Trade) :

देशाच्या व्यापारशर्तीत सतत बदल होत असतात. व्यापारशर्तीमधील बदल अनुकूल आणि प्रतिकूल असतात. व्यापारशर्तीतील बदलांची तीव्रता कमी जास्त असते. व्यापारशर्तीवर अनेक घटक परिणाम करतात. त्यातील महत्वाच्या घटकांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

#### १) मागणीची लवचिकता :

जर देशाच्या निर्यात वस्तूकरिता परदेशात मागणीची लवचिकता जेवढी कमी असेल तेवढी व्यापारशर्तीवर अनुकूल प्रभाव पडतो. याउलट देशाच्या निर्यात वस्तूकरिता परदेशात मागणीची लवचिकता जेवढी जास्त

तेवढ्या व्यापारशर्ती जास्त प्रतिकूल होतात.

जर देशाच्या आयात वस्तूची मागणीची लवचिकता जास्त असेल तर व्यापारशर्ती अनुकूल असतात. याउलट जर देशाच्या आयात वस्तूची मागणीची लवचिकता अलवचिक असेलतर व्यापारशर्ती प्रतिकूल होतात.

**२) पुरवठ्याची लवचिकता :**

स्वदेशात निर्माण होणाऱ्या वस्तूच्या पुरवठ्याची लवचिकता जास्त असेल तर देशाला व्यापारशर्ती अनुकूल होतात. याउलट देशात निर्यात होणाऱ्या वस्तूंचा पुरवठा अलवचिक असेल तर व्यापारशर्ती प्रतिकूल असतात. आयात वस्तूची पुरवठ्याची लवचिकता जास्त असेल तर देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल होतात. याउलट आयात वस्तूची पुरवठ्याची लवचिकता अलवचिक असेल तर देशाला व्यापारशर्ती अनुकूल होतात.

**३) मागणीचे परिमाण/आकारमान :**

मागणीच्या परिमाणाचा व्यापारशर्तीवर परिणाम होतो. भारतासारख्या वाढणाऱ्या लोकसंख्येच्या देशामध्ये अत्यावश्यक वस्तूची मागणी मोठ्या प्रमाणात असते. जी मागणी पूर्ण करण्यासाठी आयात करावी लागते. अशावेळी व्यापारशर्ती अनुकूल आणि प्रतिकूल होऊ शकतात. मोठ्या प्रमाणात वस्तूची मागणी आहे. म्हणून कमी किंमतीत पुरवठा करतील त्यावेळी व्यापारशर्ती अनुकूल होतात. परंतु मोठ्या प्रमाणात आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची गरज असते त्यावेळी परकीय चलन नसेल तर त्यावेळी व्यापारशर्ती प्रतिकूल होतात.

**४) आर्थिक विकास :**

देशाचा आर्थिक विकास होत असेल तर उत्पादन क्षमता वाढते. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक कल्याणात वाढ होते. म्हणून आयात वस्तूंची मागणी वाढते. आयात वस्तूंच्या किंमती वाढून देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल ठरतात. याउलट आर्थिक विकासामुळे आयात पर्यायीकरण आणि निर्यात वस्तूंच्या पुरवठ्यात वाढ झाल्यास देशाला व्यापारशर्ती अनुकूल होतात.

**५) व्यापारचक्र :**

देशामध्ये तेजीची स्थिती असेल आणि आयात वाढून निर्यातीत घट होत असेल तर देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल होतात. याउलट मंदीची स्थिती असल्यामुळे आयातीत घट होऊन निर्यातीत वाढ होऊन देशाला व्यापारशर्ती अनुकूल होतात.

**६) पर्यायी वस्तू :**

देशातून निर्यात होणाऱ्या वस्तूसाठी विदेशात पर्यायी वस्तू उपलब्ध असतील तर व्यापारशर्ती देशाला प्रतिकूल आणि विदेशाला अनुकूल असतात. याउलट आपल्या देशात आयात होणाऱ्या वस्तूसाठी देशात पर्यायी वस्तू उपलब्ध असतील तर आपल्या देशाला व्यापारशर्ती अनुकूल असतात. परदेशाला प्रतिकूल असतात.

**७) लोकसंख्येचे आकारमान :**

देशामध्ये अतिरिक्त लोकसंख्या असेल तर आयात वाढून देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल ठरतात. याउलट देशामध्ये कमी किंवा पर्याप्त लोकसंख्या असेल तर आयात मर्यादीत होऊन व्यापारशर्ती अनुकूल होतात.

**८) सरकारी धोरण :**

सरकारचे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण संरक्षणात्मक असेल तर सरकार विदेशातून येणाऱ्या वस्तूवर जास्त दराने जकाती आकारणे, कोटा ठरवून देणे आणि इतर मार्गाचा अवलंब करुन आयाती कमी करते त्यावेळी व्यापारशर्ती देशाला अनुकूल असतात. आयात वस्तूंना पर्यायी वस्तू नसतील आणि मागणी अलवचिक असेल तर व्यापारशर्ती प्रतिकूल असतात. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण मुक्त असेल तर आयात वस्तूवर नियंत्रण ठेवता येत नाही तेव्हा व्यापारशर्ती प्रतिकूल असतात.

**९) व्यापारातील वस्तूचे स्वरुप :**

देशातून निर्यात होणाऱ्या वस्तूमध्ये प्राथमिक क्षेत्रातील वस्तू, शेती उत्पादने, कच्चा माल अन्नधान्य अशा स्वरुपाच्या वस्तू असतील आणि आयातीमध्ये तंत्रज्ञान यंत्रसामग्री आणि औद्योगिक वस्तूचा समावेश असेल त्यावेळी व्यापारशर्ती प्रतिकूल असतात. याउलट परिस्थिती मध्ये व्यापारशर्ती अनुकूल असतात.

**१०) आवडीनिवडीमध्ये बदल :**

आपल्या देशातून निर्यात होणाऱ्या वस्तूची विदेशामध्ये आवड वाढत असेल तर देशाला व्यापारशर्ती अनुकूल असतात. याउलट आवड कमी होत असेल तर व्यापारशर्ती प्रतिकूल असतात. आपल्या देशामध्ये आयात होणाऱ्या वस्तूची देशामध्ये आवड वाढत असेल तर व्यापारशर्ती प्रतिकूल होतात याउलट आवड कमी होत असेल तर व्यापारशर्ती अनुकूल होतात.

**११) परराष्ट्रीय संबंध :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी असणाऱ्या देशामध्ये सलोख्याचे आणि मैत्रीपूर्ण संबंध असतील तर व्यापारशर्ती अनुकूल असतात. याउलट देशामधील संबंध तणावाचे आणि संघर्षाचे असतील तर देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल असतात.

**१२) भांडवलाच्या हालचाली :**

भांडवल आणि अन्य वस्तूच्या स्वरुपात विदेशातून भांडवलाचा प्रवाह देशांतर्गत वस्तू आणि निर्यातीची मागणी कमी करतो. त्यांचा परिणाम निर्यात वस्तूच्या किंमती कमी होऊन व्यापारशर्ती प्रतिकूल होतात. त्याचबरोबर विदेशी कर्जाच्या परतफेडीसाठी मोठ्या प्रमाणात निर्यात करावी लागत असेल तर त्यांच्या किंमती कमी होऊन व्यापारशर्ती प्रतिकूल होतात.

**१३) अवमूल्यन :**

जेव्हा देश आपल्या चलनाचे अवमूल्यन करतो तेव्हा आयात वस्तू महाग होतात आणि निर्यात वस्तू स्वस्त होतात. आयात वस्तूच्या किंमती वाढल्यामुळे आयात वस्तूची मागणी कमी होते. तर निर्यात वस्तूची किंमत कमी झाल्यामुळे मागणी वाढते. म्हणून अवमूल्यन केल्यानंतर देशाच्या व्यापारशर्ती अनुकूल होतात.

वरील घटकांचा व्यापारशर्तीवर परिणाम होतो.

## २.३ सारांश

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तूच्या उत्पादनात आणि उपभोगात वाढ होणे म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभच आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातनवादी सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभावर आधारित आहे. ॲडम स्मिथच्या मते, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील श्रमविभागणी आणि विशेषीकरणाच्या लाभामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ प्राप्त होतात. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभामध्ये उत्पादन खर्चात घट, निर्यातीत वाढ, विशेषीकरणाचे लाभ, बाजारपेठांचा विस्तार, विकासास चालना, उत्पादन घटकांना योग्य मोबदला, उत्पादन घटकांची गतिशीलता वाढते, रोजगारात वाढ, मक्तेदारीत घट, नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये मदत, कल्याणात वाढ, व्यापार चक्रावर नियंत्रण या घटकांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे मोजमाप करण्यासाठी रिकार्डो दृष्टीकोन, मिलचा दृष्टीकोन आणि आधुनिक दृष्टीकोन वापरला जातो. जगातील सनातनवादी आणि नवसनातनवादी तसेच आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासून आर्थिक वृध्दीला चालना मिळते असे मते मांडली. त्यांच्या मते, व्यापार व वृध्दीचा प्रेरक आहे. आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास यामध्ये औद्योगिक उत्पादनात वाढ, बाजारपेठांचा विस्तार, दर्जात्मक वस्तू, साधनसामग्रीचा पर्याप्त वापर, तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्यांचा विस्तार, विदेशी गुंतवणूकीमध्ये वाढ आणि आर्थिक विकासाचा दर वाढतो.

आंतरराष्ट्रीय व्यापारात ज्या मूल्यावर वस्तूंची देवाण-घेवाण होते. त्याला व्यापारशर्ती किंवा आंतरराष्ट्रीय विनिमय गुणोत्तर असे म्हणतात. व्यापारशर्ती म्हणजे एका देशाच्या वस्तूच्या मोबदल्यात दुसऱ्या देशातील वस्तूचा विनिमय होय. देशाच्या निर्यात किंमती आणि आयात किंमतीमधील संबंध स्पष्ट करतो. व्यापारशर्तीच्या प्रकारामध्ये निव्वळ वस्तू व्यापारशर्ती, स्थूल वस्तू व्यापारशर्ती, उत्पन्न व्यापारशर्ती, एक घटक व्यापारशर्ती आणि द्विघटक व्यापारशर्ती समावेश होतो. व्यापारशर्तीवर परिणाम करणाऱ्या घटकामध्ये मागणीची लवचिकता पुरवठ्याची लवचिकता, मागणीचे आकारमान, आर्थिक विकास, व्यापारचक्र, पर्यायी वस्तू, लोकसंख्येचे आकारमान सरकारी धोरण, व्यापारातील वस्तूचे स्वरुप, आवडीनिवडीमध्ये बदल परराष्ट्रीय संबंध, भांडवलाच्या हालचाली आणि अवमूल्यनाचा समावेश होतो.

## २.४ पारिभाषिक शब्द :

१) **अवमूल्यन :** सरकार आपल्या देशाच्या चलनाचे मूल्य जेव्हा परदेशी चलनाच्या संदर्भात हेतुपूर्वक कमी करते तेव्हा त्यास अवमूल्यन म्हणतात.

२) **विनिमय नियंत्रण :** परकीय चलन बाजारात सरकारचा हस्तक्षेप घेवून परकीय चलनाचे दर ठरविणे.

३) **व्यापारचक्र :** अर्थव्यवस्थेत तेजी नंतर मंदी आणि मंदी नंतर तेजी अशा स्वरुपात नियमित होणारे बदल

४) **मागणीची लवचिकता :** मागणीतील प्रमाणशीर बदल आणि किंमतीतील प्रमाणशीर बदल यामधील गुणोत्तर

५) **पुरवठ्याची लवचिकता :** पुरवठ्यातील प्रमाणशीर बदल आणि किंमतीतील प्रमाणशीर बदल यामधील गुणोत्तर

६) **व्यापारशर्ती :** दोन देशामधील आयात वस्तू आणि निर्यात वस्तूच्या विनिमयदरास व्यापारशर्ती असे म्हणतात.

**२.५ स्वयंअध्ययन प्रश्न**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) सामान्यपणे विकसनशील देशांना व्यापारशर्ती ........... असतात.

अ) अनुकूल ब) प्रतिकूल क) यापैकी नाही ड) वरील सर्व

२) दोन देशांच्या आयात-निर्यातीच्या वस्तूंमधील विनिमय दरास ..... म्हणतात.

अ) व्यापारशर्ती ब) अवमूल्यन क) श्रमविभागणी ड) यापैकी नाही

३) देशांच्या निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या पुरवठ्याची लवचिकता जास्त असेल तर देशाला व्यापारशर्ती .......असतात.

अ) अनुकूल ब) प्रतिकूल क) तटस्थ ड) यापैकी नाही

४) आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे ...... मिळतात.

अ) तोटे ब) लाभ क) अवमूल्यन ड) यापैकी नाही

५) स्थूल व्यापारशर्तीची संकल्पना ...... यांनी मांडली

अ) ॲडम स्मिथ ब) वायनर क) टॉसिंग ड) यापैकी नाही.

**२.७ सरावासाठी स्वाध्याय**

**ब) टीपा लिहा.**

१) व्यापार-आर्थिक वृध्दीचे इंजिन

२) व्यापारशर्तीचे प्रकार

३) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ

**क) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ म्हणजे कय? आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभाचे मोजमाप करणारे दृष्टीकोन स्पष्ट करा?

२) व्यापारशर्ती म्हणजे काय? व्यापारशर्तीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा?

३) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ म्हणजे काय? आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ सविस्तर स्पष्ट करा?

**२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) प्रतिकूल २) व्यापारशर्ती ३) अनुकूल ४) लाभ ५) टॉसिंग

**२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके –**


१) झामरे ग. ना. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

२) झिंगन एम. एल. - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, वृंदा पब्लिकेशन्स प्रा.लि. दिल्ली

३) वावरे-घाटगे - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, एज्युकेशनल, पब्लिशर्स, औरंगाबाद

४) भोसले काटे - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर

५) ढमढेरे - आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे


***

# घटक – ३
# विनिमय दर
# ( Exchange Rate )

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ विनिमय दराचा अर्थ/व्याख्या

    ३.२.२ क्रयशक्ती समता सिध्दांत

३.३ स्थिर विनिमय दर

३.४ बदलता विनिमय दर

३.५ तरंगता/तरता विनिमय दर

३.६ सारांश

३.७ पारिभाषिक शब्द

३.८ आपली प्रगती तपासाची उत्तरे

३.९ सरावासाठी प्रश्न

३.१० अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे : (Objectives)

सदर घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला –

१. विनिमय दराचा अर्थ स्पष्ट करता येईल.

२. क्रयशक्ती समता सिध्दांत स्पष्ट करता येईल.

३. विनिमय दराचे विविध प्रकार आणि त्यांचे गुण – दोष यांचे विश्लेषण करता येईल.

## ३.१ प्रस्तावना Introduction

आंतरराष्ट्रीय व्यवहारामध्ये विनिमय दर ही संकल्पना खूप महत्त्वाची आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात प्रत्येक देश दुसऱ्या देशाबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर वस्तू व सेवांचा व्यापार, भांडवलाची गुंतवणूक, विविध प्रकारची कर्ज यासारख्या घटकांच्या माध्यमातून व्यवहार करीत आहेत. या व्यवहारामध्ये सुलभता येण्यासाठी विनिमय दराचे महत्व अनन्यसाधारण आहे. विशेषत: आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना आणि जगातील बहुतांश देशांनी स्विकारलेले अपरिवर्तनिय कागदी चलन यामुळे विनिमय दराची भूमिका अतिशय महत्त्वाची झाली आहे.

## ३.२ विषय विवेचन : (Presentation of Subject Matter)

सदर घटकामध्ये आपण विनिमय दराचा अर्थ / व्याख्या आणि विनिमय दराच्या संदर्भात असणारा क्रयशक्ती समता सिध्दांत अभ्यासणार आहोत. तसेच विनिमय दराचे जे विविध प्रकार आहेत त्यापैकी प्रामुख्याने स्थिर विनिमय दर, बदलता विनिमय दर आणि तरंगता / तरता विनिमय दर यांच्या गुण – दोषांचे सविस्तर विश्लेषण करणार आहोत.

### ३.२.१ विनिमय दराचा अर्थ / व्याख्या :

ज्याप्रमाणे कोणत्याही वस्तूची किंमत चलनाच्या सहाय्याने व्यक्त केली जाते; त्याप्रमाणे एका चलनाची किंमत देखील दुसऱ्या चलनाच्या सहाय्याने व्यक्त केली जाते. एका चलनाची किंमत दुसऱ्या चलनात व्यक्त करणारा जो घटक आहे त्याला विनिमय दर असे म्हटले जाते. जागतिक स्थरावर प्रत्येक देशाचे वेगळे चलन आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध देशांमध्ये आर्थिक व्यवहार होत असतांना त्यांच्या चलनाचे मूल्य निर्धारीत करण्यासाठी विनिमय दराचा आधार घेतला जातो. विनिमय दराचा अर्थ/व्याख्या खालीलप्रमाणे.

१) क्लिअर आणि क्रम्प यांच्या मते, ''विनिमय दर म्हणजे एका चलनाची दुसऱ्या चलनात व्यक्त केलेली किंमत होय.''(According to Clare & crump "Rate of exchange is only a price of one currency quoted in terms of another currency.")

२) आंतरराष्ट्रीय व्यवहारात दोन देशातील चलनांची देवघेव ज्या दराने होते त्याला विनिमय दर असे म्हणतात.

३) एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनात व्यक्त केलेली अधिकृत किंमत म्हणजे विनिमय दर होय.

थोडक्यात एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनात किंवा दुसऱ्या देशाच्या चलनाचे पहिल्या देशाच्या चलनात किंमत व्यक्त करण्याचे साधन म्हणजे विनिमय दर होय. यालाच हुंडणावळ दर असे देखील म्हणतात.

उदा.१ डॉलर = ७३.१० रूपये, १ पौंड = १००.७० रूपये, १ युरो = ८७.८८ रूपये, आणि १ येन = ६७.१२ इ.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चलनाची मागणी व पुरवठा यानुसार विनिमय दर बदलत असतो. सध्या कोणत्याही देशात सुवर्ण परिमाण चलन पध्दती अस्तित्वात नाही. त्यामुळे सुवर्ण समता सिध्दांत कालबाह्य ठरला आहे. आज जवळपास सर्वच देशांमध्ये अपरिवर्तनीय कागदी चलन पध्दती स्विकारण्यात आली आहे. या पध्दतीमध्ये चलनाच्या 'क्रयशक्ती समता सिध्दांतानुसार' विनिमय दराची निश्चिती होते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चलनाची मागणी व पुरवठा यांच्या संघर्षातून विनिमय दर निर्धारित होतो. यालाच बाजार विनिमय दर असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून सतत विनिमय दरात स्थैर्य राखण्याचा प्रयत्न केला जातो.

**३.२.२ क्रयशक्ती समता सिध्दांत (Purchasing Power Parity Theory)** :

अपरिवर्तनीय कागदी चलनपध्दती असणाऱ्या देशांमध्ये परस्पर विनिमय दर कसा ठरतो याचे स्पष्टीकरण क्रयशक्ती समता सिध्दांतामध्ये करण्यात आले आहे. प्रसिध्द स्विडिश अर्थतज्ज्ञ गुस्ताव कॅशेल यांनी सन १९२० मध्ये या सिध्दांताची मांडणी केली आहे. या सिध्दांतानुसार जेंव्हा विविध देशात होणाऱ्या व्यवहारामध्ये अपरिवर्तनीय कागदी चलनपध्दतीचा स्विकार केलेला असतो. अशा देशात ठरणारा मूलभूत विनिमय दर त्या देशातील चलनांच्या क्रयशक्ती समतेने निर्धारित होतो.

एका देशातील चलनाला दुसऱ्या देशातून मागणी येते याचे मूलभूत कारण म्हणजे चलनाची खरेदीशक्ती होय. अशी खरेदीशक्ती वापरून परदेशातील वस्तू व सेवांची खरेदी करता येते. असे विदेशी चलन स्वदेशी चलनाच्या सहाय्याने खरेदी करता येते. ज्या ठिकाणी दोन देशांतील चलनांची खरेदीशक्ती समान होते त्या ठिकाणी विनिमय दर निर्धारित होतो. उदा. समजा इंग्लंडमध्ये १ पौंड खर्च केला असता जेवढ्या वस्तूंची खरेदी करता येते तेवढ्याच वस्तूंची खरेदी करण्यासाठी १०० रूपये खर्च होत असतील तर या पातळीला १ पौंड आणि १०० रूपये यांची खरेदीशक्ती समान आहे. म्हणून १ पौंड = १०० रूपये हा विनिमय दर ठरेल. यालाच क्रयशक्ती समता सिध्दांताची निरपेक्ष स्वरूपातील मांडणी असे म्हणतात. प्रत्यक्षामध्ये पैशाचे मूल्य निपेक्षपणे मोजता येत नाही.

गुस्ताव कॅसेल यांनी समतोल विनिमय दरात होणारे बदल मोजण्याचे साधन म्हणून क्रयशक्ती समता सिध्दांताचे सापेक्ष स्वरूपात विश्लेषण केले. या पध्दतीत किंमत निर्देशांकाचा वापर केला जातो. देशांतर्गत पातळीवर चलनाच्या क्रयशक्तीतील बदल निर्देशांकाच्या सहाय्याने मोजता येतो. आधार वर्षातील विनिमय दर माहीत असल्यास नवीन विनिमय दर निश्चित करण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला जातो.

**नवीन विनिमय दर = आधार वर्षातील विनिमय दर : (स्वदेशातील किंमत निर्देशांक + विदेशातील किंमत निर्देशांक)**

समजा, सन २००० हे आधार वर्ष गृहित घेतल्यास त्या वर्षी इंग्लंड व भारत यांच्यातील विनिमय दर १ पौंड = ६२ रूपये असा होता. दोन्ही देषातील किंमत पातळीत बदल झाल्यामुळे इंग्लंडमधील किंमत निर्देशांक ७०० तर भारतातील किंमत निर्देशांक ११०० झाल्यास नवीन विनिमय दर खालीलप्रमाणे असेल.

नवीन विनिमय दर = ६२ x (११०० / ७००) = ९७.४३ म्हणजेच नवीन विनिमय दर हा १ पौंड = ९७.४३ रूपये असा येईल. अशावेळी इंग्लंडमधील लोकांना १ पौंडमध्ये ६२ रूपयांऐवजी ९७.४३ रूपयांच्या वस्तू खरेदी

करता येतील. वरील उदाहरणात, भारतातील किंमत पातळीत जास्त प्रमाणात तर इंग्लंडमधील किंमत पातळीत कमी प्रमाणात वाढ झाली तर रूपयाचे मूल्य नक्की कमी होईल.

एका चलनाच्या संदर्भात दुसऱ्या चलनाचे मूल्य बाजारातील मागणी पुरवठ्याच्या परिस्थितीनुसार निश्चित होते. तर दीर्घकाळात विनिमय दर दोन चलनांच्या संबंधित मूल्यांव्दारे निश्चित होतो. अशाप्रकारे अपरिवर्तनिय कागदी चलन पध्दतीमध्ये एका चलनाचे बाह्यमूल्य दुसऱ्या चलनाच्या तुलनेत त्या चलनाच्या देशांतर्गत खरेदीशक्तीवर अवलंबून असते. म्हणजेच विनिमय दर हे वेगवेगळ्या देशांमधील भिन्न चलनाच्या सापेक्ष क्रयशक्तीव्दारे निर्धारित केले जातात.

**३.२.३ टीकात्मक परीक्षण :**

क्रयशक्ती समता सिध्दांताच्या काही मर्यादा आहेत त्या खालीलप्रमाणे.

**१) क्रयशक्ती आणि विनिमय दर संबंध अयोग्य :**

या सिध्दांतात चलनाच्या खरेदीशक्तीच्या समानतेने विनिमय दर ठरतो असे म्हटले आहे. दोन देशांतील चलनाची खरेदीशक्ती आणि विनिमय दर यामध्ये फलनात्मक संबंध असतो असे म्हटले आहे. परंतु व्यवहारात असे आढळून येत नाही. कारण विनिमय दरावर सट्टेबाजी, प्रशुल्क, भांडवलाची आयात - निर्यात इत्यादी घटकांचा देखील परिणाम होतो.

**२) किंमतपातळी व निर्देशांकाची मर्यादा :**

या सिध्दांतामध्ये दोन देशांतील सर्वसाधारण किंमत पातळीची तुलना करून चलनाची क्रयशक्ती ठरते. परंतु, सर्वसाधारण किंमतपातळी आणि चलनाची खरेदीशक्ती मोजण्यासाठी तयार केला जाणारा निर्देशांक या दोन्ही संकल्पना सदोष आहेत. त्यामुळे त्यांची तुलना करणे योग्य ठरत नाही.

**३) किंमत बदलाकडे दुर्लक्ष :**

सुरूवातीचा विनिमय दर माहित असल्यास नवीन विनिमय दर किती असेल याचे स्पष्टीकरण या सिध्दांतात केले आहे. परंतु, बऱ्याच वेळेस मूळ विनिमय दर माहित नसतो. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारात समाविष्ट नसणाऱ्या वस्तूंच्या किंमतीतील बदल हे व्यापारात समाविष्ट असाणाऱ्या वस्तूंच्या किंमतीत बदल घडवून आणतात, याकडे सिध्दांतात दुर्लक्ष करण्यात आले आहे.

**४) विरोधाभास :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात समाविष्ट असणाऱ्या वस्तूंच्या किंमती विनिमय दर ठरवितात असे म्हणण्याऐवजी विनिमय दर वस्तूंच्या किंमती ठरवितो, असे म्हणणे अधिक उपयुक्त ठरेल.

**५) मुक्त व्यापार धोरणाचा अभाव :**

क्रयशक्ती समतेने विनिमय दर ठरविण्यासाठी सर्व देशांनी मुक्त व्यापार धोरणाचा अवलंब करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र आज कोणत्याही देशात मुक्त व्यापार धोरणाचा अवलंब केला जात नाही.

**६) परिणामकारक घटकांकडे दुर्लक्ष :**

विनिमय दरावर बँकिंग सुविधा, वाहतूक सुविधा, कर्जाची देवाण - घेवाण, पर्यटक, विद्यार्थी व अभ्यासक यांनी केलेला खर्च आणि आयात - निर्यात प्रशुल्क यांचा परिणाम होतो. या सिध्दांतामध्ये मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

**७) जे. एम. केन्सची टीका :**

केन्सच्या मते, या सिध्दांतामध्ये वस्तू व सेवा तसेच भांडवल यांच्या आयातीची आणि निर्यातीची परस्पर मागणीची लवचीकता यांचा विचार करण्यात आला नाही.

**८) प्रा. पिगुची टीका :**

पिगुच्या मते, या सिध्दांतामध्ये अनेक मर्यादा आहेत. सिध्दांताचे विश्लेषण करतांना अनेक अवास्तव गृहितांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच या सिध्दांतमध्ये दोन देशांतील आर्थिक व व्यापारी संबंध सतत बदलत असतात याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

अशा प्रकारे क्रयशक्ती समता सिध्दांतावर अनेक टीका करण्यात येत असल्या तरी या सिध्दांताचे अर्थशास्त्रीय महत्व अनन्यसाधारण आहे.

### ३.२.४ आपली प्रगती तपासा (Check your progress) :

१. एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनात व्यक्त केलेली किंमत म्हणजे ----- होय.

अ) चलनाची मागणी ब) चलनाचा पुरवठा क) विनिमय दर ड) व्यापार

२. क्रयशक्ती समता सिध्दांत ----- यांनी मांडला.

अ) ॲडम स्मिथ ब) जे. एम. केन्स क) डेव्हिड रिकार्डो ड) गुस्ताव कॅसेल

३. क्रयशक्ती समता सिध्दांताची मांडणी ----- मध्ये करण्यात आली.

अ) १९२० ब) १९३० क) १९४० ड) १९५०

४. सामान्यत: आंतरराष्ट्रीय पातळीवर ----- कडून विनिमय दरात स्थैर्य राखण्याचा प्रयत्न केला जातो.

अ) जागतीक व्यापार संघटना ब) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी क) जागतीक बँक ड) रिझर्व बँक

५. विनिमय दराला ----- दर असेही म्हणतात.

अ) खरेदी ब) हुंडणावळ क) मागणी ड) वितरण

### ३.३ स्थिर विनिमय दर (Fixed Exchange Rate) :

ज्यावेळी विदेशी चलनाची देवाण - घेवाण शासनाने कायद्यानुसार ठरविलेल्या विनिमय दरानुसार केली जाते तेव्हा त्याला स्थिर विनिमय दर असे म्हणतात. जेंव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण परिमाण पध्दती

अस्तित्वात होती तेव्हा स्थिर विनिमय दराचा वापर केला जात होता. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून विनिमय दरात सतत स्थैर्य राखण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु एखाद्या देशाच्या व्यवहारतोलात मोठ्या प्रमाणात तुट निर्माण होते तेव्हा त्या देशाला विनिमय दरात बदल करण्याची परवाणगी दिली जाते.

**३.३.१ स्थिर विनिमय दराचे गुण (Merits of Fixed Exchange Rate) :**

स्थिर विनिमय दराचे गुण खालीलप्रमाणे –

**१) व्यवहारात निश्चितता :**

स्थिर विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात व व्यवहारात निश्चितता आणि विश्वासाचे वातावरण तयार होते. कारण निर्यातदारांना निर्यातीतून किती उत्पन्न मिळेल आणि आयातदारांना आयातीसाठी किती किंमत द्यावी लागेल याची स्पष्ट कल्पना येते. त्यामुळे एकप्रकारे वीत्तिय शिस्त लागण्यास मदत होते.

**२) सट्टेबाजीवर नियंत्रण :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर चलन मूल्यातील बदलांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात सट्टेबाजीचे व्यवहार केले जातात. परंतु स्थिर विनिमय दरामध्ये चलनाचे मूल्य स्थिर राहते त्यामुळे सट्टेबाजीच्या व्यवहारावर नियंत्रण प्रस्थापित होते.

**३) आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ :**

स्थिर विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांच्यामध्ये विश्वासाचे वातावरण तयार होऊन व्यापारात वाढ होते.

**४) विदेशी गुंतवणूकीला चालना :**

स्थिर विनिमय दरामुळे विदेशी गुंतवणूकदारांना दीर्घकाळात देखील परताव्याची खात्री वाटते; त्यामुळे विदेशी गुंतणूकीला चालना मिळते.

**५) भांडवल बाजाराचा विकास :**

स्थिर विनिमय दरामुळे भांडवल बाजाराचा विकास होण्यास मदत होते. स्थिर विनिमय दरामुळे अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होते. विदेशी खाजगी गुंतवणूक हा आर्थिक विकासाचा महत्वाचा स्त्रोत असतो. अल्पविकसित देशांना विकास साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते.

**६) विकास कार्यात मदत :**

अल्पविकसित देशांना विकास कार्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली साधनसामग्रीची आयात करावी लागते. तसेच विदेशासी कर्जेही घ्यावी लागतात. स्थिर विनिमय दरामुळे अशा भांडवली साधनसामग्रीचा व कर्जाचा निश्चित अंदाज येतो. त्यामुळे विकासात्मक आयात सुलभ होऊन विकास कार्यात मदत होते.

**७) व्यापारावर अवलंबून असणाऱ्या देशांना लाभदायक :**

इंग्लंड, डेन्मार्क, जपान यासारख्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून असणाऱ्या देशांना स्थिर विनिमय दर अधिक लाभदायक ठरतो.

**८) विकसनशील देशांना उपयुक्त :**

विकसनशील देशांना आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. स्थिर विनिमय दर पध्दतीमध्ये विदेशी भांडवलाचा देशांर्गत प्रवाह सुरळीतपणे चालू राहतो. त्यामुळे विकसनशील देश या पध्दतीला प्राधान्य देतात.

**९) विशिष्ट चलनगटांना उपयुक्त :**

सध्याच्या काळात काही देशांच्या चलनाला आंतरराष्ट्रीय पातळीवर बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे जगात काही चलन गट निर्माण झाले आहेत. उदा. डॉलर गट, पौंड स्टर्लिंग गट, युरो गट इ. स्थिर विनिमय दरामुळे अशा चलन गटांचे काम अधिक सुलभ बनते व ते अधिक भक्कम पायावर टिकून राहते.

**१०) देशांतर्गत उद्योगांच्या उभारणीला चालना :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमध्ये निर्यातक्षम वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना फायद्या – तोट्याचे अचूक अंदाज बांधता येतात. तसेच विकसनशील देशांना औद्योगीक विकासासाठी विदेशी भांडवलाची आयात करता येते. त्यामुळे देशांतर्गत उद्योगांच्या उभारणीला चालना मिळते.

**११) देशांतर्गत नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर :**

अनेक विकसनशील देशांमध्ये भांडवलाच्या अभावी उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर होत नाही. अशावेळी स्थिर विनिमय दर पध्दतीमध्ये भांडवलाची आयात करून देशातील उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर करता येतो.

**१२) रोजगार निर्मितीला चालना :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमूळे गुंतवणूकीला चालना मिळून नविन रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

**१३) आर्थिक विकासाला चालना :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमूळे अर्थव्यस्थेमध्ये गुंतवणूक, उत्पादन, निर्यात, रोजगार, किंमत पातळी, व्याजाचे दर आदी बाबतीत स्थैर्याचे वातावरण निर्माण होऊन एकूनच आर्थिक विकासाला चालना मिळते इत्यादी स्थिर विनिमय दराचे गुण होय.

### ३.३.२ स्थिर विनिमय दराचे दोष (Demerits of Fixed Exchange Rate)

स्थिर विनिमय दराचे काही दोष आहेत ते खालीलप्रमाणे –

**१) अंतर्गत स्थैर्याचा बळी :**

स्थिर विनिमय दर पध्दतीचा स्वीकार केल्यानंतर देशाला स्वतंत्र मौद्रिक धोरण राबविता येत नाही. अनेक वेळा विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी देशांतर्गत किंमत पातळीत सतत बदल करावे लागतात. परिणामी अंतर्गत स्थैर्य प्रस्थापित करणे कठीण होते.

**२) व्यापार वाढीला चालना मिळते याचा आधार नाही :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकार वाढतो असे म्हटले जाते. परंतु प्रत्यक्षात तसा अनुभव आल्याचा पुरावा नाही.

**३) देशातील नैसर्गिक संसाधनांचा अयोग्य वापर :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमध्ये अर्थव्यवस्थेचे संपूर्ण लक्ष विदेशी व्यापारावर केंद्रीत झालेले असते. त्यामुळे वस्तू व सेवांची जास्तीत – जास्त निर्यात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते त्यामुळे उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा अतिरिक्त वापर केला जातो.

**४) वास्तवापासून दूर :**

सध्याच्या काळात प्रत्यक्षामध्ये कोणत्याही देशात स्थिर विनिमय दर पध्दतीचा वापर केला जात नाही. कारण ही पध्दती वास्तवापासून दूर असल्याचे दिसून येते.

**५) दिर्घकाळात अशक्य :**

दिर्घकाळात आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवहारतोलात तसेच किंमत पातळीत मोठे बदल घडून येतात. त्यामुळे अशा होणाऱ्या बदलांना नियंत्रित ठेवण्याठी देश आपल्या विनिमय दरात बदल करतात. म्हणून दिर्घकाळात स्थिर विनिमय दर पध्दती केवळ अशक्य आहे.

**६) आर्थिक विषमतेत वाढ :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित व्यवसायांसाठी संपूर्ण अर्थव्यवस्था कार्यरत असते. त्यामुळे या व्यवसायातील लोकांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होते. परंतु, इतर बहुसंख्य लोकांच्या उत्पन्नावर याचा काहिही परिणाम होत नाही. त्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

**७) चलनगटांसाठी आवश्यक नाही :**

स्थिर विनिमय दर पध्दतीमुळे विविध चलनगटांचे कामकाज अधिक सुलभ होते असा एक विचार आहे. परंतु, या चलनगटांचे चलन अगोदरच खूप मजबूत असल्यामुळे यासाठी स्थिर विनिमय दर पध्दतीची आवश्यकता वाटत नाही.

**८) कृत्रिम स्थैर्य :**

स्थिर विनिमय दर पध्दतीचा स्वीकार केला आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थैर्याचे वातावरण निर्माण झाले. तर, हेतुपूरस्सर विनिमय दरात स्थैर्य ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु, हे स्थैर्य कृत्रिम स्वरूपाचे असते. यामुळे अर्थव्यवस्थेत काळाबाजार वाढून राष्ट्रहीताचा बळी जावू शकतो.

**९) आर्थिक अस्थिरतेच्या काळात निरूपयोगी :**

स्थिर विनिमय दर पध्दतीचा स्वीकारल्यानंतर विदेशात निर्माण होणाऱ्या तेजी किंवा मंदी यासारख्या घटनांपासून आपल्या अर्थव्यवस्थेचे संरक्षण करता येत नाही.

**१०) अवमूल्यन :**

विनिमय दरात स्थैर्य राखण्यासाठी काही वेळा देशी चलनाचे सक्तीचे अवमूल्यन करावे लागते.

इत्यादी स्थिर विनिमय दराचे दोष आहेत.

### ३.३.३ आपली प्रगती तपासा (Check Your Progress) :

१. आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण परिमाण पध्दती होती तेंव्हा-----वापरला जात होता.

अ) स्थिर विनिमय दर ब) बदलता विनिमय दर क) तरंगता विनिमय दर ड) यापैकी नाही

२. ----- नंतर बऱ्याच देशांनी स्थिर विनिमय दर पध्दतीचा त्याग केला.

अ) १९७५ ब) १९८० क) १९९० ड) १९९५

३. ----- ही स्थिर विनिमय दराची मर्यादा नाही.

अ) अंतर्गत स्थैर्याचा बळी ब) रोजगार निर्मितीला चालना

क) देशातील नैसर्गिक संसाधनांचा अयोग्य वापर ड) आर्थिक विषमतेत वाढ

४. ----- स्थिर विनिमय दर पध्दतीचे गुण आहेत.

अ) व्यवहारात निश्चितता ब) सट्टेबाजीवर नियंत्रण क) आर्थिक विकासाला चालना
ड) वरीलपैकी सर्व

५. ----- स्थिर विनिमय दर पध्दतीचे दोष आहेत.

अ) आर्थिक विषमतेत वाढ ब) कृत्रिम स्थैर्य क) वास्तवापासून दूर ड) वरीलपैकी सर्व

### ३.४ बदलता विनिमय दर (Flexible Exchange Rate) :

बदलते किंवा लवचिक विनिमय दर हे बाजारातील विदेशी चलनाची मागणी व पुरवठा यांच्या समतोलातून निश्चित होतात. शासनाचा विनिमय दर निर्धारणात हस्तक्षेप नसतो. जर विनिमय दर बाजारातील मागणी व पुरवठ्यानुसार ठरत असेल तर देशाच्या व्यापारतोलात तसेच व्यवहारतोलात आपोआप समतोल प्रस्थापित होतो. म्हणून बदलत्या विनिमय दराची व्याख्या अशी करता येते की, 'जेंव्हा विनिमय दर शासनाच्या हस्तक्षेपाविना बाजारातील विदेशी चलनाची मागणी व पुरवठा यांच्या समतोलातून ठरतो, तेंव्हा त्यास बदलता विनिमय दर असे म्हणतात.'

अपरिवर्तनीय कागदी चलन पध्दती असणाऱ्या देशात विनिमय दरात सतत बदल होत असतात. पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे आणि आर्थिक विकास साध्य करणे यासाठी बदलत्या विनिमय दराचा अवलंब केला जातो. बदलत्या विनिमय दर पध्दतीमध्ये चलनाचे क्रयशक्ती समता मूल्य निश्चित केलेले असते. जर बाजारात विदेशी चलनाची मागणी व पुरवठा यांच्या संघर्षातून जो विनिमय दर ठरतो त्याला मुक्तपणे बदलणारा विनिमय दर म्हणतात. परंतु जेंव्हा विनिमय दरातील मर्यादित करण्यासाठी मध्यवर्ती बँक विदेशी चलनाची खरेदी किंवा विक्री

करते त्याला मर्यादित बदलणारा विनिमय दर असे म्हणतात.

विनिमय दर मुक्तपणे बदलू नये यासाठी काही वेळा 'विनिमय स्थिरीकरण निधी' ची स्थापना केली जाते. वेगवेगळ्या देशांची चलने व सोन्याच्या स्वरूपातील साठा या निधीत एकत्रित केला जातो आणि जेव्हा वेगवेगळ्या कारणांनी चलनदरात बदल घडून येतात तेव्हा त्यांना निष्प्रभावी करण्यासाठी त्या निधीचा वापर केला जातो. विनिमय स्थिरिकरण निधीच्या वापरामुळे विनिमय दरातील अनपेक्षित व अल्पकालीन बदल नियंत्रित होतात. लवचिक विनिमय दर पध्दतीमुळे सुवर्ण परिमाण पध्दतीतील विनिमय दर व मुक्तपणे बदलणारा विनिमय दर या दोहोंचा सुवर्णमध्य साध्य केला जातो.

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून जी विनिमय दर पध्दती अंमलात आली तिला व्यवस्थापित लवचिक विनिमय दर पध्दती असे म्हणतात. या पध्दतीत स्थिर विनिमय दराची काही वैशिष्ट्ये होती तर काही प्रमाणात लवचिक विनिमय दराचीही तरतूद आहे. या दोन्हीत समन्वय साधण्यात नाणेनिधीला बरेच यश आले आहे.

### ३.४.१ बदलत्या विनिमय दराचे गुण (Flexible Exchange Rate)

बदलत्या विनिमय दराचे काही गुण आहेत ते खालील प्रमाणे.

**१) व्यापारवाढीस चालना :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होते. कारण अवमुल्यनामुळे निर्यातवाढीस चालना मिळत असते. बदलत्या विनिमय दरामुळे नेहमी अवमुल्यनास प्रोत्साहन मिळते. अवमुल्यनामुळे अनुकूल असा विनिमय दर प्रस्थपित करता येतो.

**२) सट्टेबाजीचे नियंत्रण :**

विदेशी चलनाच्या बाबतीत काही व्यक्ती नेहमी सट्टेबाजीचे धोरण अनुसरतात. परकीय चलनाच्या मूल्यासंबंधी काही अंदाज बांधता येतात आणि ते खरे ठरल्यास परकीय चलनाच्या खरेदी - विक्री व्यवहारातून भरपूर नफा मिळतो. अशा स्थितीत बदलते विनिमय दर जर बदलत राहिले तर सट्टेबाजी करणाऱ्यांना अचूक अंदाज बांधता येणार नाहीत आणि सट्टेबाजीचे व्यवहार नियंत्रित होतील.

**३) गुंतवणुकीला चालना :**

बदलत्या विनिमय दरामुळे गुंतणुकीला चालना मिळते. विनिमय दरात होणारे संभाव्य बदल लक्षात घेऊन अशी गुंतवणूक केली जाते. विदेशी भांडवल आपल्या देशात यावे व देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळावी यासाठी असे धोरण स्वीकारले जाते. अशा स्थितीत सरकार स्वदेशी चलनाचे बाह्यमूल्य कमी करीत असते. त्यामुळे परकीयांना अधिक चलन मिळून ते भांडवल गुंतवणुकीला उत्सुक असतात.

**४) चलनगटांना अडचणी नाहीत :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे चलनगटांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होत नाही. उलट काही तज्ज्ञांच्या मते, या पध्दतीमुळे चलनगटांचे व्यवहार अधिक सुरळीत झाले आहे.

**५) अंतर्गत आर्थिक स्वातंत्र्य अबाधित :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे परिस्थितीनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य मिळते. अलीकडच्या काळात बहुतेक देशांनी आर्थिक विकासाचे कार्यक्रम हाती घेतले आहेत ते यशस्वी होण्यासाठी देशाचे व्यापारविषयक धोरण बदलते असणे गरजेचे आहे. त्यासाठी बदलत्या विनिमय दर पध्दतीचा अवलंब केला जातो.

**६) साधी पध्दती :**

बदलती विनिमय दर पध्दती समजण्यास अगदी साधी व सोपी आहे. खुल्या बाजारात चलनाच्या मागणी – पुरवठ्यातील बदलानुसार विनिमय दरात बदल होतो. त्यामुळे चलनाची टंचाई निर्माण होत नाही. म्हणून बदलत्या विनिमय दराचे समर्थन केले जाते.

**७) परिवर्तनीय पध्दती :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे खुल्या व्यापारास एक प्रकारे मदत होत. विनिमय नियंत्रणाची गरज भासत नाही. परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापारात होणाऱ्या स्थित्यंतराचे लाभ मिळतात.

**८) व्यवहारतोलातील असमतोल टाळता येतो :**

आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीतील असमतोल टाळण्यासाठी बदलती विनिमय दर पध्दती उपयुक्त ठरते. व्यवहार तोलातील प्रतिकुलता कमी करण्यासाठी विनिमय दरामध्ये योग्य ते बदल करण्याचे स्वातंत्र्य देशाला असावे यासाठी या पध्दतीचा वापर केला जातो. या पध्दतीमध्ये व्यवहारतोलात सुधारणा करण्याची प्रक्रिया ही स्वयंचलित असते. त्यामुळे अंतर्गत किंमती, उत्पन्न, रोजगार यांमध्ये बदल करण्याची गरज पडत नाही.

**९) बाह्य घटकांपासून संरक्षण :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे देशांतर्गत अर्थव्यवस्थेचे बाह्य घटकांपासून संरक्षण करता येते. समजा, विदेशात मंदीची परिस्थिती निर्माण झाली आणि स्थिर विनिमय दर पध्दती असेल तर निर्यातीत घट होऊन स्वदेशालाही मंदीचे दुष्परिणाम भोगावे लागतील. याउलट जर बदलत्या विनिमय दर पध्दतीचा स्वीकार केला असेल तर निर्यात कमी झाल्यास विनिमय दरात घट होईल. त्यामुळे निर्यातीला पुन्हा प्रोत्साहन मिळून मंदीचे दुष्परिणाम टाळता येतील.

**१०) समतोल धोरण :**

विनिमय दरात फार मोठे चढ – उतार होणार नाहीत याची खात्री असेल तर बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराची हानी होण्याची शक्यता असते. अशावेळी वायदा दराच्या सहाय्याने बदलत्या विनिमय दरातील धोके कमी करून समतोल साधला जातो.

**११) परकिय चलनाचा साठा :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमध्ये देशाला मोठ्या प्रमाणात विदेशी चलनाचा साठा ठेवण्याची गरज नसते. कारण बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे निर्यातीला प्रोत्साहन देऊन विदेशी चलन प्राप्त करता येते.

**१२) उत्साहवर्धक वातावरण :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापार तसेच उधार व उसनवारीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होण्यासाठी बदलती विनिमय दर पध्दती अधिक उपयुक्त ठरते. त्यामुळे व्याजदर, लाभांश इत्यादींमध्ये स्थित्यंतरे होत असल्याने उत्साहवर्धक वातावरण निर्माण होते.

इत्यादी बदलत्या विनिमय दर पध्दतीची गुण होय.

**३.४.२ बदलत्या विनिमय दराचे दोष (Demerits of Flexible Exchange Rate)**

बदलत्या विनिमय दर पध्दतीच्या काही उणीवा किंवा दोष आहेत ते खालील प्रमाणे :

**१) विकसनशील देशांना अयोग्य :**

विकसनशील देशांना बदलती विनिमय दर पध्दती उपयुक्त ठरत नाही. कारण अशा देशांच्या व्यवहारतोलात सतत प्रतिकुलता असते. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात प्राथमिक उत्पादनांची मागणी लवचिक असते. परिणामी बदलत्या विनिमय दरामुळे त्यांच्या चलनात घट होते. त्यामुळे विकसनशील देशांच्या व्यापारावर आणि एकूणच विकास प्रक्रियेवर त्याचा विपरित परिणाम होतो.

**२) अनुभव चांगला नाही :**

दुसऱ्या महायुध्दानंतर बऱ्याच देशांनी या पध्दतीचा अवलंब केला. परंतु त्या देशांना या पध्दतीमुळे नुकसान सहन करावे लागले. म्हणून ही पध्दती योग्य नाही.

**३) चलनवाढीचा धोका :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे चलनवाढीचा धोका निर्माण होतो आणि या चलनवाढीचा देशातील सर्वसामान्य लोकांना त्रास सहन करावा लागतो.

**४) प्रतिकूल व्यापारशर्ती :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे विकसनशील देशांना व्यापारशर्ती अधिक प्रतिकूल होतात.

**५) सट्टेबाजीला प्रोत्साहन :**

विनिमय दरातील बदल सट्टेबाजीला प्रोत्साहन देतात. त्याचे अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होतात.

**६) अस्थिर वातावरण :**

बदलती विनिमय दर पध्दतीमुळे देशाच्या आर्थिक स्थैर्याला धोका निर्माण होतो. त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती बिघडण्याची शक्यता असते.

**७) आर्थिक नुकसानीची शक्यता :**

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे अस्थिरतेचे वातावरण निर्माण होऊन आंतरराष्ट्रीय व्यापारात नुकसान होण्याचीच अधिक शक्यता असते.

## ८) गुंतवणुकीवर मर्यादा :

बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थैर्याचे वातावरण निर्माण होते. परिणामी अशा वातावरणात गुंतवणूक केल्यास त्यापासून मिळणाऱ्या परताव्याची खात्री नसते. त्यामुळे गुंतवणुकदार गुंतवणूक करायला समोर येत नाही.

इत्यादी बदलत्या विनिमय दर पध्दतीच्या मर्यादा होय.

### ३.४.३ आपली प्रगती तपासा (Check your Progress)

१. बाजारातील चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या समतोलातून ----- ठरतो.

अ) स्थिर विनिमय दर ब) बदलता विनिमय दर क) तरंगता विनिमय दर ड) यापैकी नाही

२. विनिमय दर मुक्तपणे बदलू नये यासाठी ----- ची स्थापना केली जाते.

अ) भांडवल ब) विदेशी चलन क) विनिमय स्थिरिकरण निधी ड) चलनगट

३. दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून -----पध्दती अस्तित्वात आली.

अ) व्यवस्थापित लवचिक विनिमय दर ब) स्थिर विनिमय दर क) मुक्त विनिमय दर ड) यापैकी नाही

४. ----- बदलत्या विनिमय दर पध्दतीचे गुण आहेत.

अ) व्यापारात वाढ ब) अंतर्गत स्वातंत्र्य क) गुंतवणुकीला चालना ड) वरीलपैकी सर्व

५. ----- बदलत्या विनिमय दर पध्दतीचे दोष आहेत.

अ) चलनवाढीचा धोका ब) सट्टेबाजी क) अस्थिरता ड) वरीलपैकी सर्व

### ३.५ तरंगता/तरता विनिमय दर (Floating Exchange Rate)

तरंगता विनिमय दर आणि बदलता विनिमय दर यामध्ये बरेच साम्य आहे. तरंगता विनिमय दर हा बदलता विनिमय दर असू शकतो. परंतु, बदलता विनिमय दर हा तरंगता विनिमय दर असू शकत नाही. या दोन्ही विनिमय दर पध्दतीमध्ये बदल अपेक्षित आहेत. परंतु तरंगत्या विनिमय दर पध्दतीमध्ये देशाची मध्यवर्ती बँक काही प्रमाणात नियंत्रण ठेवत असते. त्यामुळे तो पूर्णत: मुक्तपणे बदलणारा असत नाही.

१९९१ मध्ये भारत एका स्थिर विनिमय दर प्रणालीकडून अंशत: तरंगत्या विनिमय दर प्रणालीकडे गेला. तर १९९४ पासून पूर्णत: तरंगत्या विनिमय दर प्रणालीकडे गेला आहे. विशिष्ट विनिमय दर प्रणालीची कार्यक्षमता म्हणजे त्या अर्थव्यवस्थेचे कार्य, विकासाचा अवस्था, अर्थव्यवस्थेची मजबुती, आर्थिक अधिकाराव्दारे प्राप्त स्वायत्ततेची श्रेणी आणि विकास दर इत्यादी होय. या बाबतीत मात्र कोणत्याही एकाच विनिमय दर पध्दतीला पूर्ण श्रेय देता येत नाही.

### ३.५.१ तरंगत्या विनिमय दराचे गुण (Merits of Floating Exchange Rate)

तरंगत्या विनिमय दराचे गुण खालील प्रमाणे.

**१) स्वतंत्र आर्थिक धोरण :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारातील बदलानुसार अंतर्गत चलनविषयक धोरणात बदल करण्याची आवश्यकता भासत नाही. अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार मौद्रिक धोरणाची आखणी व अंमलबजावणी करता येते.

**२) विदेशी व्यापार वाढीस चालना :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे देशाच्या विदेशी व्यापारात वृध्दी होते. कारण अनेक देश आपल्या चलनाचे अवमूल्यन करून आपला विनिमय दर बदलतात. एखाद्या देशाने आपल्या चलनाचे अवमूल्यन केले तर त्या देशाची निर्यात वाढते.

**३) देशांतर्गत स्थैर्य :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमध्ये किंमत पातळी, उत्पादन व रोजगार यांच्यामधील चढ-उतार टाळून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे शक्य होते. या पध्दतीमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारापेक्षा अंतर्गत स्थैर्याला अधिक महत्व दिले जाते.

**४) सट्टेबाजीला आळा :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमध्ये देशाच्या मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण असल्यामुळे सट्टेबाजीच्या व्यवहारांना प्रतिबंध घालता येतो.

**५) व्यापारातील बदलांचे लाभ :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात घडून येणाऱ्या बदलांचे योग्य लाभ प्राप्त करून घेता येतात. विनिमय दरातील बदलांचा धोका वायदेबाजारामार्फत टाळता येतो आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीला चालना मिळते.

**६) व्यवहारतोलात सुधारणा :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे व्यवहारतोल सुधारण्याची प्रक्रिया आपोआप घडते. ही पध्दती संवेदनशील असल्यामुळे विनिमय दरात असे काही बदल घडून येतात की, त्यामुळे व्यवहारतोलात सुधारणा होण्यास सहाय्य होते. या पध्दतीमुळे खुला व्यापार व चलन परिवर्तन या गोष्टींना मुभा राहते. विनिमय नियंत्रणाची गरज राहत नाही. त्यामुळे प्रतिकूल असणारा व्यवहारतोल अनुकूल होतो.

**७) उत्साहवर्धक वातावरण :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर उधार व उसनवारीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होण्यासाठी तरंगती विनिमय दर

पध्दती उपयुक्त ठरते. त्यामुळे व्याजदर, लाभांश यामध्ये अनुकूल स्थित्यंतरे होऊन उत्साहवर्धक वातावरणाची निर्मिती होते.

**८) परकीय घटकांपासून संरक्षण :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमध्ये अंतर्गत अर्थव्यवस्थेचे परकीय घटकांपासून संरक्षण करता येते. उदा. समजा विदेशात मंदीची परिस्थिती निर्माण झाली तर आपल्या निर्यातीवर त्याचा विपरित परिणाम होतो. अशा वेळी आपल्या चलनाचे अवमूल्यन करून निर्यातीला प्रोत्साहन दिले जाऊ शकते.

**९) सोपी पध्दती :**

तरंगती विनिमय दर पध्दती सोपी असते. सामान्यत: चलनच्या मागणी व पुरवठ्यातील बदलानुसार विनिमय दरात बदल होतो. त्यामुळे कोणत्याही देशाच्या चलनाची टंचाई अथवा विपुलता निर्माण होत नाही. त्यामुळे विनिमय नियंत्रणाचा फारसा वापर करावा लागत नाही.

**१०) विदेशी चलनाची गरज नाही :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे निर्यातीच्या मध्यमातून सतत विदेशी चलनांचा ओघ देशांतर्गत पातळीवर चालू राहतो. त्यामुळे विदेशी चलनाचा साठा करावा लागत नाही. विशिष्ट चलनविभाग स्थापन करावा लागत नाही. कारण उत्पादन खर्च व निर्यातमूल्य यांचे योग्य प्रमाण या दराने टिकविता येते.

इत्यादी तरंगत्या विनिमयाचे गुण होय.

**३.५.२ तरंगत्या विनिमय दराचे दोष (Demerits of Floating Exchange Rate)**

तरंगत्या विनिमय दराचे काही दोष आहेत ते खालील प्रमाणे.

**१) चलनवाढ :**

तरंगत्या विनिमय दर पध्दती स्वीकारणाऱ्या राष्ट्रांमधील आर्थिक शिस्त काही प्रमाणात कमी होते. त्यामुळे संबंधित देशात चलनवाढ निर्माण होण्याचा धोका संभवतो.

**२) सट्टेबाजी :**

विनिमय दरात सतत बदल होत असेल तर, सट्टेबाजीला उत्तेजन मिळते. विनिमय दरात घट घडून येईल असे गृहीत धरून आपले चलन व परकीय चलन साठवून ठेवण्याची प्रवृत्ती वाढते.

**३) अनिश्चितता :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात अनिश्चितता निर्माण होते. यामध्ये निर्यातदारांना निर्यातीपासून किती उत्पन्न मिळेल व आयातदारांना किती खर्च येईल याचा अचूक अंदाज करता येत नाही.

**४) गुंतवणुकीत घट :**

आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनिश्चितता परकीय व्यापाराशी निगडीत उद्योगातील गुंतवणूक कमी करण्यास

कारणीभूत ठरते. त्यामुळे देशातील रोजगार पातळीत देखील घट होते.

**५) प्रतिकूल व्यापार अटी :**

तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे विकसनशील देशांना व्यापार अटी प्रतिकूल बनतात. त्यामूळे व्यापारातून देशाचा फायदा होण्याऐवजी नुकसान होते.

**६) आर्थिक अस्थैर्य :**

प्रा. नर्क्स यांच्या मते, तरंगत्या विनिमय दर पध्दतीमुळे देशातील उत्पादन घटक, निर्यातक्षम वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग आणि अंतर्गत बाजारपेठांसाठी उत्पादन करणारे उद्योग यामध्ये सतत बदल होतो. त्यामुळे अंतर्गत अर्थव्यवस्था विस्कळीत होते. परिणामी देशाच्या आर्थिक स्थैर्याला धोका निर्माण होतो. कारण विनिमय दरात मोठे बदल झाल्यास आयात - निर्यात वस्तूंच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण होते. व्यवहारतोलामधील समतोल साधण्यासाठी या विनिमय दर पध्दतीवर अवलंबून राहता येत नाही.

**७) मागास देशांना न परवडणारी पध्दती :**

मागास देशांचा व्यवहारतोल सतत प्रतिकूल असतो. अशा स्थितीत त्यांनी तरंगत्या विनिमय दर पध्दतीचा अवलंब केला तर व्यवहारतोल अधिकच प्रतिकूल होण्याची शक्यता असते. त्यामुळे तरंगत्या विनिमय दराची पध्दती अशा देशांना परवडणारी नसते.

**८) अनुभव चांगला नाही :**

ज्या देशांनी तरंगत्या विनिमय दर पध्दतीचा अवलंब केला त्या देशांना याबाबतचा अनुभव फारसा चांगला आला नाही. हे धोरण अल्पकाळासाठी योग्य वाटत असले तरी दीर्घकाळासाठी त्याचा वापर करणे योग्य ठरत नाही.

इत्यादी तरंगत्या विनिमय दराचे दोष आहेत.

### ३.५.३ आपली प्रगती तपासा (Check your Progress)

१. तरंगत्या विनिमय दर पध्दतीमध्ये ----- काही प्रमाणात नियंत्रण ठेवते.

अ) मध्यवर्ती बँक ब) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी क) जागतीक व्यापार संघटना ड) यापैकी नाही

२. विनिमय दरातील बदल नियंत्रित ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक विदेशी चलनाची ----- करते.

अ) खरेदी ब) विक्री क) खरेदी - विक्री ड) हस्तांतरण

३. ----- मध्ये भारत सरकारणे पूर्ण तरंगत्या विनिमय दराचा वापर केला.

अ) १९९१ ब) १९९४ क) १९९९ ड) २०००

४. ----- तरंगत्या विनिमय दराचे गुण आहेत.

अ) स्वतंत्र आर्थिक धोरण ब) देशांतर्गत स्थैर्य क) व्यवहारतोलात सुधारणा ड) वरीलपैकी सर्व

५. ----- तरंगत्या विनिमय दराचे दोष आहेत.

अ) चलनवाढ ब) सट्टेबाजी क) गुंतवणुकीत घट ड) वरीलपैकी सर्व

## ३.६ सारांश (Summary)

### १) विनिमय दराचा अर्थ :

आंतरराष्ट्रीय व्यापारात विनिमय दर ही संकल्पना अतिशय महत्वाची असते. सध्याच्या काळात प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय व्यवहारात भाग घेत आहे. यामध्ये प्रत्येक देशाचे चलन वेगळे असल्यामुळे या व्यवहारामध्ये अडचणी निर्माण होवू शकतात. परंतु विनिमय दरामुळे हे सर्व व्यवहार अतिशय सुलभपणे पार पडतात. कारण एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनात मूल्य व्यक्त करण्याचे विनिमय दर हे महत्त्वाचे साधन आहे.

### २) विनिमय दराचे प्रकार :

आपल्याला अभ्यसासाठी विनिमय दराचे तीन प्रकार आहेत.

### अ) स्थिर विनिमय दर :

स्थिर विनिमय दर हे शासनाने कायद्यानुसार ठरविलेले असतात. ज्यावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण परिमाण पध्दती अस्तित्वात होती त्यावेळी स्थिर विनिमय दराचा वापर केला जात होता. निश्चितता, सट्टेबाजीवर नियंत्रण, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ, परकीय गुंतवणुकीला चालना, भांडवल बाजाराचा विकास, विकास कार्यास मदत, विकसनशील देशांना उपयुक्त, संसाधनांचा योग्य वापर आदी स्थिर विनिमय दराचे गुण आहेत. अंतर्गत स्वातंत्र्याचा बळी, स्वतंत्र मौद्रिक धोरणाचा अभाव, संसाधनांचा अतिरिक्त वापर आदी स्थिर विनिमय दराच्या मर्यादा देखील आहेत.

### ब) बदलता विनिमय दर :

बदलता विनिमय दर हा विनिमय दराचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. बाजारातील विदेशी चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या समतोलातून हा विनिमय दर निश्चित होतो. व्यापार वाढ, सट्टेबाजीवर नियंत्रण, गुंतवणुकीला चालना, साधी पध्दती, अंतर्गत स्वातंत्र्य, समतोल धोरण आदी बदलत्या विनिमय दराचे गुण आहेत. तर, विकसनशील देशांना अयोग्य, चलनवाढीचा धोका, प्रतिकूल व्यापार अटी, सट्टेबाजीला प्रोत्साहन, आर्थिक अस्थैर्य यासारख्या या विनिमय दराच्या मर्यादा आहेत.

### क) तरंगता विनिमय दर :

तरंगता विनिमय दरामध्ये देशाची मध्यवर्ती बँक काही प्रमाणात नियंत्रण ठेवते. स्वतंत्र आर्थिक धोरण, परकीय व्यापारात वाढ, व्यवहारतोलात सुधारणा, सट्टेबाजीला आळा, देशांतर्गत स्थैर्य हे तरंगत्या विनिमय दर पध्दतीचे गुण आहेत. तर, चलनवाढीचा धोका, अनिश्चितता, गुंतवणुकीत घट, प्रतिकूल व्यापार अटी, आर्थिक अस्थैर्य, सट्टेबाजीला प्रोत्साहन आदी या पध्दतीच्या मर्यादा आहेत.

### ३.७ पारिभाषिक शब्द (Glossary) :

* **सुवर्ण परिमाण पध्दती** : जेंव्हा देशातील चलनाचे मूल्य सोन्याच्या अंशावरून ठरते त्यास सुवर्ण परिमाण पध्दती असे म्हणतात.

* **सट्टेबाजी :** विनिमय दरातील चढ-उतारांचा चुकीच्या मार्गाने फायदा घेणे म्हणजे सट्टेबाजी होय.

* **भांडवल बाजार :** ज्या बाजारात दीर्घकालीन गुंतवणुकीचे व्यवहार होतात त्याला भांडवल बाजार असे म्हणतात.

### ३.८ आपली प्रगती तपासाची उत्तरे (Answers to check your progress) :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३.२.५ : | १. -क), | २.- ड), | ३. -अ), | ४.- ब), | ५.- ब) |
| ३.३.३ : | १.- अ), | २.- ड), | ३.- ब), | ४.- ड), | ५.- ड) |
| ३.४.३ : | १.-ब), | २.- क), | ३.- अ), | ४.- ड), | ५.- ड) |
| ३.५.३ : | १.- अ), | २.- क), | ३.- ब), | ४.- ड), | ५.- ड) |

### ३.९ सरावासाठी प्रश्न : (Questions to Exercise)

* **दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. क्रयशक्ती समता सिध्दांताचे टिकात्मक परिक्षण करा.

२. स्थिर विनिमय दर म्हणजे काय ? स्थिर विनिमय दराचे गुण - दोष स्पष्ट करा.

३. बदलता विनिमय दराचा अर्थ व गुण - दोष सांगा.

४. तरंगता विनिमय दर म्हणजे काय ते सांगुन त्याचे गुण - दोष स्पष्ट करा.

* **टिपा :**

१) विनिमय दर २) क्रयशक्ती समता सिध्दांत ३) स्थिर विनिमय दर

४) बदलता विनिमय दर ५) तरंगता विनिमय दर

### ३.१० अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :

१) झिंगन एम. एल. (२०१२) ''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'', वृंदा पब्लिकेशन्स प्रा. लि., नई दिल्ली.

२) महाजन धनश्री (२०१४) ''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'', विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद.

३) मोडक शं. के. (२००५) ''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'', विद्या प्रकाशन, नागपूर.

४) झामरे जी. एन. (१९९९) ''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

५) भोसले एस. एम., कदम पी. एच., आणि जाधव सी. आर. (२०२०) ''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'' अर्थशास्त्र'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) M. L.Jhingan : "Micro Economics', Vrinda Publications Ltd, Delhi.(2010)

७) . Koutsoyiannis A. (1979) Modern Microeconomics (Second Editon), MacMillan Press Ltd. London.

८) Ahuja H L, (2007) "Advanced Economic Theory" S. Chand and Company Limited.

९) Mansfield E. (1999), Microeconomics, W.W.Norton and Company, New York.

१०) Ahuja H. L. (1981) Principles of Microeconomics : A New-Look Textbook of Micro Economic Theory (22nd Edition) S. Chand and Company Limited.

✻✻✻

# घटक ४
# जकाती आणि कोटा
## ( Tariffs and Quotas )

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ मुक्त व्यापार - अर्थ, समर्थन आणि विरोधी मुद्दे

४.२.२ संरक्षित व्यापार - अर्थ, समर्थन आणि विरोधी मुद्दे

४.२.३ जकाती - अर्थ, प्रकार आणि परिणाम

४.२.४ कोटा - अर्थ, प्रकार आणि परिणाम

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


### ४.० उद्दिष्टे (Objectives)

जकाती आणि कोटा या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील गोष्टींचे आकलन होईल.

१. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मुक्त धोरण काय आहे त्याचबरोबर त्यांचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम समजतील.

२. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे संरक्षित धोरण म्हणजे काय? त्याचबरोबर संरक्षित व्यापाराचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम समजतील.

३. आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे आणणाऱ्या घटकांमधील जकात आणि कोटा या घटकांची माहिती होईल.

### ४.१ प्रास्ताविक (Introduction) :

आपण मागील घटकांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय? आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासाचे महत्व, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील साम्य आणि फरक आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत आंतरराष्ट्रीय व्यापारांचे लाभ, व्यापारशर्ती आणि विनिमय दर यांचा अभ्यास केला आहे. या घटकांद्वारे आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात राबविली जाणारी धोरणे आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे आणण्यासाठी वापरली जाणारी साधने अभ्यासणे, मुक्त आणि संरक्षित व्यापार म्हणजे काय? आणि व्यापार धोरणाची अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम समजतील. जकात आणि कोटा पध्दतीचे प्रकार आणि परिणाम लक्षात येतील.

देशाने आपल्या आयात-निर्यातीचे नियंत्रण आणि नियमन करण्यासाठी अवलंबिलेले नियम म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण होय. आंतरराष्ट्रीय व्यापरविषयक धोरणांचे मुक्तव्यापार व संरक्षित व्यापार असे दोन प्रकार आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारात सरकारचा निर्हस्तक्षेप म्हणजे मुक्त आणि खुला व्यापार होय. म्हणजेच निरनिराळ्या देशाबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापार होत असताना सरकारने कोणत्याही स्वरुपात हस्तक्षेप न करणे होय. संरक्षित व्यापार धोरण हे मुक्त व्यापाराच्या पूर्णपणे विरोधी असणारे धोरण आहे. संरक्षित व्यापार धोरणामध्ये दुसऱ्या देशातून येणाऱ्या वस्तू व सेवांवर आयात कर, कोटा आणि इतर पध्दतीचा अवलंब करुन अटकाव करणे.

मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन आर्थिक व सैध्दांतिक अशा दोन्ही ही पातळीवरुन केले जाते. परंतु प्रत्यक्षामध्ये मात्र मुक्त व्यापाराला प्रतिबंध करण्यासाठी वेगवेगळ्या देशांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या अडथळ्यांचा अवलंब केला जात आहे. मुक्त व्यापाराला प्रतिबंध करणारे नैसर्गिक व मानवनिर्मित प्रकार आहेत. देशादेशांमध्ये वस्तू व सेवांची हालचाल करण्यासाठी पार करावे लागणारे अंतर आणि खर्च यामुळे जे अडसर निर्माण होतात त्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारातील नैसर्गिक अडसरे असे म्हणतात. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापारात संरक्षित व्यापार साधनांचा अवलंब केल्यामुळे जे अडसर निर्माण होतात त्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारातील मानवनिर्मित अडथळे असे म्हणतात. संरक्षित व्यापार साधनांचे जकात मार्गांना दृश्य आणि बिगर जकाती मार्गांना अदृश्य अडथळे म्हटले जाते.

सध्याचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. जगामधील अनेक देश आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे उदारीकरण करीत आहेत. आयात आणि निर्यातीवरील बंधने कमी करीत आहेत. सन १९९१ मध्ये भारताने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे उदारीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. म्हणून आपणाला सदर घटकामध्ये मुक्त व्यापार, संरक्षित व्यापार आणि त्यांची साधनांचा अभ्यास करावायाचा आहे.

### ४.२ विषय विवेचन (Analysis of the Unit)

#### ४.२.१ मुक्त व्यापार (Free Trade)

मुक्त व्यापारालाच खुला व्यापार असे म्हणतात. मुक्त व्यापार म्हणजे देशादेशात होणाऱ्या व्यापारावर कोणतेही निर्बंध नसणे होय. त्यामध्ये देशाच्या सरकारकडून निर्हस्तक्षेप धोरणाचा अवलंब करणे अभिप्रेत

असते. निरनिराळ्या देशांकडून परस्परांशी होणाऱ्या वस्तू व सेवांच्या देवघेवीत सरकार साहाय्य करीत नाही तसेच अडथळाही आणत नाही. एका देशातील नागरिक दुसऱ्या देशातील नागरिकांबरोबर मुक्तपणे वस्तूंची निर्यात वा आयात दोन्हीही करु शकतात. यामध्ये अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक दूर होतो. त्यामुळे जगातील सर्वच देशांसाठी मुक्त व्यापाराचे धोरण हे सर्वात उत्कृष्ट असे धोरण असल्याचे तुलनात्मक लाभ सिध्दांत विशद करतो.

**व्याख्या :**

'देशी व विदेशी वस्तूंमध्ये कोणाताही भेदभाव न करणारे आणि म्हणून विदेशी वस्तूंवर अतिरिक्त भार न टाकणारे किंवा देशी वस्तूंना विशेष झुकते माप न देणारे व्यापार धोरण म्हणजे मुक्त व्यापार होय.' ॲडम स्मिथ यांच्या मुक्त व्यापाराच्या धोरणामध्ये खालील बाबी अभिप्रेत असतात.

१) जकाती आणि इतर व्यापारी अडथळ्यापासून मुक्त असलेल्या वस्तू व सेवांचा व्यापार

२) व्यापाराला हानी पोहोचविणाऱ्या धोरणांचा (कर, जकात, अनुदान इ. संबंधीची धोरणे) अभाव.

३) बाजारामध्ये मुक्त प्रवेश. (व्यापारातील अडथळ्याचा अभाव).

४) बाजारविषयक माहितीची सहज उपलब्धता (वस्तूचा पुरवठा, मागणी, किंमती).

५) बाजारात मक्तेदारी आणि अल्पाधिकारी उत्पादन संस्थांची असमर्थता.

६) आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर श्रम व भांडवलाचा मुक्त संचार/वावर.

७) व्यापारातील अडथळ्यांचा अभाव. (जकात, कोटा, विनिमय नियंत्रण, अवमूल्यन इ.)

कोणत्याही प्रकारच्या नियंत्रणाशिवाय देशादेशांत होणारा व्यापार म्हणजे मुक्त व्यापार होय. तथापि मुक्त व्यापारात कोणतेच कर नसतात असा अर्थ होत नाही. सरकारला उत्पन्न मिळवून देणे या एकमेव उद्देशाने कर आकारणे मुक्त व्यापाराच्या धोरणाशी सुसंगत असते. सर्वप्रथम ॲडम स्मिथ यांनी मुक्त व्यापार धोरणाचा पुरस्कार केला. त्यानंतर डेव्हिड रिकार्डो, जे. एस. मिल या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी मुक्त व्यापार धोरणाचा पुरस्कार केला होता. १९ व्या शतकात अनेक दशकात मुक्त व्यापार धोरण चालू होते.

**मुक्त व्यापार धोरण– समर्थन/ अनुकूल मते (Arguments in Favour of Free Trade) :**

मुक्त व्यापाराच्या समर्थनार्थ/अनुकुल परिणाम/मते खालीलप्रमाणे युक्तीवाद केला जातो.

**१) अधिकतम उत्पादन (Maximisation of Output) :**

उत्पादन घटकांच्या संख्यात्मक आणि गुणात्मक उपलब्धतेवर उत्पादनाची पातळी अवलंबून असते. तुलानात्मक खर्च लाभ तत्वानुसार प्रत्येक देशाने अशा वस्तूंच्या उत्पादनात विशेषीकरण करावे की ज्यामध्ये तो इतर देशांच्या तुलनेने अधिक सरस आहे अशाप्रकारे मुक्त व्यापार विशेषीकरणाच्या माध्यमातून मोठ्या

प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ उद्यागांना पूर्णपणे उपलब्ध करुन देतो. मुक्त व्यापार धोरणामुळे बाजारपेठांचे आकारमान वाढते. त्यामधून उद्योगसंस्थांना उत्पादनवाढीची प्रेरणा मिळते. थोडक्यात, मुक्त व्यापारामुळे प्रत्येक देश तौलनिकदृष्ट्या लाभदायक क्षेत्रात विशेषीकरण करतो. त्यामुळे आंरराष्ट्रीय पातळीवर एकंदर उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्यास मदत होते.

### २) उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर (Optimum Use of Resources) :

सर्वच देश वस्तूंचे उत्पादन सारख्याच कार्यक्षमतेने करु शकत नाही. या परिस्थितीत देशाने आपल्या साधनसंपत्तीचा वापर अत्यंत लाभदायक ठरणाऱ्या अशा काही वस्तूंच्या उत्पादनात करणे योग्य ठरते. त्या वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे त्यांची निर्यात करुन हव्या त्या वस्तू आयात करणे देशाला शक्य होते. सर्व देशांनी मुक्त व्यापार धोरणाचा अवलंब करणे मुक्त व्यापार धोरणात अभिप्रेत असेत. त्यामुळे जगातील मर्यादित प्रमाणत उपलब्ध असणाऱ्या साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर होणे शक्य होते.

### ३) अधिकतम कार्यक्षमता (Maximisation of Efficiency) :

किंमत यंत्रणा ही इतर कोणत्याही पद्धतीपेक्षा अधिक कार्यक्षम असते. व्यावसायिक स्पर्धात्मकता, उत्पादन घटकांची गतीशीलता आणि व्यापार चक्रांना प्रतिबंध यांतून किंमत यंत्रणेची कार्यक्षमता वाढविणे शक्य असते. मुक्त व्यापारामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यावसायिक संस्थांची स्पर्धात्मकता वाढते. व्यावसायिक संस्थांना स्पर्धात्मकतेतून नवप्रवर्तनाचा स्वीकार करुन कार्यक्षमता वाढविण्यास प्रवृत्त करते. मुक्त व्यापारामुळे व्यावसायिक संस्थांना भांडवल, तंत्रज्ञान इत्यादी उपलब्ध होऊन त्यांची कार्यक्षमता वाढते. उत्पादनाचे घटक कार्यक्षमपणे वापरले जातात.

### ४) उपभोक्त्यांना लाभदायक (Beneficial to Consumers) :

उपभोक्त्याला आपल्या आवडी-निवडीनुसार वस्तूंचा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य असते. जगातील कोणताही देश आपल्या लोकांना हव्या असणाऱ्या सर्व वस्तूंचे उत्पादन करु शकत नाही. त्यामुळे ज्या वस्तूंचे उत्पादन आपल्या देशात होत नाही. अशा वस्तूच्या उपभोगापासून लोकांना वंचित राहावे लागते. तसेच काही वस्तूंचा उत्पादन खर्च जास्त असल्यामुळे त्या जादा दराने लोकांना खरेदी करावे लागते. परंतु मुक्त व्यापारामुळे देशात उत्पादन न होणाऱ्या आणि देशात महाग असलेल्या वस्तू दुसऱ्या देशातून आयात करता येतात. विविध प्रकारच्या वस्तू मुबलक प्रमाणावर अत्यंत स्वस्त दरांमध्ये उपलब्ध होतात. त्यांचा परिणाम लोकांचे राहणीमान सुधारते. उपभोक्त्याचे उत्पन्न वाढते.

### ५) विशाल बाजारपेठा (Large sized market) :

उद्योग संस्थेच्या उत्पादनाची पातळी ही गुंतवणूकीच्या प्रेरणेवर अवलंबून असते. बाजारपेठेचे आकारमान घटक गुंतवणूक प्रेरणेवर प्रभाव टाकते. बाजारपेठेचे आकारमान जितके अधिक विस्तृत तितकी गुंतवणूक प्रेरणा अधिक राहते. मुक्त व्यापारामुळे नवनविन बाजारपेठा उपलब्ध होऊन गुंतवणूकीस आणि मोठ्या प्रमाणावरील

उत्पादनास उत्तेजन मिळते. योग्य किंमतीला दर्जेदार वस्तूंचे उत्पादन होते. उद्योगसंस्थांना मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळतात.

**६) आर्थिक विकास (Economic Development) :**

मुक्त व्यापाराचे धोरण आर्थिक विकासाला अनेक दृष्टीने साहाय्यभूत ठरते. मुक्त व्यापारामुळे बाजारपेठेचे आकारमान विस्तृत होते. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळविणे शक्य होते. देशाला विदेशी भांडवल उपलब्ध होते. इतकेच नव्हे तर तंत्रज्ञान, व्यवस्थापकीय कौशल्य इ. उपलब्ध झाल्यामुळे विकसनशील देशांना आपला जलद गतीने आर्थिक विकास साधने शक्य होते. तर विकसित देशांना विकासाचा दर नियमित ठेवणे शक्य होते.

**७. मक्तेदारीवर नियंत्रण (Regulation of Monopoly) :**

मुक्त व्यापाराच्या अभावी उद्योगसंस्थांना देशातील बाजारपेठेवरच अवलंबून राहावे लागते. बाजारपेठेचे आकारमान लहान असल्यामुळे उत्पादनाचा खप करणे कठीण होते. त्यातून अनिष्ट स्पर्धा अस्तित्वात येऊन मक्तेदारी निर्माण होते. मक्तेदार ग्राहकांचे शोषण करतात. उत्पादन घटकांचा अकार्यक्षम वापर होतो. मुक्त व्यापारामुळे मात्र मक्तेदारीला आळा बसतो. कारण मुक्त व्यापारामुळे विस्तृत बाजार पेठ उपलब्ध होते. स्पर्धा वाढीस लागते. मक्तेदारीवर नियंत्रण येते. मक्तेदाराकडून ग्राहकांचे होणारे शोषण थांबते. मर्यादित साधनांचा कार्यक्षमपणे वापर होतो.

मुक्त व्यापारामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी झालेल्या सर्वच देशांचा लाभ होतो. व्यापारातून उद्‌भवणाऱ्या लाभामध्ये विकसित देशांबरोबरच विकसनशील देश देखील सहभागी असतात. त्यामुळे विकसित देश आणि विकसनशील देश यांच्यातील अंतर कमी होण्यास मदत होते.

**मुक्त व्यापार धोरण– प्रतिकूल मते / विरोधी मते (Arguments Against Freer Trade) :**

मुक्त व्यापाराच्या धोरणामध्ये अनेक दोष आहेत. त्यामुळे ज्या देशांनी मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारलेले असते त्या देशांना तोटा सहन करावा लागतो. म्हणून अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मुक्त व्यापार धोरणाविषयी प्रतिकूल मते मांडली आहेत. ती खालीलप्रमाणे दिलेली आहेत.

**१) बाल्यावस्थेतील उद्योगांना अपायकारक (Harmful to Infans Industries)**

जर्मन अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरिक लिस्ट यांनी बाल्यावस्थेतील उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून मुक्त व्यापार धोरणाला विरोध केला. विकसनशील देशांत नवीन उद्योग स्थापन झालेले बाल्यावस्थेत असतात. त्यांना पुरेसे सामर्थ्य परिपक्वता साध्य करण्यासाठी संरक्षणाची गरज असते. परंतु मुक्त व्यापार धोरणामुळे विकसनशील देशातील  बाल्यावस्थेतील उद्योगांना विकसित देशातील प्रस्थापित उदयोगांबरोबर स्पर्धा करावी लागते. अशा अनिष्ट स्पर्धेत विकसनशील देशातील बाल्यावस्थेतील उद्योग टिकत नाहीत. त्यांचा त्यात अंत होतो. म्हणून मुक्त व्यापाराचे समर्थन करणे अयोग्य आहे.

**२) अर्थव्यवस्थेचा असमतोल विकास (Uneven Development of the Economy) :**

मुक्त व्यापार धोरण तुलनात्मक खर्च लाभ तत्वावर आधारित आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेत केवळ तुलनात्मक लाभ असलेल्या उद्योगांचाच विकास होतो. ज्या उद्योगांना तुलनात्मक खर्च लाभ मिळत नाही त्यांचा विकास होत नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत उद्योगाचे अतिविकास आणि अतिमागास असे दोन भाग पडतात. त्यांचा देशाच्या एकंदरीत विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. अर्थव्यवस्थेतील उत्पन्न, उत्पादन, रोजगार आणि मागणी यामध्ये अस्थैर्य निर्माण होते. म्हणून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून मुक्त व्यापाराचे धोरण हितकारक नाही

**३) नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास (Depletion of Natural Resources) :**

प्रत्येक देशाजवळ नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा मर्यादित असतो. तसेच या नैसर्गिक साधनसंपत्तीची पुन: निर्मिती करता येत नाही. मुक्त व्यापाराच्या धोरणामुळे अशा नैसर्गिक साधनसंपत्तीचे नि:सारण निर्यातीच्याा माध्यमातून विदेशात होते. देशातील त्यांचा अतिवापरामुळे साठा संपुष्टात येण्याचा धोका निर्माण होतो. उदाहरणार्थ मुक्त व्यापार धोरणामुळे इंग्लंडहून कोळशाची निरंतर निर्यात होऊन तेथील कोळशाचा साठी संपुष्टात आला. अशाप्रकारे मुक्त व्यापार धोरणामुळे देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होतो.

**४) विघातक परस्परावलंबन (**Harmful Interdependence**) :**

मुक्त व्यापार धोरणामुळे भौगोलिक श्रमविभागणी आणि विशेषीकरण घडून येते. त्यामुळे देशादेशातील परस्परावलंबित्व मोठ्या प्रमाणात वाढते. देशाला अत्यावश्यक वस्तूंसाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. ते युद्धकालीन परिस्थितीत धोक्याचे असते. संरक्षण साहित्यात देश दुसऱ्या देशावर अवलंबून असल्यास युध्दकालीन परिस्थितीत धोकादायक असते. म्हणून मुक्त व्यापार धोरण संरक्षण साहित्य आणि अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीत विघातक असते.

**५. आर्थिक अस्थिरता (Economic Instability) :**

मुक्त व्यापार धोरणामुळे एका देशातील आर्थिक घटकांचे दुसऱ्या देशात स्थलांतर होते. एका देशात आर्थिक अरिष्ट आले तर त्यांचे दुसऱ्या देशावर परिणाम होता. एखाद्या देशात उत्पन्नघटीचा झालेला प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून दुसऱ्या देशात होतो. एखाद्या देशात आलेली. आर्थिक मंदी जगाला व्यापते. उदा. १९२९ ची जागतिक महामंदीने जग व्यापले होते. अशाप्रकारे मुक्त व्यापार धोरणामुळे सर्व देशात आर्थिक अस्थिरता निर्माण होते.

**६) उपभोक्त्यांना अपायकारक (Harmful to consumers) :**

मुक्त व्यापाराच्या धोरणामध्ये वस्तूंच्या आयात-निर्यातीवर कोणत्याही प्रकारची बंधने नसतात. त्यामुळे मानवी आरोग्यास घातक चैनीच्या वस्तूंच्या व्यापाराल प्रोत्साहन मिळते. चैनीच्या आणि आरोग्यास घातक

वस्तूंच्या आयातीतून व्यापारी वर्गाला अधिक नफा मिळतो. त्याचबरोबर निकृष्ट दर्जाच्या वस्तूंचा फैलाव सर्वत्र होतो. त्यामुळे मानवी कल्याणामध्ये घट निर्माण होते.

**७) अवमूल्यन आणि इतर गैरप्रकार (Dumping & Other Malpractices) :**

मुक्त व्यापार धोरणामुळे विविध देशातील व्यावसायिक संस्थांमध्ये स्पर्धात्मकता वाढते. त्यांचा लाभ सर्वांना होतो असे गृहीत धरले जाते. परंतु प्रत्यक्षात निकोप स्पर्धेऐवजी अनिष्ट स्पर्धा वाढीस लागते. अवमूल्यन हा त्याचाच एक भाग आहे. केवळ परकीय बाजारपेठा हस्तगत करण्यासाठी काही देश विशिष्ट वस्तू परदेशात उत्पादनखर्चा पेक्षा कमी किंमतीला विकतात. परंतु स्वदेशात तीच वस्तू अधिक किंमतीला विकतात. अवमूल्यनामुळे विदेशातील उद्योग नष्ट होतात. अवमूल्यनाप्रमाणेच इतर अनेक गैरप्रकारांचा अवलंब होण्याची शक्यता असते. त्यामुळे मुक्त व्यापार धोरणाचा मूळ उद्देश साध्य होत नाही.

**८. विकसनशील देशांना अपायकारक (Harmful to Developing Countries) :**

मुक्त व्यापार धोरणामुळे निर्माण होणाऱ्या लाभांचे वाटप विकसित आणि विकसनशील देशांमध्ये न्याय पद्धतीने होत नाही. कारण विकसनशील देश ताग, चहा, कॉफी, तंबाखू, अन्नधान्य पिके इत्यादी वस्तूची निर्यात करतात. परंतु विकसित देश भांडवली आणि औद्योगिक वस्तूंची निर्यात करतात. आंतरराष्ट्रीय व्यापारात विकसनशील देश ज्या प्राथमिक वस्तूची निर्यात करतात त्यांना किंमत कमी असते आणि विकसित देश निर्यात करीत असलेल्या भांडवली वस्तूंना किंमत जास्त मिळते. त्यामुळे विकसनशील देशांना तोटा होतो.

वरील प्रतिकूल परिणामामुळे मुक्त व्यापार धोरणाला अनेक अर्थशास्त्रज्ञाकडून विरोध केला जातो.

**४.२.२ सरंक्षित व्यापार धोरण (Protective Trade Policy) :**

सरंक्षित व्यापार धोरण हे मुक्त व्यापार धोरणाच्या पूर्णपणे विरोधी असणारे धोरण आहे. देशादेशामधील व्यापारात पूर्णपणे विरोधी असणारे धोरण आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार आयात जकाती, आयात कोटा, अवमूल्यन, विनिमय नियंत्रण, कार्टेल इत्यादी साधनांद्वारे नियंत्रित करणाऱ्या धोरणाला सरंक्षित व्यापार धोरण असे म्हणतात. संरक्षित व्यापार धोरणातील बाजारामध्ये वस्तू व सेवांच्या किंमतीत मागणी व पुरवठ्याचे खरे प्रतिबिंब दिसून येत नाही. अर्थव्यवस्थेतील संसाधनांचे वितरण विविध उद्योगामध्ये कृत्रिम किंमतीद्वारे घडवून आणले जाते.

**व्याख्या**

'परकीय देशांशी असणाऱ्या व्यापाराचे आयात प्रशुल्क, आयात कोटा इत्यादी पध्दतीद्वारे नियंत्रण वा नियमन करुन देशातील व्यावसायिकांच्या व कामगारांच्या हिताचे संरक्षण करणाऱ्या धोरणाला संरक्षित व्यापार धोरण असे म्हणतात.'

अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी सर्वप्रथम सन १७९० मध्ये संरक्षणवादाचा पुरस्कार केला. हेन्री कॅरे यांनी रोजगाराच्या विविधीकरणासाठी संरक्षणवादाला पाठिंबा दिला. सन १८४० मध्ये फ्रेडरिक लिस्ट यांनी जर्मनीच्या संदर्भात त्या व्यवस्थेतील उद्योगांच्या युक्तीवादाचे समर्थन केले. सन १९२९ च्या जागतिक महामंदीने मुक्त

व्यापार धोरणाच्या उणिवा स्पष्ट केल्या. त्यामुळे जगातील अनेक देशांचा कल संरक्षित व्यापाराकडे वाढू लागला.

**संरक्षित व्यापार धोरण–अनुकूल मते/समर्थन (Arguments in Favour of Protective Trady Policy) :**

संरक्षित व्यापार धोरणाच्या समर्थनार्थ खालीलप्रमाणे युक्तीवाद केला जातो.

**१) बाल्यावस्थेतील उद्योगांना संरक्षण (Infant Industry Argument) :**

बाल्यावस्थेतील उद्योगाचा व्यापार संरक्षण युक्तीवाद सन १७९० मध्ये अमेरिकेत अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी तर सन १६४० मध्ये जर्मनीत प्रा. फ्रेडरिक लिस्ट यांनी प्रथम मांडला. त्यानंतरच्या काळामध्ये जे.एस.मिल, अल्फ्रेड मार्शल यांनी त्याचे समर्थन केले. बाल्यावस्थेतील उद्योग म्हणजे नव्याने सुरु होणारे उद्योग होय. अर्थव्यवस्थेत औद्यागिकीकरणाच्याा सुरुवातीच्या काळामध्ये अनेक उद्योग बाल्यावस्थेत असतात. बाल्यावस्थेतील उद्योग विकसित देशातील उद्योगाबरोबर स्पर्धा करु शकत नाहीत. कारण विकसित देशातील उद्योगाकडे उच्च दर्जाची तांत्रिक कार्यक्षमता, प्रमाणाच्या बचती आणि वित्तीय सामर्थ्य असते. त्यामुळे अविकसित आणि विकसनशील देशातील बाल्यावस्थेतील उद्योगांना सरकारकडून सरंक्षणाची आवशयक्ता असते. सरकार आयात जकाती कोटा आणि इतर मार्गाचा अवलंब करुन बाल्यावस्थेतील उद्योगांना संरक्षण देते.

**२) समतोल आर्थिक विकास (Balanced Economic Development) :**

समतोल आर्थिक विकासाच्या युक्तीवादाला उद्योगाच्या विविधीकरणाचा युक्तीवाद असे ही म्हणतात. फ्रेडरिक लिस्ट यांनी या युक्तीवादाचे समर्थन केलेले आहे. या युक्तीवादानुसार देशाजवळ उत्पादन, रोजगार व उत्पन्नाचे विविध स्त्रोत असले पाहिजेत. ठराविक उद्योगावर देशाने अवलंबून राहणे आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या घातक असते. राजकीय दृष्ट्या युध्दाच्या काळामध्ये देशाला विदेशी व्यापाराशिवाय आपले अस्तित्व टिकवून ठेवणे अवघड असते. आर्थिकदृष्टया काही मोजक्याच उद्योगावर अवलंबून असणारी देशाची अर्थव्यवस्था तो उद्योग कोसळताच कोलमडून पडते. केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्या अर्थव्यवस्थांना देखील युक्तीवाद लागू आहे. म्हणून अर्थव्यवस्थेचा समतोल विकास करण्यासाठी विविध उद्योगांचा विकास घडवून आणणे गरजेचे असते आणि ते संरक्षणाशिवाय शक्य नसते. पी.टी. एल्सवर्थ यांच्या मते 'असमतोलापेक्षा समतोलाला धोक्यापेक्षा सुरक्षेला कोणीही प्राधान्य देते, त्यामुळे या युक्तीवादाचे समर्थन भक्कम असे आहे.'

**३) रोजगारात वाढ (Employment Growth) :**

देशातील रोजगार व उत्पन्नात वाढ करण्यासाठी आयातीवर जकाती लादणे यांचा युक्तिवाद केला जातो. सन १९२९ च्या महामंदीच्या काळात अमेरिकेने बेरोजगारीवर उपाय म्हणून संरक्षित व्यापार धोरणाचे समर्थन केले होते. आयात जकातीमुळे देशाची आयात कमी होते. त्यांचा परिणाम देशामध्ये आयात पर्यायी उद्योगांचा विकास होऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. एका क्षेत्रातील रोजगारवाढीचा परिणाम अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रावर होतो आणि अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मिती होते.

**४) स्वस्त श्रम धोरण (Cheap Labour Policy) :**

औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांतील श्रमाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी संरक्षित धोरणाचे समर्थन केले जाते. विकसनशील देशातील स्वस्तश्रमापासून आपल्या देशातील श्रमिकांचे संरक्षण करावे असे अमेरिकेसारख्य देशांना वाटते. कारण विकसनशील देशातील वेतनाच्या तुलनेत विकसित देशातील वेतन कितीतरीपटीने अधिक असते. मुक्त व्यापार धोरण असेलतर विकसनशील देशाच्या स्वस्त वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री विकसित देशाच्या बाजारात होऊन विकसित देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढेल. त्याचा परिणाम कामगारांच्या जीवनमानावर होईल. हा धोका टाळण्यासाठी विकसित देशांनी विकसनशील देशांकडून आयात होणाऱ्या वस्तूंवर जकात आकारणे गरजेचे आहे.

**५) मुलभूत उद्योगांची उभारणी (Key Industry Argument) :**

मुलभूत उद्योगामध्ये लोखंड, पोलाद, यंत्रसामग्री, अवघड विद्युतउपकरणे व रसायने इत्यादींचा समावेश होतो. देशांतील उद्योगांचा पाया स्थिर व भक्क्म करण्यासाठी मुलभूत उद्योगांची उभारणी करणे आवश्यक असते. देशाला अशा उद्योगांमध्ये तुलनात्मक खर्च लाभ नसला तरी देखील त्यांची उभारणी करणे आर्थिक विकसासाठी अपरिहार्य असते. तसेच या उद्योगांना विकसित देशांतील उद्योगांच्या स्पर्धेपासून योग्य ते संरक्षण सरकारने देणे समर्थनीय ठरते.

**६) अवमूल्यन विरोधी युक्तीवाद (Anti-dumping Argument) :**

अवमूल्यन विरोधी साधन म्हणून संरक्षण व्यापार धोरणाचे समर्थन केले जाते. अवमूल्यन म्हणजे देशातील बाजाराच्या तुलनेने विदेशातील बाजारात वस्तूंची किंमत अत्यंत कमी ठेवणे. अवमूल्यनाचा अवलंब बाजारपेठेत मक्तेदारी निर्माण करण्यासाठी केला जतो. विदेशी उद्योग-संस्थेकडून देशातील बाजारात अवमूल्यनाचा वापर केला जात असले तर त्याला पायबंद घालण्यासाठी सरंक्षित व्यापार उपायांचा अवलंब करणे योग्य ठरते. कारण अवमूल्यनामुळे देशातील उद्योग नष्ट होण्याचा धोका असतो.

**७) व्यवहारतोल अनुकूल करणे (Balance of Payments Argument) :**

व्यवहारतोलातील प्रतिकूलता दूर करण्यासाठी आयातीवर वेगवेगळ्या प्रकारचे निर्बंध लादण्याचे समर्थन दुसऱ्या महायुध्दाच्या काळापासून केले जाते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने देखील आपल्या सभासद देशांना व्यवहारतोलातील प्रतिकूलता कमी करण्यासाठी व्यापारावर हंगामी निर्बंध लादण्यास परवानगी देते. या संदर्भात आयात जकाती, आयात कोटा, अवमूल्यन, कर्टिल यसारखी संरक्षित व्यापार साधने महत्वाची भूमिका निभावू शकतात. ही साधने आयात कमी करतात आणि त्याचबरोबर मागणीचे स्थानांतर आयात वस्तूंकडून देशी वस्तूंकडे करतात. आयात कमी झाल्यास, व्यवहारतोलातील तूट कमी होते.

**८) व्यापारशर्तीत सुधारणा करण्यासाठी (Terms of Trade Argument) :**

विदेशी व्यापारातील लाभाची वाटणी व्यापारशर्तीवरुन ठरते. व्यवहारतोल अनुकूल किंवा प्रतिकूल हे देखील व्यापारशर्तीवरुन ठरते. व्यापारशर्ती प्रतिकूल असल्यास व्यवहारतोलातील असमतोल निर्माण होतो. व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्यासाठी व्यापारशर्तीत सुधारणा करता यावी म्हणून देशाने संरक्षित व्यापार धोरण स्वीकारावे असे मत मांडले. आयात जकातीचा अवलंब करुन व्यापारशर्ती सुधारता येतात कारण आयात जकातीमुळे निर्यातीच्या तुलनेत आयात स्वस्त होते.

**९) अंतर्गत बाजारपेठेचा विस्तार (Extentsion of Home Market) :**

अंतर्गत बाजारपेठेचे संरक्षण करण्यासाठी संररिक्षत व्यापार धोरणाचे समर्थन केले जाते. आयत जकाती, आयात कोटा इत्यादीमुळे विदेशी वस्तुंची देशात होणारी आयात कमी होते. त्यामुळे देशातील आयात स्पर्धक वस्तूंना मागणी वाढते. त्या उद्यांगांचा विकास होऊन देशी अर्थव्यवस्थेत रोजगार व उत्पन्न यामध्ये वाढ होते. ही वाढ इतर उद्योगांच्या विकासास पोषक ठरते. परिणामी देशांतर्गत बाजारपेठेचा विस्तार होण्यास मदत होते.

**१०) संरक्षण साहित्य सामग्रीचे उद्योग (Defence Argument) :**

ॲडम स्मिथ यांनी मुक्त व्यापाराचे समर्थन केलेले असले तरीही संरक्षण साधनसामग्रीचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना संरक्षसण दिले पाहिजे असे प्रतिपादन केलेले होते. ॲडम स्मिथच्या मतानुसार, 'आर्थिक समृध्दीपेक्षा देशाचे संरक्षण महत्त्वाचे आहे.' आधुनिक काळात प्रत्येक देश संरक्षण साहित्याबाबत स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**संरक्षत व्यापार धोरण–प्रतिकूल/विरोधी मते (Arguments Aganinst Protective Trade Policy) -**

संरक्षित व्यापार धोरणाच्या विरोधी मते खालीप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) तुलनात्मक खर्च लाभाचा त्याग (Loss of Comparative Cost Advantage) :**

मुक्त व्यापारामुळे जगातील सर्वच देशांना विशेषीकरणाचा लाभ मिळतो. उत्पादनाचे महत्तमीकरण होते. उपभोक्त्यांना स्वस्त दरात विविध वस्तू उपलब्ध होतात. संरक्षित व्यापारामुळे जगातील लोकांना या लाभांपासून वंचित रहावे लागते.

**२) जागतिक संसाधनांचा गैरवापर (Misuse of World's Resources) :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे आंतरराष्ट्रीय श्रम विभागणी प्रत्यक्षात येऊ शकत नाही. उत्पादक घटकांचा कार्यक्षम वापर होत नाही.

**३) जागतिक व्यापाराचा संकोच (Contraction in World Trade) :**

मुक्त व्यापारामुळे बाजारपेठेचे आकारमान विस्तृत होते. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे उद्योगसंस्थांना

मिळतात. परंतु संरक्षित व्यापारामुळे प्रत्येक देशाकडून व्यापारावर निर्बंध लादले जातात, त्यामुळे जागतिक व्यापाराचा संकोच होतो.

**४) अकार्यक्षम उद्योगधंद्यांचा उदय व वाढ (Rise & Growth of Inefficient Industries) :**

संरक्षित व्यापार धोरणात देशातील अकार्यक्षम उद्योगांना संरक्षण दिले जाते. त्यांना केवळ देशांतर्गत बाजारपेठ उपलब्ध असते. त्यांचा उत्पादन खर्च वाढतो. परंतु असा खर्च कमी करावा असे त्यांना वाटत नाही त्यामुळे संरक्षित व्यापार धोरणामुळे अकार्यक्षम उद्योग वाढतात.

**५) मक्तेदारीचा धोका (Danger of Monopoly) :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे विदेशी स्पर्धा नष्ट होते. अंतर्गत बाजारपेठेत उद्योगांची मक्तेदारी निर्माण होते. मक्तेदारीतून ग्राहकांचे शोषण होते. किंमती वाढतात. पुरवठा घटविला जातो.

**६) उपभोक्त्यांची हानी (Loss to Consumers) :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे उपभोक्त्यांना देशातील बाजारपेठेत ज्या वस्तू उपलब्ध आहेत. त्या जास्त किंमत देऊन खरेदी कराव्या लागतात. अशा देशातील वस्तूंचा दर्जाही निकृष्ट असतो. थोडक्यात संरक्षित व्यापारामुळे उपभोक्त्यांची पिळवणूक व हानी होते. उपभोगाचा त्याग करावा लागतो. काही वेळा उपभोग पुढे ढकलला जातो.

**७) औद्योगिक विकासात असमतोल (Imbalances in Industrial Development) :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे ज्या उद्योगांना संरक्षण दिलेले आहे त्यांचा विकास होतो. तर ज्या उद्योगांना संरक्षण दिलेले नसते ते उद्योग मागासलेले राहतात.

**८) भ्रष्टाचाराचा धोका (Danger of Corruption) :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे आपले उद्योग आर्थिक संरक्षणात राहण्यासाठी व्यवस्थापनाकडून प्रयत्न केले जातात. प्रसंगी भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबिला जातो.

**९) आंतरराष्ट्रीय तणाव (International Coflict) :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध लादतात. देशादेशांत व्यापारी संघर्ष निर्माण होतात. त्यातून राजकीय संघर्ष निर्माण होण्याचा धोका असतो.

### ४.२.३ जकाती किंवा प्रशुल्क (Tariffs) :

जकाती, प्रशुल्क, आयात कर आणि तटकर हा अत्यंत प्राचीन कर आहे. पूर्वीच्या काळामध्ये बाहेरुन एखाद्या राज्यात व्यापाराच्या हेतूने येणाऱ्या व्यक्तींनी राज्याला योग्य अशी वस्तू नजराणा म्हणून बहाल करण्याची पध्दत होती. काळ जसजसा पुढे गेला तसे या रुढीने जकातीचे रुप धारण केले. सध्या अविकसित आणि विकसनशील देशात महसूलीचे प्रमुख साधन म्हणून जकातीकडे पाहिले जाते.

**व्याख्या :** 'एक देश विदेशातून येणाऱ्या आयातीवर ज्या दराने कर लावतो त्याला जकाती, प्रशुल्क किंवा सीमाशुल्क असे म्हणतात.'

देशाच्या सीमा ओलांडताना वस्तूवर लादलेला कर म्हणजे जकाती होय. म्हणून याला सीमा कर असेही म्हणतात. देशातून आयात होणाऱ्या आणि निर्यात होणाऱ्या वस्तूंवर हा कर आकारला जातो.

जकातीमध्ये खालील करांचा समावेश होतो.

**१) निर्यात कर (Export Duties) :**

आपल्या देशात उत्पादित होणाऱ्या पण विक्रीसाठी इतर देशांना निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूवर निर्यात कर आकारला जातो. कस्टम ॲक्ट १९६२ च्या कलम १२ नुसार भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूवर निर्यात कर आकारता येतो. प्राथमिक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या देशांकडून महसूलाची उभारणी करण्यासाठी या कराचा प्रामुख्याने अवलंब केला जातो. जेव्हा देशाची काही वस्तूच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय पातळीवरील बाजारपेठेत मक्तेदारी असते तेव्हा निर्यात कर हे त्या देशाच्या महसूलाचे महत्त्वाचे साधन असते.

**२) आयात कर (Import Duties) :**

विदेशात उत्पादीत हेणाऱ्या पण विक्रीसाठी आपल्या देशात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूवर आयात कर आकारला जातो. म्हणजेच, विदेशातून आपल्या देशात आयात होणाऱ्या वस्तूंवर आकारला जाणारा कर, म्हणजे आयात कर होय. कस्टम ॲक्ट १९६२ च्या कलम १२ नुसार भारतात आयात केल्या जाणाऱ्या सर्व वस्तूवर आयात कर आकारला जातो.

**३) संक्रमण किंवा पारगमन कर (Transit Duties) :**

विदेशात उत्पादीत होणाऱ्या पण विक्रीसाठी आपल्या देशातून दुसऱ्या देशात संक्रमण करणाऱ्या वस्तूवर आकारला जाणारा कर म्हणजे संक्रमण / पारगमन कर होय.

वरील प्रकारे जकातीमध्ये निर्यात कर, आयात कर व संक्रमण कर यांचा समावेश केला जातो. परंतु त्यामधील आयात कर हा सर्व ठिकाणी वाढवून येतो.

**जकातीचे वर्गीकरण किंवा प्रकार** (classification & Type of Tariffs) **:**

**१) उद्दिष्टाच्या आधारावर वर्गीकरण / प्रकार**

**अ) महसुली जकाती (Revenue Tariff) :**

जेव्हा केवळ सरकारला उत्पन्न मिळावे म्हणून आयात-निर्यातीवर जो जकात कर आकारला जातो त्या जकातीला महसुली जकाती असे म्हणतात. शुध्द स्वरुपातील महसुली जकातीमुळे उत्पादनाची साधने देशातील आयात पर्यायी उद्योगांकडे स्थानांतरीत होत नसतात. विकसित देशात प्रत्यक्ष करांच्या विकास आणि विस्तारामुळे सरकारला उत्पन्न मिळवून देणारे साधन म्हणून जकातीचे महत्व कमी झाले आणि परंतु विकसनशील देशात मात्र

सरकारला आज ही जकातीच्या उत्पन्नावर अवलंबून राहावे लागते. उदा. भारतामध्ये संरक्षणात्मक जकाती पेक्षा महसुली जकातीवर अधिक भर दिला जातो.

**ब) संरक्षणात्मक जकाती (Protective Tariff) :**

ज्यावेळी देशातील उद्योगांचे परदेशातील उद्योगांच्या स्पर्धेपासून संरक्षण करण्यासाठी जकाती आकारल्या जातात त्या जकातीला संरक्षणात्मक जकाती असे म्हणतात. उदा., आपल्या देशातील सुती कापड उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी विदेशी सुती कापड उद्योगातून येणाऱ्या सुती कापडावर आयात जकाती आकारणे.

जकाती आकारल्यामुळे संबंधित वस्तूंची आयात ही पूर्णपणे प्रतिबंधित होत असेल तर जकात पूर्णपणे संरक्षणात्मक जकात आहे असे म्हणतात. त्यावेळी जकाती पासून मिळणारा महसूल पूर्णपणे शून्य होते.

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये संरक्षणात्मक जकातीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे. औद्योगिकदृष्ट्या विकसित देश आपल्या देशातील उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी सरंक्षणात्मक जकातीचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये करतात.

**क) प्रत्याघात जकाती (Retaliators Tarrifs) :**

जेव्हा 'स' हा देश 'य' ह्या देशाकडून आयात वस्तूंवर जकात आकारतो तेव्हा 'य' ला देखील स्वसंरक्षणार्थ प्रत्याघात करावासा वाटतो आणि म्हणून 'य' हा देश 'स' या देशाकडून ज्या वस्तूंची आयात होते. त्या वस्तुंवर जकाती आकारतो. तेव्हा 'य' या देशाकडून आकारण्यात आलेल्या जकातीला 'प्रत्यक्ष जकात' असे म्हणतात. ह्या ठिकाणी जकात आकारण्यामागे स्वसंरक्षणार्थ प्रत्याघात करणे हा हेतू आहे.

**ड) प्रतिकार जकात (Countervailing Tariff) :**

ज्या देशातून वस्तूंची आयात केली जाते. त्या देशाने निर्यातीवर अर्थसाहाय्य दिल्यामुळे त्या वस्तूंची किंमत आपल्या देशातील बाजारपेठेत कमी होते. अशा परिस्थितीत देशातील संबंधित वस्तुंच्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयातीवर विशेष जकाती आकारल्या जातात त्यांना प्रतिकार जकाती (Countervailing Tariff) असे म्हणतात. विदेशातील सरकारने त्याच्या निर्यातीला दिलेल्या अर्थसाहाय्याची भरपाई करणे हा या जकातीचा हेतू असतो. भारतात या प्रतिकार जकातीचा वापर वेगळ्या पध्दतीने केला जातो. कस्टम टॅरिफ ॲक्ट १९७५ च्या कलम ३(१) नुसार भारतात आयात होणाऱ्या वस्तू जादा जकात कर आकारण्यास पात्र ठरतात. या जकातीच्या दराला प्रतिकार जकात असे म्हणतात. हा जकातीचा दर त्या वस्तूसमान भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूवर आकारण्यात येणाऱ्या उत्पादन शुल्काएवढ असतो.

**२) जकातीच्या उगमाच्या आधारावर वर्गीकरण –**

**अ) एक स्तंभी जकाती (Single Column Tariff) :**

जकाती पद्धतीमध्ये एकाच प्रकारच्या वस्तूवर एकाच एक स्तंभी जकातीचा दर आकारला जातो. ती वस्तू कोणी आयात केली आहे, कोणत्या देशातून आली आहे, याचा जकात आकारताना विचार केला जात नाही.

या जकातीला अभेदात्मक जकाती असेही म्हणतात. या जकात पद्धतीत करदराची सूची एकच असते.

**ब) द्वि–स्तंभी जकाती (Double Column Tariff) :**

द्वि–स्तंभी जकाती पद्धतीत जकातीचे महत्तम व न्यूनतम दर ठरवून देण्यात येतात. म्हणून ह्या पध्दतीत सर्व वस्तूंचे किंवा काही वस्तूंकरिता दोन प्रकारचे करदर असतात. उदा. भारतामध्ये पाकिस्तान मधून आयात होणाऱ्या वस्तूंवर जादा दराने आणि इंग्लंडमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर कमी दराने जकात आकारली जाते. भारत परम मित्र देश (Most Favoured Nations) असलेल्या देशांच्या बाबतीत किमान दराने कर आकारणी करतो.

**क) बहु–स्तंभी जकाती (Multiple Column Tariff) :**

बहु–स्तंभी जकाती पद्धतीमध्ये कर दरांची सूची दोन पेक्षा जास्त असतात. ह्या भिन्न–भिन्न देशांकरिता भिन्न–भिन्न कराचे दर लावण्यात येतात. सामान्यपणे जकातीच्या तीन याद्या तयार केल्या जातात. उदा. सामान्य दर पद्धती, मध्यम दर पद्धती व परस्पर पसंतीचे दर पद्धती असतात. सामान्य दर पध्दतीत महत्तम दराने कर आकारणी केली जाते तर परस्पर पसंती दर पध्दतीत आयात वस्तूंवर अगदी कमी किंवा शून्य जकाती आकारल्या जातात. विशेषत: मित्रत्वाचे संबंध असणाऱ्या देशांच्या बाबतीत या पद्धतीचा अवलंब केला जातो.

**ड) परंपरागत जकाती (Conventional Tariff) :**

परंपरागत जकाती प्रकारात प्रत्येक वस्तूसाठी कायद्यान्वये एक मूलभूत वा मुख्य जकाती निश्चित केली जाते. अशाप्रकारे भिन्न देशासाठी वा भिन्न वस्तुंसाठी जकातीचे वेगवेगळे दर आकारले जातात. उभय देशांतील अथवा व्यापारी करारानुसार जकातीच्या दरात घट केली जाते. हा जकातीचा प्रकार सर्वात जास्त प्रचलित आहे.

**इ) स्वायत्त जकाती (Autonomous Tariffs) :**

विविध देशातील जकातीचे दर आपाआपसातील तडजोडीने न ठरता कायद्यानुसार ठरतात. तेव्हा त्याला स्वायत्त जकाती असे म्हणतात.

**३) जकातीच्या स्वरुपावरुन वर्गीकरण / प्रकार –**

**अ) परिमाण / विशिष्ट जकाती (Specific Duties) :**

वस्तूंचे परिमाण मोजण्याच्या एककाच्या (उदा., किलो, मिटर, पौंड, वार, टन इ.) साहाय्याने प्रत्येक नगानुसार एका निश्चित रक्कमेचा कर आकारला जातो. तेव्हा त्याला परिमाण किंवा विशिष्ट जकाती असे म्हणतात. उदा. १ क्विंटल गव्हाच्या आयातीवर १०० रुपये या दराने जकात आकारणे याला परिमाण जकाती असे म्हणतात.

**ब) मूल्याधारित जकाती (Advalorem Duties) :**

आयात–निर्यात वस्तूंचे मूल्य आधारभूत मानून त्यावर एका निश्चित प्रतिशत दराने कर आकारणी केली जात

असल्यास त्याला मूल्याधारित कर असे म्हणतात. उदा., आयात मोटार कारच्या किंमतीत १५ टक्के आयात कर आकारणे. आयात वस्तूंच्या किंमतीतील वाढ ही आयात जकाती आकरणाऱ्या देशातील सरकारला अधिक महसूल मिळवून देते. विशिष्ट कराशी तुलना करता मुल्याधारित कर चलन वाढीच्या काळात देशातील उद्योगांना सातत्याने अधिक प्रमाणात संरक्षण देतात. युरोपियन देश प्रामुख्याने मुल्याधारित कर आकारतात.

**क) संयुक्त / मिश्रित (Compound Duties) :**

संयुक्त / मिश्रित जकाती मध्ये परिमाण आणि मूल्याधारित जकातीचे सहअस्तित्व असते. आयातदार वा निर्यातदार यांना आयात वा निर्यात वस्तूंवर सरकारला विशिष्ट कर / जकाती अधिक मूल्याधारित एकत्रितपणे द्यावा लागतो. उदा., आयात मोटार कारवर प्रति नग ५००० रुपये अधिक तिच्या किंमतीच्या २% आयात कर आकारणे.

**ड) सरकते जकाती (Sliding Scale Duties) :**

वस्तूंच्या मूल्यानुसार जकात दरात बदल करणे ही बाब सरकते जकातीत अभिप्रेत असते. ह्या जकाती विशिष्ट कर/जकाती बाबत मुल्याधारित जकाती असू शकतात.

**आयात जकातीचे उद्देश (Objectives of Import Tariffs) :**

जकातीमध्ये निर्यात कर, आयात कर व संक्रमण कर यांचा समावेश होतो. परंतु त्यापैकी आयात कर हा सर्वत्र आढळून येणारा असा कर आहे. आयात जकातीचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) जकाती आकारुन आयात कमी करुन देशातील उत्पादकांना विस्तृत बाजारपेठ निर्माण करणे.

२) जकतीच्या माध्यमातून सरकारला जास्तीत जास्त महसुली उत्पन्न मिळवून देणे.

३) जकाती आकारुन व्यापारशर्ती अनुकूल करणे.

४) जकतीच्या माध्यमातून व्यवहारतोलात समतोल निर्माण करणे.

**जकातीचे परिणाम (Effects of Tarrifs) :**


जकती ह्या सरकारी उत्पन्नात वाढ करणे आणि देशातील उद्योगांना संरक्षण देणे या हेतूने लावण्यात येतात. सरकारच्या अर्थसंकल्पातील वित्तीय उत्पन्नात वाढ करण्याकरिता लावण्यात येणाऱ्या जकातींना महसुली जकाती म्हणतात. आपल्या देशातील स्वदेशी उद्योगांतील वस्तूची विदेशातील उद्योगांमधील वस्तू बरोबरील स्पर्धेपासून संरक्षण देण्यासाठी लावण्यात येणारी जकात म्हणजे सरंक्षणात्मक जकात होय. बऱ्याच वेळा एक हेतू साध्य करण्यासाठी जकात आकारल्यास दुसरा हेतू आपोआपच साध्य होतो. उदा., सरकारी महसुलात वाढ व्हावी म्हणून जकात आकारल्यास आपोआप देशातील उद्योगाचे संरक्षण होते. याउलट देशातील उद्योगांचे सरंक्षण करण्यासाठी जकाती आकारल्यास आपोआप सरकारी महसुलात वाढ होते.

अर्थशास्त्रज्ञ किंडलबर्जर यांनी जकातीचे सात परिणाम सांगितले आहेत.

१) उपभोग परिणाम २) संरक्षण परिणाम ३) महसूल परिणाम ४) पुनर्वाटणी परिणाम

५) व्यापारशर्ती परिणाम ६) रोजगार परिणाम ७) व्यवहारतोल परिणाम

**आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण –** **आकृती क्र. ४.१**




वरील आकृतीत 'म१ म१' हा ऋणात्मक उताराचा मागणी वक्र आणि 'प प१' धनात्मक उताराचा पुरवठा वक्र आहे. जकात आकारण्यापूर्वी वस्तूची किंमत 'अ त' इतकी होती. 'अ त' ह्या किंमतीला 'अ क' एवढी मागणी किंवा उपभोग एका देशाचा आहे. कारण 'त' वरुन काढलेली रेषा 'म१ म१' ह्या मागणी वक्राला 'ख' बिंदूत मिळते. हीच रेषा 'प प१' ह्या पुरवठा वक्राला 'ड' बिंदूत मिळते. म्हणून 'अ ब' हे त्या वस्तूचे स्वदेशातील होणारे उत्पादन/ परिमाण आहे. 'अ क' परिमाणाची मागणी आहे. 'अ ब' परिमाणाचा स्वदेशातून पुरवठा होतो. 'ब क' एवढ्या परिमाणाची देशाला आयात करावी लागते. ही स्थिती जकात लावण्यापूर्वीची आहे.

**आयातीवर जकाती आकारल्यानंतरची स्थिती / परिणाम –**

समजा त्या देशाने 'त त१' एवढ्या रकमेची आयात जकाती किंवा आयात प्रशुल्क आकारले. त्यामुळे वस्तूची किंमत वाढून 'त त१' झाली. त्यानंतर काय परिणाम होतात यांच पुढीलप्रमाणे विचार करु.

**१) उपभोग परिणाम (Consumption Effect) :**

आयात होणाऱ्या वस्तूवर जकाती आकारल्यानंतर आयात वस्तूंच्या किंमती वाढून मागणी कमी होते. त्यांचा परिणाम लोकांचा उपभोग घटतो. यालाच जकातीचा उपभोग परिणाम असे म्हणतात. आयातीवर जकाती आकारण्यापूर्वी आयात वस्तूची किंमत 'अ त' आहे. त्यावेळी त्या वस्तूची देशातील उपभोगाची मागणी 'अ क' एवढी आहे.

जकाती आकारल्यानंतर आयात वस्तूंची किंमत 'अ त' वरुन वाढून 'अ त१' एवढी झाली. किंमत वाढीचा परिणाम म्हणून मागणी 'अ क' वरुन 'अ न' एवढी घटते. जकाती आकारल्यानंतर उपभोगात पूर्वीपेक्षा 'न क' एवढी मागणीत घट होते 'न क' हा जकाती आकारल्यानंतरचा उपभोग परिणाम आहे.

### २) महसूल परिणाम (Revenue Effect) :

जकाती आकारल्यानंतर सरकारच्या महसूली उत्पन्नात जी भर पडते त्याला जकातीचा महसूली परिणाम असे म्हणतात. जकातदराला आयातीच्या परिमाणाने गुणल्यास जकातीचा महसूल परिणाम कळतो. जकाती आकारल्यानंतर वस्तूची एकूण मागणी 'अ न' एवढी होते. त्या वस्तूचा देशातील पुरवठा 'अ स' एवढा आहे. त्यामुळे देश दुसऱ्या देशातून 'स न' एवढ्या नगाची आयात करतो. आकृतीत 'सन = थ द' देश 'थ द' परिमाणाची आयात करतो. आयातीच्या प्रत्येक नगावर 'त $त_१$' किंमतीची जकात सरकार आकारते. आकृतीमध्ये 'त $त_१$ = थ ल' आहे. जकाती आकारल्यानंतर होणारी आयात 'थ द' आणि जकात 'थ ल' ह्यांचा गुणाकार (थ द **x** थ ल) थ द ध ल हा चौकोन आहे. 'थ ल ध ल' हा चौकोन सरकारला जकातीपासून मिळणारे महसूली उत्पन्न दर्शवितो.

### ३) सरंक्षण परिणाम (Protective Effect) :

आयात वस्तूवर जकाती आकारल्यामुळे देशातील उद्योगांना संरक्षण मिळते. आयातीवर जकाती आकारल्यामुळे आयात वस्तूच्या किंमती वाढतात आणि देशातील उद्योगातील वस्तूंच्या किंमती त्या तुलनेने कमी राहतात. त्यामुळे देशातील उद्योगातील वस्तूची मागणी आणि पुरवठ वाढतो यालाच जकातीचा सरंक्षण परिणाम म्हणतात. जकाती आकारण्यापूर्वी देशातील वस्तूचे उत्पादन 'अ ब' एवढे होते. जकाती आकारल्यानंतर 'अ स' एवढे देशातील उद्योगातील वस्तूंचे उत्पादन वाढले. जकाती आकारल्यानंतर देशातील उत्पादनात जी 'ब स' एवढी वाढ होते ती जकातीचा संरक्षण परिणाम आहे. संरक्षण परिणाम कमी किंवा जास्त पुरवठा वक्राच्या लवचिकतेवर अवलंबून असतो. पुरवठा वक्र जेवढा जास्त लवचिक तेवढा संरक्षण परिणाम कमी असतो.

### ४) पुनर्वाटणी परिणाम (Redistribution Effect) :


किंमत व नफा दोन्ही वाढल्यामुळे उत्पादकांना मिळणारे आधिक्य स्वरुपाचे उत्पन्न म्हणजे पुनर्वाटणी परिणाम होय. जकातीच्या पुनर्वाटणी परिणामालाच एल्सवर्थ यांनी 'हस्तांतरण परिणाम' असे म्हणतात. जकाती आकारल्यानंतर देशातील उत्पादन पूर्वीपेक्षा 'ब स' नगांनी वाढवावे लागते. जास्तीचे उत्पादन करण्यासाठी जास्तीचे उत्पादन साधने लागतात. जास्तीचे उत्पादन करण्यासाठी जास्तीचे उत्पादन साधने लागतात. नवीन असणाऱ्या उत्पादनसाधनांना 'ब स' गुणिले 'अ क' एवढी प्राप्ती होत असते. असे गृहीत धरले आहे. ह्या उद्योगात नवीन उत्पादन साधनांना आकर्षित करण्यासाठी $\Delta$ 'ड थ ल' ह्या त्रिकोणाएवढी जास्त किंमत द्यावी लागेल.

### ५) व्यापारशर्ती परिणाम (Terms of Trade Effect) :

निर्यातदार देशातील वस्तूचा पुरवठा अलवचिक आणि आयातदार देशातील वस्तूची, मागणी लवचिक असेल तर कमी झालेल्या किंमतीत सामान्यपणे पूर्वीएवढीच आयात चालू राहते. व्यापारशर्ती आयातदार देशाला लाभदायक राहतात. याउलट निर्यात-आयातदार देशातील वस्तूचा पुरवठा लवचीक आणि आयातदार देशातील वस्तूची मागणी अलवचीक असेलतर जकाती आकारल्यामुळे व्यापारशर्तीत कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नाही.

**व्यापारशर्ती परिणाम आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण.**

**आकृती क्र. ४.२**




आकृतीत 'अ म' अमेरिकेचा आणि 'अ इ' इंग्लंडचा विक्रय प्रस्ताव वक्र आहे. दोन्ही प्रस्ताव वक्र 'स' ह्या बिंदूत छेदतात. 'अ स' ह्या व्यापारशर्तीवर दोन्ही देशात व्यापार सुरु होतो. समजा इंग्लंडने आयात होणाऱ्या गव्हावर जकात कर आकारला तर इंग्लंडच्या गव्हाच्या मोबदल्यात पूर्वी पेक्षा कमी कापड देतो. त्याचा परिणाम 'अ इ१' हा इंग्लंडचा विक्रय प्रस्ताव वक्र इंग्लंड देशाच्या व्यापारशर्ती अधिक अनुकूल झाल्याचे दर्शवितो. कारण जकाती आकारण्यापूर्वी इंग्लंड देश 'अ ग' गव्हाच्या मोबदल्यात 'ग क' मात्रा कापड देत होता. जकाती आकारल्यानंतर फक्त 'ग न' एवढ्या मात्रा कापड देतो. ते पूर्वीपेक्षा कमी आहे. जकाती आकारल्यानंतर इंग्लंडचा फायदा होतो. इंग्लंडचे जकाती आकारल्यानंतर त्याला प्रतिकार करण्यासाठी अमेरिकासुध्दा इंग्लंडमधून आयात होणाऱ्या कापडावर जकाती आकारु शकतो. त्यामधून जकाती युध्द **(Tariff War)** सुरु होते आणि व्यापार घटत जातो. याउलट जकातीचा दर कमी करत गेल्यास व्यापार वाढत जातो.

**६) व्यवहारतोल परिणाम (Balance of Payments Effects) :**

देशाच्या सीमेवर परकीय वस्तू आल्यानंतर जकाती आकारल्यामुळे व्यापार मात्रा आणि वस्तूंच्या किंमतीत बदल होतात. त्याचा परिणाम व्यवहारतोलावर होतो. देशाच्या व्यवहरतोलात तूट असेल तर आयात जकात आकारुन आयात नियंत्रित करता येते. त्यामुळे व्यवहारतोलातील असंतुलन दूर करता येते. गॅट ही आंतरराष्ट्रीय संस्था तात्पुरती उपाययोजना म्हणून जकाती आकारण्याची परवानगी देते.

**७) रोजगारीवरील परिणाम :**

जकाती आकारल्यामुळे अल्प कालावधीत रोजगाराची पातळी वाढते. लोकांच्या मागणीचा ओघ आयात

वस्तूकडून स्वदेशातील स्वस्त वस्तूकडे जकाती आकारल्यामुळे जातो. वस्तूची मागणी वाढल्यामुळे त्यांचा पुरवठा वाढविण्यासाठी उत्पादन घटकांची मागणी वाढून काम मिळते आणि त्यातून रोजगारात वाढ होते. गुणक परिणामामुळे रोजगार आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. याचा उलट परिणाम होऊ शकतो. आपण आयात घटविली तर विदेशीच्या निर्यातीत आणि उत्पन्नात घट होते. परदेशाचे उत्पन्न घटल्यामुळे त्या देशाच्या आयाती घटतात म्हणजे आपल्या देशाची निर्यात घटते आपले निर्यात उत्पन्न घटते. तसेच आपण आयात वस्तूवर जकाती आकारल्यानंतर विदेशी सरकार आपल्या वस्तूवर जकाती आकारुन संरक्षणार्थ धोरण राबविते.

वरील सात जकातीचे परिणाम किंडलबर्जर यंनी सांगितले आहेत. पुढील जकातीचे परिणाम इतर आहेत.

**८) मागणी प्रवाहावर परिणाम :**

जकातीचा परिणाम वस्तूच्या मागणी प्रवाहावर पडतो. समजा आयात वस्तूच्या मागणीची लवचिकता एकक असेल तर आयातदार/ खरेदीदार ह्या वस्तूवर पूर्वी एवढाच खर्च करतील. परंतु इतर वस्तूंकरिता असणाऱ्या सापेक्ष मागणीत बदल होतो. वस्तूची मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी असेल तर जकाती आकारल्यानंतर त्या वस्तूवर जास्त खर्च करावा लागतो. त्यासाठी दुसऱ्या वस्तूवरील खर्च कमी करावा लागतो. त्यामुळे मागणी कमी होते. वस्तूच्या मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त असेल तर इतर वस्तूच्या खरेदीसाठी पैसा शिल्लक राहतो आणि इतर वस्तूची मागणी वाढते.

**९) उत्पादन घटकांवरील परिणाम :**

वस्तूचे उत्पादन घेण्यासाठी उत्पादन घटकांच्या आयातींवर जकाती आकारल्यामुळे उत्पादन घटकांच्या किंमती वाढतात. जकाती आकारलेल्या उत्पादन घटकांचा ज्या उत्पादनामध्ये वापर होतो. त्या उत्पादनाच्या किंमतीत वाढ होते. त्यामुळे निर्यात महाग होऊन निर्यातीत घट होते. परंतु उत्पादन घटकांच्या आयातीवर जकाती आकारल्यामुळे आयात घटलेली असते. आयातीबरोबरच निर्यातीमध्ये घट होत असल्यामुळे व्यवहारतोलावर परिणाम होत नाही.

**१०) उत्पादन घटकांच्या गतिशीलतेवर परिणाम :**

प्रो. मुंडेल यांच्या मते, १) व्यापारावरील निर्बंधामुळे उत्पादन घटकांची गतिशीलता वाढते. २) उत्पादन घटकांच्या गतिशीलतेवरील निर्बंधामुळे व्यापारामध्ये वाढ होते. आयातीवर जकाती आकारल्यामुळे उत्पादन घटकांच्या गतिशीलतेला उत्तेजन मिळते.

**११) किंमतीवर व विक्रीकर परिणाम :**

जकाती आकारल्यामुळे त्याचा प्रत्यक्ष परिणाम वस्तूंच्या किंमतीवर आणि विक्रीवर होत असतो. हा परिणाम किती होईल हे उत्पादनाचे नियम आणि मागणीची लवचिकता यावर अवलंबून असते.

वरीलप्रमाणे जकातीचा परिणाम होत असतो.

### ४.२.४ कोटा (Quotas) :

'कोटा' हे व्यापक प्रमाणावर वापरले जाणारे संरक्षित व्यापाराच्या धोरणाचे साधन आहे. देशाच्या आयात व निर्यात वस्तूंचे परिमाण प्रत्यक्षपणे मर्यादित करणाऱ्या पध्दतीला कोटा असे म्हणतात. आयात कोटा पध्दतीचा वापर अनेक देशांनी मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येते.

**हॅबरलर :** आयात कोटा पध्दतीत आयातीचे जे एक निश्चित परिमाण ठरलेले असते त्यात वाढ होऊ शकत नाही.

सन १९३० मधील जागतिक महामंदीच्या कालावधीत जकाती पध्दतीमधील अनेक दोष दिसून येऊ लागले. तेव्हापासून आयात कोटा पध्दतीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. आयात कोटा पध्दतीमध्ये देशामध्ये विशिष्ट काळात एखाद्या वस्तूचे निश्चित परिमाण किंवा मूल्यापर्यंत आयात करण्यासाठी परवानगी देणे अभिप्रेम असते. आयात कोटा पध्दतीत एखाद्या वस्तूच्या आयातीची संख्या ठरविलेली असते. त्यापेक्षा जास्त नग आयात करता येत नाहीत. उदा. एका वर्षाच्या काळात जास्तीत जास्त ५० हजार संगणकाची आयात करण्याचा आयात कोटा ठरविला असेल तर त्यावर संगणकाची आयात करता येत नाही. मुक्त व्यापाराच्या वेळी देशातवस्तूंची आयात होत असते. त्यापेक्षा कमी आया कोटा असला पाहिजे. नाहीतर त्यांचा परिणाम होत नाही आणि आयात कोट्याची गरज भासणार नाही.

जगामध्ये सर्वात प्रथम आयात कोटा वापरणारा देश फ्रान्स आहे. त्यानंतरच्या काळात जगामधील अनेक देशांनी त्यांचे अनुकरण केले आहे. फ्रान्सने देशामधील शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी आणि गव्हासाठी जास्तीत जास्त भाव मिळावा म्हणून आयात कोटा पध्दतीचा वापर केला होता. आयात नियंत्रित करण्यासाठी जकात पध्दतीचा वापर होत नाही तेव्हा आयात कोटा पध्दतीचा वापर केला जातो.

**आयात कोट्याचे उद्देश :**

१) आयातीचे व्यवस्थित नियंत्रण करण्यासाठी आयात कोटा पध्दतीचा अवलंब करणे.

२) स्वदेशी उद्योगांना विदेशी स्पर्धेपासून संरक्षण करण्यासाठी आयात कोटा पध्दतीचा अवलंब करणे.

३) व्यवहारतोलातील तूट कमी करण्यासाठी आणि व्यवहारतोल संतुलित करण्यासाठी आयात कोटा पध्दतीचा अवलंब करणे.

४) सट्टेबाजीच्या व्यवहारांना आळा घालण्यासाठी अशा आयातीवर निर्बंध घालण्यासाठी आयात कोटा पध्दतीचा अवलंब करणे.

५) आयात वस्तूंचा ओघ नियंत्रित करुन देशांतर्गत किंमत पातळी स्थिर ठेवण्यासाठी आयात कोटा पध्दतीचा अवलंब करणे.

६) विदेशी सरकार आयात कोटा पध्दतीला प्रत्युत्तर देण्यासाठी आयात कोटा पध्दतीचा अवलंब करणे.

**आयात कोटा पध्दतीचे प्रकार :**

**१) जकात कोटा (Tariff Quotas) :**

आयात जकात कोटा पध्दतीत एखाद्या वस्तूची एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आयात करताना त्यावर जकात आकारली जात नाही किंवा अगदी नाममात्र जकात आकारली जाते. परंतु त्यापेक्षा जास्त परिमाण आयात केल्यास अतिरिक्त परिमाणावर वाढीव दराने जकात आकारली जाते. आयातदारांनी मर्यादित प्रमाणात विदेशातून माल आणावा आणि त्यापेक्षा जास्त प्रमाणात माल आणल्यास त्यांना भुर्दंड बसावा हा हेतू या पध्दतीमागे आहे. आयात जकात आणि आयात कोटा या दोहोंचे या पध्दतीत गुण दिसून येतात. ही पध्दती लवचिक असली तरीही तिच्यामध्ये काही दोष आहेत. जेव्हा आयात ही करमुक्त निश्‍चित मर्यादेपेक्षा जास्त होते तेव्हा करमुक्ततेचा लाभ निर्यातदार देशांना होतो. या पध्दतीत प्रत्येक नव्या कोट्याच्या सुरुवातीला आयातीत मोठ्या प्रमाणावर वाढ होते. त्याचा देशातील किंमत पातळीवर प्रतिकूल परिणाम होतो.

**२) एकमार्गी आयात कोटा (Unllateral Quotas) :**

एकमार्गी आयात कोटा पध्दतीत एका विशिष्ट कालावधीसाठी वस्तूंच्या आयातीची महत्तम मर्यादा सरकार जाहीर करते असे जाहीर करताना सरकारने कोणत्याही देशाबरोबर वाटाघाटी केलेल्या नसतात. एकमार्गी आयात कोटा हा जागतिक कोटा किंवा देशनिहाय विभाजित कोटा या स्वरुपाचा असतो.

जेव्हा जागतिक कोणत्याही देशातून ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत आयात करता येत असेल तर त्याला 'जागतिक कोटा' असे म्हणतात. जेव्हा आयात वस्तूंचे ठराविक प्रमाण वेगवेगळ्या / विविध देशांतून वाटून दिलेले असते तेव्हा त्याला 'देशनिहाय विभाजित कोटा' असे म्हणतात.

**३) मिश्र आयात कोटा (Mixing Quotas) :**

स्वदेशात उत्पादित होणाऱ्या मालामध्ये विदेशातील कच्च्या मालाचे प्रमाण किती असावे ह्यावर मर्यादा आणण्यासाठी मिश्र कोटा पध्दतीचा वापर केला जातो. आयात कोटा पध्दतीने स्वदेशात तयार होणाऱ्या उत्पादनात स्वदेशातील कच्चा माल किती टक्के आणि विदेशातील कच्चा माल किती टक्के वापरावयाचा यांचे प्रमाण ठरविले जाते. विदेशातील कच्च्या मालावर निर्बंध आणून आपल्या देशातील कच्च्या मालाचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यासाठी मिश्र आयात कोटा पध्दतीचा वापर केला जातो.

**४) द्विमार्गी आयात कोटा (Bilateral Quota) :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वाढ करण्यासाठी दोन रेषा एकमेकांशी चर्चा करुन आयात वस्तूबाबतचे धोरण ठरवितात. तेव्हा त्याला द्विमार्गी आयात कोटा पध्दती असे म्हणतात. आयातदार आणि निर्यातदार देशांमध्ये चर्चा करुन कोटा ठरविला जातो. त्यानुसार प्रत्येक देशाने दुसऱ्या देशातून किती प्रमाणात वस्तूची आयात आणि निर्यात करावयाची हे दोन्ही बाजूचे प्रतिनिधी ठरवत असता म्हणून त्याला द्विमार्गी आयात कोटा पध्दती म्हणतात.

५) **आयात परवाना पध्दती (Import Licencing System) :**

अलिकडच्या काळात आयात परवाना पध्दती अतिशय लोकप्रिय झाली आहे. आयात परवाना पध्दतीमध्ये परदेशातून किती प्रमाणात वस्तूची आयात करावयाची हे ठरविले जाते. परदेशातून वस्तूंची आयात करण्यासाठी आयातदाराला सरकारकडून आयात परवाना घ्यावा लागतो. परवानाधारकांशिवाय इतर घटकांना वस्तूंची आयात करता येत नाही. आयात परवाना पध्दतीत खुला आयात परवाना जास्तीचा मोबदला देणाऱ्यांना मिळतो. परवान्याचे आयातदारात नियंत्रित वाटप आणि आयात परवाना देताना सरकारची मक्तेदारी अशा चार पध्दतीचा अवलंब केला जातो.

६) **आयात कोटा (Import Quotas) :**

जेव्हा एखाद्या देशातील सरकार आपल्या देशात वस्तूंची आयात करण्यासाठी एक निश्चित असे प्रमाण / परिमाण ठराविक कालावधीसाठी ठरविले / निश्चित केले जाते. या निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा एकही जादा नग खरेदी करता येत नाही. तेव्हा त्याला 'आयात कोटा पध्दती' असे म्हणतात. आयात कोटा पध्दतीमुळे देशाला आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियंत्रण करता येते.

७) **निर्यात कोटा (Export Quotas) :**

आयात वस्तूंप्रमाणेच निर्यात वस्तूबाबत ही कोटा निश्चित केला जातो. जेव्हा एखादा देश विशिष्ट कालावधीसाठी देशातून वस्तूंची निर्यात किती प्रमाणात करावयाची? याबाबतीत निश्चित धोरण ठरवून त्याप्रमाणे कार्यवाही करतो तेव्हा त्याला निर्यात कोटा असे म्हणतात. अशाप्रकारे निर्यात कोटा निश्चित केल्यामुळे जगातील विशिष्ट वस्तूचे उत्पादन करणाऱ्या सर्वच देशांना आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी करुन घेतले जाते.


**आयात कोटा पध्दतीचे परिणाम : (Effects of Import Quotas) :**

आयात कोटा पध्दतीचे अर्थव्यवस्थेतील विविध घटकांवर परिणाम होतात.

१) **किंमत परिणाम (Price Effect) :**


आयात कोटा पध्दतीचे विविध परिणाम पुढील आकृती क्र ४.३ आणि ४.४ च्या सहाय्याने स्पष्ट केले आहेत.

आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण : **आकृती क्र. ४.३**



आकृती क्र. ४.४ मध्ये 'म म$_१$' मागणी वक्र आणि 'प प$_१$' हा पुरवठा वक्र आहे. दोन्ही वक्राचे संतुलन 'अत' या किंमतीला होते. आता 'अ क१' हा आयात कोटा ठरविलेला आहे. त्यामुळे पूर्वीचा पुरवठा वक्र 'प प$_१$' बदलून तो 'प$_२$व$_२$' आणि मागणी वक्र 'म$_१$ म' 'र' या बिंदूत संतुलित होतो. त्यामुळे पूर्वीची किंमत 'अ त' वरुन 'अ त$_१$' होते. पुरवठा स्थिर झाल्यामुळे जसजशी मागणी वाढेल तसतशी वस्तूची किंमत वाढत जाते.

**आकृती क्र. ४.४**




## २) उपभोग परिणाम : (Consumption Effect)

आयात कोटा पध्दतीमुळे वस्तूची आयात कमी होते. त्यांचा परिणाम वस्तूचा पुरवठा कमी होऊन वस्तूंच्या किंमती वाढतात. किंमत वाढीचा परिणाम उपभोग घटतो. आकृती क्र. ४.३ मध्ये दुसऱ्या देशातून येणाऱ्या वस्तूवर कोटा पध्दतीचा वापर केल्यामुळे वस्तूंची किंमत 'अत' वरुन 'अत$_१$' होते. त्यांचा परिणाम उपभोग 'अक' वरुन 'अन' एवढा होतो. 'क' पासून 'न' पर्यंत उपभोगात घट होते.

## ३) संरक्षण परिणाम : (Protective Effect)


आयात वस्तूवर कोटा पध्दतीचा वापर केल्यामुळे देशातील उद्योगांना संरक्षण मिळते. आयातीवर कोटा लावल्यामुळे आयात वस्तूच्या किंमती वाढतात. त्यावेळी देशातील उद्योगातील वस्तूंच्या किंमती आयात वस्तूंच्या किंमतीच्या तुलनेत कमी राहतात. त्यामुळे देशातील उद्योगातील वस्तूंची मागणी आणि पुरवठा वाढतो. यालाच कोट्याचा संरक्षण परिणाम म्हणतात. आकृती क्र. ४.३ मध्ये दाखविल्याप्रमाणे कोटा पध्दतीचा वापर करण्यापूर्वी देशातील वस्तूंचे उत्पादन 'अब' एवढे होते. कोटा पध्दती लागू केल्यानंतर 'अस' एवढे देशातील उद्योगातील वस्तूचे उत्पादन वाढेल. कोटा पध्दती लागू केल्यानंतर देशातील उत्पादनात 'बस' एवढी वाढ होते. याला संरक्षण परिणाम म्हणता येईल.

## ४) पुनर्वाटप परिणाम : (Redistribution Effect)

उपभोक्त्यांकडून उत्पादकाकडे उत्पन्नाच्या होणाऱ्या स्थानांतरणाला पुनर्वाटप परिणाम असे म्हणतात. आयात कोट्याचे परिमाण निश्चित केल्यानंतर वस्तूंच्या किंमती वाढतात. त्यामुळे त्याचा उत्पादकांना लाभ होतो. मात्र उपभोक्त्यांना किंमती वाढल्यामुळे अधिक दराने वस्तू खरेदी कराव्या लागतात. त्यामुळे त्यांचा तोटा होतो. आकृतीत 'त$_३$लत$_१$' हा चौकोन पुनर्वाटप परिणाम आहे. आकृती ४.३ मध्ये 'र', 'ख', 'ब' हा उपभोक्त्याचा तोटा आहे. आकृती क्र. ४.३ मध्ये त्रिकोण 'फ','स','ट' इतका उपभोक्त्याचा तोटा होतो. म्हणजे उपभोक्त्यांकडून उत्पन्नाचे पुर्नवाटप उत्पादकांकडे होते. यालाच पुनर्वाटप परिणाम म्हणता येईल.

## ५) व्यापारशर्ती परिणाम : (Terms of Trade Effect)

**आकृती क्र. ४.४**




आकृतीत 'अड' हा इंग्लंडचा आणि 'अक' अमेरिकेचा प्रस्ताव वक्र आहे. 'प' या बिंदूत या दोन वक्राचा समतोल होतो आणि 'अप' ह्या व्यापारशर्ती ठरतात. समजा इंग्लंडने आयात होणाऱ्या गव्हाचा वाटा 'अख' एवढा मर्यादित केला. अशा स्थितीत इंग्लंडच्या दृष्टीने व्यापारशर्ती ह्या 'अप२' ह्या रेषेने दर्शविल्या आहेत. दोन्ही देशात चर्चा होऊन व्यापारशर्ती 'अप$_२$' व 'अप$_१$' यामध्ये कुठेतरी ठरतील.

## ६) व्यवहारतोल परिणाम : (Balance of Payments Effects)

आयात कोटा ठरवून देश आयातीवर मात्रात्मक निर्बंध लादतो. त्यामुळे आयात कमी होऊन व्यवहारतोलातील असंतुलन कमी होते. तुटीचा व्यवहारतोल समतोल व्यवहारतोल होऊ शकतो.

**७) रोजगारावरील परिणाम :**

आयात कोटा ठरविल्यामुळे आयात घटते. त्यामुळे देशातील वस्तूंचे उत्पादन वाढवावे लागते. उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादन घटकांना रोजगार मिळतो आणि देशात रोजगारात वाढ होते.

**८) महसूल परिणाम :**

आयात कोटा निश्चित केल्यानंतर आयातीचे आकारमान आणि जकातीचा दर निश्चित होऊन सरकारचे महसूली उत्पन्न घटते. मात्र त्याचवेळी सरकारने देशांतर्गत उद्योगांना चालना देऊन त्यांची वाढ घडवून आणल्यास सरकारी महसुलात वाढ होऊन आर्थिक विकास साध्य करता येतो.

वरीलप्रमाणे आयात कोट्याचे परिणाम अर्थव्यवस्थेवर होतात.

**४.३ सारांश :**

देशाने आपल्या आयात-निर्यातीचे नियंत्रण आणि नियमन करण्यासाठी अवलंबिलेले नियम म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण होय. आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरणाचे मुक्त व्यापार आणि संरक्षित व्यापार असे दोन प्रकार आहेत. मुक्त व्यापार म्हणजे निरनिराळ्या देशाबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापार होत असताना सरकारने कोणत्याही स्वरूपात हस्तक्षेप न करणे होय. संरक्षित व्यापार धोरणामध्ये दुसऱ्या देशातून येणाऱ्या वस्तू व सेवांवर आयात कर, कोटा आणि इतर पध्दतीचा अवलंब करुन आयात कमी करणे. मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन आर्थिक व सैध्दांतिक अशा दोन्हीही पातळीवरुन केले जाते. परंतु प्रत्यक्षामध्ये मात्र मुक्त व्यापाराला प्रतिबंध करण्यासाठी वेगवेगळ्या देशांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या अडथळ्यांचा अवलंब केला जात आहे. मुक्त व्यापाराला प्रतिबंध करणारे नैसर्गिक व मानवनिर्मित प्रकार आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारात संरक्षित व्यापार साधनांचा अवलंब केल्यामुळे जे अडसर निर्माण होतात. त्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारातील मानवनिर्मित अडसर असे म्हणतात. संरक्षित व्यापार, साधनांचे जकाती आणि बिगर जकाती मार्ग असे वर्गीकरण केले जाते. जकाती मार्गांना दृश्य आणि बिगर जकाती मार्गांना अदृश्य अडसर म्हटले जाते.

जकाती प्रशुल्क, आयात कर आणि तटकर अत्यंत प्राचीन कर आहे. देशांच्या सीमा ओलांडताना वस्तूवर लादलेला कर म्हणजे जकाती होय. देशातून आयात होणाऱ्या आणि निर्यात होणाऱ्या वस्तूंवर हा कर आकारला जातो. जकातीमध्ये निर्यात कर, आयात कर, संक्रमण किंवा परगमन कर यांचा समावेश होतो. जकातीच्या प्रकारामध्ये महसुली जकाती, संरक्षणात्मक जकाती, प्रत्याघात जकाती, बहुस्तंभी जकाती, परंपरागत जकाती, स्वायत्त जकाती, विशिष्ट जकाती, मूल्याधारित जकाती, संयुक्त जकाती आणि सरकते जकाती यांचा समावेश होतो. तसेच जकातीचे उद्देश आणि परिणाम सांगितले आहेत.

कोटा हे व्यापक प्रमाणावर वापरले जाणारे संरक्षित व्यापाराच्या धोरणाचे साधन आहे. देशाच्या आयात व निर्यात वस्तूंचे परिमाण प्रत्यक्षपणे मर्यादित करणाऱ्या पध्दतीला कोटा असे म्हणतात. आयात कोटा पध्दतीचा वापर अनेक देशांनी मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येतो. आयात कोटा पध्दतीचे प्रकार जकात कोटा, एकमार्गी आयात कोटा, मिश्र आयात कोटा, द्विमार्गी आयात कोटा, आयात परवाना पध्दती, आयात कोटा व निर्यात कोटा आहेत.

जकाती आणि कोटा पध्दतीच्या परिणामामध्ये किंमत, उपभोग, संरक्षण, पुनर्वाटप, व्यापारशर्ती, व्यवहारतोल, रोजगार आणि महसूल परिणाम आहेत.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**१) मुक्त व्यापार :** देशी व विदेशी वस्तूंमध्ये कोणताही भेदभाव न करणारे आणि म्हणून विदेशी वस्तूंवर अतिरिक्त भार न टाकणारे किंवा देशी वस्तूंना विशेष झुकते माप न देणारे व्यापार धोरण म्हणजे मुक्त व्यापार होय.

**२) संरक्षित व्यापार धोरण :** परकीय देशांशी असणाऱ्या व्यापाराचे आयात प्रशुल्क, आयात कोटा इत्यादी पध्दतीद्वारे नियंत्रण वा नियमन करुन देशांतील व्यावसायिकांच्या व कामगारांच्या हिताचे संरक्षण करणाऱ्या धोरणाला संरक्षित व्यापार धोरण असे म्हणतात.

**३) जकाती :** एक देश विदेशातून येणाऱ्या आयातीवर ज्या दराने कर लावतो त्याला जकाती, प्रशुल्क किंवा सीमाशुल्क असे म्हणतात.

**४) निर्यातर कर :** आपल्या देशात उत्पादित होणाऱ्या पण विक्रीसाठी इतर देशांना निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर आकारला जाणारा कर म्हणजे निर्यात कर होय.

**५) आयात कर :** विदेशात उत्पादित होणाऱ्या पण विक्रीसाठी आपल्या देशांत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर आकारला जाणारा कर म्हणजे आयात कर होय.

**६) संक्रमण कर :** विदेशात उत्पादित होणाऱ्या पण विक्रीसाठी आपल्या देशातून दुसऱ्या देशात संक्रमण करणाऱ्या वस्तूंवर आकारला जाणारा कर म्हणजे संक्रमण कर होय.

**७) कोटा :** आयात कोटा पध्दतीत आयातीचे जे एक निश्चित परिमाण ठरलेलेअसते त्यात वाढ होऊ शकत नाही.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

१) मुक्त व्यापाराचे समर्थन ......................यांनी केले.

अ) ॲडम स्मिथ ब) ॲलेक्झांडर हॅमिल्टन क) फ्रेडरिक लिस्ट ड) वरीलपैकी नाही

२) संरक्षित व्यापार धोरणाचा सर्वप्रथम पाठपुरावा ......... केला.

अ) फ्रेडरिक लिस्ट ब) ॲलेक्झांडर हॅमिल्टन क) डेव्हिड रिकार्डो ड) वरीलपैकी नाही

३) आयात व निर्यातदार देशांमध्ये वाटाघाटीद्वारे निश्चित होणारा कोटा ............होय.

अ) द्विमार्गी आयात कोटा ब) जकात कोटा क) एकमार्गी आयात कोटा ड) आयात कोटा

४) खालीलपैकी ............ ही संरक्षित व्यापाराची साधने आहेत.

अ) जकात ब) कोटा क) आयात कर ड) वरीलपैकी सर्व

५) संरक्षित व्यापार धोरणांच्या साधनांचे ....................प्रकारे वर्गीकरण केले जाते.

अ) जकाती ब) बिगर जकाती क) 'अ' व 'ब' पर्याय ड) वरीलपैकी नाही

६) जकाती आणि कोटा या पध्दतीचा .................. व्यापारधोरणामध्ये वापर केला जातो.

अ) संरक्षित ब) मुक्त क) मिश्र ड) वरीलपैकी नाही

७) ..................... यांनी जकातीचे परिणाम स्पष्ट केले आहेत.

अ) हॅम ब) जे. एस. मिल क) किंडल बर्जर ड) रिकार्डो

८) खुल्या व्यापारामुळे ................. हा फायदा होतो.

अ) उत्पादन घटकांचा योग्य वापर ब) ग्राहकांना लाभ क) उत्पादन तंत्रात सुधारणा ड) वरील सर्व

९) संरक्षण धोरणामुळे देशांना ........................... हा तोटा होतो.

अ) मक्तेदारी संस्थांची स्थापना ब) उद्योगांच्या कार्यक्षमतेत घट

क) देशादेशांतील संबंधात तणाव ड) वरील सर्व

१०) सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी .............व्यापार धोरणाचा पुरस्कार केला.

अ) संरक्षण ब) खुल्या क) बंदिस्त ड) यापैकी नाही

११) जकातीचा हेतू ................. असतो.

अ) देशांतर्गत उद्योगांना संरक्षण देणे ब) सरकारचे उत्पन्न वाढविणे

क) परकीय व्यापारावर निर्बंध घालणे ड) वरील सर्व

१२) OPEC (ओपेक) ही .................. निर्यातक देशाची संघटना आहे.

अ) अन्नधान्य ब) तेल क) डाळ ड) खाद्यतेल

१३) जकातीचे आठ परिणाम ........................ यांनी सांगितले आहेत.

अ) किंडल बर्जर ब) टॉसिंग क) मिल ड) केन्स

१४) देशात संरक्षण धोरणाचा स्वीकार केल्यामुळे देशांतर्गत श्रमविभागीला चालना मिळते असे मत ........... यांनी व्यक्त केले.

अ) हॅमिल्टन ब) लिस्ट क) रिकार्डो ड) स्मिथ

**४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) अ) ॲडम स्मिथ २) ब) अलेक्झांडर हॅमिल्टन

३) अ) हिमार्गी आयात कोटा ४) ड) वरीलपैकी सर्व

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | क) अ आणि ब | ६) | अ) संरक्षित |
| ७) | क) किंडल बर्जर | ८) | ड) वरील सर्व |
| ९) | ड) वरील सर्व | १०) | ब) खुल्या |
| ११) | ड) वरील सर्व | १२) | ब) तेल |
| १३) | अ) किंडल बर्जर | १४) | अ) हॅमिल्टन |

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय :

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न :

१) जकात म्हणजे काय ? सांगून जकातीचे परिणाम स्पष्ट करा.

२) कोटा म्हणजे काय? सांगून कोटा पध्दतीचे परिणाम स्पष्ट करा.

३) मुक्त व्यापार म्हणजे काय? सांगून मुक्त व्यापार धोरणाची अनुकूल आणि प्रतिकूल घटकांची चर्चा करा.

४) संरक्षित व्यापार म्हणजे काय? सांगून संरक्षित व्यापार धोरणांचा अनुकूल आणि प्रतिकूल युक्तीवादाची चर्चा करा.

### ब) टीपा लिहा :

१) जकातीचे वर्गीकरण / प्रकार

२) कोट्याचे प्रकार

३) कोट्याचे परिणाम

४) जकातीचे परिणाम

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१) M. L. Jhingam - 'International Economics' Vrinda Publications (P) Ltd., Delhi.

२) Reeta Mathur - 'International Economics', Sublime Publications, Jaipur.

३) झामरे जी. एन. – आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

४) झामरे जी. एन. – आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

५) कुलकर्णी आणि ढमढेरे – आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६) मोडक श. के., आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर

७) देसाई आणि भालेराव – आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, निराली प्रकाशन, नागपूर

८) वावरे आणि घाटगे – आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद.


***

# घटक – १

# व्यापारतोल आणि व्यवहारतोल

# ( Balance of Trade and Balance of Payments )

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ व्यापारतोल आणि व्यवहारतोल – Balance of Trade and Balance of Payments

१.२.२ व्यवहारतोलाचे महत्त्व – Importance of Balance of Payments

१.२.३ व्यवहारतोलातील असमतोल : कारणे आणि परिणाम –Diseqilibrium in Balance : Causes and Consequences

१.२.४ व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याचे उपाय – Balance to correct disequlibrium in Balance of Payments

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे

१.६ पारिभाषिक शब्द

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## १.० उद्दिष्टे :

सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. व्यापारतोल, व्यापारतोलाचे प्रकार, समतोल व्यापारतोल, असमतोल व्यापारतोल, अनुकूल व्यापारतोल, प्रतिकूल व्यापारतोल, व्यवहारतोल, व्यवहारतोलाचे व्यापारी खाते, व्यवहारातोलाचे चालू खाते, व्यवहारतोलाचे

भांडवली खाते या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

२. व्यवहारतोलाचे महत्त्व अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

३. व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे, व्यवहारतोलातील असमतोलाचे परिणाम याबाबत अधिक माहिती प्राप्त होण्यास मदत होते.

४. व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याचे उपाय स्पष्ट होण्यास मदत होते.

## १.१ प्रास्ताविक :

आधुनिक कालखंडात व्यापार हे आर्थिक व्यवहार व विकासाचे प्रभावी माध्यम मानले जाते. विशिष्ट कालखंडामध्ये व्यक्ती आणि संस्थांनी नफाप्राप्तीच्या हेतूने वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे व्यापार होय. व्यापाराचे अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार असे मुख्य प्रकार केले जातात. देशाच्या सीमेच्याआत, वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे अंतर्गत व्यापार होय. तर एका देशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय. अशा या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासाबाबत अनेक विचार विकसीत झालेले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापारतोल आणि व्यवहारतोल या दोन महत्त्वपूर्ण संकल्पना आहेत. व्यापारतोल हा विशिष्ट कालावधीतील एखाद्या देशाच्या दृश्य वस्तुंच्या निर्यातीचे आर्थिक मूल्य आणि दृश्य वस्तुंच्या आयातीचे आर्थिक मूल्य यांच्यामधील फरक दर्शवितो. तर देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील सर्व देशांच्या बरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमाखर्चास व्यवहारतोल असे म्हणतात. यालाच देवघेवीचातोल असे देखील म्हणतात. सदर प्रकरणामध्ये व्यापारतोल आणि व्यवहारतोल या संकल्पनाचा अर्थ, व्यवहारतोलाचे महत्त्व, व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे तसेच परिणाम, व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याचे उपाय यांचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ व्यापारतोल आणि व्यवहारतोल (Balance of Trade and Balance Payments) :

**व्यापारतोल (Balance of Trade) :** एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांच्या बरोबर केलेल्या फक्त दृश्य वस्तुंच्या देवाण-घेवाणीच्या जमाखर्चास व्यापारतोल असे म्हणतात. यालाच व्यापारशेष असेही म्हणतात. व्यापारतोल हा विशिष्ट कालावधीतील एखाद्या देशाच्या दृश्य वस्तुंच्या निर्यातीचे आर्थिक मूल्य आणि दृश्य वस्तुंच्या आयातीचे आर्थिक मूल्य यांच्यामधील फरक दर्शवितो. व्यापारतोल हा विशिष्ट कालावधीतील निर्यातीचा आणि आयातीचा प्रवाह मोजतो.

जर एखाद्या देशाला आपल्या दृश्य वस्तुंच्या आयातीपेक्षा अधिक मूल्य दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून

प्राप्त झाले तर त्या देशाकडे व्यापारातील अतिरिक्त व्यापार शिल्लक असेल आणि त्याउलट, जर एखाद्या देशाला आपल्या दृश्य वस्तुंच्या निर्यातीपेक्षा जास्त मूल्य दृश्य वस्तुंच्या आयातीवर खर्च करावे लागले तर त्याला व्यापार तूट असे म्हणतात.

भारत एका आर्थिक वर्षामध्ये जगातील अन्य देशांबरोबर अन्नधान्य, यंत्रसामग्री यासारख्या दृश्य वस्तुंची निर्यात करतो. त्यापासून प्राप्त होणारी रक्कम भारताच्या व्यापारतोलाच्या येणे बाजूला, तर ज्या दृश्य वस्तुंची आयात करतो त्याची द्यावी लागणारी रक्कम भारताच्या व्यापारतोलाच्या देणे बाजूला दाखविली जाते व त्याच्या एकत्रित जमा-खर्चास भारताचा व्यापारतोल असे म्हटले जाते.

**कोष्टक क्रमांक १.१**

**व्यापारतोल पत्रक**

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| **घटक** | **रक्कम** | **घटक** | **रक्कम** |
| अ. सर्व दृश्य वस्तुंच्या<br>१. शेतीमधील दृश्य वस्तू<br>२. उद्योगातील दृश्य वस्तू<br>यांच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम<br>दृश्य वस्तुंची एकूण निर्यात | | अ. सर्व दृश्य वस्तुंच्या<br>१. शेतीमधील दृश्य वस्तू<br>२. उद्योगातील दृश्य वस्तू<br>यांच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम<br>दृश्य वस्तुंची एकूण आयात | |

वरील पत्रक विशिष्ट कालखंडात एखाद्या देशाने शेतीमधील दृश्य वस्तू तसेच उद्योगमधील दृश्य वस्तू याच्या निर्यातीपासून मिळणारी रक्कम आणि यांच्या आयातीसाठी द्यावी लागणारी रक्कम यांचा जमा खर्च दर्शविते.

**व्यापारतोलाचे प्रकार :** व्यापारतोलाची जमा बाजू आणि खर्च बाजू विचारात घेता त्याचे समतोल व्यापारतोल आणि असमतोल व्यापारतोल असे दोन प्रकार पडतात.

### १. समतोल व्यापारतोल (Balanced Balance of Trade ) :

एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा आयातीवरील खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेबरोबर (समान) असते तेव्हा त्यास समतोल व्यापारतोल असे म्हणतात.

**कोष्टक क्रमांक १.२**

**समतोल व्यापारतोल**

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| घटक | रक्कम (को.रू.) | घटक | रक्कम (को.रू.) |
| दृश्य वस्तूंची एकूण निर्यात | ५०००/- | दृश्य वस्तूंची एकूण आयात | ५०००/- |

समजा एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम ५००० कोटी रूपये असेल व आयातीवर खर्च करावी लागणारी रक्कम सुद्धा ५००० कोटी रूपये असेल तर त्यास समतोल व्यापरतोल असे म्हणतात.

**२. असमतोल व्यापारतोल (Unbalanced Balance of Trade ) :**

एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा दृश्य वस्तुंच्या आयातीवर खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेबरोबर नसते तेव्हा त्यास असमतोल व्यापारतोल असे म्हणतात.

**अ) अनुकूल व्यापारतोल :**

एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा दृश्य वस्तुंच्या आयातीवर खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेपेक्षा जास्त असते तेव्हा त्यास अनुकूल व्यापारतोल असे म्हणतात.

**कोष्टक क्रमांक १.३**

**अनुकूल व्यापारतोल**

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| घटक | रक्कम (को.रू.) | घटक | रक्कम (को.रू.) |
| दृश्य वस्तूंची एकूण निर्यात | ५०००/- | दृश्य वस्तूंची एकूण आयात | ४०००/- |

समजा एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम ५००० कोटी रूपये असेल व दृश्य वस्तुंच्या आयातीवरील खर्च करावी लागणारी रक्कम ४००० कोटी रूपये असेल तर त्यास अनुकूल व्यापारतोल असे म्हणतात. म्हणजेच त्या देशाचा व्यापारतोल हा १००० कोटी रूपयांनी अनुकूल आहे असे स्पष्ट होते.

### भारताचा अनुकूल व्यापारतोल :

एका वर्षाची एकूण निर्यात एकूण आयातीपेक्षा अधिक असेल तर व्यापारतोल अनुकूल आहे असे म्हणतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९७२-७३ आणि सन १९७६-७७ ही दोन वर्षे अपवाद सोडता भारताचा व्यापारतोल हा नेहमीच तुटीचा राहिलेला आहे.

**कोष्टक क्रमांक १.४**

**भारताच्या व्यापारातील अनुकूल असणारी दोन वर्षे**

| वर्ष | अनुकूल व्यापारतोल रूपयांमध्ये | अनुकूल व्यापारतोल डालरमध्ये |
|---|---|---|
| १९७२-७३ | १०४ कोटी | ०.१३४ |
| १९७६-७७ | ६८ कोटी | ०.०७७ दशलक्ष |

१९६६ मधील रूपयाचे झालेले अवमूल्यन व हरितक्रांती या कारणांनी भारताची अन्नधान्य व अन्य दृश्य वस्तुंची आयातकमी व निर्यात अधिक झाल्याने व्यापारतोल अनुकूल बनला. सन १९७२-७३ मध्ये भारताचा व्यापारतोल १०४ कोटी रूपयांनी शिलकीचा होता तर सन १९७६-७७ मध्ये तो ६८ कोटी रूपयांनी शिलकीचा राहीला होता.

### आ) प्रतिकूल व्यापारतोल :

एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा दृश्य वस्तुंच्या आयातीवरील खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेपेक्षा कमी असते तेव्हा त्यास प्रतिकूल व्यापारतोल असे म्हणतात.

**कोष्टक क्रमांक १.५**

**प्रतिकूल व्यापारतोल**

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| घटक | रक्कम (को.रू.) | घटक | रक्कम (को.रू.) |
| दृश्य वस्तूंची एकूण निर्यात | ३०००/- | दृश्य वस्तूंची एकूण आयात | ४०००/- |

समजा एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम ३००० कोटी रूपये असेल व दृश्य वस्तुंच्या आयातीवर खर्च करावी लागणारी रक्कम ५००० कोटी रूपये असेल तर त्यास प्रतिकूल व्यापारतोल असे म्हणतात. म्हणजेच त्या देशाचा व्यापारतोल हा २००० कोटी रूपयांनी प्रतिकूल राहतो.

**व्यवहारतोल (Balance of Payment) :**

एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील सर्व देशांच्या बरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमा खर्चास व्यवहारतोल असे म्हणतात. यालाच देवघेवीचा तोल असे देखील म्हणतात. म्हणजे भारत एका आर्थिक वर्षामध्ये जगातील अन्य देशांबरोबर अन्नधान्य, यंत्रसामग्री, विविध स्वरूपाच्या सेवा, परकिय गुंतवणूक, कर्ज या स्वरूपात जे काही आर्थिक व्यवहार करतो त्या सर्वांचा जमा-खर्च म्हणजेच भारताचा व्यवहारतोल होय.

**कोष्टक क्रमांक १.६**

**व्यवहारतोलपत्रक**

| **जमा बाजू**<br>**घटक** | **रक्कम** | **खर्च बाजू**<br>**घटक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| **चालू खाते** | | | |
| १. वस्तूंची निर्यात (दृश्य)<br>२. सेवांची निर्यात (अदृश्य)<br>३. हस्तांतर देयता (अदृश्य)<br>यांच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम | | १. वस्तूंची आयात (दृश्य)<br>२. सेवांची आयात (अदृश्य)<br>३. हस्तांतर देयता (अदृश्य)<br>यांच्या आयातीसाठी खर्च करावी लागणारी रक्कम | |
| **भांडवली खाते** | | | |
| १. अन्य देशांकडून घेतलेले कर्ज<br>२. अन्य देशांनी आपल्या देशात केलेली प्रत्यक्ष गुंतवणूक | | १. अन्य देशात दिलेले कर्ज<br>२. अन्य देशात केलेली प्रत्यक्ष गुंतवणूक | |
| एकूण जमा रक्कम | | एकूण खर्च रक्कम | |

**व्यवहारतोलाचे व्यापारी खाते :**

व्यवहारतोलाच्या ज्या भागामध्ये देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्याबरोबर केलेल्या फक्त दृश्य वस्तुंची देवाण-घेवाण दर्शविली जाते, त्यास व्यवहारतोलाचे व्यापारी खाते असे म्हणतात. जेव्हा विशिष्ट कालखंडात एखाद्या देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्याबरोबर केलेल्या फक्त दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणाऱ्या मुल्यापेक्षा, दृश्य वस्तुंच्या आयातीसाठी खर्च करावे लागणारे मूल्य जास्त असते. तेव्हा त्यास व्यवहारतोलाच्या व्यापारी खात्यामधील तूट आहे असे म्हणतात. त्यालाच व्यापारतोलातील तूट असे म्हणतात.

**व्यवहारतोलाचे चालू खाते :**

व्यवहारतोलाच्या ज्या भागामध्ये देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्याबरोबर दृश्य वस्तू व अदृश्य सेवांच्या स्वरूपात केलेली देवाण-घेवाण दर्शविली जाते, त्यास व्यवहारातोलाचे चालू खाते असे म्हणतात.

जेव्हा विशिष्ट कालखंडामध्ये एखाद्या देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्या बरोबर केलेल्या दृश्य वस्तुंच्या व अदृश्य सेवांच्या निर्यातीपासून प्राप्त होणाऱ्या मुल्यापेक्षा दृश्य वस्तुंच्या व अदृश्य सेवांच्या आयातीसाठी खर्च करावे लागणारे मूल्य जास्त असते तेव्हा त्यास व्यवहार तोलाच्या चालू खात्यामधील तूट असे म्हणतात. तर जेव्हा विशिष्ट कालखंडामध्ये एखाद्या देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्या बरोबर केलेल्या दृश्य वस्तुंच्या व अदृश्य सेवांच्या निर्यातीपासून प्राप्त होणाऱ्या मुल्यापेक्षा दृश्य वस्तुंच्या व अदृश्य सेवांच्या आयातीसाठी खर्च करावे लागणारे मूल्य कमी असते तेव्हा त्यास व्यवहारतोलाच्या चालू खात्यामध्ये शिल्लक आहे असे म्हणतात.

**व्यवहारतोलाचे भांडवली खाते :**

व्यवहारतोलाच्या ज्या भागामध्ये देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्याबरोबर परकिय गुंतवणूक, कर्ज व अन्य भांडवलीरकमाच्या स्वरूपामध्ये केलेली देवाण-घेवाण दर्शविली जाते त्यास व्यवहारतोलाचे भांडवली खाते असे म्हणतात.

जेव्हा विशिष्ट कालखंडामध्ये एखाद्या देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्याबरोबर केलेल्या परकीय गुंतवणूक, कर्जे, बँकिंग व अन्य भांडवल या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या मुल्यापेक्षा खर्च करावे लागणारे मूल्य जास्त असते, तेव्हा त्यास व्यवहारतोलाच्या भांडवली खात्यामधील तूट असे म्हणतात. तर जेव्हा विशिष्ट कालखंडामध्ये एखाद्या देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्याबरोबर केलेल्या परकिय गुंतवणूक, कर्जे, बँकिंग व अन्य भांडवल या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या मुल्यापेक्षा खर्च करावे लागणारे मूल्य कमी असते, तेव्हा त्यास व्यवहारतोलाच्या भांडवली खात्यामध्ये शिल्लक आहे असे म्हणतात.

**व्यवहारतोल हा नेहमीच समतोल असतो (Balance of Payments is always Balanced) :**

एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशाच्याबरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमाखर्चास त्या देशाचा व्यवहारतोल किंवा व्यवहारशेष असे म्हणतात. व्यवहारतोलावरून त्या देशाच्या

आंतरराष्ट्रीय व्यवहारांची स्थिती स्पष्ट होण्यास मदत होते. अशा या व्यवहारतोलाबाबत एक महत्वाची बाब म्हणजे प्रत्येक देशाचा व्यवहारतोल हा नेहमीच समतोलामध्ये ठेवला जातो. जेव्हा व्यवहारतोलाच्या चालू खात्यामध्ये तूट असते, तेव्हा अशा राष्ट्रांना आपल्या भांडवली खात्यावरील येणी (परकीय गुंतवणूकीमध्ये वाढ करून, अन्य देशांकडून अधिक कर्ज घेऊन किंवा अन्य भांडवली प्राप्ती वाढवून) वाढवावी लागतात व व्यवहारतोल समतोलामध्ये ठेवावा लागतो.

जेव्हा व्यवहारतोलाच्या चालू खात्यामध्ये आधिक्य असते, तेव्हा अशा राष्ट्रांना आपल्या भांडवली खात्यावरील येणे बाजू कमी व देणे बाजू जास्त ठेवावी लागते व त्यासाठी अशी राष्ट्रे अन्य राष्ट्रांना अधिक कर्ज देणे, दुसऱ्या राष्ट्रांमध्ये अधिक गुंतवणूक करणे यासारख्या मार्गाचा अवलंब करतात. म्हणजे प्रत्येक राष्ट्र आपल्या देशाच्या व्यवहारतोलाची स्थिती विचारामध्ये घेऊन त्याला अनुसरून भांडवली खात्यामध्ये बदल करतात व आपला व्यवहारतोल नेहमीच समतोलामध्ये ठेवण्याचा प्रयत्न करतात.

### १.२.२ व्यवहारतोलाचे महत्त्व :

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापारतोल आणि व्यवहारतोल या दोन महत्त्वपूर्ण संकल्पना मानल्या जातात. व्यापारतोल हा विशिष्ट कालावधीतील एखाद्या देशाच्या दृश्य वस्तुंच्या निर्यातीचे आर्थिक मूल्य आणि दृश्य वस्तुंच्या आयातीचे आर्थिक मूल्य यांच्यामधील फरक दर्शवितो. व्यापारतोल हा विशिष्ट कालावधीतील निर्यातीचा आणि आयातीचा प्रवाह मोजतो. तर एका आर्थिक वर्षामध्ये एखादा देश जगातील अन्य देशांबरोबर अन्नधान्य, यंत्रसामग्री, विविध स्वरूपाच्या सेवा, परकिय गुंतवणूक, कर्ज या स्वरूपात जे काही आर्थिक व्यवहार करतो त्या सर्वाचा जमा-खर्च म्हणजे व्यवहारतोल होय. एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील सर्व देशांच्या बरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमाखर्चास व्यवहारतोल असे म्हणतात. व्यापारतोलाच्या तुलनेत व्यवहारतोल ही संकल्पना अधिक व्यापक असल्याचे दिसून येते. व्यवहारतोल ही संकल्पना कोणत्याही देशाच्या दृष्टीने का महत्त्वाची असते हे पुढील मुद्यांवरून अधिक स्पष्ट होते.

**१) एक आवश्यक कागदपत्र आहे :** व्यवहारतोल हे कोणत्याही देशातील सरकारचे एक अत्यावश्यक कागदपत्र किंवा व्यवहार असल्याने त्या देशाने जगातील अन्य देशांबरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहाराच्या जमा खर्चाची कल्पना येण्यास तसेच पद्धतशीर मांडणी केलेली असते त्यावरून त्या देशाची आर्थिक स्थिती स्पष्ट होण्यास मदत होत असते म्हणून व्यवहारतोल महत्त्वाचा ठरतो.

**२) सर्व वस्तू आणि सेवांच्या आयात निर्यातीचे व्यवहार तपासते :** व्यवहारतोलाच्या माध्यमातून एखाद्या देशाने जगातील सर्व देशांबरोबर विशिष्ट कालखंडात केलेल्या वस्तू व सेवांच्या आयात निर्यातीचा जमाखर्च दिलेला असतो. त्याच्या आधारे सर्व वस्तू आणि सेवांच्या आयात आणि निर्यातीचे व्यवहार तपासणे सहज शक्य होत असल्याने व्यवहारतोल अत्यंत उपयुक्त ठरतो.

**३) निर्यात वाढीच्या संभाव्यता स्पष्ट करण्यास उपयुक्त :** एखाद्या देशाच्या व्यवहारतोलावरून त्या देशाच्या अन्य देशांबरोबरील आयात निर्यातीचे आकडे अगदी सहज उपलब्ध होत असतात. त्या आकडेवारीच्या

आधारे सरकारला विशिष्ट उद्योगाच्या निर्यात वाढीच्या संभाव्यतेचे विश्लेषण करणे सहज शक्य होते तसेच ती आकडेवारी निर्यात वाढीच्या संभाव्यता स्पष्ट करण्यास उपयुक्त ठरत असते.

**४) आयात आणि निर्यातीच्या शुल्काबाबत व्यापक दृष्टीकोन देते :** एखाद्या देशाच्या व्यवहारतोलावरून त्या देशाची अन्य देशांबरोबरील आयात निर्यातीचे आकडेवारी समजते तसेच किंमतीमधील बदलाचा परिणाम म्हणून आयात-निर्यातीमध्ये किती बदल होतो याचा ही अंदाज घेता येतो. त्याच्या आधारे कोणत्या वस्तू व सेवाच्या आयात निर्यातीवर शुल्क आकारावे आणि कोणत्या वस्तू व सेवांच्या आयात निर्यातीवर शुल्क आकारू नये याबाबत व्यापक दृष्टीकोन देते. तसेच या आकडेवारीच्या आधारे आयात रोखण्यासाठी आणि निर्यातीला प्रोत्साहित करण्यासाठी सरकार कर वाढवणे किंवा कमी करण्याचे उपाय योजण्याचे कार्य अगदी सहज करू शकते.

**५) भविष्यातील वाढीचा शोध घेण्यासाठी उपयुक्त :** एखाद्या अर्थव्यवस्थेच्या सद्यस्थितीमधील व्यवहारतोलामधील आयात-निर्यातीच्या आधारे भविष्यकालखंडात वस्तू व सेवांची आयात-निर्यात किती वाढू शकते किंवा कमी होऊ शकते तसेच कोणत्या वस्तू व सेवांची आयात निर्यात अधिक वाढू शकेल आणि कोणत्या वस्तू व सेवांची आयात निर्यात कमी होईल याचा अंदाज घेता येतो.

**६) अर्थव्यवस्थेची स्थिती शोधण्यासाठी उपयुक्त :** कोणत्याही देशाचा व्यवहारतोल त्यादेशाची आर्थिक स्थिती स्पष्ट करण्याचे कार्य करतो. त्या आधारे त्या देशासाठी कोणती पूरक व पोषक धोरणे राबविता येतील याचा अंदाज बांधून योग्य त्या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व्यवहारतोलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

**७) देशाच्या चलन मुल्यात वाढ होते की घट हे समजते :** आर्थिक वर्षामध्ये एखादा देश जगातील अन्य देशांबरोबर अन्नधान्य, यंत्रसामग्री, विविध स्वरूपाच्या सेवा, परकिय गुंतवणूक, कर्ज या स्वरूपात जे काही आर्थिक व्यवहार करतो त्या सर्वाचा जमा-खर्च म्हणजे व्यवहारतोल होय. या व्यवहारतोलातील आयात निर्यातीच्या आधारे त्या देशाच्या चलनाच्या मुल्यात वाढ होते आहे की घट होत आहे याची कल्पना येण्यास उपयुक्त ठरते.

**८) सरकारला वित्तीय आणि व्यापार धोरणांवर निर्णय घेण्यास उपयुक्त :** व्यवहारतोल हे कोणत्याही देशातील सरकारचे एक अत्यावश्यक कागदपत्र असते त्यावरून त्या देशाची आर्थिक स्थिती स्पष्ट होण्यास मदत होत असल्याने त्या आर्थिक स्थितीच्या आधारे सरकारला वित्त विषयक तसेच व्यापार विषयक धोरणांवर विविध स्वरूपाचे निर्णय घेण्यास व्यवहारतोल उपयुक्त ठरतो.

**९) आर्थिक व्यवहार समजून घेण्यासाठी उपयुक्त :** व्यवहारतोल हा विशिष्ट कालखंडात एखादा देश करीत असलेल्या सर्व वस्तू व सेवांची आयात निर्यात स्पष्ट करत असतो. त्या आकडेवारीच्या आधारे इतर देशांबरोबरच त्या देशाच्या व्यवहारांचे विश्लेषण करणे सहज शक्य होते. तसेच त्या देशाचे सर्व आर्थिक व्यवहार समजून घेण्यास उपयुक्त ठरते.

**१०) अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर किंवा हानिकारक प्रवृत्तीचा शोध घेण्यास उपयुक्त :** व्यवहारतोलाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या आकडेवारीच्या आधारे अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर असणाऱ्या बाबी कोणत्या आहेत तसेच हानिकारक प्रवृत्ती कोणत्या आहेत याचा शोध घेणे सहज शक्य असल्याने त्या आधारे विविध धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी व्यवहारतोल उपयुक्त ठरतो.

**११) निर्यात क्षमता असलेले क्षेत्र ओळखण्यास मदत :** व्यवहारतोलातील माहितीच्या आधारे एखाद्या देशाची निर्यात क्षमता असलेली क्षेत्रे कोणती आहेत याची कल्पना येण्यास मदत होते व त्या आधारे विशिष्ट वस्तुची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरणे राबविणे सहज शक्य होते.

**१२) सरंक्षणात्मक उपाय योजण्यासाठी उपयुक्त :** अनावश्यक वस्तुंच्या आयातीला निरूत्साहित करण्यासाठी आणि देशांतर्गत उद्योगांना स्वयंपूर्ण होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सरकार काही संरक्षणात्मक उपायांचा अवलंब करू शकते जसे आयात जास्त कर आकारणे, आयात बंदी इ.

**१३) अवमुल्यनासारख्या उपाय योजनांचा अवलंब :** देशाच्या व्यवहारतोलाच्या आधारे निर्यातीची क्षमता अधिक वाढावी यासाठी अवमुल्यनासारख्या उपाय योजनांचा अवलंब केल्यास आंतरराष्ट्रीय बाजारात वस्तू व सेवा स्वस्त दरात उपलब्ध होऊ लागल्याने देशाची निर्यात वाढून व्यापारतोल आणि व्यवहारतोल यामधील असमतोल कमी होण्यास मदत होते.

**१४) महागाई नियंत्रण ठेवण्यासाठी उपयुक्त :** कोणतीही अर्थव्यवस्थेची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी तसेच महागाईची अवस्था जाणून घेण्यासाठी व्यवहारतोल महत्त्वाचा ठरत असतो. त्याच्या आधारे महागाई नियंत्रणासाठी विविध आर्थिक तसेच वित्तीय धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या हेतून व्यवहारतोल महत्त्वाचा ठरतो.

### १.२.३ व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे आणि परिणाम :

#### अ) व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे :

एकादेशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पुर्ततेच्या हेतुने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासाबाबत अनेक विचार विकसित झालेले आहेत. त्यामध्ये व्यवहारतोल ही एक महत्त्वपूर्ण संकल्पना मानली जाते. हवामानातील बदलाचे शेती उत्पादनावर होणारे विपरीत परिणाम यासारख्या कारणांनी देशातील शेतमालाच्या किमती, उत्पादन, पुरवठा यावर देखील विपरीत परिणाम झाल्याने शेती उत्पादनाची आयात वाढवावी लागते व त्यामधुन त्या देशाच्या व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होत असतो. ग्राहकांच्या अभिरूचीमध्ये बदल झाल्याने देशाची निर्यात कमी होऊन आयात वाढते त्यामधुन दीर्घकालीन असमतोल निर्माण होतो. उद्योगातील उत्पादनांच्या पद्धतीमधील तांत्रिक बदल घडून आल्यास वस्तू व सेवांच्या

किंमती तसेच गुणवत्तेत बदल घडवून आणतात व त्याचा ही व्यवहारतोलावर विपरीत परिणाम होत असतो. जेव्हा देशात मंदी सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असते, तेव्हा अन्य देश अशा देशातून होणाऱ्या आयातीवर अनेक बंधने लादत असल्याने त्या देशाची निर्यात मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होतो. व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण करणारी कारणे पुढीलप्रमाणे अधिक स्पष्ट करता येतील.

**१) अल्पकालीन बदल :** अर्थव्यवस्थेतील हंगामी स्वरूपाचे चढउतार, नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदलाचे शेती उत्पादनावर होणारे विपरीत परिणाम झाल्याने शेती उत्पादनाची आयात वाढवावी लागते व त्यामधुन त्या देशाच्या व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होत असतो. म्हणजेच अर्थव्यवस्थेतील अल्पकालीन बदल हे एक व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण करणारे कारण मानले जाते.

**२) दीर्घकालीन चढ उतार :** कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये दीर्घ कालखंडात जे बदल घडून येतात त्यालाच दीर्घकालीन बदल किंवा मुलभूत बदल असे म्हणतात. देशात किंवा परदेशात ग्राहकांच्या अभिरूचीमध्ये बदल झाल्याने देशाची निर्यात कमी होऊन आयात वाढते त्यामधुन दीर्घकालीन असमतोल निर्माण होतो. परदेशी वस्तू व सेवांची मागणी सातत्याने वाढल्याने आयात वाढून असमतोल निर्माण होतो. भांडवली वस्तू, कच्चा माल, अत्यावश्यक ग्राहक वस्तू, तंत्रज्ञान यांची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागल्याने, अल्पविकसित देशाची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मक शक्ती कमी राहिल्याने दीर्घ कालखंडात आयात अधिक व निर्यात कमी होते व त्यामधून व्यवहारतोलामध्ये दीर्घकालीन असमतोल निर्माण होत असतो असे मत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केले आहे.

**३) रचनात्मक बदल :** एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये संरचनात्मक बदल घडून आल्याने देखील देशाच्या व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होत असतो. उद्योगातील उत्पादनांच्या पद्धतीमध्ये तांत्रिक बदल घडून आल्यास वस्तू व सेवांच्या किंमती तसेच गुणवत्तेत बदल घडूवन आणतात त्याचा ही व्यवहारतोलावर विपरीत परिणाम होत असतो. संरचात्मक बदलाचा भाग म्हणून वस्तू व सेवांच्या आयातीवर बंदी घातल्यामुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो.

**४) चक्रीय बदल :** व्यावसायिक क्षेत्रामधील चक्रीय चढ-उतारदेखील व्यवहारतोलातील असमतोलाला कारणीभूत ठरतात. जेव्हा एखाद्या देशात मंदी सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असते, तेव्हा अन्य देश अशा देशातून होणाऱ्या आयातीवर अनेक बंधने लादत असल्याने त्या देशाची निर्यात मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होतो.

**५) विनिमयदरातील बदल :** एखाद्या देशाने आपल्या देशाच्या चलनाच्या अवमुल्यनाने देखील व्यवहारतोलाच्या असमतोलावर परिणाम होत असतो. दोन देशातील चलनाच्या देवाण-घेवाणीच्या दराला विनिमय दर असे म्हणतात. तर एखादा देश आपल्या देशी चलनाचे मूल्य अन्य देशांच्या चलनाच्या तुलनेत कमी करतो तेव्हा त्यास अवमूल्यन असे म्हणतात. जेव्हा अन्य चलनांच्या संदर्भात देशांच्या चलनाचे मूल्य वाढविले जाते तेव्हा त्यास ऊर्ध्वमूल्यन असे म्हणतात. असे केल्याने परदेशी वस्तू देशात स्वस्त होतात आणि याचा परिणाम

म्हणून देशात नागरिकांकडून जास्त वस्तुंची आयात केली जाते आणि वस्तुंची निर्यात कमी होते. परिणामी त्यामधुन व्यवहारतोलातील असमतोल वाढत जातो.

**६) किंमतीमधील बदल :** देशातील किंमतीमधील बदल हा घटक देखील व्यवहारतोलामधील असमतोलावर परिणाम करतो. एखाद्या देशात किंमत वाढ असेल तर त्या देशातील निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तुंच्या किंमती अधिक राहिल्याने निर्यात कमी होते तर दुसऱ्या बाजूला देशात अधिक आयात केली जाते. म्हणजेच निर्यातीच्या किंमती वाढल्याने निर्यात कमी होऊन आयातीमध्ये वाढ झाल्याने त्यामधून व्यवहारतोलातील असमतोल वाढत जातो.

**७) राष्ट्रीय उत्पन्नातील बदल :** देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात बदल झाल्याने देखील व्यवहारतोलातील असमतोलामध्ये वाढ होऊ शकते. जर एखाद्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ झाल्यास त्या देशातील वस्तू व सेवांची मागणी वाढते व आयात देखील वाढते त्याचा परिणाम म्हणून व्यवहारतोलातील असमतोलामध्ये वाढ होते.

**८) आर्थिक विकास :** देशाच्या व्यवहारतोलामधील असमतोल हा त्या देशाच्या आर्थिक विकासावर देखील अवलंबून असतो. एखादा अल्पविकसीत देश विकास साध्य करण्याचा प्रयत्न करत असेल तर तो मोठ्या प्रमाणात कच्चा माल, यंत्रसामग्री, भांडवली उपकरणे, तंत्रज्ञान आयात करतो. त्यामधुन त्याच्या व्यवहारतोलामध्ये मोठ्या प्रमाणात तूट निर्माण होत असते.

**९) भांडवलाची गतिशीलता :** एखाद्या देशातून होणाऱ्या कर्ज किंवा भांडवलाच्या हालचाली हा घटक देखील व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण करू शकतो. जर एखाद्या देशाने अन्य देशाने मोठ्या प्रमाणात कर्ज किंवा अनुदान दिले असेल तर त्या देशाच्या भांडवलाच्या खात्यात तूट निर्माण होत असते. तसेच विकसनशील देशांनी अन्य देशांकडून आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले असल्यास त्या देशाचा व्यवहारतोल अनुकूल बनतो. म्हणजेच भांडवलाची हालचाल हा घटक देखील व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण करत असतो.

**१०) राजकीय अस्थिरता :** विशिष्ट कालखंडात एखाद्या देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यास परदेशी गुंतवणूकदारांमध्ये त्या देशात गुंतवणूक करण्याबाबत अनिश्चितता निर्माण होते. त्यामुळे अशा देशांमध्ये विदेशी भांडवलाची गुंतवणूक कमी, अन्य देश त्या देशाला कर्ज देणे नाकारतात. त्या देशातून होणाऱ्या आयातीवर अनेक बंधने लादल्याने त्या देशाच्या व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होतो व तो वाढीस लागतो.

**११) आर्थिक नियोजन :** भारतासारखी विकसनशील राष्ट्रे आपला विकास गतिमान करण्यासाठी आर्थिक नियोजनसारख्या साधनाचा वापर करतात. अनेक योजनांची अंमलबजावणी करताना विकासासाठी आवश्यक भांडवल, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आयात मोठ्या प्रमाणात करतात, त्यामधुन अशा देशाची आयात अधिक आणि निर्यात कमी झाल्याने व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होतो.

देशाच्या व्यवहारतोलामधील असमतोल हा त्या देशाच्या आर्थिक विकासावर अवलंबून असतो. जर एखाद्या देशाने अन्य देशाला मोठ्या प्रमाणात कर्ज किंवा अनुदान दिले असेल तर त्या देशाच्या भांडवलाच्या खात्यात तूट निर्माण होत असते. विशिष्ट कालखंडात एखाद्या देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यास परदेशी गुंतवणूकदारांमध्ये त्या देशात गुंतवणूक करण्याबाबत अनिश्चितता निर्माण होऊन त्या देशाच्या व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होतो व तो वाढीस लागतो. अनेक योजनांची अंमलबजावणी करताना विकासासाठी आवश्यक, भांडवल, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आयात मोठ्या प्रमाणात करतात. त्यामधुन अशा देशाची आयात अधिक आणि निर्यात कमी झाल्याने व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होतो.

**आ) व्यवहारतोलातील असमतोलाचे परिणाम :**

जेव्हा एखादा देश आर्थिक विकासासाठी, वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी जास्त वस्तूंची आयात करतो आणि वस्तूंची निर्यात वाढ करणे शक्य नसेल तर त्यामधून व्यवहारतोलातील असमतोल वाढत जातो. एखाद्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ झाल्यास त्या देशातील वस्तू आणि सेवांची मागणी वाढते व आयात देखील वाढते त्याचा परिणाम म्हणून व्यवहारतोलातील असमतोलमध्ये वाढ होते. अल्पकालीन बदल, दीर्घकालीन चढ-उतार, रचनात्मक बदल, चक्रीय बदल, विनिमयदरातील बदल, किंमतीमधील बदल, राष्ट्रीय उत्पन्नातील बदल, आर्थिक विकास, भांडवलाची गतिशीलता, राजकीय अस्थिरता, व्यापारावरील बंधने, आर्थिक नियोजन यासारख्या विविध कारणांनी व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होत असतो. अशा स्वरूपाच्या असमतोल अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण झाल्यास त्याचे अर्थव्यवस्थेवर पुढील परिणाम होतात.

१. जेव्हा एखाद्या देशाच्या व्यवहारतोलात असमतोल वाढत जातो त्यावेळी देशातील सरकार निर्यात प्रोत्साहनासारख्या मार्गांचा अवलंब करते परिणामी देशाची निर्यात वाढत जाते.

२. निर्यात वाढ झाल्याने देशांतर्गत बाजारात वस्तू आणि सेवांची टंचाई निर्माण होण्याचा धोका उद्‌भवतो.

३. देशांतर्गत बाजारात वस्तू आणि सेवांची टंचाई निर्माण झाल्याने त्या देशात किंमतवाढ घडून येते.

४. देशाचा व्यवहारतोलात सातत्याने दीर्घकालीन तूट निर्माण झाली असेल तर अशा देशामध्ये गुंतवणूक करण्यास जगातील अन्य देश तयार होत नसल्याने विदेशी गुंतवणूक घटते त्यामधून भांडवलाचा तुटवडा निर्माण होतो.

५. व्यवहारतोलात सातत्याने दीर्घकालीन तूट निर्माण झाल्यास अशा देशासमोर आर्थिक संकट निर्माण होण्याचा धोका निर्माण होतो याच कारणाने भारतात सन १९९०-९१ आर्थिक संकट निर्माण झालेले होते.

६. व्यवहारतोलात सातत्याने वाढत जाणारी तूट भरून काढण्यासाठी अन्य देश आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था याच्याकडून कर्ज घ्यावे लागल्याने कर्जाचा व व्याजाचा भार वाढत जातो.

७. निर्यात वाढीसाठी अशा देशाला अवमुल्यनाच्या मार्गाचा स्वीकार करावा लागतो.

८. काही प्रसंगी विदेशी देणी देण्यासाठी सोन्याची देखील निर्यात करावी लागते त्यामधून देशातील सुवर्ण साठा कमी होतो.

९. देशी चलनाचे मूल्य म्हणजेच विनिमयदरात मोठ्या प्रमाणात घसरण होते.

१०. देशातील उद्योगांच्या विकासावर विपरीत परिणाम होतो.

११. आर्थिक विकास रोखला जाण्याची शक्यता निर्माण होते.

१२. लघु व कुटीर उद्योग संकटात सापडल्याने देशात बेरोजगारी तसेच दारिद्रय वाढते व लोकांचा राहणीमानाचा दर्जा घसरतो.

अशा स्वरूपाचे विविध परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होऊ शकतात त्यासाठी देशातील सरकारने योग्य त्या उपाय योजनाची अंमलबजावणी करून असमतोल कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### १.२.४ व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याचे उपाय :

जगातील प्रत्येक देश आपला व्यवहारतोल समतोल ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला जगातील अन्य सर्व देशांशी केलेल्या आर्थिक व्यवहारापासून प्राप्त होणारी रक्कम आणि सर्व देशांना द्यावी लागलेली रक्कम समान असते, तेव्हा त्यास समतोल व्यवहारतोल असे म्हणतात. समजा एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला जगातील अन्य सर्व देशांशी केलेल्या आर्थिक व्यवहारांपासून प्राप्त होणारी रक्कम १५००० कोटी रूपये असेल आणि सर्व देशांना द्यावी लागलेली रक्कम ही सुद्धा १५००० कोटी रूपये असते, तेव्हा त्यास समतोल व्यवहारतोल असे म्हणतात. असे असले तरी एखाद्या देशातील अल्पकालीन बदल, दीर्घकालीन चढ उतार, रचनात्मक बदल, चक्रीय बदल, विनिमय दरातील बदल, किंमतीमधील बदल, राष्ट्रीय उत्पन्नातील बदल, आर्थिक विकास, भांडवलाची गतिशीलता, राजकीय अस्थिरता, व्यापारावरील बंधने, आर्थिक नियोजन यासारख्या विविध कारणांनी व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण होत असतो. असा हा असमतोल कमी करण्यासाठी पुढील उपाय योजले जातात.

**१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून सहाय्य :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी भारतासारख्या विकसनशील देशांच्या व्यवहारतोलात निर्माण होणारा अल्पकालीन असमतोल दूर करण्यासाठी मदत करते. भारत हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा संस्थापक सभासद देशांपैकी एक देश आहे. भारताचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील सुरूवातीचा हिस्सा ४०० दशलक्ष डॉलर्स होता तो २०११ मध्ये ५८२१.५ दशलक्ष एस्.डी.आर. झाला नाणेनिधीचे सभासदत्व स्विकारल्याने भारताला जागतिक बँक व इतर जागतिक संघटनेचे सभासदत्व सहज मिळाले. खनिज तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढती तूट कमी करण्यासाठी एस.डी.आर. (विशेष उचल अधिकार) च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत केली. म्हणजेच स्थापनेपासूनच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी भारताच्या व्यवहारतोलातील असमतोल कमी करण्यासाठी आर्थिक मदत करत आहे.

**२) अवमूल्यन :** जेव्हा देशाची मध्यवर्ती बँक दुसऱ्या देशांच्या चलनाच्या संदर्भात देशीचलनाचे मूल्य कमी करते, तेव्हा त्यास अवमूल्यन असे म्हणतात. जेव्हा भारतीय रूपयाचे अवमूल्यन केले जाते, तेव्हा रूपयाचे मूल्य दुसऱ्या देशातील चलनाच्या संदर्भात कमी होते परिणामी अवमूल्यना अगोदर असणारा १ डॉलर = ५० रू. हा विनिमय दर बदलून, तो १ डॉलर = ६० रू. असा बदलतो. म्हणजेच १ डॉलरच्या प्राप्तीसाठी ५० रूपयांच्या तुलनेत अधिक रूपये द्यावे लागतात, त्यामधून भारतीयांना डॉलर व पर्यायाने आयात महाग होऊन कमी होते, तर परकियांना रूपया व पर्यायाने भारतीय वस्तू स्वस्त झाल्याने भारताची निर्यात वाढण्यास मदत होते व भारताचा व्यापारतोल आणि व्यवहारतोल अनुकूल होण्यास मदत होते.

कोणत्याही देशाने अवमूल्यन केल्यास त्या देशाची निर्यात वाढ होते. आयात घट होते त्यामधून व्यापारतोलातील आणि व्यवहारतोलामधील तूट कमी होऊन अर्थव्यवस्थेमध्ये समतोल निर्माण होण्यास मदत होते. याच उद्देशाने १८ सप्टेंबर १९४९ रोजी अमेरिकन डॉलरच्या संदर्भात ३०.५ टक्क्यांनी, ६ जून १९६६ रोजी भारतीय रूपयांचे अमेरिकन डॉलर व युरोपियन चलनांच्या संदर्भात ३६.५ टक्क्यांनी तर जुलै १९९१ मध्ये तीन टप्प्यामध्ये भारतीय रूपयाचे २० टक्क्यांनी अवमूल्यन केले.

**३) चलनमूल्य घट :** जेव्हा देशातील परकीय चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या संघर्षामधून जेव्हा देशीचलनाचे मूल्य आपोआप कमी होते तेव्हा त्यास चलनमूल्य घट असे म्हणतात. म्हणजेच भारतामध्ये डॉलरची मागणी अधिक व पुरवठा कमी झाला तर रूपयाचे मूल्य आपोआपच घटते, त्यास चलनमूल्य घट असे म्हणतात. जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यवहारांमधून भारतीय रूपयाचे मूल्य घसरते, तेव्हा अवमुल्यनासारखाच परिणाम होतो. त्यामधून आयात महाग होऊन कमी होते, तर भारतीय वस्तू स्वस्त झाल्याने भारताची निर्यात वाढून भारताचा व्यापारतोल आणि व्यवहारतोल अनुकूल होण्यास मदत होते. चलनमूल्य घटीमधून होणारे फायदे-तोटे हे अगदी अवमुल्यनाच्या फायद्या-तोट्याप्रमाणे असतात.

**४) परकीय चलनाचे नियंत्रण :** अधिक आयात आणि निर्यात कमी या कारणाने व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण झाल्यास तो कमी करण्यासाठी परकीय चलनाचे नियंत्रीत वाटप हा एक उपाय योजला जातो. देशाला निर्यातीपासून जे परकीय चलन प्राप्त होते ते देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे जमा केले जाते. तर आयातीसाठी आवश्यक असणारे परकीय चलन व्यक्ती आणि संस्थांना मध्यवर्ती बँकेकडून घ्यावे लागते. व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण झाल्यास देशाची मध्यवर्ती बँक अत्यावश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांच्या आयातीसाठीच फक्त परकीय चलन उपलब्ध करून देते अन्य आयातीसाठी परकीय चलन उपलब्ध करून देत नाही. परिणामी आयात कमी होऊन व्यवहारतोलातील तूट कमी होण्यास मदत होते.

**५) आयात कोटा :** आंतरराष्ट्रीय धोरणामध्ये सरंक्षणाच्या धोरणाचा भाग म्हणून जकातीबरोबर कोटा पद्धतीचा वापर केला जातो. कोटा हे एक जकातेत्तर सरंक्षणाचे साधन आहे. 'आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू किंवा सेवांच्या आयात-निर्यातीचे प्रमाण नग संख्येमध्ये, पैशामध्ये किंवा एककामध्ये नियंत्रीत ठेवण्यासाठी जी परिमाणात्मक नियंत्रणे लादली जातात त्यास कोटा असे म्हणतात.' उदा. सन २०२१ मध्ये भारत फक्त १०००

कोटी रूपयाच्या अन्नधान्याची आयात करेल किंवा फक्त १००० यंत्रे आयात करेल अशा स्वरूपात बंधने लादली जातात तेव्हा त्यास कोटा असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापारात राष्ट्रातील उद्योगधंद्यांना परकीय मालाच्या आयातीवर बंधने लादून आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलातील तूट किंवा असमतोल कमी करण्याचा एक मार्ग म्हणजे आयातीचा कोटा ठरवून आवश्यक तेवढीच आयात करण्यास परवानगी देणे. कोटा पद्धतीच्या मदतीने आयात जकातीपेक्षा अधिक प्रभावीपणे आयातीचे नियंत्रण करता येते. त्यामधून व्यवहारतोलातील असमतोल कमी होण्यास मदत होते.

**६) निर्यात प्रोत्साहन :** जेव्हा एखादा देश देशांतर्गतत रोजगार वाढीसाठी, व्यवहारतोलामधील असमतोल कमी करण्यासाठी निर्यातवाढीसाठी जेव्हा विविध मार्गाचा अवलंब करतो, तेव्हा त्यास निर्यात प्रोत्साहन धोरण असे म्हणतात. निर्यात वित्त पुरवठ्यावरील व्याज दर कमी करून तसेच निर्यात शुल्क कमी करून निर्यातीला प्रोत्साहन दिले जाते. वस्तुच्या उत्पादकांना आणि निर्यातदारांना अनुदान देऊन निर्यातीला प्रोत्साहन दिले जाते. निर्यातदारांनी अधिक वस्तू व सेवांची निर्मिती व निर्यात करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी निर्यातीपासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नावर कमी उत्पन्न कर आकारला आहे.

**७) आयात पर्यायीकरण :** जेव्हा एखादा देश देशांतर्गत उद्योगांना सरंक्षण देणे तसेच व्यापारातील व व्यवहारतोलातील असमतोल कमी करण्यासाठी आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंना पर्यायी वस्तूंचे उत्पादन देशामध्येच करण्याचे धोरण स्विकारतो तेव्हा त्यास आयात पर्यायीकरण धोरण असे म्हणतात. आयात पर्यायीकरण म्हणजे आपण ज्या वस्तू, तंत्रज्ञान परदेशातून आयात करतो त्याला देशांतर्गत पर्याय निर्माण करणे होय. विकसनशील देश आपला विकास साध्य करण्यासाठी पायाभूत सोयीसुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान, विकसीत दर्जाची यंत्रप्रणाली परदेशातून आयात करतात. त्यामधून व्यवहारतोलाच्या व्यापार खात्यावर आयात जास्त व निर्यात कमी झाल्याने असमतोल निर्माण होतो. ज्या वस्तू थेट परदेशातून आयात होतात अशा स्वरूपाच्या वस्तू बनवण्यासाठी देशांतर्गत पातळीवर प्रयत्न करायचे. वस्तूंच्या आयातीवर शुल्क लादून किंवा त्यामध्ये वाढ करून आयात कमी केली जाते. आयातीचा आयात कोटा निश्चित करून, आयातीसाठी परवाना पद्धत सुरू करून आयातीवर बंधने लादली जातात.

**८) संकुचित चलनविषयक धोरण :** अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा यामध्ये योग्य समन्वय साधण्यासाठी मध्यवर्ती बँकेकडून राबविल्या जाणाऱ्या धोरणास मौद्रिक धोरण असे म्हणतात. बाजारातील पैसा व पतनिर्मितीची उपलब्धता, मूल्य आणि उपयोगितेचे नियंत्रण करून बाजारातील पैसा योग्य दिशेला वळवणे आणि त्यासाठी व्याजदराचे नियमन करणे म्हणजे चलन विषयक धोरण किंवा मौद्रिक धोरण होय. सी.आर.आर, एस.एल.आर, बँक रेट, रेपोरेट, रिव्हर्स रेपोरेट, खुल्या बाजारात कर्ज रोख्याची खरेदी-विक्रीही चलनविषयक धोरणाची संख्यात्मक साधने आहेत तर कर्ज व तारणामधील अंतर ठरविणे, उपभोग कर्जाचे नियंत्रण, कर्जाचे नियंत्रित वाटप, प्रसिद्धी, नैतिक समजावणी, प्रत्यक्षकारवाईही चलनविषयक धोरणाची गुणात्मक साधने आहेत. या साधनाचा वापर करून व्यवहारतोलामध्ये समतोल ठेवण्याचा प्रयत्न देशाची मध्यवर्ती बँक करत असते.

देशाची मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी करून वस्तू व सेवांची मागणी आयात कमी करण्यासाठी जे धोरण राबविते त्यास संकुचित चलनविषयक धोरण असे म्हणतात. या धोरणाचा भाग म्हणून मध्यवर्ती बँक सी.आर.आर., एस.एल.आर., बँक रेट, रेपोरेट, रिव्हर्स रेपोरेट यामध्ये वाढ करते त्यामधून पैशाचा पुरवठा कमी होऊन वस्तू व सेवांची मागणी तसेच आयात देखील कमी होते व व्यवहारतोलातील असमतोल कमी होण्यास मदत होते.

**९) आयात जकाती :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू व सेवांची देवाण-घेवाण, आयात-निर्यात होत असताना त्यावर जो कर आकारला जातो त्यास जकात असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एखाद्या देशातून दुसऱ्या देशामध्ये वस्तू व सेवांची निर्यात करताना त्यावर जो कर आकारला जातो त्यास निर्यात जकात असे म्हटले जातात. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एखाद्या देशातून दुसऱ्या देशामध्ये वस्तू व सेवांची आयात करताना जो कर आकारला जातो त्यास आयात जकात असे म्हटले जाते. आयात होणाऱ्या वस्तू व सेवांवर जेव्हा आयात कर आकारला जातो तेव्हा परकीय वस्तू व सेवांच्या किमती वाढतात व त्याची आयात कमी होऊन व्यवहारतोलामध्ये समतोल साध्य होण्यास मदत होते.

## १.३ सारांश :

१९६६ मधील रूपयाचे झालेले अवमूल्यन व हरितक्रांती या कारणांनी भारताची अन्नधान्य व अन्य दृश्य सेवांची आयात कमी व निर्यात अधिक झाल्याने व्यापारतोल अनुकूल बनला. सन १९७२-७३ मध्ये भारताचा व्यापारतोल १०४ कोटी रूपयांनी शिलकीचा होता. तरसन १९७६-७७ मध्ये तो ६८ कोटी रूपयांनी शिलकीचा राहीला होता. ७७ ही दोन वर्षे अपवाद सोडता भारताचा व्यापारतोल हा नेहमीच तुटीचा राहिलेला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारतासारख्या विकसनशील देशांच्या व्यवहारतोलात निर्माण होणारा अल्पकालीन असमतोल दूर करण्यासाठी मदत करते. आंतरराष्ट्रीय व्यवहारांमधून भारतीय रूपयाचे मूल्य घसरणे किंवा अवमूल्यन केल्यास त्या देशाची निर्यात वाढ होते, आयात घट होते त्यामधून व्यापारतोलातील आणि व्यवहारतोलामधील तूट कमी होऊन अर्थव्यवस्थेमध्ये समतोल निर्माण होण्यास मदत होते. व्यवहारतोलामध्ये असमतोल निर्माण झाल्यास देशाची मध्यवर्ती बँक अत्यावश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांच्या आयातीसाठीच फक्त परकीय चलन उपलब्ध करून देते अन्य आयातीसाठी परकीय चलन उपलब्ध करून देत नाही परिणामी आयात कमी होऊन व्यवहारतोलामधील तूट कमी होण्यास मदत होते. आयातीचा कोटा ठरवून आवश्यक तेवढीच आयात करण्यास परवानगी देणे. कोटा पद्धती आयात जकातीपेक्षा अधिक प्रभावीपणे आयातीचे नियंत्रण करता येते त्यामधून व्यवहारतोलातील असमतोल कमी होण्यास मदत होते. वस्तुच्या उत्पादकांना आणि निर्यातदारांना अनुदान देऊन निर्यातीला प्रोत्साहन दिले जाते. निर्यातदारांनी अधिक वस्तू व सेवांची निर्मिती व निर्यात करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी निर्यातीपासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नावर कमी उत्पन्न कर आकारला जातो. वस्तुंच्या आयातीवर शुल्क लादून किंवा त्यामध्ये वाढ करून आयात कमी केली जाते. आयातीचा कोटा निश्चित करून, आयातीसाठी परवाना पद्धत सुरू करून आयातीवर बंधने लादली जातात. चलनविषयक धोरणाची गुणात्मक साधने तसेच संख्यात्मक साधनाचा वापर करून व्यवहारतोलामध्ये समतोल ठेवण्याचा प्रयत्न देशाची मध्यवर्ती बँक करत

असते. आयात होणाऱ्या वस्तू व सेवांवर जेव्हा आयात कर आकारला जातो तेव्हा परकीय वस्तू व सेवांच्या किमती वाढतात व त्याची आयात कमी होऊन व्यवहारतोलामध्ये समतोल साध्य होण्यास मदत होते.

## १.४ खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :

१. ------ मधील रूपयाचे झालेले अवमूल्यन व हरितक्रांती या कारणांनी भारताची अन्नधान्य व अन्य दृश्य वस्तूंची आयात कमी व निर्यात अधिक झाली.

अ) १९४९ ब) १९६६ क) १९९१ ड) यापैकी नाही

२. प्रत्येक देशाला आपला व्यवहारतोल हा नेहमीच ------ ठेवावा लागतो.

अ) समतोल ब) असमतोल क) तुटीचा ड) शिलकीचा

३. व्यवहारतोलात असमतोल निर्माण करणारी कारणे ------ ही आहेत.

अ) अल्पकालीन बदल ब) दीर्घकालीन चढ उतार

क) रचनात्मक बदल ड) वरील सर्व

४. व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याच्या उपायांमध्ये ------ उपायांचा समावेश होतो.

अ) अवमूल्यन ब) चलनमुल्य घट क) आयातकोटा ड) वरील सर्व

५. सन १९७२-७३ मध्ये भारताचा व्यापारतोल ------ कोटी रूपयांनी शिलकीचा होता.

अ) १०२ ब) १०४ क) १०६ ड) १०८

६. एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तुंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा आयातीवरील खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेबरोबर (समान) असते तेव्हा त्यास ------ व्यापारतोल असे म्हणतात.

अ) समतोल ब) असमतोल क) तुटीचा ड) यापैकी नाही

७. सन ------ मध्ये तो ६८ कोटी रूपयांनी शिलकीचा राहीला होता.

अ) १९७२-७३ ब) १९७४-७५ क) १९७६-७७ ड) यापैकी नाही

८. जेव्हा देशाची मध्यवर्ती बँक दुसऱ्या देशांच्या चलनाच्या संदर्भात देशी चलनाचे मूल्य कमी करते, तेव्हा त्यास ------ असे म्हणतात.

अ) अवमूल्यन ब) ऊर्ध्वमूल्यन क) चलनमूल्य घट ड) यापैकी नाही

९. जेव्हा देशातील परकिय चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या संघर्षमधून जेव्हा देशी चलनाचे मूल्य आपोआप कमी होते तेव्हा त्यास .............असे म्हणतात.

अ) अवमूल्यन ब) ऊर्ध्वमूल्यन क) चलनमूल्य घट ड) यापैकी नाही

१०. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू किंवा सेवांच्या आयात-निर्यातीचे प्रमाण नगसंख्येमध्ये, पैशामध्ये किंवा एककामध्ये नियंत्रित ठेवण्यासाठी जी परिमाणात्मक नियंत्रणे लादली जातात त्यास ......... असे म्हणतात.

अ) कोटा ब) जकात क) आयात बंदी ड) यापैकी नाही

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे :

१) ब १९६६

२) अ समतोल

३) ड वरील सर्व

४) ड वरील सर्व

५) ब १०४

६) अ समतोल

७) क १९७६-७७

८) अ अवमूल्यन

९) क चलनमूल्य घट

१०) अ कोटा

## १.६ पारिभाषिक शब्द :

१. **व्यापारतोल :** एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांच्या बरोबर केलेल्या फक्त दृश्य वस्तूंच्या देवाण-घेवाणीच्या जमाखर्चास व्यापारतोल असे म्हणतात. यालाच व्यापार शेष असेही म्हणतात.

२. **समतोल व्यापारतोल :** एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तूंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा आयातीवरील खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेबरोबर (समान) असते तेव्हा त्यास समतोल व्यापारतोल असे म्हणतात.

३. **असमतोल व्यापारतोल :** एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तूंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा दृश्य वस्तूंच्या आयातीवर खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेबरोबर नसते तेव्हा त्यास असमतोल व्यापारतोल असे म्हणतात.

४. **अनुकूल व्यापारतोल :** एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तूंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा दृश्य वस्तूंच्या आयातीवर खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेपेक्षा जास्त असते तेव्हा त्यास अनुकूल व्यापारतोल असे म्हणतात.

५. **प्रतिकूल व्यापारतोल :** एका आर्थिक वर्षामध्ये एखाद्या देशाला दृश्य वस्तूंच्या निर्यातीपासून प्राप्त होणारी रक्कम जेव्हा दृश्य वस्तूंच्या आयातीवर खर्च कराव्या लागणाऱ्या रक्कमेपेक्षा कमी असते तेव्हा त्यास प्रतिकूल व्यापारतोल असे म्हणतात.

६. **व्यवहारतोल :** एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील सर्व देशांच्या बरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमाखर्चास व्यवहारतोल असे म्हणतात. यालाच देवघेवीचा तोल असेदेखील म्हणतात.

७. **व्यवहारतोलाचे व्यापारी खाते :** व्यवहारतोलाच्या ज्या भागामध्ये देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्या बरोबर केलेल्या फक्त दृश्य वस्तूंची देवाण-घेवाण दर्शविली जाते, त्यास व्यवहारतोलाचे व्यापारी खाते असे म्हणतात.

८. **व्यवहारतोलाचे चालू खाते :** व्यवहारतोलाच्या ज्या भागामध्ये देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्या बरोबर दृश्य व अदृश्य वस्तूंची देवाण-घेवाण दर्शविली जाते, त्यास व्यवहारतोलाचे चालू खाते असे म्हणतात.

९. **व्यवहारतोलाचे भांडवली खाते :** व्यवहारतोलाच्या ज्या भागामध्ये देशाने जगातील अन्य राष्ट्रांच्या बरोबर परकिय गुंतवणूक, कर्ज व अन्य भांडवली रकमांच्या स्वरुपामध्ये केलेली देवाण-घेवाण दर्शविली जाते, त्यास व्यवहारतोलाचे भांडवली खाते असे म्हणतात.

१०. **अवमूल्यन :** जेव्हा देशाची मध्यवर्ती बँक दुसऱ्या देशांच्या चलनाच्या संदर्भात देशी चलनाचे मूल्य कमी करते, तेव्हा त्यास अवमूल्यन असे म्हणतात.

११. **चलनमुल्य घट :** जेव्हा देशातील परकिय चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या संघर्षामधून जेव्हा देशी चलनाचे मूल्य आपोआप कमी होते, तेव्हा त्यास चलनमूल्य घट असे म्हणतात.

१२. **आयात कोटा :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू किंवा सेवांच्या आयात-निर्यातीचे प्रमाण नगसंख्येमध्ये, पैशामध्ये किंवा एककामध्ये नियंत्रित ठेवण्यासाठी जी परिमाणात्मक नियंत्रणे लादली जातात त्यास कोटा असे म्हणतात.

१३. **निर्यात प्रोत्साहन :** जेव्हा एखादा देश देशांतर्गत रोजगार वाढीसाठी, व्यवहारतोलामधील असमतोल कमी करण्यासाठी निर्यातवाढीसाठी जेव्हा विविध मार्गाचा अवलंब करतो, तेव्हा त्यास निर्यात प्रोत्साहन धोरण असे म्हणतात.

१४. **आयात पर्यायीकरण :** जेव्हा एखादा देश देशांतर्गत उद्योगांना संरक्षण देणे तसेच व्यापारातील व व्यवहारतोलातील असमतोल कमी करण्यासाठी आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंना पर्यायी वस्तूंचे उत्पादन

देशामध्येच करण्याचे धोरण स्विकारतात तो तेव्हा त्यास आयात पर्यायीकरण धोरण असे म्हणतात.

**१५. चलनविषयक धोरण :** अर्थव्यवस्थेतील पैशाचीमागणी व पैशाचा पुरवठा यामध्ये योग्य समन्वय साधण्यासाठी मध्यवर्ती बँकेकडून राबविल्या जाणाऱ्या धोरणास चलनविषयक धोरण असे म्हणतात.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा :**

१) समतोल व्यापारतोल आणि असमतोल व्यापारतोल

२) अनुकूल व्यापारतोल आणि प्रतिकूल व्यापारतोल

३) व्यवहारतोलाचे व्यापारी खाते

४) व्यवहारतोलाचे चालू खाते

५) व्यवहारतोलाचे भांडवली खाते

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) व्यापारतोल म्हणजे काय ते सांगून व्यापारतोलाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

२) व्यवहारतोल म्हणजे काय ते सांगून व्यवहारतोलाची विविध खाती स्पष्ट करा.

३) व्यवहारतोलाचे महत्त्व अधिक स्पष्ट करा.

४) व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे स्पष्ट करा.

५) व्यवहारतोलातील असमतोलाचे परिणाम स्पष्ट करा.

६) व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्याचे उपाय स्पष्ट करा.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१) Mathur Reeta (2002) : International Economics, Sublme Publication, Jaipur.

२) Economic Survey of India 2020-21, Ministry of Finance, Dept. of Economic Affairs Govt. of India.

३) झांबरे जी. एन. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र (पिंपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपूर)

४) वावरे आणि घाटगे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.

५) शिंदे आणि सत्रे (२०१७) : भारतीय अर्थव्यवस्था, अजित पब्लिकेशन, इस्लामपूर.


***

# घटक – २

# भारताचा १९९१ पासूनचा विदेशी व्यापार

# ( Foreign Trade of India since 1991 )

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ रचना, आकारमान आणि दिशा (Volume, Composition and Direction)

२.२.२ २०१४-१९ ची एक्झिम पॉलिसी (Exim Policy of 2014-19)

२.२.३ भारतातील व्यापार प्रशासन. (Trade administration of India)

२.२.४ रुपयाची परिवर्तनियता : अर्थ आणि प्रकार (Convertibility of Rupee : Meanig and types)

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

२.६ पारिभाषिक शब्द

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्टे : (Objectives)

सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. परकीय व्यापाराची रचना, आयात व्यापाराची रचना, निर्यात व्यापाराची रचना, परकीय व्यापाराचे आकारमान, आयात व्यापाराचे आकारमान, निर्यात व्यापाराचे आकारमान, परकीय व्यापाराची दिशा, आयात व्यापाराची दिशा, निर्यात व्यापाराची दिशा या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

२. भारताचे २०१५-२० चे आयात-निर्यात धोरण, २०१५-२० आयात-निर्यात धोरणाची उद्दिष्टे, २०१५-२० आयात निर्यात धोरणाची वैशिष्ट्ये अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

३. भारतातील व्यापार प्रशासन आणि व्यापार प्रशासनाचे फायद्याबाबत अधिक माहिती प्राप्त होण्यास मदत होते.

४. रुपयाची परिवर्तनियता अर्थ, रुपयाची परिवर्तनियतचे प्रकार, रुपयाची अंशत: परिवर्तनियता, रुपयाची पूर्णत: परिवर्तनियता, व्यापारी खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता, चालू खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता, भांडवली खात्यावरील परिवर्तनियता, पहिली तारापोर समिती, दुसरी तारापोर समिती याची अधिक माहिती मिळते.

## २.१ प्रास्ताविक :

विशिष्ट कालखंडामध्ये एका देशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आयात व्यापार, निर्यात व्यापार आणि पुनर्निर्यात व्यापार असे मुख्य प्रकार पडतात. विशिष्ट कालखंडामध्ये एका देशातील व्यक्ती व संस्थांनी दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांकडून वस्तू व सेवांची खरेदी करुन त्यांची पुन्हा दुसऱ्या राष्ट्रांना निर्यात करणे पुनर्निर्यात व्यापार होय.

व्यक्ती व संस्थांनी दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांकडून वस्तू व सेवांची केलेली खरेदी म्हणजे आयात व्यापार होय. विशिष्ट कालखंडामध्ये एका देशातील व्यक्ती, संस्थांनी दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांना वस्तू व सेवांची केलेली विक्री म्हणजे निर्यात व्यापार होय. तर विशिष्ट कालखंडामध्ये एका देशातील व्यक्ती, संस्थांनी दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांकडून वस्तू व सेवांची खरेदी करुन त्यांची पुन्हा दुसऱ्या राष्ट्रांना निर्यात करणे म्हणजे पुनर्नियात व्यापार होय.

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अविकसित देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळते असे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी म्हटले आहे. त्यामध्ये रॅग्नर नर्क्स्, हॅबरलर वगैरेंचा समावेश आहे. या अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराला अविकसित देशांच्या आर्थिक वाढीचे इंजिन असे म्हटले आहे, कारण आंतरराष्ट्रीय व्यापाराने देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास होऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते, नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर होतो, आंतरराष्ट्रीय व्यापारातील सहभागी देशातील लोकांना कमी किंमतीत वस्तू मिळतात, अविकसित देशांची निर्यात वाढून आर्थिक विकास घडून येतो. विकसनशील देशातील वस्तूंचा दर्जा सुधारतो, कार्यक्षमतेत वाढ होऊन निर्यात वाढ होते. अशा रितीने आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाशी संबंधीत विविध घटकात सुधारणा होऊन आर्थिक विकास गतिमान होतो. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापाराला आर्थिक वाढीचे इंजिन असे म्हणतात. सदर प्रकरणामध्ये भारताच्या परकिय व्यापाराची रचना, आकारमान आणि दिशा तसेच २०१५-२० चे आयात-निर्यात धोरण, भारतातील व्यापार प्रशासन आणि भारतीय रुपयाची परिवर्तनियता-अर्थ आणि प्रकार इत्यादि घटक विचारात घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ परकिय व्यापाराची रचना, आकारमान आणि दिशा :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये विदेशी व्यापाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आर्थिक

विकासाबरोबर त्या देशाच्या परकीय व्यापाराची रचना, आकारमान आणि दिशा यामध्ये बदल होत असतो. भारताच्या विदेशी व्यापाराची रचना, आकारमान आणि दिशा यावरती ब्रिटिश पूर्व कालखंड, ब्रिटिश कालखंड, स्वातंत्र्यप्रेमीचा कालखंड, नियोजन कालखंड आणि भारताने १९९१ मध्ये स्वीकारलेले नवीन आर्थिक धोरण या सर्व घटकांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणून एकेकाळी मसाल्याचे पदार्थ, कच्चा माल याची निर्यात करणारा देश आज उत्पादित वस्तू व विविध प्रकारच्या सेवांची मोठ्या प्रमाणात निर्यात करताना दिसून येतो.

**अ. परकीय व्यापाराची रचना : (Composition of Foreign Trade)**

एखादा देश कोणकोणत्या वस्तू आणि सेवांची आयात-निर्यात करतो व प्रत्येक वस्तूचे व्यापारामधील प्रमाण काय आहे यास त्या देशाच्या परकीय व्यापाराची रचना असे म्हणतात. ब्रिटिश कालखंडात भारत हा कच्च्या मालाची निर्यात करणारा आणि पक्क्या मालाची आयात करणारा देश अशी भारताची ओळख होती. या व्यापार रचनेमध्ये अलीकडील कालखंडात बदल झाल्याचे दिसून येते.

**अ.१ आयात व्यापाराची रचना : (Composition of Import Trade)**

एखादा देश कोणकोणत्या वस्तूंची आयात करतो व प्रत्येक वस्तूचे एकूण आयातीमधील प्रमाण किती आहे त्यास त्या देशाच्या आयात व्यापाराची रचना असे म्हटले आहे. एके काळी पक्का माल तसेच विकासास आवश्यक असणारी यंत्रसामग्री, तंत्रज्ञान यांची आयात करणार देशाच्या आयातीमध्ये आज पेट्रोलियम, ऑईल, ल्युब्रिकंटस्, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांची आयात अधिक होताना दिसून येते. अन्नधान्यासाठी अमेरिकेसारख्या देशावर अवलंबून असणाऱ्या आपल्या देशात १९७० च्या दशकात हरितक्रांती घडून आली आणि भारताची अन्नधान्याची आयात कमी होऊन भारत अन्नधान्याची निर्यात करु लागला. भारताच्या आयात व्यापाराच्या रचनेमध्ये जवळपास ६००० वस्तू समाविष्ट होत्या.

**कोष्टक क्रमांक २.१**

**भारताच्या आयात व्यापाराची रचना (महत्त्वाच्या वस्तू)**

| क्रमवारी | वस्तू | २०१८-१९ (टक्के) | २०१८-१९ (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | पेट्रोलियम,ऑईल,ल्युब्रिकंटस | २७.४ | २७.५ |
| २ | इलेक्ट्रॉनिक वस्तू | ११.२ | ९.९ |
| ३ | सोने, चांदी | ७.१ | ६.५ |
| ४ | रसायने | ६.८ | ६.६ |
| ५ | मौल्यवान मोती, कच्चे हिरे | ५.३ | ४.७ |

**संदर्भ : आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१**

वरील कोष्टक क्रमांक २.१ हे भारताच्या आयात व्यापाराची रचना स्पष्ट करते. २०२०-२१ मधील आर्थिक पाहणी अहवालातील उपलब्ध आकडेवारीनुसार भारत जगातील विविध देशांमधून कोणकोणत्या महत्त्वाच्या वस्तूची आयात करतो ते दर्शवते. भारताच्या आयात व्यापार रचनेमध्ये सन २०१९-२० मध्ये पेट्रोलियम, ऑईल आणि ल्युब्रिकंटस ही सर्वात महत्त्वाची वस्तू असून त्याचे एकूण आयातीमधील प्रमाण २७.५% आहे. पेट्रोलियम, ऑईल आणि ल्युब्रिकंटसनंतर इलेक्ट्रॉनिक वस्तू, सोने-चांदी, रसायने, मौल्यवान मोती व कच्चे हिरे यांचा क्रमांक लागतो.

**ब. परकिय व्यापाराचे आकारमान (Volume of Foreign Trade)** :

एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांबरोबर किती रकमेच्या वस्तूंचा व्यापार करतो त्यास त्या देशाच्या परकीय व्यापाराचे आकारमान असे म्हणतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचा आयात तसेच निर्यात व्यापार मोठ्या प्राणात वाढल्याचे दिसून येते. वाढती लोकसंख्या, विकासात्मक वस्तू व सेवा तसेच तंत्रज्ञान, भांडवल, यंत्रसामग्रीची आयात मोठ्या प्रमाणात करावी लागल्याने देशाच्या आयात व्यापाराचे आकारमान वाढण्याबरोबरच विदेशी व्यापाराचे एकूण आकारमान वाढत गेल्याचे दिसून येते.

**कोष्टक क्रमांक २.२**

**परकीय व्यापाराचे आकारमान**

| वर्ष | आयात (को.रू.) | निर्यात (को.रू.) | एकूण आकारमान (को.रू.) | व्यापारातील तूट/शेष (को.रू.) |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ६०८ | ६०६ | १२१४ | - ०२ |
| १९९०-९१ | ४७८५१ | ४४०४१ | ९१८९२ | - ३८१० |
| २००१-०२ | २४५२०० | २०९०२८ | ४५४२१८ | - ३६१८२ |
| २०१६-१७ | २५७७६६ | १८४९४२९ | ४४२७०९५ | - ७२८२३७ |
| २०१९-२० | ३३६०९५४ | २२१९८५४ | ५५८०८०८ | - ११४११०० |
| पट वाढ | ५५२७.८८ | ३६६३.१३ | ४५९७.०४ | - ५७०५५०.०० |

**संदर्भ : आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१**

वरील कोष्टक क्रमांक २.२ हे भारताच्या २०२०-२१ मधील आर्थिक पाहणी अहवालातील उपलब्ध आकडेवारीनुसार विदेशी व्यापाराचे आकारमान स्पष्ट करते. सन १९५०-५१ ते २०१९-२० या कालखंडात भारताची आयात, निर्यात, एकूण व्यापार आणि व्यापारातील तूट किंवा शेष कसा बदलत गेला आहे हे स्पष्ट करते. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या एकूण व्यापाराचे आकारमान १२१४ कोटी रुपये एवढे होते. त्यामध्ये सन २०१९-२० कालखंडात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन ५५८०८०८ कोटी रुपये पर्यंत वाढल्याचे दिसून येते. या कालखंडात भारताचा एकूण विदेशी व्यापार ४५९७.०४ पट वाढल्याचे दिसून येते. तसेच याचा कालखंडात

भारताच्या विदेशी व्यापारातील तूट २ कोटी रुपयांवरुन ११४११०० रुपये पर्यंत वाढल्याचे दिसून येते ही बाब सर्वाधिक असून ती ५७०५०.०० पट आहे.

**ब.१ आयात व्यापाराचे आकारमान : (Volume of Export Trade)**

एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांकडून किती रकमेच्या वस्तू व सेवांची आयात करतो त्यास त्या देशाच्या आयात व्यापाराचे आकारमान असे म्हणतात. कोष्टक क्रमांक २.२ हे भारताच्या विदेशी व्यापारातील आयात व्यापाराचे आकारमान स्पष्ट करते. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या आयात व्यापाराचे आकारमान ६०८ कोटी रुपये एवढे होते. त्यामध्ये सन २०१९-२० कालखंडात मोठ्या प्रमाणात वाढ होऊ ३३६०९५४ कोटी रुपये पर्यंत वाढल्याचे दिसून येते. या कालखंडात भारताचा आयात व्यापाराचे आकारमान ५५२७.८८ पट वाढल्याचे दिसून येते.

**ब.२ निर्यात व्यापाराचे आकारमान : (Volume of Export Trade)**

एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांना किती रकमेच्या वस्तू व सेवांची निर्यात करतो, त्यास त्या देशाच्या निर्यात व्यापाराचे आकारमान असे म्हणतात. कोष्टक क्रमांक २.२ हे भारताच्या विदेशी व्यापारातील आयात व्यापाराचे आकारमानाबरोबरच निर्यात व्यापाराच्या आकारमानामध्ये झालेली वाढ देखील स्पष्ट करते. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या निर्यात व्यापाराचे आकारमान ६०६ कोटी रुपये एवढे होते. त्यामध्ये सन २०१९-२० कालखंडात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन २२१९८५४ कोटी रुपये पर्यंत वाढल्याचे दिसून येते. या कालखंडात भारताचा आयात व्यापाराचे आकारमान ३६६३.१३ पट वाढल्याचे दिसून येते.

**क. परकिय व्यापाराची दिशा : (Direction of Export Trade)**

एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील कोणकोणत्या देशांबरोबर व्यापार करतो त्यास त्या देशाच्या परकीय व्यापाराची दिशा असे म्हटले जाते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारताच्या आयात आणि निर्यात व्यापाराच्या दिशेमध्ये युरोपियन देशाचे प्रामुख्याने इंग्लंड, ब्रिटन या देशांचे योगदान खूपच महत्त्वपूर्ण होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र युरोपियन देशांचे महत्त्व कमी होत जावून आशिया व आसियान या समूहाचे तसेच अमेरिका, चीन या देशांचे महत्त्व वाढत गेल्याचे दिसून येते.

**क.१ आयात व्यापाराची दिशा : (Volume of Import Trade)**

एखादा देश कोणकोणत्या देशांकडून वस्तू व सेवांची आयात करतो व एकूण आयातीमध्ये प्रत्येक देशाच्या आयातीचे प्रमाण किती आहे, त्यास त्या देशाच्या आयात व्यापाराची दिशा असे म्हटले जाते. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या कालखंडात भारताच्या आयात व्यापाराच्या दिशेमध्ये इंग्लंड, ब्रिटन या देशाचे महत्त्व कमी होत जावून चीन, अमेरिका या देशाचे महत्त्व वाढलेले आहे. भारताच्या आयात व्यापाराच्या दिशेमध्ये जवळपास १४० देश सहभागी होतात.

**कोष्टक क्रमांक २.३**

**भारताच्या आयात व्यापाराची दिशा (देशाचा समूह)**

| क्रमवारी | विभाग | २०१९-२० (टक्के) | २०२०-२१ (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | आशिया व आसियन | ६१.६ | ६३.२ |
| २ | युरोप | १५.१ | १४.९ |
| ३ | उत्तर लॅटिन अमेरिका | १२.९ | १२.५ |
| ४ | आफ्रिका | ७.९ | ६.९ |
| ५ | सीआयएस व बाल्टिक राष्ट्रे | २.५ | २.५ |

**संदर्भ : आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१**

वरील कोष्टक क्रमांक २.३ हे २०२०-२१ मधील आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारीनुसार भारताच्या आयात व्यापाराची दिशा स्पष्ट करते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील सहभागी समूह किंवा गटाचा विचार करता सन २०२०-२१ या कालखंडात भारताच्या आयात व्यापाराच्या दिशेमध्ये आशिया व आसियान हा विभाग पहिल्या क्रमांकावर असून भारत एकूण आयातीपैकी ६३.२ टक्के आयात ही आशिया व आसियान या विभागाकडून करते. त्याच्यानंतर युरोप, उत्तर लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि बाल्टिक राष्ट्रे याची क्रमवारी लागते.

**कोष्टक क्रमांक २.४**

**भारताच्या आयात व्यापाराची दिशा (देशाचा समूह)**

| क्रमवारी | विभाग | २०१९-२० (टक्के) | २०२०-२१ (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | चीन | १३.७ | १७.७ |
| २ | यु. एस. ए. | ७.५ | ७.४ |
| ३ | यु. ए. ई. | ६.४ | ६.० |
| ४ | सौदी अरेबिया | ५.७ | ४.२ |
| ५ | इराक | ५.० | ३.५ |

**संदर्भ : आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१**

वरील कोष्टक क्रमांक २.४ हे २०२०-२०२१ मधील आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारी नुसार भारताच्या आयात व्यापाराची दिशा स्पष्ट करते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील सहभागी देशांचा विचार करता सन २०२०-२१ या कालखंडात भारताच्या आयात व्यापाराच्या दिशेमध्ये चीन या देशाचा पहिला क्रमांक असून भारत एकूण आयातीपैकी १७.७ टक्के आयात ही चीनकडून करते. चीनच्यानंतर भारताच्या आयात व्यापाराच्या दिशेमध्ये अमेरिका, यु.ए.ई., सौदी अरेबिया आणि इराक या देशांची क्रमवारी लागते.

**क.२ निर्यात व्यापाराची दिशा : (Direction of Export Trade)**

एखादा देश कोणकोणत्या देशांना निर्यात करतो व प्रत्येक देशाच्या निर्यातीचे एकूण निर्यातीशी प्रमाण किती आहे त्यास त्या देशाच्या निर्यात व्यापाराची दिशा असे म्हटले जाते. अलीकडील कालखंडात युरोपियन देशाचे भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेमधील महत्त्व कमी होत जाऊन आशिया व आसियान या विभागाचे महत्त्व वाढलेले आहे. भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेमध्ये जवळपास १९० देश सहभागी होतात.

**कोष्टक क्रमांक २.५**

**भारताच्या आयात व्यापाराची दिशा (देशाचा समूह)**

| क्रमवारी | विभाग | २०१९-२० (टक्के) | २०२०-२१ (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | आशिया व आसियान | ४८.८ | ४६.७ |
| २ | युरोप | २२.२ | २३.६ |
| ३ | उत्तर लॅटिन अमेरिका | १९.३ | १८.४ |
| ४ | आफ्रिका | ९.३ | ९.५ |
| ५ | सीआयएस व बाल्टिक राष्ट्रे | १.३ | १.३ |

**संदर्भ : आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१**

वरील कोष्टक क्रमांक २.५ हे भारताच्या २०२०-२०२१ मधील आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारी नुसार निर्यात व्यापाराची दिशा स्पष्ट करते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील सहभागी समूह किंवा गटांच्या आधारे सन २०२०-२१ या कालखंडात भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेमध्ये आशिया व आसियान हा विभाग पहिल्या क्रमांकावर असून भारत एकूण निर्यातीपेकी ४६.७% निर्यात ही आशिया व आसियान या विभागाकडून करते. त्याच्यानंतर युरोप या विभागाचा क्रमांक लागतो. भारत या विभागाला २३.६% निर्यात करतो. युरोपनंतर उत्तर लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि बाल्टिक राष्ट्रे यांचा अनुक्रमे तिसरा, चौथा आणि पाचवा क्रमांक लागतो.

**कोष्टक क्रमांक २.६**

**भारताच्या निर्यात व्यापाराची दिशा (महत्त्वाचे देश)**

| क्रमवारी | विभाग | २०१९-२० (टक्के) | २०२०-२१ (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | यु. एस. ए. | १६.९ | १८.० |
| २ | यु. ए. ई. | ९.२ | ५.६ |
| ३ | हाँगकाँग | ३.५ | ३.८ |
| ४ | चीन | ५.३ | ७.८ |
| ५ | सिंगापूर | २.८ | ३.२ |

**संदर्भ : आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१**

वरील कोष्टक क्रमांक २.६ हे भारताच्या निर्यात व्यापाराची दिशा स्पष्ट करते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील सहभागी देशांचा विचार करता सन २०२०-२१ या कालखंडात भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेमध्ये अमेरिका या देशाचा पहिला क्रमांक असून भारत एकूण निर्यातीपैकी १८.० टक्के निर्यात ही अमेरिकेला करते. अमेरिकेनंतर भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेमध्ये यू.ए.ई. या देशाचा क्रमांक लागतो त्या देशाला भारत आपल्या एकूण निर्यातीच्या ५.६ टक्के निर्यात करते. यू.ए.ई नंतर हाँगकाँग, चीन आणि सिंगापूर या देशांचा अनुक्रमे तिसरा, चौथा आणि पाचवा क्रमांक लागतो.

## २.२ भारताचे २०१५-२० चे आयात-निर्यात धोरण :

आयात पर्यायीकरण आणि निर्यात प्रोत्साहन या साधनांच्या वापराच्या माध्यमातून भारताचा जागतिक व्यापारातील सध्याचा २ टक्के असणारा वाटा सन २०२० पर्यंत ३.५ टक्के करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट समोर ठेऊन भारताच्या तत्कालीन वाणिज्य मंत्री निर्मला सितारामन यांनी १ एपिल्र २०१५ ते ३१ मार्च २०२० या कालावधी साठी नवीन विदेशी व्यापार धोरण जाहीर केले. २०२० पर्यंत जागतिक व्यापारात भारताला महत्त्वपूर्ण भागीदार देश बनविणे हे देखील या धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. सन २०१३-१४ मध्ये भारत सरकारची वस्तू व सेवांच्या असणाऱ्या ४६५.९ अब्ज डॉलर्स निर्यातीमध्ये सन २०१९-२० मध्ये ९०० अब्ज डॉलर्स पर्यंत वाढ करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

### २०१५-२० आयात-निर्यात धोरणाची उद्दिष्टे :

१. सन २०१३-१४ मध्ये भारत सरकारची वस्तू व सेवांच्या ४६५.९ अब्ज अमेरिकन डॉलर्स असणारी निर्यात सन २०१९-२० मध्ये ९०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढविणे.

२. भारताला २०२० पर्यंत जागतिक व्यापारातील महत्त्वपूर्ण भागीदार देश बनविणे.

३. भारताचा जागतिक व्यापारातील २०१५ मध्ये २ टक्के असणारा वाटा सन २०२० पर्यंत ३.५ टक्के पर्यंत वाढविणे.

४. भारताच्या निर्यातीच्या संधी वाढवून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत देशाचे स्पर्धा सामर्थ्य वाढविणे.

५. आयात पर्यायीकरण आणि निर्यात प्रोत्साहन या धोरणांच्या माध्यमातून व्यवहारतोलात समतोल साध्य करणे.

वरील उद्दिष्टे समोर भारताच्या वाणिज्य मंत्री निर्मला सितारामन यांनी १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२० या कालावधीसाठी आयात-निर्यात धोरण जाहीर केले.

### २०१५-२० आयात-निर्यात धोरणाची उद्दिष्ट्ये :

नवीन आयात-निर्यात धोरण हे अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांना व्यापून टाकणारे धोरण असेल, नवीन आयात-निर्यात धोरणात हे केंद्र सरकार, राज्य सरकार व केंद्रशासित प्रदेश या तिन्ही स्तरावर परकीय व्यापार वाढीसाठी प्रयत्न केले जातील. व्यापारविषयक धोरणाबाबत व्यापक धोरण तयार करुन त्याच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी भारताच्या व्यापाराची संस्थात्मक चौकट तयार करण्यावर भर देण्यात येईल. भारताचा

अमेरिका आणि युरोपियन देशांच्या बरोबरचा व्यापार वाढीस लागावा यासाठी तीन महत्त्वपूर्ण करार करण्याचे निश्चित करण्यात आले. व्यापारविषयक करार करताना निर्यात वृध्दी, निर्यात प्रधान वस्तूंची आयात आणि उच्च दर्जाच्या वस्तूंची जागतिक बाजारपेठेत निर्यात करुन देशाचे निर्यात मूल्य वाढविण्यावर भर देण्यात येईल. याबरोबरच २०१५ ते २०२० या कालावधीसाठी जाहीर केलेल्या नवीन आयात-निर्यात धोरणाची सर्व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. **सर्व क्षेत्रांना व्यापून टाकणारे धोरण :** भारताच्या वाणिज्य मंत्री निर्मला सितारामन यांनी १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२० या कालावधीसाठी जाहीर केलेले नवीन आयात-निर्यात धोरण हे अर्थव्यवस्थेतील सर्व सर्व क्षेत्रांना व्यापून टाकणारे धोरण असेल जे देशाची निर्यात वाढीवर भर देईल.

२. **तीन स्तरावरील सरकार व्यापार वाढीसाठी प्रयत्न करणार :** २०१५ ते २०२० या कालावधी साठी जाहीर केलेले नवीन आयात-निर्यात धोरण हे केंद्र सरकार, राज्य सरकार व केंद्रशासति प्रदेश या तिन्ही स्तरावर परकीय व्यापार वाढीसाठी प्रयत्न केले जातील. निर्यात वाढीसाठी राज्य सरकाराची भूमिका महत्त्वाची असून राज्य स्तरावर संस्थात्मक चौकट स्थापन करुन राबविले जाईल.

३. **भारताच्या व्यापाराची संस्थात्मक चौकट तयार करणे :** भारताने आयात-निर्यात व्यापार विषयक धोरणात्मक व्यापक धोरण तयार करुन त्याच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी भारताच्या व्यापाराची संस्थात्मक चौकट तयार करण्यावर भर देणे, हे एक भारताच्या २०१५ ते २०२० या कालावधीसाठी जाहीर केलेल्या नवीन आयात-निर्यात धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

४. **व्यापार वृध्दीसाठी तीन करार :** भारताच्या २०१५ ते २०२० या कालावधीसाठी जाहीर केलेल्या नवीन आयात-निर्यात धोरणामध्ये भारताचा अमेरिका आणि युरोपियन देशांच्या बरोबरचा व्यापार वाढीस लागावा यासाठी ट्रान्स पॅसिफिक पार्टनरशिप, ट्रान्स अटलांटिक ट्रेड इन्व्हेस्टमेंट पार्टनरशिप व प्रादेशिक आर्थिक विस्तारीत सहभागीदारी हे तीन महत्त्वपूर्ण करार करण्याचे निश्चित करण्यात आले. या तीन करारामधून भारताचा निर्यातवृध्दी बरोबर भारताचा औद्योगिक विकास गतिमान होण्यास मदत होईल.

५. **भारताचे निर्यातमूल्य वाढीवर भर :** नवीन आयात-निर्यात धोरणाचा भाग म्हणून भारताने व्यापारविषयक करार करताना निर्यात वृध्दी, निर्यात प्रधान वस्तूंची आयात आणि उच्च दर्जाच्या वस्तूंची जागतिक बाजारपेठेत निर्यात करुन देशाचे निर्यात मूल्य वाढविण्यावर भर देण्यात येईल असे निश्चित करण्यात आले.

६. **अमेरिकेसोबतच्या व्यापारवाढीसाठी विशेष प्रयत्न :** अमेरिका हा भारताचा एक महत्त्वपूर्ण व्यापारातील भागीदार देश आहे. या देशाबरोबरील व्यापारात भारताची आयात कमी आणि निर्यात जास्त असल्याने भारताचा अमेरिकेबरोबरील व्यापार अनुकूल स्वरुपाचा म्हणजेच अधिक परकीय चलन प्राप्त करुन देणारा आहे. अशा या देशाबरोबरचा व्यापार वाढविण्यावर अधिक भर देणे हे एक या धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होते. या धोरणाचा परिणाम म्हणून सध्या अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा भागीदार देश बनला आहे.

७. **आशियाई तसेच युरोपिय देशांशी प्रादेशिक आर्थिक सहकार्य वाढविणे :** भारताच्या दक्षिण आशियाई देश तसेच युरोपियन संघाशी होणारा व्यापार वाढावा, व्यापारातील अडथळे कमी व्हावेत या दृष्टीने

महत्त्वपूर्ण प्रयत्न २०१५-२० च्या धोरणात केले जातील. त्यासाठी या देशाच्या व्यापार संबंधात सुधारणा घडवून आणून या देशासोबत प्रादेशिक आर्थिक सहकार्य वाढविण्यावर अधिक भर देण्याचे निश्चित करण्यात आले.

८. **चीनला निर्यात वाढविणे :** सदर धोरण जाहीर केले त्या कालखंडात म्हणजेच सन २०१४-१५ च्या कालखंडात चीन हा देश भारताचा सर्वात मोठा भागीदार देश होता. तसेच या देशाकडून भारताला होणारी आयात अधिक व भारताची चीनला होणारी निर्यात कमी असल्याने भारताला चीनबरोबरचा व्यापार सातत्याने तुटीचा राहिलेला आहे. त्यामध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने चीनला निर्यात वाढविणे हे २०१५-२० या आयात निर्यात व्यापारविषयक धोरणाचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.

९. **विशेष कक्ष स्थापन करणे :** विविध देशातील वस्तू व सेवांच्या किंमती, मागणी-पुरवठा यांची आयातदार तसेच निर्यातदार व्यापारी यांना माहिती व्हावी, त्यामधून देशाची निर्यात क्षमता वाढावी यासाठी विशेष कक्ष स्थापन करणे यावर या धोरणात भर दिला जाईल.

**१०. स्पर्धक उत्पादन वाढीवर भर :** भारताच्या जागतिक बाजारातील निर्यातीच्या संधी वाढवून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा सामर्थ्य वाढावे तसेच चीनच्या आणि जपानच्या उत्पादनांशी स्पर्धा करू शकेल असे उच्च गुणवत्तापूर्ण उत्पादन निर्माण करणे यासाठी स्पर्धक उत्पादन वाढीवर भर देणे.

**११. भारताचा निर्यात वाढीच्या क्षेत्रात विशेष ब्रँड तयार करणे :** जागतिक व्यापार संघटनेच्या करारामधील तरतुदींना अनुसरून व्यापाराचे भारताला महत्तम लाभ प्राप्त व्हावेत यासाठी भारताच्या वाणिज्य मंत्रालयामार्फत विविध नियमावलीचा मसुदा तयार केला जाईल. त्याच्या आधारे भारत अधिकाधिक सेवा क्षेत्रातील उत्पादनाची मागणी, विक्री, निर्यात इत्यादीबाबत माहिती उपलब्ध करून देऊन देशाला निर्यात वाढीच्या क्षेत्रात विशेष ब्रँड तयार करणे हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे.

**१२. व्यापारवृद्धीसाठी संस्थात्मक कार्यप्रणाली विकसित करणे :** भारताची जागतिक स्तरावरील व्यापारवृद्धी तसेच निर्यातवृद्धी घडून यावी यासाठी २०१५-२० च्या धोरणामध्ये संस्थात्मक कार्यप्रणाली विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून बाजारपेठ संशोधन विभाग व बाजारपेठ विस्तार करण्यासाठी आर्थिक योजनाची अंमलबजावणी केली जाईल तसेच नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर प्रदर्शन केंद्र विकसित केले जाईल. त्याबरोबरच निर्यात संवर्धन मंडळाची पुनर्रचना यासारख्या संस्थात्मक सुधारणा करण्यावर सदर धोरणात भर देण्यात येईल.

**१३. निर्यातवृद्धीसाठी पायाभूत सुविधा निर्मितीवर भर :** भारताची भविष्यकालीन निर्यात क्षमता वाढावी यासाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात पायाभूत सुविधा निर्मितीवर तसेच पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष अर्थसहाय्य मंजूर करण्याचे निश्चित करण्यात आले.

**१४. व्यापारवृद्धीसाठी सेझच्या स्थापनेवर भर :** भारताची भविष्यकालीन निर्यात क्षमता वाढून देशाच्या व्यापारतोलातील तसेच व्यवहारतोलातील असमतोल कमी व्हावा यासाठी देशामध्ये विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) स्थापना करण्यावर केंद्र सरकार भर देईल असे या धोरणात निश्चित करण्यात आले. देशातील वाणिज्य मंत्रालय या सेझच्या माध्यमातून उद्योग तसेच सेवा क्षेत्रातील निर्यात वाढीसाठी प्रयत्न करेल असे निश्चित करण्यात आले.

**१५. राष्ट्रीय उच्चस्तरीय समितीची स्थापना :** भविष्य कालखंडात नवीन उत्पादक तसेच उद्योजकांना जागतिक स्तरावरील व्यापाराच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देता यावी यासाठी राष्ट्रीय स्तरावर एक उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. त्याबरोबरच भारताने आपली व्यापारवृद्धी जागतिक व्यापार संघटनेचे विविध करार व अटींना आधीन राहून करावी यासाठी या उच्चस्तरीय समितीची भूमिका महत्वपूर्ण असेल.

**१६. दोन विशेष यंत्रणांची स्थापना :** भारताची जागतिक व्यापारवृद्धी तसेच निर्यातवृद्धी घडवून आणण्यासाठी व्यापार मंडळ आणि व्यापार विकास आणि वृद्धी मंडळ या दोन महत्वपूर्ण यंत्रणा निर्माण करण्यास सदर विदेशी व्यापार धोरणामध्ये विशेष भर दिलेला दिसतो. यामधील व्यापार मंडळ हे भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीस लागावा यासाठी सल्लागार मंडळ म्हणून कार्य करेल. तर व्यापार विकास आणि वृद्धी मंडळ हे देशातील राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याचे कार्य करेल.

भारताचा अमेरिकेसोबतचा व्यापार वाढविण्यावर अधिक भर देणे, भारताचा दक्षिण आशियाई देश तसेच युरोपियन संघाशी होणारा व्यापार वाढावा, व्यापारातील अडथळे कमी व्हावेत या दृष्टीने प्रादेशिक आर्थिक सहकार्य वाढविण्यावर अधिक भर देण्याचे निश्चित करण्यात आले. भारतातून चीनला निर्यात वाढविणे, देशाची निर्यातक्षमता वाढावी यासाठी विशेष कक्ष स्थापन करणे, स्पर्धक उत्पादन वाढीवर भर देणे, देशाला निर्यात वाढीच्या क्षेत्रात विशेष ब्रँड तयार करणे, निर्यात संवर्धन मंडळाची पुनर्रचना यासारखी संस्थात्मक सुधारणा करणे, पायाभूत सुविधा निर्मितीवर तसेच पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष अर्थसहाय्य मंजूर करणे, देशातील वाणिज्य मंत्रालय या सेझच्या माध्यमातून उद्योग तसेच सेवा क्षेत्रातील निर्यात वाढीसाठी प्रयत्न करेल असे निश्चित करण्यात आले. आपली व्यापारवृद्धी जागतिक व्यापार संघटनेच्या विविध करार व अटींना अधीन राहून करावी यासाठी ही उच्चस्तरीय समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. भारताची जागतिक व्यापारवृद्धी तसेच निर्यातवृद्धी घडवून आणण्यासाठी व्यापार मंडळ आणि व्यापार विकास आणि वृद्धी मंडळ या दोन महत्वपूर्ण यंत्रणा निर्माण करण्यास सदर विदेशी व्यापार धोरणांमध्ये विशेष भर दिलेला असतो. यासारखी महत्वाची वैशिष्ट्ये २०१५-२० च्या विदेशी व्यापार धोरणाची स्पष्ट करता येतील.

### २.३ भारतातील व्यापार प्रशासन :

कोणत्याही व्यवसायामध्ये प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. व्यवसाय प्रशासन किंवा व्यवसाय व्यवस्थापनामध्ये व्यावसायिक उपक्रमांचा कारभार असून यामध्ये व्यवसाय कार्यपध्दतीवर देखरेख ठेवणे आणि त्यांचे निरीक्षण करणे यासारख्या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यवस्थापन आणि नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून व्यवसाय प्रशासनामध्ये कार्यालयीन इमारत प्रशासन, लेखा, वित्त, डिझाईनिंग, विकास, गुणवत्ता आश्वासन, माहिती विश्लेषण, विक्री, प्रकल्प व्यवस्थापन, माहिती-तंत्रज्ञान व्यवस्थापन, संशोधन आणि विकास आणि विपणन इत्यादी क्रियांचा समावेश होतो. व्यवसायाच्या प्रशासनामध्ये व्यवसाय कामकाज आणि निर्णय घेण्याची कार्यक्षमता किंवा व्यवस्थापन, सामान्य उद्दिष्टे तसेच इतर संसाधनांची कार्यक्षम संस्था समाविष्ट असते. प्रशासनामध्ये प्रशासकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून तो व्यवसायामध्ये नियोजन, आयोजन करणे, प्रमुख म्हणून कार्य, समन्वयक तसेच नियंत्रक म्हणून कार्य करीत असतो. वस्तू आणि सेवांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या

अनुषंगाने अमेरिकेच्या वाणिज्य विभागाने जानेवारी २, रोजी १९८० आंतरराष्ट्रीय व्यापार प्रशासन ही एक एजन्सी निर्माण केली आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापार प्रशासन (ITA) :**

आंतरराष्ट्रीय व्यापार प्रशासन ही एक अमेरिकेच्या वाणिज्य विभागातील एक एजन्सी आहे. तिवी निर्मिती २ जानेवारी १९८० रोजी सेवांच्या आणि वस्तू कृषित्तर अमेरिकेच्या उद्देश मुख्य निर्यातीला प्रोत्साहन देणे हा आहे. इंटरनॅशनल ट्रेड ॲडमिनिस्ट्रेशन (ITA) हे अमेरिकेतील उद्योगांची उद्योजकता मजबूत करुन तेथील व्यापार आणि गुंतवणुकील प्रोत्साहन देते. देशातील व्यापार कायदे आणि करारांचे कठोर पालन करुन जागतिक व्यावसायिक वातावरण सुधारण्यासाठी कार्य करते.

**आंतरराष्ट्रीय व्यापार प्रशासनाची महत्त्वाची उद्दिष्टे :**

१) अमेरिकन नागरिकांना योग्य ती बाजारपेठ आणि उत्पादने निवडण्यासाठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणे.

२) अमेरिकेच्या व्यापार करारानुसार आवश्यकतेनुसार अमेरिकन नागरिकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवून देणे.

३) डंपिंग केलेल्या वस्तू आणि अनुदान दिलेल्या वस्तू व सेवांच्या आयातीपासून अमेरिकन लोकांचे संरक्षण करणे.

४) जागतिक व्यापाराद्वारे आर्थिक वाढ आणि समृद्धी वाढवणे.

व्यापार प्रशासन म्हणजे निवडक लक्ष्य प्रभावीपणे साध्य करता येईल. अशा स्वरूपाची वातावरण रचना आणि समर्थन करण्याची प्रक्रिया हीच म्हणजेच 'व्यवसाय प्रशासन ही रोजच्या व्यवसायावर नियंत्रण ठेवण्याची एक कला आहे.' व्यवसाय प्रशासन तत्त्वे तसेच नियमावली जेव्हा व्यापारास लागू केली व त्या आधारे व्यापाराचे फायदे प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हा त्यास व्यापार प्रशासन असे म्हणतात. जगातील कोणत्याही देशाच्या दृष्टीने व्यापार प्रशासन अत्यंत महत्त्वपूर्ण असते. भारतासारख्या देशाला देखील व्यापार प्रशासनाची आवश्यकता असते. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार प्रशासनाच्या धर्तीवर भारताच्या व्यापार प्रशासनामध्ये बदल केल्यास भारताला देखील आंतरराष्ट्रीय व्यापारमध्ये अनेक फायदे होऊ शकतात.

**व्यापार प्रशासनाचे फायदे :** व्यापार प्रशासनाच्या अवलंब करणाऱ्या देशांना अनेक प्रकारचे फायदे प्राप्त होतात. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) व्यापार प्रशासनाचा अवलंब केल्यास व्यापार आणि गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळते.

२) व्यापार विषयक कायदे आणि कराराच्या अंमलबजावणीद्वारे देशात तसेच विदेशात फायदेशीर व्यापारावी हमी व्यापार प्रशासन देते.

३) लक्ष केंद्रीत निर्यात सहाय्य आणि मार्केट रिसर्च यासारख्या सुविधा प्राप्त करुन देऊन व्यापार वाढीची संधी निर्माण करुन देण्यास व्यापार प्रशासन मदत करते.

४) व्यापार प्रशासन वस्तू व सेवांची निर्यात करण्यास, बाजारातील अडथळे दूर करण्यास आणि परदेशी गुंतवणूकीस प्रोत्साहित करण्यास मदत करते.

५) उद्योग आणि विश्लेषण आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक आणि विविध उद्योग आणि क्षेत्रांमध्ये निर्यात प्रोत्साहन यावर भर देते.

६) व्यापार प्रशासनांतर्गत निर्यातवृद्धीसाठी देशी उत्पादनाचे परदेशी व्यापार मेळावे आणि निर्यात जाहिरात कार्यक्रमाची अंमलबजावणी यासारखे कार्यक्रम राबविते.

७) व्यापारातील अनुचित डंपिंग आणि सबसिडी यासारख्या बाबींचा तपास करणे आणि त्याविरोधी योग्य ती उपाययोजना करण्याचे कार्य व्यापार प्रशासन करते.

८) आंतरराष्ट्रीय व्यापारातील विविध व्यापार कराराचे निरीक्षण करुन त्याचे योग्य पद्धतीने पालन केले जाते का यावर व्यापार प्रशासन लक्ष देते.

९) व्यापार प्रशासनाच्या मदतीने देशाची निर्यात वाढण्यास मदत होते.

१०) देशाची अन्य देशाकडून होणारी आयात नियंत्रणात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य व्यापार प्रशासन करते.

११) व्यापार प्रशासनाच्या मदतीने देशाची निर्यात वाढल्याने आणि आयात कमी झाल्याने व्यवहारतोल आणि व्यापारतोल समतोलात येण्यास मदत होते.

व्यापार प्रशासनाचा अवलंब केल्यास व्यापार आणि गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळते. विदेशात फायदेशीर व्यापाराची हमी व्यापार प्रशासन देते. व्यापार वाढीची संधी निर्माण करुन देण्यास मदत, परदेशी गुंतवणूकीस प्रोत्साहित करणे, परदेशी व्यापार मेळावे आणि निर्यात जाहिरात कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, व्यापारातील अनुचित डंपिंग आणि सबसिडी यासारख्या बाबींचा तपास करणे आणि त्याविरोधी योग्य ती उपाययोजना करणे, व्यापार कराराचे निरीक्षण करून त्याचे योग्य पद्धतीने पालन यावर लक्ष देणे. निर्यात वाढण्यास मदत, आयात नियंत्रणात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य करते तसेच व्यवहारतोल आणि व्यापारतोल समतोलात येण्यास मदत होते. यावरून व्यापार प्रशासनाची भूमिका किती महत्वपूर्ण आहे ते स्पष्ट होण्यास मदत होते.

## २.४ रुपयाची परिवर्तनियता :

जेव्हा एखाद्या देशाच्या चलनाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन सहज रुपांतरित करता येत असेल तर त्यास चलनाची परिवर्तनियता असे म्हणतात. त्याप्रमाणेच जेव्हा रुपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन सहज रुपांतरित करता येत असेल तर त्यास रुपयाची परिवर्तनियता असे म्हणतात. थोडक्यात नागरिकांना एका देशाचे चलन देऊन बाजारातून दुसऱ्या देशाचे चलन सहज खरेदी करता येणे म्हणजेच चलनाची परिवर्तनियता होय. चलन परिवर्तनीयतेचा अर्थ असा होतो की, जेव्हा एखाद्या देशाचे चलन मुक्तपणे दुसऱ्या देशाच्या चलनामध्ये रुपांतरित केली जाऊ शकते. रुपयाची परिवर्तनियता म्हणजे अमेरिकन डॉलर्स, पौंड स्टर्लिंग्ज

यासारख्या परकीय चलनाचे रुपयामध्ये सहज रुपांतरण होऊ शकते. सध्या भारतीय रुपया व्यवहारतोलाच्या चालू खात्यावर पूर्ण परिवर्तनीय आहे.

**रुपयाची परिवर्तनियता प्रकार :**

आंतरराष्ट्रीय नाणे निधीचा सभासद या नात्याने भारताने सर्व सभासद राष्ट्रांच्याबरोबर मुक्तपणे परकीय चलनाच्या देवाण-घेवाणीचे धोरण मान्य केले असले, तरी भारतीय रिझर्व्ह बँकेने परकीय विनिमय नियंत्रण कायद्यांतर्गत (FERA - 1973) विनिमय नियंत्रणाची बहुव्यापक (Comprehensive Systgem of Exchange Control) पध्दती स्वीकारली. रुपयाच्या परिवर्तनियतेचे अंशत: परिवर्तनीयता, पूर्णत: परिवर्तनीयता, व्यापारी खात्यावरील रुपयाची परिवर्तनीयता, चालू खात्यावरील रुपयाची परिवर्तनियता, भांडवली खात्यावरील परिवर्तनियता हे मुख्य प्रकार आहेत.

**१. रुपयाची अंशत: परिवर्तनियता : (Partially Convertibility of Rupee)**

रुपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन खरेदी करताना त्यावर काही बंधने असतील तर त्यास रुपयाची अंशत: परिवर्तनियता असे म्हणतात. उदारीकरणाचा भाग म्हणून भारतीय रुपयाच्या परिवर्तनियतेस दुहेरी विनिमय दर धोरणाने सुरुवात झाली. परंतु ते पूर्ण परिवर्तन नव्हते, यामध्ये ४० टक्के विनिमय व्यवहारावर बंधने होती, ६० टक्के रक्कम मुक्तपणे परिवर्तनीय असल्याने यामधून परकीय चलन वाढेल अशी अपेक्षा होती. त्यामधूनच १९९०-९१ मध्ये असणारे ५.८ बिलीयन डॉलर असणारे परकिय चलन १९९४-९५ मध्ये २५.२ बिलीयन डॉलर पर्यंत वाढले. अशा स्वरुपाच्या परिवर्तनियतेला रुपयाची अंशत: परिवर्तनियता असे म्हणतात. थोडक्यात जेव्हा एकूण परकिय चलनापैकी काही चलनाची खरेदी रिझर्व्ह बँकेने ठरविलेल्या अधिकृत दराने व काही चलनाची बाजार विनिमय दराने केली जाते तेव्हा त्यास रुपयाची अंशत: परिवर्तनियता असे म्हणतात.

**२. रुपयाची पूर्णत: परिवर्तनियता : (Full Convertibility of Rupee)**

रुपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन बाजार विनिमय दरानुसार सहज कोणत्याही बंधनाशिवाय उपलब्ध होणे म्हणजे रुपयाची पूर्णत: परिवर्तनियता होय.

**३. व्यापारी खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता : (Full Convertibility of Rupee on Merchant Account)**

जेव्हा व्यापारी खात्यावरील व्यवहारांसाठी रुपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन आवश्यक तेवढ्या प्रमाणात, कोणत्याही अटी किंवा बंधनाशिवाय बाजार विनिमय दराप्रमाणे खरेदी करता येत असेल तर त्यास व्यापारी खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता असे म्हणतात. सन १९९३-९४ मध्ये भारतीय रुपया व्यापारी खात्यावरील व्यवहारासाठी म्हणजे दृश्य स्वरुपाचा वस्तूंच्या आयातीसाठी आवश्यक परकिय चलन, रुपयाच्या मोबदल्यात पूर्णपणे कोणत्याही बंधनाशिवाय देण्यास सुरुवात झाली. यालाच व्यापारी खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता असे म्हणतात.

**४. चालू खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता : (Full Convertibility of Rupee on Current Account)**

जेव्हा व्यवहारतोलाच्या चालू खात्यावरील व्यवहारांसाठी रुपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन आवश्यक तेवढ्या प्रमाणात, कोणत्याही अटी किंवा बंधनाशिवाय बाजार विनिमय दराप्रमाणे खरेदी करता येत असेल, तर त्यास चालू खात्यावरील रुपयाची पूर्ण परिवर्तनियता असे म्हणतात. १९ ऑगस्ट, १९९४ रोजी चालू खात्यावरील व्यवहार म्हणजे दृश्य वस्तू व अदृश्य सेवांच्या आयातीसाठी आवश्यक परकीय चलन रुपयांच्या मोबदल्यात कोणत्याही बंधनाशिवाय देण्यास सुरुवात झाली. यालाच भारतीय रुपयाची व्यवहारतोलाच्या चालू खात्यावरील पूर्ण परिवर्तनियता असे म्हणतात.

**५. भांडवली खात्यावरील परिवर्तनियता : (Rupee Convertibility on Capital Account)**

जेव्हा व्यवहारतोलाच्या भांडवली खात्यावरील व्यवहारांसाठी रुपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन आवश्यक तेवढ्या प्रमाणात, कोणत्याही अटी किंवा बंधनाशिवाय बाजार विनिमय दराप्रमाणे खरेदी करता येत असेल, तर त्यास भांडवली खात्यावरील रुपयाची परिवर्तनियता असे म्हणतात. म्हणजेच परकीय कर्ज, परकीय गुंतवणूक यासारख्या भांडवली व्यवहारासाठी रुपया सहज रुपांतरित करता येणे होय.

**पहिली तारापोर समिती :** भांडवली खात्यावरील परिवर्तनियतेच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने एस.एस. तारापोर समिती ८ फेब्रुवारी, १९९७ रोजी नेमली. याच वर्षी या समितीने अहवाल सादर केला. सन १९९९-२००० अखेर तीन टप्प्यामध्ये भारताच्या व्यवहारतोलाच्या भांडवली खात्यावर रुपया पूर्ण परिवर्तनिय बनविण्याची शिफारस केली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वित्तीय क्षेत्राचा सखोल अभ्यास करुन भांडवली खात्यावरील रुपयाच्या पूर्ण परिवर्तनियतेच्या संदर्भात शिफारशी करण्यासाठी सदर समितीचे गठन केले गेले. सन १९९९-२००० पर्यंत या सर्व पूर्व अटीची पूर्तता भारतीय अर्थव्यवस्था करत असेल तर भारतीय रुपया भांडवली खात्यावर पूर्ण परिवर्तनीय करावा, अशी शिफारस करण्यात आली. परंतु १९९७-२००० हा कालावधी वरील पूर्व अटीची पूर्तता करण्यास अगदीच कमी होता, तसेच या दरम्यानच्या कालावधीमध्ये जुलै १९९७ मध्ये पूर्व आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक संकट निर्माण झाले व ज्या राष्ट्रांनी त्यांचे चलन भांडवली खात्यावर पूर्ण परीवर्तनिय केले होते ती राष्ट्रे संकटामध्ये सापडल्याने भारतीय अर्थव्यवस्थेमधील भांडवली खात्यावरील रुपयाच्या परिवर्तनियतेकडे सरकारने दुर्लक्ष केले.

**दुसरी तारापोर समिती :** भांडवली खात्यावरील परिवर्तनियतेच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने दुसरी तारापोर समिती १ फेब्रुवारी २००६ रोजी नेमली. या समितीने ३१ जुलै २००६ रोजी आपला अहवाल सादर केला की जो आर.बी.आय. ने १ सप्टेंबर २००६ रोजी जाहीर केला. परंतु भारत सरकारने अजूनही रुपया भांडवली खात्यावर पूर्ण परीवर्तनीय केलेला नाही.

## २.३ सारांश :

नवीन आर्थिक धोरणाचा भाग म्हणून भारताने १९९१ मध्ये उदारीकरण स्वीकारले. या धोरणा अंतर्गत परवाना पध्दती तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारावरील अनेक बंधने शिथील केली. दुहेरी विनिमय दर पध्दती अंतर्गत

१९९२-९३ मध्ये व्यापारी खात्यावरील आंशिक परिवर्तनियता स्विकारली. परकिय चलनाच्या देवाण-घेवाणीमध्ये जेव्हा दोन प्रकारच्या विनिमय दरांचा अवलंब करुन विनिमय व्यवहार पूर्ण केले जातात. तेव्हा, त्यास दुहेरी विनिमय दर पध्दती असे म्हणतात. त्यामध्ये अधिकृत विनिमय दर व बाजार व विनिमय यांचा समावेश होतो. जो विनिमय दर मध्यवर्ती बँकेमार्फत नियंत्रित केला जातो त्यास अधिकृत किंवा नियंत्रित विनिमय दर असे म्हणतात. दुहेरी विनिमय दरानुसार ४० टक्के परकिय चलनाची रक्कम ही अधिकृत विनिमय दरानुसार देशी चलनामध्ये परावर्तीत करुन दिली जात होती व ती रक्कम रिझर्व्ह बँकेकडून महत्वपूर्ण अशा वस्तूंच्या आयातीसाठीच उपलब्ध करुन दिली जात असे. ज्या विनिमय दरात मुक्तपणे बदल होत असतो किंवा जो बाजार परिस्थितीनुसार ठरतो, त्यास बाजार विनिमय दर असे म्हणतात. या दुहेरी विनिमय दरानुसार ६० टक्के परकीय चलनाची रक्कम ही बाजार विनिमय दरानुसार देशी चलनामध्ये परावर्तीत करुन दिली जात होती व ती रक्कम चालू खात्यावरील व्यवहारांसाठी तसेच देणी भागविण्यासाठी वापरण्याची मुभा होती. भांडवली खात्यावरील रुपयाच्या पूर्ण परिवर्तनियतेच्या संदर्भात १९९७-२००० हा कालावधी पूर्व अटीची पूर्तता करण्यास अगदीच कमी होता, तसेच या दरम्यानच्या कालावधीमध्ये जुलै १९९७ मध्ये पूर्व आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक संकट निर्माण सापडल्याने भारतीय अर्थव्यवस्थेमधील भांडवली खात्यावरील रुपयाच्या परिवर्तनियतेकडे सरकारने दुर्लक्ष केले. भांडवली खात्यावरील परिवर्तनियतेच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने दुसरी तारापोर समिती १ फेब्रुवारी २००६ रोजी नेमली. या समितीने ३१ जुलै २००६ रोजी आपला अहवाल सादर केला की जो आर.बी.आय. ने १ सप्टेंबर २००६ रोजी जाहीर केला. परंतु भारत सरकारने अजूनही रुपया भांडवली खात्यावर पूर्ण परिवर्तनीय केलेला नाही.

## २.४ खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. :

१. ------ रोजी चालू खात्यावरील व्यवहारांसाठी रूपया पूर्ण परिवर्तनीय केला.

अ) ऑगस्ट, १९९३ ब) ऑगस्ट, १९९४

क) ऑगस्ट, १९९५ ड) ऑगस्ट, १९९६

२. भारताच्या ------ मध्ये पेट्रोलियम, ऑईल आणि लुबरिकंट्स ही सर्वात महत्त्वाची वस्तू आहे.

अ) निर्यात व्यापार रचना ब) आयात व्यापार दिशा

क) आयात व्यापार रचना ड) निर्यात व्यापार आकारमान

३. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या आयात व्यापाराचे आकारमान ------ कोटी रूपये एवढे होते.

अ) ६०३ ब) ६०५ क) ६०६ ड) ६०८

४. एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांना किती रकमेच्या वस्तू व सेवांची निर्यात करतो, त्यास त्या देशाच्या निर्यात व्यापाराचे ------ असे म्हणतात.

अ) आकारमान ब) दिशा क) रचना ड) यापैकी नाही

५. एखादा देश कोणकोणत्या देशांकडून वस्तू व सेवांची आयात करतो व एकूण आयातीमध्ये प्रत्येक देशाच्या आयातीचे प्रमाण किती आहे, त्यास त्या देशाच्या आयात व्यापाराची ------ असे म्हटले जाते.

अ) आकारमान ब) दिशा क) रचना ड) यापैकी नाही

६. भारताच्या आयात व्यापाराच्या दिशेमध्ये जवळपास ------ देश सहभागी होतात.

अ) १४० ब) १६० क) १८०ड) २००

७. सन २०२०-२१ या कालखंडात भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेमध्ये ------ विभाग पहिल्या क्रमांकावर आहे.

अ) युरोप ब) अमेरिका क) आशिया व आसियान ड) यापैकी नाही

८. भारताच्या तत्कालीन वाणिज्य मंत्री निर्मला सितारामन यांनी ------ या कालावधीसाठी नवीन विदेशी व्यापार धोरण जाहीर केले.

अ) २०१५ ते २०२० ब) २०१६ ते २०२१

क) २०१७ ते २०२२ ड) २०१८ ते २०२३

९. भारताचा जागतिक व्यापारातील २०१५ मध्ये २ टक्के असणारा वाटा सन २०२० पर्यंत ----- पर्यंत वाढविणे हे २०१५-२० आयात-निर्यात धोरणाचे मुख्य उद्दिष्टे होते.

अ) ३.० टक्के ब) ३.५ टक्के क) ४.० टक्के ड) ४.५ टक्के

१०. भांडवली खात्यावरील परिवर्तनियतेच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने एस. एस. एस. तारापोर समिती ------ मध्ये नेमली.

अ) फेब्रुवारी १९९७ ब) मार्च १९९७ क) एप्रिल १९९७ ड) मे १९९७

**२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | ब. ऑगस्ट, १९९४ | ६. | अ. | १४० |
| २. | क. आयात व्यापार रचना | ७. | ब. | अमेरिका |
| ३. | ड. ६०८ | ८. | अ | २०१५ ते २०२० |
| ४. | अ. आकारमान | ९. | ब. | ३.५ टक्के |
| ५. | ब. दिशा | १०. | अ. | फेब्रुवारी १९९७ |

२.६ पारिभाषिक शब्द :

**१) परकीय व्यापाराची रचना :** एखादा देश कोणकोणत्या वस्तू आणि सेवांची आयात-निर्यात करतो व प्रत्येक वस्तूचे व्यापारामधील प्रमाण काय आहे यास त्या देशाच्या परकिय व्यापाराची रचना असे म्हणतात.

**२) परकीय व्यापाराचे आकारमान :** एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील अन्य देशांबरोबर किती रकमेच्या वस्तुंचा व्यापार करतो त्यास त्या देशाच्या परकीय व्यापाराचे आकारमान असे म्हणतात.

**३) आयात व्यापाराचे आकारमान :** एखादा देश विशिष्ट कालखंडा मध्ये जगातील अन्य देशांकडून किती रकमेच्या वस्तू व सेवांची आयात करतो त्यास त्या देशाच्या आयात व्यापाराचे आकारमान असे म्हणतात.

**४) परकिय व्यापाराची दिशा :** एखादा देश विशिष्ट कालखंडामध्ये जगातील कोणकोणत्या देशांबरोबर व्यापार करतो त्यास त्या देशाच्या परकीय व्यापाराची दिशा असे म्हंटले जाते.

**५) रूपयाची परिवर्तनियता :** रूपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन सहज रूपांतरित करता येत असेल तर त्यास रूपयाची परिवर्तनियता असे म्हणतात.

**६) रूपयाची अंशतः परिवर्तनियता :** रूपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन खरेदी करताना त्यावर काही बंधने असतील तर त्यास रूपयाची अंशतः परिवर्तनियता असे म्हणतात.

**७) रूपयाची पूर्णतः परिवर्तनियता :** रूपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन बाजार विनिमयदरानुसार सहज उपलब्ध होणे म्हणजे रूपयाची पूर्णतः परिवर्तनियता होय.

**८) व्यापारी खात्यावरील रूपयाची पूर्ण परिवर्तनियता :** जेव्हा व्यापारी खात्यावरील व्यवहारांसाठी रूपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन आवश्यक तेवढ्या प्रमाणात, कोणत्याही अटी किंवा बंधनाशिवाय बाजार विनिमय दराप्रमाणे खरेदी करता येत असेल तर त्यास व्यापारी खात्यावरील रूपयाची परिवर्तनियता असे म्हणतात.

**९) चालू खात्यावरील रूपयाची पूर्ण परिवर्तनियता :** जेव्हा व्यवहारतोलाच्या चालू खात्यावरील व्यवहारांसाठी रूपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन आवश्यक तेवढ्या प्रमाणात, कोणत्याही अटी किंवा बंधनाशिवाय बाजार विनिमय दराप्रमाणे खरेदी करता येत असेल, तर त्यास चालू खात्यावरील रूपयाची परिवर्तनियता असे म्हणतात.

**१०) भांडवली खात्यावरील परिवर्तनियता :** जेव्हा व्यवहारतोलाच्या भांडवली खात्यावरील व्यवहारांसाठी रूपयाच्या मोबदल्यात दुसऱ्या देशाचे चलन आवश्यक तेवढ्या प्रमाणात, कोणत्याही अटी किंवा बंधनाशिवाय बाजार विनिमय दराप्रमाणे खरेदी करता येत असेल, तर त्यास भांडवली खात्यावरील रूपयाची परिवर्तनियता असे म्हणतात.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय :

### अ) टीपा लिहा

१. आयात व्यापाराची रचना

२. निर्यात व्यापाराचे आकारमान

३. परकीय व्यापाराची दिशा

४. भारताचे २०१५-२० चे आयात-निर्यात धोरण

५. २०१५-२० आयात-निर्यात धोरणाची वैशिष्ट्ये

६. व्यापार प्रशासनाचे फायदे

७. रूपयाची अंशत: परिवर्तनियता

८. रूपयाची पूर्णत: परिवर्तनियता

९. व्यापारी खात्यावरील रूपयाची परिवर्तनियता

१०. चालू खात्यावरील रूपयाची परिवर्तनियता

११. भांडवली खात्यावरील परिवर्तनियता

### ब) दिर्घोत्तरी प्रश्न :

१. भारताच्या परकीय व्यापाराची रचना स्पष्ट करा.

२. भारताच्या परकीय व्यापाराचे आकारमान स्पष्ट करा.

३. भारताच्या विदेशी व्यापाराची दिशा स्पष्ट करा.

४. भारताच्या २०१५-२० आयात-निर्यात धोरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५. रूपयाची परिवर्तनियता म्हणजे काय ते सांगून रूपयाची परिवर्तनियतेचे प्रकार स्पष्ट करा.

६. भारतातील व्यापार प्रशासन स्पष्ट करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


१. Mathur Reeta (2002) : International Economics, Sublme Publication, Jaipur

२. Economic Survey of India 2020-21 Ministry of Finance Dept. of Economic Affairs Govt. of India.

३. झांबरे जी. एन. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र. (पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपूर)

४. वावरे ॲन्ड घाडगे (जून २०१५) : आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.

५. शिंदे ॲन्ड सत्रे (२०१७) : भारतीय अर्थव्यवस्था, अजित पब्लिकेशन, इस्लामपूर.


***

# घटक – ३
# भारतातील विदेशी भांडवल
# (Foreign Capital in India)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.३.१ विदेशी भांडवलाचा अर्थ आणि गरज

३.२.२ विदेशी भांडवलाचे प्रकार

३.२.३ भारत सरकारचे विदेशी भांडवलाचे धोरण

३.२.४ भारतातील थेट परकीय गुंतवणूकीची प्रवृत्ती

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे (Objectives) :

सदर प्रकरणाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे आहेत.

१) विदेशी भांडवलाचा अर्थ सांगणे.

२) विदेशी भांडवलाचे विविध प्रकार स्पष्ट करणे.

३) विदेशी भांडवलाची गरज विशद करणे.

४) भारतातील थेट परकीय गुंतवणूकीचा अभ्यास करणे.

५) भारत सरकारचे परकीय भांडवल विषयक धोरण अभ्यासणे.

### ३.१ प्रास्ताविक :

देशाच्या विकासाच्या दृष्टीने भांडवल हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. विकसनशील देशामध्ये देशांतर्गत भांडवल निर्मितीचा वेग कमी असल्याने भांडवल अपुरे पडते. या बरोबरच राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न अतिशय कमी असल्याने वित्तीय तूट निर्माण होते. ती वित्तीय तूट भरून काढण्यासाठी विदेशी भांडवलाची गरज असते. अनेक देशात आर्थिक विकासासाठी विदेशी भांडवलाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. विकसनशील देशात दारिद्र्याचे प्रमाण अधिक असल्याने दारिद्र्य निवारण व आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी विदेशी भांडवल उपयुक्त ठरते. याशिवाय देशांतर्गत उपलब्ध नैसर्गिक व मानवी साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी भांडवलाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. मात्र विकसनशील देशांत भांडवलाची टंचाई असल्याने विदेशी भांडवल उपयुक्त ठरते.

भारतासारख्या विकसनशील देशाला आर्थिक विकासासाठी विदेशी भांडवलाचे सहाय्य महत्त्वाचे आहे. भारताने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणांमध्ये विदेशी भांडवलाबाबत उदार धोरण स्वीकारल्यामुळे देशात परकीय भांडवल गुंतवणूकीला चालना मिळाली. त्यानंतरच खऱ्या अर्थाने भारतामध्ये थेट परकीय गुंतवणूकीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

सामान्यपणे राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्याने बचतीचा दर कमी, बचतीचा दर कमी असल्याने गुंतवणूक कमी परिणामी आर्थिक विकासाचा दर कमी अशा दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात अर्थव्यवस्था अडकलेल्या असतात. अशा परिस्थितीत दारिद्र्याचे दृष्टचक्र भेदण्यासाठी आणि आर्थिक विकासाचा दर उंचावण्यासाठी परदेशातून भांडवलाची आयात करावी लागते. प्रस्तुत प्रकरणात विदेशी भांडवलाची संकल्पना, विदेशी भांडवलाचे प्रकार, विदेशी भांडवलाची गरज, भारताचे विदेशी भांडवलाबाबतचे धोरण आणि भारतातील थेट परकीय गुंतवणूक प्रवृत्ती याची चर्चा केली आहे.

### ३.२ विषय विवेचन :

भारतातील परकीय भांडवलाचे अनेक स्त्रोत उपलब्ध आहेत. त्यामध्ये थेट परकीय गुंतवणूक हा त्यामधील एक महत्त्वाचा स्त्रोत होय. १९९१ नंतर या स्त्रोतातून भारतामध्ये मोठ्या प्रमाणात परकीय भांडवल आले. आर्थिक विकासाचा पाया म्हणून भांडवलाकडे पाहिले जाते. अनेक विकसनशील देशांना परकीय भांडवलाची गरज आहे.

परकीय भांडवलाचा अर्थ एखाद्या देशातील भांडवलाची गुंतवणूकीसाठी इतर देशांकडून किंवा आंतरराष्ट्रीय संस्थाकडून आणलेली साधनसामग्री होय. परकीय भांडवल म्हणजे परदेशातील लोकांनी त्यांच्या बचतीचा विशिष्ट भाग दुसऱ्या देशाच्या आर्थिक विकासासाठी उपलब्ध केलेला असतो. परकीय भांडवलाचा अर्थ असा ही सांगता येतो की, 'देशात गुंतवणूकीच्या उद्देशाने देशाच्या भौगोलिक सीमेबाहेरील देशातून येणारे भांडवल होय.' उदा- भारतात अमेरिकेमधून येणारे भांडवल असे भांडवल खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातून येते. आंतरराष्ट्रीय स्तरावर

असणाऱ्या अनेक संस्थामधून देखिल परकीय भांडवल उपलब्ध होते. उदा– आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक इ. यासारख्या संस्थानी अनेक देशांत कर्जे, मदत, अनुदान व देणगी इ. स्वरूपात केलेली गुंतवणूक देखील परकीय भांडवल संबोधली जाते.

### ३.२.१ परकीय भांडवलाची गरज (Need of Foreign Capital) :

विकसनशील देशात जलद विकासाची गरज असते. त्यासाठी त्यांना यंत्रसामग्री, तांत्रीक ज्ञान, यंत्राचे सुटे भाग, प्रसंगी कच्चा माल आयात करावा लागतो. अशा आयातीचे देणे देण्यासाठी निर्यातीत वाढ करावी लागते. पण विकसनशील देशांच्या निर्यातीत तात्काळ वाढ होत नाही. म्हणून असे देश परकीय भांडवल या मार्गाचा अवलंब म्हणून करतात. त्यादृष्टीने परकीय भांडवलाची गरज विकसनशील देशाच्या आर्थिक विकासात आहे ते पुढील मुद्याच्या आधारे सांगितले आहे.

**१) अपुरे देशांतर्गत भांडवल :**

अनेक विकसनशील देशामध्ये भांडवलाची टंचाई असते. कारण मुळात हे देश गरीब असतात. अल्प उत्पन्न असल्याने बचतीचे प्रमाण अल्प राहते. त्यामुळे भांडवल निर्मितीचा वेग मंद राहतो. तेव्हा अशा देशाच्या आर्थिक विकासासाठी भांडवलाची गरज देशांतर्गत भांडवल पूर्ण करू शकत नाही, त्यामुळे अशा देशांना परकीय भांडवलाची गरज भासते. परकीय भांडवलामुळे बचत व गुंतवणूक यामधील फरक भरून काढता आल्याने देशाच्या विकासाला चालना मिळते.

**२) प्रारंभिक धोका स्वीकारण्यासाठी :**

अनेक विकसनशील देशात धाडशी उद्योजकांची दुर्मिळता असते. अनुभव व उपक्रमशीलता यांच्या अभावामुळे भांडवल योग्य ठिकाणी गुंतविले जात नाही. तसेच उद्योग क्षेत्रात प्रारंभिक धोक्याचे प्रमाण जास्त असते. असे धोके स्वीकारण्याचे धाडस उद्योजकांमध्ये नसते. परिणामी ते गुंतवणूक करण्यासाठी पुढे येत नाहीत. त्यामुळे उद्योग क्षेत्रावर त्यांचा वाईट परिणाम होतो. परकीय भांडवलाने अशा धोक्याचे नियंत्रण करता येते.

**३) नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्यासाठी :**

विकसनशील देशाकडे नैसर्गिक साधनसामग्री मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते. मात्र अशा सामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी त्यांच्याकडे भांडवलाची कमतरता असते. देशाची ढासळलेली अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी करून देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होणे आवश्यक आहे. उदा – आफ्रिका खंडामध्ये नैसर्गिक विज निर्मिती क्षमता ४०% इतकी आहे. परंतु भांडवलाअभावी केवळ ०.०६ टक्के इतकीच वीज निर्मिती आफ्रिका खंडात केली जाते. देशातील नैसर्गिक साधनाचा पर्याप्त वापर करण्यासाठी परकीय भांडवलाची गरज आहे.

**४) नवीन तंत्रज्ञानाचा फायदा घेण्यासाठी :**

देशाच्या आर्थिक विकासामध्ये तंत्रज्ञानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणत्याही देशाचा विकास हा

संशोधन आणि तंत्रज्ञान यावर अवलंबून असतो. संशोधन तंत्रज्ञानामुळे उत्पादनाचा दर्जा वाढविता येतो. विकसनशील देशात सर्व क्षेत्रात परंपरागत तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याने उत्पादनाचा दर्जा खालावतो उत्पादन खर्चही वाढतो. उत्पादनाचा दर्जा वाढविण्यासाठी आणि उत्पादन खर्च कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. असे नवीन तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी परकीय भांडवलाची गरज असते.

**५) देशांतर्गत बचतीना प्रेरणा देण्यासाठी :**

विकसनशील देशामध्ये बचतीचा वेग कमी असतो. तसेच विकासाच्या प्राथमिक अवस्थेत विकसनशील देशांतील भांडवल बाजार मुळातच अप्रगत असतो. तात्पुरता उपाय म्हणून परकीय भांडवल या काळात भांडवल बाजाराच्या विकासाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असते. परकीय भांडवलाची अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात गुंतवणूक केल्यास देशातील राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात वाढ होईल. त्यामुळे बचत वाढण्यास मदत होईल. याशिवाय देशामध्ये विस्तृत अशा बँकिंग सुविधा निर्माण केल्यास आणि लोकांना बचतीसाठी प्रोत्साहन दिल्यास बचतीचा वेग वाढू शकतो. या सर्वांसाठी परकीय भांडवलाची गरज आहे.

**६) पायाभूत सुविधांच्या विकासासाठी :**

अनेक विकसनशील देशात देशांतर्गत भांडवल आर्थिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी खूपच अपुरे पडते. तेव्हा अशा प्रकारच्या सुविधा निर्माण करण्यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात परकीय भांडवलाची गरज असते. अलीकडे अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आणि विकसित देशांनी विकसनशील देशांना पुरेसे भांडवल उपलब्ध करून दिले आहे. विशेषत: वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा, विजेची निर्मिती, वितरण, सिंचन सुविधांचा विकास इत्यादीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाचा पुरवठा केला आहे. थोडक्यात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी परकीय भांडवलाची गरज असते.

**७) मुलभूत व अवजड उद्योग :**

लोखंड व पोलाद, इंजिनिरिंग, रासायनिक, विमान, रेल्वे, खते, जहाजबांधणी इ. मुलभूत व अवजड उद्योग उभारणे व त्यांचा विकास करणे यासाठी प्रचंड प्रमाणात गुंतवणूकीची आवश्यकता असते. मात्र इतके भांडवल विकसनशील देशाकडे उपलब्ध नसते. त्यात विकसनशील देशात भांडवल निर्मितीचा वेग मंद असतो. त्यामुळे अशा उद्योगाच्या विकासासाठी विकसनशील देशाला परकीय भांडवलाची आवश्यकता असते.

**८) रोजगार संधी निर्माण करणे :**

विकसनशील देशामध्ये प्राथमिक क्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी जास्त लोकसंख्या कार्यरत असते. कारण देशातील उद्योगक्षेत्राचा फारसा विकास झालेला नसतो. देशातील शिक्षणाचा विकास झालेला नसतो. त्यामुळे बेकारांची संख्या वाढलेली असते. बेकारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकासाला चालना दिल्यास प्राथमिक क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्येच्या औद्योगिक क्षेत्रात रोजगार उपलब्ध होतो. देशातील ही बेकारी कमी करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात परकीय भांडवलाची गरज भासते.

**९) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ करणे :**

परकीय भांडवलाच्या सहाय्याने दोन्ही देशांना आर्थिक फायदा होतो. ज्या देशाला भांडवल उपलब्ध करून दिले त्या देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते आणि ज्या देशाने ते भांडवल दिले त्या देशाला भांडवलावर व्याज किंवा इतर कराराप्रमाणे मोबदला प्राप्त होतो. त्यामुळे दोन्ही देशामधील सहकार्यात वृद्धी होते. आर्थिक करारासोबत दोन देशात सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक सहकार्य वाढण्यास मदत होते. त्यासाठी परकीय भांडवलाची गरज भासते.

**१०) स्पर्धात्मक क्षमता विकसीत करणे :**

२१ वे शतक हे स्पर्धेचे शतक मानले जाते. त्यामुळे देशाच्या कृषी, उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रात स्पर्धात्मक क्षमता विकसीत करणे गरजेचे असते. या स्पर्धात्मक क्षमतेमुळे विकसीत देशातील विविध अंगाशी तुलना करून आपण नेमके कोठे आहोत या संदर्भातील वस्तुस्थिती समजण्यास मदत होते. परकीय भांडवलामुळे देशात वेगवेगळ्या उद्योगांची स्थापना होऊन देशातील उद्योग व परकीय भांडवलामुळे स्थापन झालेले उद्योग यांच्यात स्पर्धा निर्माण होते. या उद्योगातून निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवाची गुणवत्ता व किंमत यामध्ये तुलना होते. थोडक्यात परकीय भांडवलामुळे देशी उद्योगात स्पर्धात्मक क्षमता वाढविण्यासाठी परकीय भांडवलाची गरज भासते.

**११) व्यवहारतोलाची समस्या सोडविणे :**

विकसनशील देशांना आर्थिक विकासाच्या सुरूवातीच्या अवस्थेत प्रतिकूल व्यवहारतोलाच्या समस्येला तोंड द्यावे लागते. कारण अशा देशात विकासासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रे, भांडवली वस्तू, औद्योगिक कच्चा माल, यंत्राचे सुटे भाग इ. मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते. त्यामानाने त्यांची निर्यात अत्यंत कमी व प्राथमिक वस्तुंची असते. त्यामुळे त्या देशाचा व्यवहारतोल प्रतिकूल बनतो. परकीय चलन, उत्पन्न व खर्च यात तफावत निर्माण होते. या समस्येचे अल्पकाळात निराकरण करणे परकीय भांडवलाने शक्य होते. त्यासाठी परकीय भांडवलाची आवश्यकता आहे.

**१२) भाववाढीवर नियंत्रण :**

विकसनशील देशांना नेहमीच भाववाढीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. अर्थव्यवस्थेचा विकास होताना अधिकाधिक गुंतवणूक करावी लागते. प्रसंगी तुटीचा अर्थभरणा करावा लागतो. ज्यामुळे लगेच लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे लोकांच्या वस्तू व सेवांची मागणी वाढते. तात्काळ वस्तू व सेवांचा पुरवठा वाढवता येत नसल्याने त्यांच्या किंमतीमध्ये वाढ होते. अशा परिस्थितीत परकीय भांडवलाच्या साहाय्याने अन्नधान्य व आवश्यक वस्तू व सेवा यांची आयात करून भाववाढ नियंत्रित करणे शक्य होते.

आर्थिक विकासात परकीय भांडवलाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. जॉन. पी. लेवीस यांच्यामते, परकीय मदतीने देशाचा आर्थिक विकास होतो हे सत्य नाकारता येणार नाही. मदत देणारा व घेणारा या दोन देशांत संबंध निर्माण करते. तर प्रा. ए. के. केअर्नक्रास याच्या मते, परकीय भांडवलाच्या तरतुदीने अधिक पुरेशा

पायाभूत सोई निर्माण करता येतात. त्यामुळे वेगवान विकास साधता येतो. अर्थात त्यासाठी मोठ्या गुंतवणूक संधी असाव्या लागतात. मात्र अशी गुंतवणूक करताना प्रगत देश अप्रगत देशांवर अनेक अटी लादतात. स्वाभिमान गहाण ठेवावा लागतो. पण योग्य क्षमता घेऊन परकीय भांडवल घेतल्यास देशांच्या आर्थिक विकास वेगाने होण्यास मदत होते.

**३.२.२ विदेशी भांडवलाचे प्रकार :**

विदेशी भांडवलाचा अर्थ आणि आवश्यकता पाहिल्यानंतर विदेशी भांडवलाचे प्रकार खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**अ) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (Direct Foreign Investment) :**

बऱ्याचदा अनेक देशात विदेशी भांडवल प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या स्वरूपात येते. प्रगत देशातील कंपन्यांनी विशेष हेतू ठेवून विकसनशील देशात गुंतवणूक केलेली असते. उदाहरणार्थ भारतासारख्या देशात प्रगत देशातील कंपनी दुय्यम ऑफिस किंवा तिची शाखा सुरू करू शकते. तसेच काही प्रकारात परकीय लोक संबंधित देशातील कंपन्यातील भागरोख्यात गुंतवणूक करतात. म्हणजे शेअर्स विकत घेतात. त्यामधून परकीय भांडवल प्राप्त झालेले असते.

**आ) विदेशी संयुक्त गुंतवणूक (Foreign Collaboration Investment) :**

अलीकडे विकसनशील देशामध्ये विदेशी संयुक्त भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण वाढत आहे. भारतामध्ये अशा प्रकारच्या भांडवल गुंतवणूकीला प्राधान्य देण्यात येत आहे. याचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात.

१) खाजगी व्यक्तीबरोबर केलेली भागीदारी

२) परकीय कंपन्या आणि संबंधीत देशात केलेली भागीदारी

३) परकीय सरकार आणि संबंधीत देशातील सरकार यांच्यामधील भागीदारी

**इ) आंतर–सरकारी कर्जे (Inter - government loans) :**

अशा कर्जाची सुरूवात खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुद्धानंतर प्रत्यक्ष आंतर–सरकारी कर्ज व मदत देण्याची प्रवृत्ती वाढत गेली. या कर्जासंदर्भात मार्शल असे म्हणतात की, दुसऱ्या महायुद्धात युरोपियन राष्ट्रे बेचिराख झाली होती. त्यांच्या अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करण्यासाठी मार्शल समितीचे सुचविल्याप्रमाणे या देशांना अमेरिकेने प्रचंड प्रमाणात मदत केली. त्यामधून या राष्ट्रांना युद्धातून सावरण्याची आणि प्रगती करण्याची संधी मिळाली. त्यानुसार जगातील प्रगत देश कमी विकसीत देशातील सरकारला मदत व कर्जे देतात.

**ई) आंतरराष्ट्रीय संस्थाकडून कर्जे (Loans for International Institutions):**

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर आर्थिक सहकार्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण

झाल्या. यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, पुर्नरचना व विकासासाठी बँक व तिच्या संलग्न संस्था, आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ व आंतरराष्ट्रीय विकास संघटना, आशियाई विकास बँक इ. या संख्या अनेक देशांना कर्ज आणि मदत देण्याचे कार्य करतात. अलीकडे या संस्थाकडून भारताला मोठ्या प्रमाणात मदत मिळाली आहे.

**इ) बर्हिगत व्यापारी कर्जे (External Commercial Borrowing) :**

आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातून घेतल्या जाणाऱ्या कर्जाना बाह्य व्यापारी कर्जे असे म्हणतात. अशी कर्जे विविध देशातील निर्यात एजन्सीकडून घेतली जातात. उदा. अमेरिकन निर्यात बँक, जपान निर्यात बँक, इंग्लंड निर्यात बँक इ. यांच्या भांडवल बाजारातून विकसनशील देशांना विशेष प्रमाणात व्यापारी कर्जे प्राप्त केली आहेत. याशिवाय अनिवासी लोकांच्याकडून ठेवीच्या स्वरूपात विदेशी चलन प्राप्त होते.

**३.२.३ भारत सरकारचे विदेशी भांडवलाबाबतचे धोरण :**

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये आर्थिक विकासासाठी विदेशी भांडवलाची मोठ्या प्रमाणात गरज भासू लागली. तेव्हा विदेशी भांडवलाविषयी काय धोरण असावे याला महत्त्व आले. सरकारने १९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहिर केले. त्यामध्ये विदेशी भांडवलाबाबतचा दृष्टीकोन फारसा चांगला नव्हता. विदेशी भांडवलावर अनेक बंधने घातली होती. त्यामुळे विदेशी भांडवलावर नाराज झाले. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूनी विदेशी भांडवलदारांना विश्वास देण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये विदेशी व देशी भांडवलात भेदभाव केला जाणार नाही, नफा मिळविण्याची समान संधी असेल आणि नुकसान भरपाईची हमी दिली जाईल असा विश्वास विदेशी भांडवलदारांना दिला.

१९५६ मध्ये सरकारने दुसरे औद्योगिक धोरण जाहिर केले. या धोरणात सरकारने विदेशी भांडवलाचे महत्त्व ओळखले. ज्यामुळे देशांतर्गत बचतीला पूरक वातावरण करून विकासाला चालना देता येईल आणि शास्त्रीय, तांत्रीक व औद्योगिक स्थान प्राप्त करता येईल असे धोरण आखले असले तरी धोरणात्मक निर्णय म्हणून प्रमुख मालकी व उद्योगाचे परिणामकारक नियंत्रण हे सरकारचे राहिल याची दक्षता घेतली गेली. काही बाबतीत विदेशी उद्योगांना अनुकूल अशा कर सवलती दिल्या व विदेशी संयुक्त उद्योगांना औद्योगिक परवानगीमधील विलंब टाळण्यासाठी ताबडतोब परवानगी देण्याचे धोरण स्वीकारले.

१९७७ मध्ये जनता पक्षाच्या सरकारच्या काळात विदेशी भांडवलाबाबत काही नियम सांगितले गेले. त्यानुसार जेथे पुरेसे भारतीय कौशल्य व भांडवल उपलब्ध आहे तेथे विदेशी कंपन्यांना परवानगी दिली जाणार नाही. जेथे विदेशी कंपन्यांची गरज आहे तेथे तांत्रीक ज्ञान, तांत्रीक कौशल्य व तंत्रे विकत घेण्यास प्राधान्य देण्यात आले. फेरा कायद्यातील तरतूदी प्रमाणे उपभोग्य वस्तू उद्योगांच्या क्षेत्रात कठोर अंमलबजावणी केली. या सरकारच्या दोन-तीन वर्षाच्या काळात काही दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

१) कोका-कोला कंपनीला तिचा भारतातील कारभार गुंडाळण्यास सांगण्यात आले आणि (२) आंतरराष्ट्रीय व्यावसायिक यंत्रणेला (IBM) तिचे शेअर्स ४०% पर्यंत कमी करण्यास सांगण्यात आले.

थोडक्यात विदेशी भांडवलाबाबत फारसा चांगला दृष्टीकोन भारतामध्ये १९९१ च्या औद्योगिक धोरणापर्यंत नव्हता असे म्हणता येईल.

**विदेशी भांडवलाबाबत १९९१ नंतरचे धोरण :**

भारत सरकारने १९९१ ला नवीन औद्योगिक धोरण स्वीकारले. या धोरणामध्ये विदेशी भांडवलाबाबतचे उदारिकरण नव्या आर्थिक धोरणाचा अविभाज्य भाग होता. या धोरणात स्पष्ट करण्यात आले की, भारतीय उद्योगांच्या आधुनिकीकरणासाठी नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी आणि देशाचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यासाठी विदेशी भांडवलाची गुंतवणूक अत्यावश्यक आहे म्हणूनच या धोरणानंतर विदेशी गुंतवणूकीसंबंधी अनेक सवलती जाहिर करून विदेशी भांडवलाला आकर्षित करण्यात आले. १९९१ च्या नंतर विदेशी भांडवलाबाबतच्या धोरणाचा आढावा पुढीलप्रमाणे.

**१) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस तात्काळ मान्यता :**

१९९१ मध्ये ज्या उद्योगांना मोठ्या प्रमाणात विदेशी भांडवलाची गरज आहे. त्यांची यादी तयार करण्यात आली. त्यानुसार त्या उद्योगातील भागभांडवलामध्ये ५१% पर्यंत प्रत्यक्ष गुंतवणूकीस तात्काळ मान्यता देण्याचे जाहिर केले. या यादीमधील उद्योगांची संख्या गरजेनुसार वाढविण्यात आली. १९९६ पर्यंत ४८३ उद्योगांत ५१% गुंतवणूक करण्यास मान्यता दिली. प्रत्यक्ष गुंतवणूकीसाठी मान्यता देण्यात उद्योग जसे ऊर्जानिर्मिती उद्योग, करमणूकीशी निगडीत इलेक्ट्रॉनिक उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, सेवा क्षेत्रातील उद्योग इ.

**२) सेवा क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक :**

१९९१ पर्यंत विविध सेवा क्षेत्रातील उद्योगावर अनेक निर्बंध होते. जसे हॉटेलिंग पर्यटन ३ मार्च १९९१ च्या धोरणामुळे विदेशी गुंतवणूकदारांना सेवा क्षेत्र खुले करण्यात आले. सर्व क्षेत्रातील उद्योगामध्ये ५१% पर्यंत गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

**३) अनिवासी भारतीय व त्यांच्या कंपन्यासंबंधी धोरण :**

भारताच्या जलद आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी भांडवलाची आवश्यकता होती. अशावेळी विदेशी भांडवल भारतात आणण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे अनिवासी भारतीय होय. त्यांना भारतामध्ये गुंतवणूक करण्यास आमंत्रित करण्यात आले. अनिवासी भारतीयांना भारतामध्ये अग्रक्रम क्षेत्रात भांडवल गुंतवणूक करण्याची १००% परवानगी देण्यात आली. अनिवासी भारतीयांना पायाभूत क्षेत्रातील ९ उद्योग आणि इतर क्षेत्रातील १३ उद्योगात गुंतवणूक करण्याची परवानगी दिली.

**४) वीजनिर्मिती क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक :**

भारतामध्ये वीजनिर्मिती क्षेत्रात अनेक अडचणी असल्याने त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज होती. तसेच वीज पुरवठा गरजेच्या तुलनेने कमी असल्याची औद्योगिक उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत होता. तेव्हा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्याशिवाय वीजटंचाई प्रश्न सुटणार नाही याची जाणीव सरकारला झाली. त्यामुळे या

क्षेत्रात विदेशी गुंतवणूक करण्यास विदेशी गुंतवणूकदारांना आमंत्रित करण्यात आले. या क्षेत्रात विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी या क्षेत्रातील भांडवल गुंतवणूकीस १००% करण्याची परवानगी देण्यात आली.

**५) फेराचे उदारीकरण :**

भारतातील विदेशी कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी फॉरेन एक्सेंज रेग्युलेशन ॲक्ट (फेरा) हा कायदा अस्तित्वात होता ह्या कायद्यामुळे भारतात विदेशी भांडवल येण्यास अडथळे निर्माण झाले होते. तेव्हा ह्या कायद्यातील जाचक अटी रद्द करण्यासाठी आणि आवश्यक बदल करण्यासाठी १ जानेवारी १९९३ रोजी सरकारने एक अध्यादेश काढला. या अध्यादेशानुसार ४०% पेक्षा जास्त विदेशी समभाग असणाऱ्या कंपन्या आणि तशाच प्रकारचा मालकी हक्क असणाऱ्या भारतीय कंपन्या यांना एकाच पातळीवर आणण्याचा निर्णय घेतला. म्हणजे विदेशी भांडवल गुंतवणूकीला चालना प्राप्त करून दिली.

**६) विदेशी गुंतवणूकदारांना अपगुंतवणूकीस परवानगी :**

१९९१ च्या धोरणाने भारतीय कंपन्यांच्या समभागातील गुंतवणूक प्रसंगी मोकळी करण्याची सोय विदेशी गुंतवणूकदारांना देण्यात आली. याचा अर्थ असा की, विदेशी गुंतवणूकदाराने भारतीय कंपन्याच्या समभागातात केलेली गुंतवणूक भांडवल बाजारातील किंमतीनुसार विकण्यास आणि विक्रीतून मिळालेला पैसा विदेशी चलनाच्या स्वरूपात मायदेशी नेण्यास परवानगी देण्यात आली. यामुळे भारतीय भांडवल बाजाराची विश्वासर्हता विदेशी गुंतवणूकदारांच्या दृष्टीने वाढली. परिणामी विदेशी भांडवल गुंतवणूक वाढण्यास मदत झाली.

**७) विदेशी ट्रेडमार्क वापरण्यास परवानगी :**

१९९१ च्या विदेशी भांडवल विषयक धोरणामध्ये भारतात व्यवसाय करणाऱ्या विदेशी कंपन्यांना स्वत:चे मूळ नाव आणि स्वत:चा ट्रेडमार्क वापरण्याची परवानगी देण्यात आली. म्हणजे विदेशी कंपन्यांना विदेशी अस्मिता जपण्यास परवानगी देण्यात आली. त्यामुळे आत्मविश्वासाने भारतात विदेशी भांडवल येऊ शकेल असा विश्वास निर्माण झाला.

अशा प्रकारे १९९१ च्या औद्योगिक धोरणात विदेशी भांडवलबाबत उदार धोरण स्वीकारण्यात आले. बदलत्या आर्थिक परिस्थितीत भारतीय उद्योगांचा विकास व्हावा म्हणून विदेशी गुंतवणूक व परकीय मदतीचे स्वागत करून आर्थिक विकासाची प्रक्रिया गतीमान करण्याचा प्रयत्न केला. देशातील उद्योगांचा विकास केवळ देशांतर्गत भांडवलावर न करता विदेशी भांडवलाला खुली परवानगी देवून आर्थिक विकासाचा प्रश्न सोडविण्यासाठी विदेशी भांडवलाबाबत उदार धोरणाचा स्वीकार सरकारने केला. ही बाब भविष्यकाळात भारताचा आर्थिक विकास व स्थैर्यास निश्चितीत उपयुक्त ठरेल.

**३.२.४ भारतातील थेट परकीय गुंतवणूकीची प्रवृत्ती :**

१९९०-९१ च्या दरम्यान भारतामधील परकीय चलन साठयात प्रचंड प्रमाणात घट झाली. त्यावेळी देशाजवळ काही दिवस पुरेल इतकेच परकीय चलन शिल्लक होते. अशा परिस्थितीमध्ये सरकारने नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब केला. या धोरणामध्ये थेट परकीय गुंतवणूकीला प्राधान्य देण्यात आले. यामध्ये विदेशी संस्था व्यक्ती व सरकारे यांना भारतामध्ये प्रत्यक्ष भांडवल व इतर सुविधांच्या माध्यमातून केलेली गुंतवणूक ही थेट परकीय गुंतवणूक मानली जाते. अशा प्रकारची गुंतवणूक देशाच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरते. भारतातील थेट परकीय गुंतवणूकीची प्रवृत्ती व वार्षिक वृद्धीदर कोष्टक क्रमांक ३.१ मध्ये दाखविण्यात आला आहे.

**कोष्टक क्र. ३.१**

**भारतातील थेट परकीय गुंतवणूकीची प्रवृत्ती**

| वर्ष | थेट परकीय गुंतवणूक (दशलक्ष रू.) | वार्षिक वृद्धी दर | वर्ष | थेट परकीय गुंतवणूक (दशलक्ष रू.) | वार्षिक वृद्धी दर |
|---|---|---|---|---|---|
| १९८० | ७९.२ | – | २००१ | ५४७७.६ | ५२.७ |
| १९८१ | ९१.९ | १६.१ | २००२ | २६२९.७ | २.८ |
| १९८२ | ७२.१ | –२१.६ | २००३ | ४३२१.१ | –२३.२ |
| १९८३ | ५.६ | –९२.२ | २००४ | ५७७८.८ | ३३.७ |
| १९८४ | १९.२ | २४१.१ | २००५ | ७६२१.८ | ३१.९ |
| १९८५ | १०६.१ | ४५१.४ | २००६ | २०३२७.८ | १६६.७ |
| १९८६ | ११७.७ | ११.० | २००७ | २५३४९.९ | २४.७ |
| १९८७ | २१२.३ | ८०.३ | २००८ | ४७१०२.४ | ८५.८ |
| १९८८ | ९१.३ | –५७.० | २००९ | ८५६३३.९ | –२४.३ |
| १९८९ | २५२.१ | १७६.३ | २०१० | २७४१७.१ | –२३.१ |
| १९९० | २३६.७ | –६.१ | २०११ | ३६११०.५ | ३२.० |
| १९९१ | ७५.० | –६८.३ | २०१२ | २४१९५.८ | –३३.१ |
| १९९२ | २५२.० | २३६.० | २०१३ | २८१९९.४ | १६.५ |
| १९९३ | ५३२.० | १११.१ | २०१४ | ३४५८२.१ | २२.६ |
| १९९४ | ९७४.० | ८३.१ | २०१५ | ४४०६४.१ | २७.४ |
| १९९५ | २१५१.० | १२०.८ | २०१६ | ४४४८०.६ | ०.९ |
| १९९६ | २५२५.० | १७.४ | २०१७ | ३९९०३.८ | –१०.३ |
| १९९७ | ३६१९.० | ४३.३ | २०१८ | ४२२८५.७ | ६.० |
| १९९८ | २६३३.० | –२७.२ | | | |
| १९९९ | २१६८.० | –१७.७ | | | |
| २००० | ३५८८. | ६५.५ | | | |

संदर्भ : Shanlax, International Journal of Economics web - http://www.shanlaxjournals.com P.N.44

कोष्टक क्रमांक ३.१ वरून आपणास १९८० ते २०१८ या काळातील भारताच्या थेट परकीय गुंतवणूकीतील वाढ ७९.२ वरून ४२२८५.७ दशलक्ष रूपयांपर्यंत पोहचलेली दिसते. १९९०-९१ नंतर देशातील गृहबांधणी, शेती, वीजनिर्मिती, वाहतूक, दळणवळण व सेवा इ. क्षेत्रांच्या थेट परकीय गुंतवणूकीचे प्रमाण वाढल्याचे दिसते.

**भारतातील थेट परकीय गुंतवणूकीचे देशनिहाय वर्गीकरण :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जगातील विविध राष्ट्रांना भारतामध्ये भांडवलाची गुंतवणूक करण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. त्यानंतरच्या काळात RBI व वाणिज्य मंत्रालयाने अनेक प्रस्ताव सादर करून मान्य केले. २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षामध्ये भारतामध्ये वेगवेगळ्या देशांनी भारतात केलेली थेट परकीय गुंतवणूक खालील कोष्टकात दर्शविली आहे.

**कोष्टक क्र. ३.२**

**निवड देशांनी भारतात केलेली थेट परकीय गुंतवणूक (दशलक्ष रुपये)**

| अ.नं. | देश | २०१७-१८ (एप्रिल-मार्च) | २०१८-१९ (एप्रिल-मार्च) | एकूण (एप्रिल-डिसें.) २०१९-२००० | FDI % |
|---|---|---|---|---|---|
| १ | मॉरिशस | १५,९४१ | ८०८४ | १४१९२४.९३ | ३१.१ |
| २ | सिंगापूर | १२,१८० | १६२२८ | ९४६५०.८४ | २०.७ |
| ३ | जपान | १६३३ | २९६५ | ३३०८०.५६ | ७.२ |
| ४ | नेदरलँड | २८०० | ३८७० | ३०८८३.८० | ६.८ |
| ५ | अमेरिका | २०९५ | ३१३९ | २८३४९.२९ | ६.२ |
| ६ | इंग्लंड | ८४७ | १३५१ | २७९३६.९६ | ६.१ |
| ७ | जर्मनी | ११२४ | ८८६ | १२०७३.७७ | २.६ |
| ८ | सायप्रस | ४१७ | २९६ | १०१०७.२६ | २.२ |
| ९ | फ्रान्स | ५११ | ४०६ | ७१०२.३८ | १.६ |
| १० | संयुक्त अरब अमिरात | १०५० | ८९८ | ६९१६.१९ | १.५ |
| ११ | इतर देश | ६२५९ | ६२४३ | ६३८८५.०१ | १४.० |
|  | एकूण कल सर्व देशाचा | ४४८५७ | ४४३६६ | ४५६९१०.९९ | १०० |

संदर्भ : Shanlax, International Journal of Economics

web - http://www.shanlaxjournals.com P.N.42

कोष्टक क्र. ३.२ असे लक्षात येते की, सन २०१७-१८ व २०१८-१९ या दोन वर्षाच्या काळात भारतातील निवड केलेल्या देशांनी थेट परकीय गुंतवणूकीचे प्रमाण दिसते. या काळातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक ही मॉरिशसने केली असून त्याखालील सिंगापूर, नेदरलँड व अमेरिका यांचा क्रमांक लागतो. या काळात सर्व देशांनी २०१७-१८ व २०१८-१९ मिळून अनुक्रमे ४४८५७ व ४४३६६ दशलक्ष रुपयाची गुंतवणूक केल्याचे दिसते. तर २००० ते २०१९ पर्यंत एकूण थेट परकीय गुंतवणूकीचे प्रमाण ४५६९१०.९९ दशलक्ष रू. इतके होते.

**भारतातील थेट परकीय गुंतवणूकीचे उद्योगनिहाय वर्गीकरण :**

भारतामध्ये १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामध्ये खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण यांचा अंतर्भाव केल्याने भारतातील थेट परकीय गुंतवणूकीचे प्रमाण वाढत गेले. याकाळात देशातील सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात थेट परकीय गुंतवणूक प्रमाण वाढले. ते पुढील कोष्टकातून दाखविता येईल.

**कोष्टक क्र. ३.३**

**थेट परकीय गुंतवणूकीचे उद्योगनिहाय वर्गीकरण**

| अ.नं. | क्षेत्र | २०१७-१८ (एप्रिल-मार्च) | २०१८-१९ (एप्रिल-मार्च) | FDI एकूण (एप्रिल-डिसें.) २०१९-२००० | FDI % |
|---|---|---|---|---|---|
| १ | सेवा क्षेत्र | ६७०९ | ९१५८ | ८०६७०.७९ | १७.७ |
| २ | संगणक (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) | ६१५३ | ६४१५ | ४३५८६.९५ | ९.५ |
| ३ | टेलिकम्युनिकेशन | ६२१२ | २६६८ | ३७११६.३४ | ८.१ |
| ४ | बांधकाम व्यवसाय | ५४० | २१३ | २६५४१.६० | ५.८ |
| ५ | व्यापार | ४३४८ | ४४६२ | २५३७१.४७ | ५.६ |
| ६ | ऑटोमोबाईल उद्योग | २०९० | २६२३ | २३८९२.८१ | ५.२ |
| ७ | औषधे व फार्मास्युटिकल्स. | १०१० | २६६ | १६३९६.५६ | ३.६ |
| ८ | रसायने | १३०८ | १९८१ | १७४४६.९५ | ३.८ |
| ९ | धातू उद्योग | २७३० | २२५८ | १६१५६.२१ | ३.५ |
| १० | वीजनिर्मिती | १६२१ | ११०६ | १४६५२.९६ | ३.२ |
| ११ | इतर | १२१३६ | १३२१६ | १५५०८३.३५ | ३३.९ |
|  | एकूण | ४४३६६ | ४४३६६ | ४५६९१०.९९ | १०० |

कोष्टक क्रमांक ३.३ वरून असे दिसते की, भारतातील उद्योगनिहाय थेट परकीय गुंतवणूकीमध्ये सेवा क्षेत्र आघाडीवर असून त्याखालोखाल संगणक व टेलिकम्युनिकेशन या क्षेत्राचा क्रमांक लागतो. १९९१ नंतरच्या काळात भारताने आपली निर्यात जाणीवपूर्वक वाढविण्याचा प्रयत्न केल्यामुळे सेवाक्षेत्राचा वेगाने विकास झाल्याचे दिसते. भारताच्या एकूण विकासामध्ये थेट परकीय गुंतवणूकीची भूमिका महत्त्वाची आहे.

भारताने १९९१ मध्ये स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतामध्ये थेट परकीय गुंतवणूकीबाबत विविध प्रवृत्ती दिसून येतात. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आर्थिक सुधारणा काळात गेल्या ३० वर्षात भारतामध्ये थेट परकीय गुंतवणूकीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली आहे. त्यामुळे देशातील औद्योगिक विकास चालना मिळाल्याने सर्वांगीण आर्थिक विकास होण्यास मदत झाली आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात आणि वृद्धीदर वाढ घडून आली आहे. येणाऱ्या काळात थेट परकीय गुंतवणूकीचा अनुकूल परिणाम होईल अशी आशा बाळगता येईल.

## ३.३ **सारांश** (Summary) :

विकसनशील देशाची एकंदरीत आर्थिक परिस्थिती पहाता त्यांना विदेशी भांडवलाची गरज असते. अशा देशांच्या आर्थिक विकासामध्ये विदेशी भांडवलाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स यासारख्या विकसीत देशांमध्ये त्यांच्या विकासाच्या प्रारंभिक अवस्थेतमध्ये ते विदेशी भांडवलावरच अवलंबून होते. मात्र चीन व रशिया सारख्या देशांनी अत्यंत कमी विदेशी भांडवलावर आपली सर्वांगीण प्रगती साध्य केली आहे. यांचा कोणत्या देशाच्या आर्थिक विकासामध्ये विदेशी भांडवल महत्त्वाचे असते. याबाबत प्रा. अर्थर लेविस असे म्हणतात की, 'विदेशी मदतीने देशाचा आर्थिक विकास होतो हे सत्य नाकारता येत नाही.' मदत देणारा व घेणारा या दोन देशांत सलोख्यांचे संबंध निर्माण होतात. तर केअर्नक्रास यांच्यामते, विदेशी भांडवलाच्या तरतुदीचे अधिक पुरेशा पायाभूत सुविधा निर्माण करता येतात. परिणामी विकासाची गती वाढविता येते. अर्थात त्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक संधी निर्माण कराव्या लागतात. विकसनशील देशात विकसीत राष्ट्रे गुंतवणूक करताना अनेक जाचक अटी घालण्याची शक्यता असते. प्रसंगी त्याचे म्हणणे चुकीचे असताना मान्य करावे लागते. पण योग्य दक्षता घेऊन विदेशी भांडवल घेतल्यास देशाच्या विदेशी भांडवल घेतल्यास देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढू शकतो.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये विदेशी भांडवलाची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे. १९९१ मध्ये जो आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला होता तसेच सततच्या प्रतिकूल व्यवहारतोलाचा प्रश्न सोडविण्यासाठी विदेशी भांडवल व थेट विदेशी भांडवल गुंतवणूकीचे उदार धोरण स्वीकारण्यात आले. १९९१ ते २०१८ या काळात भारतामध्ये झालेल्या थेट विदेशी गुंतवणूकीत २५२ दशलक्ष रू वरून ४२२८५.७ दशलक्ष रूपयांपर्यंत वाढली. या गुंतवणूकीमध्ये मॉरिशस, सिंगापूर, अमेरिका, इंग्लंड, जपान, नेदरलँड, जर्मन यासारख्या देशांनी भारतात थेट विदेशी गुंतवणूक केली. या काळात झालेल्या थेट विदेशी गुंतवणूकीत वाढ झाल्यामुळे गेल्या ३० वर्षात सेवाक्षेत्र, संगणक, टेलिकम्युनिकेशन बांधकाम, व्यापार यासारख्या क्षेत्रांच्या वेगाने विकास होण्यास मदत झाली. भविष्यकाळात विदेशी भांडवल गुंतवणूकीच्या माध्यमातून देशाची आर्थिक भरभराट होऊ शकेल असे वाटते.

विकसनशील देशांना अपुऱ्या भांडवलामुळे त्यांच्या देशामध्ये असणाऱ्या नैसर्गिक साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करता येत नाही. अशावेळी देशातील नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी विदेशी भांडवलाची गरज असते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था विकसनशील देशांना विदेशी भांडवलाचा पुरवठा करतात. यांच्यामध्ये विदेशी कर्जे, मदत अनुदान, देणगी इ. चा समावेश असतो. विदेशी भांडवलामुळे विकसनशील देशांमधील पायाभूत सुविधांचा विकास, नैसर्गिक साधनाचा वापर रोजगार आणि उत्पादनात वाढ अशा अनेक गरजांची पुर्तता करता येते.

भारताने १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणात विदेशी भांडवलाबाबत उदार धोरणाचा स्वीकार केल्याने विविध देशात कंपन्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करताना दिसतात. विदेशी भांडवल गुंतवणूक वाढविण्यासाठी ऑगस्ट १९९९ मध्ये सरकारने उद्योग मंत्रालयाच्या अधिपत्याखाली 'परकीय गुंतवणूक अंमलबजावणी अधिकार मंडळाची' स्थापना केली आहे. यामुळे भारतातील विदेशी भांडवल गुंतवणूकीवर अनुकूल परिणाम होऊन गुंतवणूक वाढण्यास मदत झाली आहे. परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेत निर्यातवाढ व परकीय चलन साठ्यात अमुलाग्र बदल झाला आहे. ही वाढ देशातील विविध उद्योगाच्या दृष्टिने समाधानकारक आहे.

## ३.४ परिभाषिक शब्द :

**विकसनशील राष्ट्रे :-** जी राष्ट्रे विकासाच्या मार्गावर आहेत त्यांना विकसनशील राष्ट्रे असे म्हणतात. उदा- भारत, पाकिस्तान, श्रीलंका इत्यादी.

**औद्योगिक धोरण :** विविध उद्योगांच्या व एकूण औद्योगिक क्षेत्रासंबंधीच्या विविध बाबीवर विचार करून औद्योगिक क्षेत्रासंबंधी जे सर्वसमावेशक असे धोरण ठरविले व अनुसरले जाते त्याला औद्योगिक धोरण म्हणतात.

**पायाभूत सुविधा :** अर्थव्यवस्थेतील अशा भांडवलाचा पायाभूत किंवा मुलभूत सुविधा म्हणतात की ज्यामध्ये रस्ते, रेल्वे, पाणी पुरवठा, शैक्षणिक व आरोग्यविषयक सोयीचा समावेश असतो.

**फेरा :** फॉरेन एक्सचेंज रेग्युलेशन ॲक्ट फेरा उपलब्ध परकीय चलनांचा देशहिताच्या दृष्टीने १९७३ आणि देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल अशा दृष्टीने त्यांचा अधिकाअधिक कार्यक्षम रितीने उपयोग करणे.

**थेट परकीय गुंतवणूक :** विदेशी संस्था, सरकारे व व्यक्तींनी भारतात प्रत्यक्ष भांडवलाच्या तंत्रज्ञान व इतर सुविधांच्या माध्यमातून केलेली गुंतवणूक म्हणजे थेट परकीय/विदेशी गुंतवणूक होय.

**नैसर्गिक साधनसामग्री :** ज्यामध्ये निसर्गदत्त साधनसामग्रीचा संपत्तीच्या उत्पादनासाठी उपयोग केला जातो. त्या सर्वांचा समावेश नैसर्गिक साधनसामग्रीत केला जातो. उदा- जमीन, नद्या, खनिजे, जंगले, हवामान, पर्जन्यमान, समुद्रकिनारा इ.

### ३.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडा.**

१. ------ हा परकीय भांडवलाचा प्रकार होय.

अ) थेट परकीय भांडवल ब) परकीय संयुक्त भांडवल

क) आंतरसरकारी कर्जे ड) बर्हिगत व्यक्तिगत कर्जे

२. ------ साठी परकीय भांडवलाची गरज भासते.

अ) तांत्रीक ज्ञानाची आयात ब) पायाभूत सुविधांची कर्जे

क) मुलभूत अवजड उद्योगांची उभारणी ड) वरील सर्व

३. भारतामध्ये ------ साली आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला होता.

अ) १९५१ ब) १९९१ क) १९७१ ड) २०११

४. २०१८ मध्ये भारतातील थेट परकीय गुंतवणूक ------ दशलक्ष होती.

अ) ४२२८५.७ ब) ४५२८०.० क) ३०४५५.८ ड) २०२१५.९

५. भारतामध्ये थेट परकीय गुंतवणूकीला ------ सालापासून अनुकूल वातावरण तयार झाले.

अ) १९४९ ब) १९५६ क) १९८२ ड) १९९१

६. ------ या देशाने भारतात सवाधिक थेट परकीय गुंतवणूक केली.

अ) जपान ब) मॉरिशस क) अमेरिका ड) सिंगापूर

७. आंतरराष्ट्रीय व्यापारातून ------ मिळविण्याचा मार्ग आहे.

अ) ब्रिटिश चलन ब) परकीय चलन क) सरकारी मदत ड) वरील पैकी नाही

८. १९९१ च्या आर्थिक धोरणानंतरच्या काळात भारत सरकारने ------ कोटी रूपयापेक्षा जास्त गुंतवणूकीसाठी परवाना मुक्त धोरण स्वीकारणे.

अ) १०० ब) २०० क) ५०० ड) ७००

९. भारत सरकारने ------ क्षेत्रातील उद्योगासाठी १००% थेट परकीय गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

अ) कापड ब) संगणक क) टेलिकम्युनिकेशन ड) इलेक्ट्रॉनिक उपकरणे

१०. सन २०१८-१९ मधील भारतातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक ------ या क्षेत्रात होती.

अ) सेवा क्षेत्र ब) संगणक क) टेलिकम्युनिकेशन ड) बांधकाम

११. विमा नियंत्रण व विकास मंडळाची (IRDA) स्थापना ------ मध्ये करण्यात आली.

अ) १९९१ ब) १९९५ क) १९९९ ड) २००१

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अ - थेट परकीय भांडवल | ७. | ब - परकीय चलन |
| २. | ड - वरील सर्व | ८. | अ - १०० |
| ३. | ब - १९९१ | ९. | क - टेलिकम्युनिकेशन |
| ४. | अ- ४२२८५.७ | १०. | अ - सेवाक्षेत्र |
| ५. | ड - १९९१ | ११. | क - १९९९ |
| ६. | ब - मॉरिशस | | |

## ३.७ स्वाध्याय :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. विदेशी भांडवल म्हणजे काय सांगून त्यांची गरज स्पष्ट करा?

२. विदेशी भांडवलाचा अर्थ सांगून त्यांचे प्रकार स्पष्ट करा?

३. थेट परकीय गुंतवणूकीचा अर्थ सांगून भारतातील थेट परकीय गुंतवणूकीची प्रवृत्ती विषद करा?

४. भारत सरकारचे परकीय भांडवलाबाबतचे धोरणाचे स्पष्टीकरण करा?

**ब) टीपा लिहा.**

१. परकीय भांडवल

२. परकीय भांडवलाचे प्रकार

३. परकीय भांडवलाची गरज

४. भारतातील थेट परकीय गुंतवणुकीचे आकारमान

५. भारतातील विविध उद्योगांमधील परकीय भांडवल गुंतवणूक

६. भारताचे परकीय भांडवल विषय धोरण

### ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. जयप्रकाश (२०००) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली ११०००२

२. कांयदे पाटील गंगाधर वि (जुलै २००२) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, आंतरराष्ट्रीय व्यावसायिक पर्यावरण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक १३

३. महाजन धनश्री (जून २००५) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगापूरा, औरंगाबाद.

४. साठे मधुसूदन(२००८) 'व्यापार आणि व्यापार संघटना' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

५ देसाई व भालेराव (२०११) 'भारतीय अर्थव्यवस्था' निराली प्रकाशन, पुणे.

६. कुलकर्णी बी. डी. व कुलकर्णी एस. व्ही. (२००७) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

७. झामरे जी. एन. (२०१०) 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरण अर्थशास्त्र' पिंपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपूर.

८. Rudar Datta & Sundaram K.P.M, Ashwini Mahajan, Indian Economy (2014) S. Chand and company, New Delhi. 66th Edition

९. Misra S. K. and Puri V. K. (2012) Indian Economy, Himalaya Publishing, House, Mumbai, 28th Edition.

१०. Economic Survy of India 2020-21 Ministry of Finance Department of Economic Affairs, Govt. of India.

११. P. Rajesh investment in India Emerging Trends and Pattern Publish with Shanlax interncgonal Journal of Economics. web- http://www.shanlaxjournals.com


***

# घटक – ४

# आंतरराष्ट्रीय संस्था आणि भारत

## ( International Institutions and India )

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF)
- ४.२.२ आंतरराष्ट्रीय पुर्नरचना व विकास बँक (IBRD) जागतिक बँक
- ४.२.३ आशियाई विकास बँक (ADB)
- ४.२.४ जागतिक व्यापार संघटना (WTO)

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

### ४.० उद्दिष्टे :

आंतरराष्ट्रीय संस्था आणि भारत या प्रकरणाचा अभ्यास पुढील उद्दिष्टांसाठी आपण करणार आहोत.

१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना, भांडवल व व्यवस्थापन इत्यादींची माहिती अभ्यासणे.

२) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्टे, कार्ये यश अपयश इत्यादीची माहिती विशद करणे.

३) जागतिक बँकेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, भांडवल व्यवस्थापन इत्यादीची माहिती अभ्यासणे.

४) जागतिक बँकेची उद्दिष्टे व कार्ये विशद करणे.

५) आशियन विकास बँकेची स्थापना पार्श्वभूमी रचना स्पष्ट करणे.

६) आशियन विकास बँकेची उद्दिष्टे व कार्ये विशद करणे.

७) जागतिक व्यापार संघटना स्थापना पार्श्वभूमी, व्यवस्थापन रचना स्पष्ट करणे.

८) जागतिक व्यापार संघटना उद्दिष्टे व कार्य विशद करणे.

## ४.१ प्रास्ताविक :

आर्थिक विकासाची प्रक्रिया ही दीर्घकालीन असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज भासते. अशा प्रकारचे भांडवल विकसनशील देशांना उपलब्ध करुन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर वित्तीय संस्था अशा प्रकारची संकल्पना मांडण्यात आली. त्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसनशील देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी त्यांना भांडवल व इतर मदत प्राप्त करुन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेची स्थापना करण्यात आली. या चलनांच्या माध्यमातून विकसनशील देशाच्या विकासाला आणि पर्यायाने जागतिक विकासाला चालना देण्यात आली.

आर्थिक विकासाबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होणे अपेक्षित असते. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अशी संघटना असावी म्हणून जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. त्यातून आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देण्यात आली. तसेच आशियाई राष्ट्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी आशियाई राष्ट्रापुरती एखादी संघटना असावी म्हणून त्यातून आशियाई राष्ट्राचे आर्थिक भांडवलाविषयक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न या बँकेने केला आहे. सदर प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आशियाई विकास बँक आणि जागतिक व्यापार संघटना या संस्थांचा अभ्यास करण्यात आला असून या सर्व संस्थांची स्थापना व्यवस्थापन उद्दिष्टे व कार्य इ. घटक विचारात घेण्यात आले आहेत.

## ४.२ विषय विवेचन :

आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ घडवून आणणे तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण चलन पध्दतीचे लाभ मिळवून देणे, विनिमय दरात स्थिरता निर्माण करणे, व्यवहारतोलातील तूट भरुन काढण्यासाठी मदत करणे, अल्पविकसीत राष्ट्रांना विकास कार्यासाठी मदत करणे, या दृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या संस्थांना विशेष महत्व आहे.

जागतिक विकासामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांचे योगदान मोठे आहे. भारताच्या आर्थिक विकासात या संस्थांची भूमिका महत्वाची आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करता तो वाढविण्यासाठी जागतिक व्यापार संघटना महत्वपूर्ण कार्य करत आहे. याशिवाय आशियाई विकास बँकेने देखील आशियाई राष्ट्रांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये या संस्थांची तपशीलवार माहिती करुन घेणार आहोत.

### ४.२.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund) :

#### अ) पार्श्वभूमी :

आंतरराष्ट्रीय वित्तीय देवाण-घेवाणीसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादी संघटना असावी. अशा प्रकारचा विचार प्रवाह १९३० च्या जागतिक महामंदी आणि दुसऱ्या महायुद्धांच्या अपरिमित नुकसानीनंतर झाला. महामंदीमुळे संकटात आलेल्या आपापल्या देशातल्या अंतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी वेगवेगळ्या देशांनी आपआपल्याचलनांचे स्पर्धेने अवमुल्यन केले. अवमुल्यामुळे आयात महाग होते आणि निर्यात स्वस्त होतो. या अनिर्बंध अवमुल्यनाच्या स्पर्धेमुळे सर्वच देशांच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला. परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रचंड प्रमाणात घट झाली.

दरम्यान दुसरे जागतिक महायुद्ध झाल्याने अनेक देशांची मोठी आर्थिक हानी झाली. हे युद्ध चालू असतानाच आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य वाढवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेक देशांनी प्रयत्न सुरू केले. जागतिक पातळीवर एखादी आर्थिक संघटना असावी या दृष्टीने विचार सुरू झाले. त्याचाच एक भाग म्हणून इंग्लंडमधील जे. एम. केन्स यांनी एक योजना तयार केली. त्याला 'केन्स योजना' असे म्हणतात. तर अमेरिकेतील व्हाईट यांनी आंतरराष्ट्रीय स्थिरीकरण निधी स्थापण्याची योजना मांडली. तिला 'व्हाईट योजना' असे म्हणतात. या दोन्ही योजनांबाबत विचारविनिमय करण्यासाठी अमेरिकेतील ब्रेटन वुडस येथे जगातील ४४ देशांचा प्रतिनिधीची एक बैठक जुलै १९४४ मध्ये झाली. या बैठकीमध्ये या योजनांचा सविस्तर विचार करणे, जगभर शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि आर्थिक सहकार्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेची २७ डिसेंबर, १९४५ मध्ये स्थापना झाली. तेव्हा ४० देश त्याचे सदस्य होते. सध्या या संस्थेचे एकूण १८९ देश सदस्य आहेत. भारत हा नाणेनिधीचा संस्थापक सदस्य देश आहे.

#### आ) नाणेनिधीचे भांडवल :


नाणेनिधी प्रत्येक सदस्य देशाकडून वर्गणी रुपाने भांडवल जमा करते. नाणेनिधीने ठरवून दिलेल्या हिश्श्यापैकी २५% भाग सोन्यात किंवा अमेरिकन डॉलरमध्ये घ्यावा लागत होता. तो एप्रिल १९७८ पासून एस.डी. आर. (विशेष उचल अधिकार) मध्ये घ्यावा लागतो. सन १९४५ मध्ये नाणेनिधीचे भांडवल ८.८ महापद्म डॉलर होते. सदस्य देशांच्या कोट्यामध्ये दर ५ वर्षांनी वाढ केली जात असून मार्च २०२१ मध्ये ४७५८०८.३ दशलक्ष एस.डी. आर. आहे. १९४५ मध्ये एकट्या अमेरिकेचा कोटा ३६% इतका होता. १९८० तो २३% पर्यंत खाली आला. त्यवेळी भारताचा कोटा ३.२% होता. १९९८ मध्ये जर्मनी, जपान, इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका या पाच देशांनी मिळून एकूण कोट्यापैकी वाटा ४०% होता. तर भारताचा कोटा केवळ २.१% होता.

#### इ) नाणेनिधीचे व्यवस्थापन :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे व्यवस्थापन काही प्रमाणात लोकशाही तर अंशत: हुकूमशाही पद्धतीचे असल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रत्येक सभासद देशाचा एक गर्व्हनर व एक प्रति गर्व्हनर मिळून बोर्ड धोरण निश्चित करायचे असते. बोर्डाची बैठक वर्षातून एकदा होते. तथापी, दैनंदिन व्यवहार सुरळीत चालविण्यासाठी २१ सभासदांचे एक कार्यकारी संचालक मंडळ (Board of Executive Directors) नेमण्यात येते.

नाणेनिधीच्या कार्यासाठी कार्यकारी संचालक मंडळ जबाबदार असते. सर्वात अधिक कोटा आहे, अशा अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व जपान ५ देशांचे ५ संचालक कायम आहेत. प्रारंभी भारत कायम कार्यकारी संचालक होता. नाणीनिधीला मोठ्या प्रमाणात कर्ज देणाऱ्या सौदी अरेबियास आपला संचालक नेमण्याचा अधिकार देण्यात आला आहे. बाकीचे १५ संचालक सभासदांनी निवडावयाचे असतात. नाणेनिधीचे मुख्य ऑफिस अमेरिकेतील वॉश्गिंटन येथे आहे. गव्हर्नर मंडळाचे कार्यालय वॉश्गिंटन येथे आहे. गव्हर्नर मंडळाचा कारभार व्यवस्थापकीय संचालक पाहतो. तोच नाणेनिधीचा अध्यक्ष असतो. १ ऑक्टोबर २०१९ पासून बल्गेरियन अर्थशास्त्रज्ञ क्रिस्टालिना जॉर्जियाना (Kristalina Georgieva) हे नाणेनिधीचे अध्यक्ष आहेत.

**नाणेनिधीचे व्यवस्थापन रचना**




**ई) नाणेनिधीची उद्दिष्टे :**

**१) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ करणे :** पहिल्या महायुद्धानंतर आणि दुसऱ्या महायुद्धापूर्वी अनेक कारणांनी विविध देशांमधील सहकार्य संपुष्टात आले. त्यातून आर्थिक युद्ध सुरू झाले. अशा प्रकारचा प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळी एखादी संस्था असावी म्हणून नाणेनिधीच्या स्थापनेला गति मिळाली. नाणेनिधीला स्थापनेनंतर सदस्य देशांनी चलनविषयक सहकार्य वाढविणे, आंतरराष्ट्रीय चलनविषयक प्रश्न सोडविणे व भविष्यकाळात युद्धाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून काम करणे हे नाणेनिधीचे प्रमुख उद्दिष्ट मानले गेले.

**२) हुंडणावळ दरामध्ये स्थिरता राखणे :** पहिल्या महायुद्धानंतर विनिमय दरात संस्थेचे अस्थैर्य निर्माण झाले होते. त्याचा जागतिक व्यापारावर फारच प्रतिकूल परिणाम झाला म्हणून विनिमय दरात स्थिरता राखणे हे

नाणेनिधीचे महत्वाचे उद्दिष्ट निश्चित केले. सदस्य देशामधील चलनमुल्य घट टाळणे व देशांदेशांतील चलनव्यवस्था व्यवस्थित ठेवण्याचे कार्य करणे, स्पर्धात्मक अवमुल्यनाला आळा घालणे हा नाणेनिधी स्थापनेचा उद्देश होता.

**३) आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे :** आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे व व्यापारातील वाढ समतोलव्हावी असा प्रयत्न करणे, त्यामुळे सदस्य देशातील वास्तव उत्पन्न व रोजगार वाढण्यास मदत होईल.

**४) व्यापारवाढीसाठी विनिमय नियंत्रण दूर करणे :** विशिष्ट पातळीवर विनिमय दर नियंत्रित करण्यासाठी विविध देशांनी दुसऱ्या महायुद्धापूर्वी विनिमय नियंत्रणाचा अवलंब केला होता. त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला. म्हणूनच व्यापारवाढीसाठी विनिमय नियंत्रणे दूर करण्याच्या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात यावे.

**५) विकसनशील देशांना गुंतवणूकीस प्रेरणा देणे :** प्रगत देशाकडून विकसनशील देशांत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढली पाहिजे. यासाठी प्रेरणा देण्याचे काम नाणेनधीकडून अपेक्षित आहे.

**६) बहुपक्षीय पध्दतीची स्थापना करणे :** सदस्य देशात जो व्यापार चालतो त्यामधून निर्माण होणारी एकमेकांची देणी देण्यासाठी बहुपक्षीय पध्दती स्थापन करणे, त्यातून आंतरराष्ट्रीय समाशोधनाचे प्रश्न सोडविणे. यामुळे विनिमय नियंत्रणाचा आळा बसेल अशी अपेक्षा होती.

**७) व्यवहारतोलातील असमतोल कमी करणे :** सदस्य देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलातील असमतोलाची समस्या महत्त्वाची असून ती दूर करण्यासाठी नाणेनिधी आर्थिक सहाय्य करते.

**८) सदस्यांच्या विश्वास निर्माण करणे :** नाणेनिधीकडून सदस्य देशांना आर्थिक मदत मिळत असल्याने आपण खात्रीशीर विकास करु शकतो. असा विश्वास नाणेनिधी निर्माण करते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे अंतर्गत स्थैर्य विस्कटू न देता आपला व्यवहारतोल दुरुस्त करण्याचा विश्वास नाणेनिधी देते.

**९) जागतिक शांतता :** प्रगत व अप्रगत देशात नेहमी शांतता निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी नाणेनिधी सर्व सदस्य देशांचे सामाजिक, आर्थिक प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करते.

**१०) भांडवली स्थलांतर रोखणे :** जागतिक महामंदीच्या काळात भिन्न देशांमधील भागभांडवलाच्या सततच्या स्थलांतराने वित्तीय व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत होते. हे अल्पकालीन आगमन-निगमन आर्थिक स्थैर्याला घातक ठरते. अशा प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवणे हा नाणेनिधीचा हेतू असतो.

**उ) नाणेनिधीची कार्ये :**

**१) विनिमय दर निश्चित करणे :** नाणेनिधीचे सभासदत्व स्विकारणाऱ्या सर्वच देशांना आपल्या चलनाचे मुल्य सोने किंवा अमेरिकन डॉलरमध्ये किती राहिल हे जाहीर करावे लागते. अलिकडे तो विनिमय दर एस.डी. आर. मध्ये जाहीर करावा लागतो. ते मुल्य स्थिर ठेवण्याची जबाबदारी त्या त्या देशांची असते. यानिधीत १०% पेक्षा जास्त बदल करण्यासाठी नाणेनिधीची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे विनिमय दरात स्थिरता राखता येते.

२) **सदस्य राष्ट्रांना संकटकाळात मदत :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सदस्य राष्ट्रांवर नैसर्गिक आपत्ती आल्यास किंवा या देशांचा व्यवहारतोल प्रतिकूल झाल्यास अशा वेळेस मदत करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय नाणेनिधी करते. त्यामुळे नाणेनिधीचे कार्य सदस्य राष्ट्रांवर कोणतेही आर्थिक संकट आले असलेले तरी त्यास मदत करते असा प्रघात पडला आहे.

३) **विनिमयप्रश्न दूर करण्यास सहकार्य :** आंतरराष्ट्रीय व्यापारात वृद्धी करत असताना आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागीहोणारे सर्वच देश एकाच दर्जाचे नसल्याने व्यापारात अडथळे निर्माण होतात. त्यातून विनिमयाचा प्रश्न निर्माण होतो हा प्रश्न दूर करण्याचे कार्य नाणेनिधी करते. नाणेनिधीचा हा उद्देश यशस्वी करण्यासाठी नाणेनिधीकडून सदस्य राष्ट्रांना दुसऱ्या राष्ट्रांचे चलन दिले जाते. परंतु चलन देण्यात काही प्रश्न निर्माण होत असल्यास संबंधित देशाचे चलन विकण्याचे कार्य नाणेनिधीकडून केले जात असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार प्रश्न निर्माण होत नाहीत.

४) **दुर्मिळ चलनाचे वाटप** (Hard Currency) **:** नाणेनिधी कडे अनेक देशांचे चलन असते. ज्यावेळी एखाद्या देशाच्या चलनाचा इतर देशांकडून मोठी मागणी येते. पण सर्व देशाची मागणी पूर्ण करणे शक्य नसते. अशा वेळी मागणी केलेले चलन नाणेनिधीजवळ उपलब्ध नसेल तर ते चलन संबंधित देशांकडून घेऊन पुरविण्याची जबाबदारी नाणेनिधी पार पाडते. प्रसंगी नाणेनिधी सोन्याच्या मोबदल्यात असे चलन आपल्याकडून देते. एवढे करुनही ते चलन अपुरे ठरत असेल तर नाणेनिधी त्या चलनाला दुर्मिळ चलन म्हणून घोषित करते. दुर्मिळ चलनाचे रेशनिंग करण्याचा अधिकार नाणेनिधीला असतो.

५) **तांत्रिक मदत आणि सल्ला :** सदस्य राष्ट्रांना आर्थिक मदतीबरोबर तांत्रिक मदत आणि चलनविषयक व राजकोषीय सल्ला देण्याचे कार्य नाणेनिधी करते. असा सल्ला देण्यासाठी नाणेनिधीत केंद्रीय अधिकोषीय विभाग आणि राजकोषिय विभाग निर्माण केले आहेत. या विभागातील तज्ञ सदस्य देशांना गरजेनुसार सल्ला व सेवा उपलब्ध करुन देतात.

६) **भरपाईमुक्त वित्तीय सुविधा :** प्राथमिक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या अल्पविकसीत देशांना त्या वस्तूंच्या निर्यातीमध्य नेहमीच किंमतीच्या अनिश्चिततेला तोंड द्यावे लागते. म्हणून १९६३ पासून नाणेनिधीने प्रांतपूरक वित्तीय सुविधा निर्माण करुन दिली आहे. या सुविधेमुळे प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीवर अवलंबून असणाऱ्या देशांना निर्यातीच्या उत्पन्नातील घटीमुळे येणारी ताळेबंदातील तूट भरुन काढली जाते. या योजनेमुळे अल्पविकसीत देशांना त्यांच्या कोट्याच्या २५% एवढे परकीय चलन, नाणेनिधी उपलब्ध करुन देते. मात्र ही निर्यात घट अल्पकालीन स्वरुपाची असते.

७) **भाव स्थिरक साठा वित्त व्यवस्था सुविधा :** प्राथमिक वस्तूंच्या किंमती स्थिर राहाव्यात म्हणून चलननिधीचे भावस्थिरक साठा वित्तव्यवस्था सुविधा निर्माण केल्या आहेत. त्यानुसार या योजनेत सहभागी होणाऱ्या राष्ट्रांना त्यांच्या तोट्याची वर्गणी भरण्यासाठी अथवा तद्नुषंगिक खर्च भागविण्यासाठी नाणेनिधीची मदत मिळते. सदस्य देशांना त्यांच्या कोट्याच्या ४५% पर्यंत परकीय चलन नाणेनिधीकडून प्राप्त होते.

८) **विस्तारीत निधी सुविधा :** विकसनशील सदस्य देशांना अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी दीर्घकालीन धोरणे आखावी लागतात. त्यासाठी नाणेनिधीने १९७४ पासून विस्तारीत निधी सुविधा सुरु केली आहे. सदस्य देशांना विकासाचा कार्यक्रम आखण्यास नाणेनिधीकडून साहाय्य केले जाते. या योजनेच्या माध्यमातून सदस्य देशांना त्यांच्या कोट्याच्या १४०% पर्यंत परकीय चलन खरेदी करता येते. १९९७ मध्ये नाणेनिधीने या प्रकारची ३३०८ कोटी एस. डी. आर. मदत केली आहे.

९) **तेलविषयक सुविधा :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सन १९७३ नंतर तेलाच्या किंमती विशेषत: पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती वाढल्याने तेल आयातीवर खर्च वाढला. परिणामी अनेक देशांची व्यापारातील तूट वाढली. या संकटातून मार्ग काढण्यासाठी नाणेनिधी सदस्य देशांना दोन वर्षांसाठी तेल सुविधा निर्माण करुन मर्यादा (SDR) सभासदांच्या कोट्याच्या २५% एवढी करण्यात आली. ७.७५% व्याजदराने दिलेल्या या मदतीची परतफेड ५ ते ७ वर्षात करावी लागते.

१०) **परत चलन खरेदी सुविधा :** जेव्हा एखादा सदस्य देश नाणेनिधीकडून कर्ज उचलतो. तेव्हा तो आपले चलन देऊन आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून दुसऱ्या देशाचे चलन विकत घेत असतो. त्या देशाला आपले चलन ५ वर्षानंतर पुन्हा खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

११) **न्यास निधी :** नाणेनिधी सोन्याच्या स्वरुपातील वर्गणीतील विक्री करुन त्यामधून न्यासनिधीची स्थापना करते. अत्यंत कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या देशांना विकास कामासाठी या निधीतून कर्ज मिळते. त्यावर ०.५% इतके अल्प व्याजदर असते. १९८१ पासून न्यासनिधी कर्जवाटप व्यवस्था स्थगित करण्यात आली असून ती रक्कम विशेष खात्यात शिल्लक ठेवण्यात येते.

**ऊ) नाणेनिधीच्या कार्याचे मूल्यमापन :**

**अ) नाणेनिधीचे यश :**

१) **सदस्य देशांच्या संख्येत वाढ :** ४० सदस्य देशांवर स्थापन झालेल्या या संस्थेची सभासद संख्या १८९ पर्यंत वाढली आहे. यावरुन या संस्थेच्या कार्याचे मोल जगभर लक्षात येत आहे.

२) **विनिमय दरात स्थैर्य :** नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात परस्पर सहकार्याची भावना निर्माण करुन विविध देशांच्या विनिमय दरात स्थैर्य निर्माण करण्याचे कार्य केले आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी अनेक देशांनी चलनाचे अवमुल्यन करण्याचा प्रयत्न केला होता. नाणेनिधीच्या स्थापनेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर विनिमय दरात स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली आहे.

३) **योग्य मार्गदर्शन :** नाणेनिधीने अनेक सदस्य देशांना चलनविषयक समस्याबाबत सल्ला व मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे सदस्य देशांना आपल्या हुंडणावळीच्या दरात योग्य व न्याय बदल घडवून आणण्याची यंत्रणा निर्माण करता आली. तसेच विकसनशील देशांतील लोकांना विविध बाबींचे शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करुन दिले आहे.

**४) आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना :** नाणेनिधीच्या कार्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावरील अनेक बंधने कमी झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली. तसेच बहुराष्ट्रीय करार, विविध देशांना कर्ज देवून त्यांच्या व्यवहारतोलातील प्रतिकूलता दूर करण्याचा प्रयत्न सतत नाणेनिधीने केला आहे. तसेच एसडीआरची निर्मिती करुन आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना दिली आहे.

**५) आंतरराष्ट्रीय रोखतेत वाढ :** विकसनशील देशांना सवलतीच्या दरात कर्जवाटप व अर्थसाहाय्य केले आहे. सोने, डॉलर, पौंड, स्टर्लिंग, एस.डी.आर. व पत्रव्यवहार यामुळे आंतरराष्ट्रीय रोखतेत ७० अब्ज डॉलर एवढी वाढ झाली आहे.

**६) विसकनशील देशांना मदत :** तेल सुविधा, नैसर्गिक आपत्तीत मदत, भरपाई अर्थसाहाय्य व मार्गानी नाणेनिधीने विकसनशील देशांच्या विविध अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. नाणेनिधीने विकसनशील देशांतील अनेक प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मदत केल्याने त्या देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.

**७) सुवर्ण परिमाणापेक्षा चांगली व्यवस्था :** दीर्घकाळ सुवर्ण परिमाण पध्दतीचा अवलंब संपूर्ण जगभर करण्यात आला होता. परंतु कालांतराने वाढती लोकसंख्या, वाढता व्यापार, सोन्याची दुर्मिळता इ. मुळे सुवर्ण परिमाण पध्दत चालविणे कठीण झाले. त्याला पर्याय म्हणून नाणेनिधीकडून कागद चलनपध्दती स्वीकारली त्यांची अंमलबजावणी केली.

**ऋ) नाणेनिधी अपयश :**

**१) मर्यादित कार्यक्षेत्र :** नाणेनिधीचे कार्यक्षेत्र फारच मर्यादित आहे, फक्त चालू व्यापाराद्वारे विदेशी विनिमयाची समस्या निर्माण झाली तर सोडविण्याचा प्रयत्न करते. युध्दकालीन कर्जाची व्यवस्था, भांडवलाची आयात-निर्यात बेशिस्त स्टर्लिंग (Blocked Sterling) इत्यादीशी संबंधित कार्य करते.

**२) सदस्य देशांना कोटा कोणत्याही शास्त्रीय आधारावर निश्चित केला नाही :** सदस्य देशांच्या कोटा निश्चित करताना कोणत्याही शास्त्रीय आधार घेतला नाही. कोणताही आधार न घेता इंग्लंड व अमेरिकेची आर्थिक व राजनैतिक स्वार्थासाठी कोटा निश्चित केला जातो. कारण सदस्य देशांना नाणेनिधीपासून मिळणारा फायदाचा कोटा मर्यादित असतो.

**३) भेदभावपूर्ण धोरण :** कर्जाची स्वीकृती व इतर सहकार्य देताना नाणेनिधीने भेदभावपूर्ण धोरणाचा वापर केला आहे. जसे की फ्रान्सने आपल्या चलनाचे १९४८ मध्ये कोणत्याही प्रकारे नाणेनिधीची परवानगी न घेता ४४% अवमुल्यन केले होते. तरी फ्रान्सवर कोणतीही कारवाई केली नाही. संपूर्ण जगभर प्रभाव असल्यामुळे नाणेनिधीनी डॉलरची 'दुर्लभ चलन' म्हणून घोषणा केली नाही. दुर्लभ चलनाची घोषणा केली असती तर अमेरिकेला आपल्या चलनाचे अशा प्रकारे पुनर्मुल्यन करावे लागते असते की, ज्यामुळे डॉलरचा भाव एक मर्यादेपर्यंत राहिला नसता. परंतु नाणेनिधीने हे न करता पौंड स्टर्लिंग ह्या अवमुल्यानाची शिफारस केली.

**४) अमेरिकेच्या हातातील बाहुले :** नाणेनिधीवर पूर्णत: अमेरिकेचे वर्चस्व आहे. ज्या देशांचे संबंध

अमेरिकेशी बिघडले असतील तर त्यापासून नाणेनिधीला जेवढा लाभ मिळावयास हवा तेवढा मिळत नाही. कोट्याचे वाटप करताना इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स व चीन या देशांनी स्वत: ६४% कोटा घेतला आहे. यामध्ये सर्वात जास्त कोटा अमेरिकेचा असल्याने नाणेनिधी अमेरिकेच्या हातातील बाहुले आहे.

**५) अर्धविकसीत देशाकडे दुर्लक्ष :** नाणेनिधीचा कारभार भांडवलशाही पध्दतीने चालतो. भांडवलशाही देशाचे त्यावर प्राबल्य आहे. अर्धविकसीत देश उदा. आशिया व आफ्रिका खंडातील गरिब देशांकडे विशेष लक्ष देण्यात आले नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

**६) नियमांचे पालन झाले नाही :** नाणेनिधीने स्वातंत्र्य रितीने १०% अवमुल्यनाची व्यवस्था ठेवली होती. यापेक्षा अधिक अवमुल्यनावर निर्बंध नाणेनिधी लावू शकत नाही. फ्रान्स, इंग्लंड, भारत इत्यादी देशांनी नाणेनिधीच्या स्थापनेनंतर आपल्या विनिमय दरात १०% पेक्षा अधिक बदल केला. परंतु त्यावर कोणतीही कारवाई केली नाही.

**७) गुप्ततेचा अभाव :** नाणेनिधीची कार्यपध्दती अत्यंत गुंतागुंतीची आहे. सदस्य देशात एखाद्या समस्यांच्या आर्थिक व्यवहारांची गुप्तता राखली जात नाही. ती जगजाहीर करण्याचा प्रयत्न केला जातो.परिणाम सदस्य देशांची आंतरराष्ट्रीय पातळीवर नाहक बदनामी होते.

**८) कर्ज देताना विविध अटी :** सदस्य देशांना अंतर्गत धोरणात अमेरिकेचा हस्तक्षेप वाढत आहे. अनेक वेळा कर्ज देताना नाणेनिधी विविध अटी लादते. त्यामुळे नाणेनिधीच्या मुख्य उद्दिष्टांचा बाधा येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नाणेनिधी व जागतिक बँक यांच्या दबावामुळे भारताने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारावे लागले.

**९) खुलेपणाचा अनाठायी आग्रह :** खुलेपणा म्हणजे सरकारची जाचक नियंत्रणे रद्द करणे होय. विकसीत देशांच्या प्रभावाखाली नाणेनिधी खुल्या अर्थव्यवस्थेचा आग्रह धरते. परंतु हेच विकसीत देश खुल्या व्यापारात अडथळे निर्माण करतात. बालकामगार, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर, पर्यावरण प्रदुषण, सरकारी अनुदान या कारणांमुळे अनेक देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधने लादली जातात.

### ए) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि भारत :

सुरुवातीच्या ४४ देशांपैकी भारत हा एक देश असल्यामुळे भारताला नाणेनिधीचा संस्थापक सदस्य देश असे म्हटले जाते. भारताचा कोटा अधिक असल्यामुळे पूर्वी ५वा क्रमांक होता. नाणेनिधीच्या संचालक मंडळावर भारताला कायमचे सदस्यत्व होते. त्यावेळी भारताचा कोटा ४०० दशलक्ष डॉलर्स एवढा होता. सातत्याने भारताचा कोटा वाढून फेब्रुवारी १९९३ मध्ये ४१५.२ दशलक्ष एसडीआर एवढा झाला. परंतु नाणेनिधीच्या एकूण निधीमध्ये भारताचा हिस्सा २.०९% वरुन कमी होऊन सध्या १.९६१% इतका झाला आहे. त्या कोट्यानुसार भारताचा १३वा क्रमांक लागतो. २००४ मध्ये भारताचा कोटा ६१८-७० दशलक्ष एसडीआर इतका होता. नाणेनिधीने भारताला आतापर्यंत वेळोवेळी विविध प्रकारची मदत व सहाय्य केले आहे.

**१) महत्त्वाचे स्थान :** भारत हा नाणेनिधीचा संस्थापक सदस्य देश असल्याने सुरवातीच्या सर्वात मोठ्या पाच कोट्यामध्ये भारताला स्थान होते. त्यामुळे नाणेनिधीच्या संचालक मंडळात संचालक नेमण्याची व क्रमाने संचालक पदावर निवडून घेण्याचा अधिकार भारताला मिळाला होता. त्यामुळे सुरुवातीस नाणेनिधीमध्ये भारताचे स्थान महत्त्वाचे होते.

**२) रुपयांची स्टर्लिंगच्या बंधनातून मुक्ती :** ब्रिटिश कालखंडात भारतीय रुपया हा पूर्णपणे स्टर्लिंगवर अवलंबून होता. नाणेनिधीचा सदस्य झाल्यानंतर भारतीय रुपयांची स्टर्लिंगच्या बंधनातून मुक्ती झाली. रुपयांचे एक स्वातंत्र्य अस्तित्व निर्माण झाले. रुपयांचा संबंध सुवर्णाशी आल्याने रुपयाचे परिवर्तन कोणत्याही देशाच्या चलनाबरोबर केले जावू लागते. त्यामुळे भारताचा स्टर्लिंग सोडून इतर देशातही व्यापार वाढला.

**३) संकटकाळी आर्थिक मदत :** १९५७ मध्ये भारतासमोर विनिमय संकट निर्माण झाले. त्यामुळे भारताने नाणेनिधी कडून २०० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज घेतले. पुन्हा १९६१ मध्ये २५० दशलक्ष डॉलर्स कर्ज घेतले. याशिवाय नैसर्गिक व अनपेक्षित आपत्तीला तोंड देण्यासाठी १९६६ मध्ये भारतातील दुष्काळ निवारण्यासाठी १८.७५ कोटी कर्ज दिले. १९७५ मध्ये २०१ दशलक्ष डॉलर्स, १९७६ मध्य २०० दशलक्ष डॉलर्स तर १९९१ ते १९९३ या काळात २.२ अब्ज डॉलर्स कर्ज दिले.

**४) आंतरराष्ट्रीय पत वाढली :** भारताला नाणेनिधीच्या कार्यकारणीत संचालक नियुक्त करण्याचा अधिकार आहे. ही कार्यकारणी नाणेनिधीचे धोरण ठरविते. या प्रकारे भारताला नाणेनिधीच्या मोठ्या सदस्यांकडून एक सदस्य म्हणून गणले गेल्याने भारताची आंतरराष्ट्रीय पत वाढली.

**५) तांत्रिक मदत :** पंचवार्षिक योजनांत अनेक आर्थिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यावेळी आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी नाणेनिधीने आर्थिक मदत दिली व तांत्रिक बाबतीत मार्गदर्शनही केले. १९५३ मध्ये नियोजनाच्या मौद्रिक प्रशासनाचा अभ्यास करण्यासाठी व सरकारला सल्ला देण्यासाठी नाणेनिधीचे एक खास शिष्टमंडळ भारतामध्ये पाठविले होते. या शिष्टमंडळाने भारताच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन अनेक उपयोगी शिफारशी केल्या होत्या.

थोडक्यात संकटकाळात आर्थिक मदत, तांत्रिक मदत, जागतिक बँकेचे सदस्यत्व मिळवून देणे, रुपयांची स्टर्लिंग बंधनातून मुक्तता करणे, एस.डी.आर. योजनेचा फायदा भारताला मिळवून दिला.आज नाणेनिधीकडून भारताला फार मोलाचे सहकार्य मिळाले आहे व भविष्यातही भारताच्या भावी योजना यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे.

### ४.२.२ पुनर्रचना आणि विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक (IBRD) (जागतिक बँक) : (International Bank for Reconstruction and Development)

**अ) पार्श्वभूमी :**

आंतरराष्ट्रीय वित्तीय देवाण-घेवाणीसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादी संघटना असावी अशाप्रकारचा विचार प्रवाह १९३० च्या जागतिक महामंदी आणि दुसऱ्या महायुद्धाच्या अपरिमित नुकसानाच्या पार्श्वभूमीवर

घेण्यात आली. महामंदीमुळे संकटात आलेल्या आपापल्या देशातल्या अंतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी वेगवेगळ्या देशांनी आपआपल्या चलनांचे स्पर्धेने अवमुल्यन केले. या अवमुल्यनामुळे आयात महाग होते आणि निर्यात स्वस्त होते. या अनिर्बंध अवमुल्यनाच्या स्पर्धेमुळे सर्वच देशांच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला.परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रचंड प्रमाणात घट झाली.

दरम्यान दुसरे महायुद्ध झाल्याने अनेक देशांची मोठी आर्थिक हानी झाली. हे युद्ध चालू असतानाच आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य वाढूवन शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेकदेशांनी प्रयत्न सुरु केले. जागतिक पातळीवर एखादी आर्थिक संघटना असावी या दृष्टीने विचार सुरू झाले. त्याचाच एक भाग म्हणून इंग्लंडमधील जे.एम.केन्स यांनी एक योजना तयार केली. त्याला 'केन्स योजना' म्हणतात. तर अमेरिकेतील व्हाईट यांनी आंतरराष्ट्रीय स्थिरीकरण निधी स्थापण्याची योजना मांडली. तिला 'व्हाईट योजना' असे म्हणतात. या दोन्ही योजनांबाबत विचारविनिमय करण्यासाठी अमेरिकेतील 'ब्रेटन वुडस' येथे जगातील ४४ देशांच्या प्रतिनिधींची एक बैठक जुलै १९४४ मध्ये झाली. या बैठकीमध्ये या दोन योजनांचा सविस्तर विचार करुन जगभर शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि आर्थिक सहकार्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या दोन संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. २७ डिसेंबर १९४५ ला जागतिक बँकेची स्थापना झाली. जागतिक बँकेने प्रत्यक्षात जून १९४६ मध्ये कार्य सुरु झाले. नाणेनिधीचे सभासद असणारे देश जागतिक बँकेचे सभासद असतात. सध्या या बँकेचे १८९ सभासद देश आहेत.

### आ) जागतिक बँकेचे भांडवल : (Capital Structure of IBRD)

जागतिक बँक स्थापनेच्या वेळी बँकेचे अधिकृत भांडवल १०००० द.ल. डॉलर्स एवढे होते. त्यात वेळोवेळी गरजेप्रमाणे वाढ करण्यात आली. सध्या जागतिक बँकेचे अधिकृत भांडवल २१००० द.ल. डॉलर्स इतके आहे. परंतु वसूल भांडवल मात्र केवळ १०% म्हणजे २४०० द.ल. डॉलर्स इतके आहे. प्रत्येक सभासद देशाला आपल्या भांडवलापैकी १०% सोने किंवा डॉलर्स मध्ये व ९०% स्वत:च्या चलनात द्यावे लागतात. जागतिक बँकेत भारताचा वाटा ३.४६% मताचा आहे.

### इ) सभासदत्व : (Membership)

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सभासद असणाऱ्या देशांनाच जागतिक बँकेचे सभासद होता येते. भारत हा यापैकी एक संस्थापक सभासद आहे.

### ई) जागतिक बँकेचे व्यवस्थापन : (Organisational Structure of IBRD)

प्रत्येक देश जागतिक बँकेमध्ये एक प्रतिनिधी म्हणून एका गर्व्हनरची नियुक्ती करतो. प्रत्येक सभासद देशाला मुलभूत मतसंख्या २५०+१ डॉलर्स एवढी मिळते. या वर्गणीला १ मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो. या बँकेवर ही नाणेनिधी प्रमाणेच विकसीत देशाच्या हाती एकूण मतदानाच्या ५०% मते आहेत. बँकेच्या दैनंदिन कामकाजासाठी २० सभासदांचे कार्यकारी संचालक मंडळ निवडले जाते. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व जपान या देशांचा सर्वाधिक कोटा असल्याने कार्यकारी संचालक मंडळात प्रत्येकी एक संचालक होता. परंतु

जपानची वर्गणी वाढल्याने जपान कायमचा कार्यकारी संचालक झाला आहे. उर्वरित १५ सभासद पंचवार्षिक निवडणूकीद्वारा निवडले जातात. या कार्यकारी संचालकांमधूनच बँकेच्या अध्यक्षाची निवड होते. बँकेची प्रमुख म्हणून अध्यक्ष कारभार पाहतो. आतापर्यंत अमेरिकेचा प्रभाव असल्याने अध्यक्षपद त्यांच्याकडे राहिले आहे. ०९ एप्रिल २०१९ पासून अमेरिकेचे डेव्हीड मालपास (David Malpass) हे जागतिक बँकेचे अध्यक्ष आहेत.

**उ) जागतिक बँकेची उद्दिष्टे : (Objectives of IBRD)**

१) सदस्य देशांना उत्पादक भांडवल गुंतवणुकीसाठी कर्ज देणे, युद्धोत्तर पुनर्बांधणी आणि शांततेच्या काळातील गरजा यासाठी मदत करणे.

२) सदस्य देशांच्या मधील श्रमिकांच्या स्थितीत आणि वाढ करण्यासाठी आर्थिक मदत करणे

३) नव्याने स्वातंत्र्य झालेल्या आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका या खंडातील विकसनशील व अत्यंत मागासलेल्या देशांना आर्थिक विकासासाठी मदत करणे.

४) जागतिक बँकेच्या प्रत्येक राष्ट्राला आंतरराष्ट्रीय व्यापारात समतोल साधता यावा म्हणून प्रयत्न करणे.

५) सदस्य देशांना त्यांच्या विकासासाठी दीर्घकालीन कर्ज देणे हा बँकेचा महत्त्वाचा उद्देश असतो.

६) दुर्मिळ चलन उपलब्ध करुन देवून आंतरराष्ट्रीय व्यापारातील असमतोल दूर करणे.

७) देशा-देशातील वादविवाद कमी करुन आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करुन मानवजातीत बंधुभाव निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करणे.

**ऊ) जागतिक बँकेची कार्ये : (Functions of IBRD)**

**१) दुसऱ्या महायुद्धात नुकसान झालेल्या सदस्य देशांचे पुर्नवसन :** दुसऱ्या महायुद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांना झळ बसली. अशा देशांच्या अर्थव्यवस्थांची बिकट अवस्थेतून मुक्तता करण्याचे काम बँक करते. विविध देशांतील गुंतवणूक साधनांच्या सहाय्याने देशाच्या अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करण्यासाठी अर्थव्यवस्थांच्या पुनर्रचनेच्या दृष्टीनेच कार्यक्रम तयार केला. सभासद देशात मोठ्या प्रमाणातील गुंतवणूक उत्पादक प्रकल्पात सूक्ष्म अर्थव्यवस्थांची घडी नीट बसविण्यावर प्रभाव देण्यात आला. दुसऱ्या महायुध्दानंतर नव्याने स्वातंत्र्य झालेल्या देशांची पुर्नरचना करणे.

**२) खाजगी भांडवल गुंतवणूक प्रोत्साहन :** आंतरराष्ट्रीय व्यापारात सभासद देशांच्या अर्थव्यवस्थांची पुनर्रचना करताना सभासद देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये खाजगी भांडवली गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देण्यावर जागतिक बँकेने भर दिला. विविध देशांत गुंतवणूक करणाऱ्या देशांना जागतिक बँक कर्जे दिली आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होण्यास मदत झाली.

**३) वित्तीय संस्थांची स्थापना :** जागतिक बँकेने विविध संस्था स्थापन करुन आंतरराष्ट्रीय कर्जव्यवहारात सुलभता आणण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. १९५६ मध्ये आंतरराष्ट्रीय वित्तनियम संस्था स्थापन करुन त्याद्वारे खाजगी उद्योजकांना कर्जपुरवठा केला आहे. सन १९६० मध्ये आंतरराष्ट्रीय विकास संघाची स्थापना करण्यात

आला. त्याचबरोबर राष्ट्रा-राष्ट्रांतील भांडवलाचा विकास कार्यासाठी वापर व्हावा म्हणून जागतिक बँकेने वित्त निगम (Finance Corporation) स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले.

**४) तांत्रिक सल्ला व सेवा :** जागतिक बँक सभासदांना कर्जवाटप करण्याबरोबरच विविध प्रकारच्या तांत्रिक व सल्लागाराच्या सेवा पुरविते. वित्तीय योजनांचे संचालन, वित्तीय व्यवस्थापन, देशांतर्गत बँकिंगचा विकास, पतनियंत्रण इत्यादि क्षेत्रात मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. याशिवाय विविध प्रकल्प कार्यक्षम बनविण्यासाठी आवश्यक तो सल्ला दिला जातो.

**५) नियोजन यंत्रणा उभारणे :** विकसनशील देशांना नियोजन यंत्रणा उभारण्यासाठी जागतिक बँकेचे तज्ञ मार्गदर्शन करतात. युनोची प्रतिनिधी म्हणून ही बँक विविध देशांच्या आर्थिक अभ्यासाचे कार्य करते. सभासद देशांच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी जागतिक बँकेकडून प्रशिक्षण केंद्र चालविले जाते.

**६) कर्ज सापळ्यातून मुक्तता :** विकसनशील देशांनी विविध मार्गांनी उभारलेल्या कर्ज सापळ्यातून बाहेर काढण्यासाठी जागतिक बँक मदत करते. ब्राझील, अर्जेंटिना, चिली इत्यादी देशांना त्यांची कर्जे परत करण्यासाठी जागतिक बँकेने मदत केली आहे.

**७) विकसनशील देशांना विशेष मदत :** विकसनशील देशांच्या विकासासाठी भांडवल गुंतवणूक, यंत्र व तंत्रज्ञान आयात इत्यादीसाठी प्रचंड प्रमाणात पैसा लागतो ही भांडवल गुंतवणूक दीर्घकालीन असते. त्यानुसार जागतिक बँकेने आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिका या खंडातील विकसनशील देशांना मदत केली आहे.

**८) लोकसंख्याविषयक समस्या :** सदस्य देशांना लोकसंख्येच्या समस्येच्या बाबतीत मार्गदर्शन करण्यासाठी जागतिक बँकेने एक स्वतंत्र विभाग सुरु केला आहे. कुटुंब नियोजनातील दीर्घकालीन कार्यक्रम आखले आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जागतिक बँकेने मदत केली आहे.

**९) आंतरराष्ट्रीय विवाद सोडविणे :** विविध देशांदेशामधील विविध प्रकारचे तंटे वाद सोडविण्याचे काम जागतिक बँक करते. अशा प्रकारच्या वादामुळे संबंधित देशांच्या आर्थिक विकास कार्यात अडथळे निर्माण होतात. १९६६ मध्ये गुंतवणूक तंटे सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय गुंतवणूक विवाद निवाडा केंद्र नावाची यंत्रणा निर्माण केली. या यंत्रणेच्या माध्यमातून सुएझ कालव्याच्या राष्ट्रीयीकरणाने इंग्लंड व युनायटेड अरब रिपब्लिक यांच्यातील तणाव कमी करण्यात जागतिक बँकेला यश मिळाले आहे. याशिवाय भारत-पाकिस्तानमधील पाणी वाटपाचा प्रश्न सोडविला आहे.

**ऋ) जागतिक बँकेचे मुल्यमापन :**

**१) पुनर्रचना कार्यावर भर :** जागतिक बँकेने दुसऱ्या महायुद्धामध्ये अपरिमित नुकसान झालेल्या युरोपीय देश व जपानकडे अधिक लक्ष दिले. या देशांची आर्थिक पुनर्रचना करून त्यांची अर्थव्यवस्था पूर्वीसारखी करण्यासाठी प्रयत्न केले. युद्धानंतर तात्काळ ५००० द.ल डॉलर्स इतकी आर्थिक मदत पुर्नबांधणी कार्यासाठी दिल्याने युद्धात नुकसान झालेल्या देशांची पुर्नरचना होण्यास मदत झाली.

**२) पायाभूत सुविधांची उपलब्धता :** सर्व सभासद देशामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जागतिक बँकेने मोठ्या प्रमाणात कर्ज सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामध्ये पाणीपुरवठा, वाहतूक व दळणवळण, रस्ते, दुरसंचार इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा केला. पायभूत सुविधांच्या उपलब्धतेवरच आर्थिक विकास अवलंबून असतो.

**३) शेती क्षेत्राला कर्ज पुरवठा :** विकसनशील देशांत शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. त्यामुळे या क्षेत्रांच्या विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. या दृष्टीने जागतिक बँकेने शेती क्षेत्रासाठी विशेषत: जलसिंचन, पाटबंधारे प्रकल्प, भूसुधारणा, शेतमाल, विक्रीव्यवस्था, संकरित बी-बियाणे अशा विविध उपक्रमांना मोठ्या प्रमाणावर मदत केली. याबरोबर शेती व्यवसायात आधुनिकता आणण्यासाठी जागतिक बँकेने शेती शिक्षण व प्रशिक्षण यावर ही भर दिला आहे. ग्रामीण भागात रस्ते विकास यासाठी जागतिक बँकेने शेतीच्या सर्वांगिण विकासासाठी कर्ज पुरवठा केला आहे.

**४) कर्जाची समान प्रादेशिक विभागणी :** जागतिक बँकेने सर्व खंडातील विविध देशांना कर्ज देताना समान प्रादेशिक विभागणीचे तत्व स्विकारले आहे. बँकेने एकूण कर्ज वाटपापैकी २५% कर्जे आशिया व मध्य पूर्वेकडील देशांना, पश्चिम गोलार्धातील देशांना ३०%, युरोप खंडातील देशांना २० व १०% कर्जे अफ्रिकन देशांना जागतिक बँकेचा प्रादेशिक समतोल लक्षात येतो.

**५) कमी व्याजदर :** जागतिक बँकेने सदस्य देशांना अत्यंत कमी व्याजदराने कर्जपुरवठा केला आहे. सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा करण्यासाठी 'तिसरी खिडकी' या नावाने योजना सुरू केली आहे. त्यावर ४.५% व्याजदर आकारला जातो. विशेषत: विकसनशील व अविकसीत देशांना अशा कमी व्याजदराची कर्जे दिली जातात.

**६) सामाजिक गरजांची पूर्तता :** जागतिक बँकेने विशेषत: विकसनशील देशांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सन १९६३ पासून लक्ष केंद्रीत केले. यादृष्टीने लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम, अपुरा व निकृष्ट आहार पर्यावरण समस्या, आर्थिक विषमता, दारिद्र्य इत्यादी मुलभूत प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी बँक पतपुरवठा करते, अलीकडे जागतिक बँकेने नागरी पाणीपुरवठा, सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था, पर्यटन इत्यादी विविध कारणांसाठी आर्थिक मदत दिली आहे.

**ए) जागतिक बँकेचे अपयश :**

**१) अपुरे भांडवल :** दुसऱ्या महायुद्धामध्ये बेचिराख झालेल्या युरोपियन राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात मदत केली परंतू दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र्य झालेल्या आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका या खंडातील देशांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रचंड प्रमाणात भांडवलाची गरज होती. मात्र जागतिक बँकेकडे तेवढ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध नसल्याने अशा देशांची भांडवलाची गरज पूर्ण करता आली नाही.

**२) खाजगी गुंतवणूकीत अडचणी :** विविध क्षेत्रामध्ये खाजगी गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे हा जागतिक बँकेचा मुख्य हेतू आहे. परंतु मागासलेल्या देशात भांडवल गुंतविण्यास खाजगी उद्योजकांना अनिश्चितता वाटते. सरकारने हमी दिल्यास त्यांच्या हस्तक्षेपाचा धोका असतो. बँक प्राधान्य देत असलेल्या प्रकल्पात

गुंतवणूक करण्यास नफा मिळण्याची शक्यता कमी असल्याने खाजगी गुंतवणूकदारांना फारसा रस नसतो. त्यामुळे खाजगी गुंतवणूकीस अडचणी निर्माण होतात.

**३) अल्पविकसीत देशांकडे दुर्लक्ष :** जागतिक बँकेने अल्पविकसीत देशांकडे दुर्लक्ष केल्याची टीका केली आहे. आशिया, आफ्रिका खंडातील बहुसंख्य देशात दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. त्यांच्या गरजांप्रमाणे त्यांनी कर्जपुरवठा केला नाही. त्यामुळे त्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास झालेला नाही.

**४) कर्ज मंजुरीस विलंब व जाचक अटी :** एखाद्या सभासद देशाने या बँकेकडे कर्ज मागणी केल्यानंतर त्यांच्या कर्जफेडीवर अवास्तव चर्चा होते. कर्ज मंजुरीस विलंब होतो. बँकेने दिलेले कर्ज त्या निर्धारित प्रकल्पावर दिलेल्या कालावधीत खर्च व्हावे अशी अट घातली जाते. बऱ्याच वेळा प्रकल्प अहवाल तयार करतेवेळी प्रकल्प महत्त्वाचा असतो परंतु विलंबामुळे दरम्यानच्या काळात प्रकल्पाचे महत्त्व कमी झालेले असते. तरीही जाचक अटीमुळे कमी महत्त्वाच्या प्रकल्पावर खर्च करावा लागतो.

**५) अयोग्य वागणूक :** जागतिक बँक गरीब राष्ट्रांना अयोग्य वागणूक देते. प्रारंभापासून श्रीमंत देशांच्या भांडवलशाही विचाराला बँक महत्त्व देते व ज्यावेळी विकसनशील देशातील प्रकल्पासाठी प्रगत राष्ट्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जुन्या व कालबाह्य यंत्रसामग्री पुरवल्या जातात. या बँकेच्या हाती प्रचंड आर्थिक सत्ता असल्याने ती विकसनशील देशाच्या विकास प्रकल्पांना अनेक अटी लादते.

**६) अमेरिकेचा प्रभाव :** सुरवातीला जागतिक बँकेचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात निधी दिला होता. त्यामुळे या बँकेवर अमेरिकेचा प्रभाव निर्माण झाला आहे. या बँकेचे स्वरूप जागतिक नसून एका अमेरिकेन बँकेसारखे झाले आहे. या बँकेचे अध्यक्षपद सतत अमेरिकन व्यक्तीच भूषविले असल्याचे दिसते. यामुळे अमेरिकेला या स्वरूपात संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थांवर नियंत्रण ठेवता आले आहे.

**ऐ) जागतिक बँक आणि भारत :**

भारत हा जागतिक बँकेचा संस्थापक देश आहे. स्थापनेपासून बँकेने भारताला वारंवार कर्जपुरवठा केला आहे. सन १९५८ पासून सर्वाधिक मदत प्राप्त करणारा देश म्हणून भारताचा क्रमांक लागतो.

१) सर्वप्रथम १९४९ मध्ये पुर्ननिर्माणाकरीता भारताला ३४ द.ल डॉलर्सचे कर्ज मंजूर करण्यात आले. शेती व ग्रामीण विकास, वीज, औद्योगिक विकास, वाहतूक व दळणवळण याकरिता बँकेने भारताला गरजेनुसार कर्ज दिले आहे.

२) जून १९९६ पर्यंत भारताला जागतिक बँकेकडून २३७३३.६ द.ल डॉलर्स किंमतीचे एकूण १६० वेळा कर्ज मिळाले आहे.

३) जागतिक बँकेने भारतातील दामोदर, कोयना यासारखे विद्युत प्रकल्प, बंदर, रेल्वे, रस्ते विकास इत्यादींना मोठी कर्जे आणि अर्थसहाय्य केले आहे.

४) २०१० मध्ये 'Vision 2010' अहवाल तयार करण्यासाठी लक्ष्यनिश्चित करण्यात आली.

अ) भारतातील कुपोषित बालकांची संख्या निम्यांवर आणणे.

आ) रोगराई निवारण यंत्रणा कार्यक्षम करणे.

इ) लोकसंख्या वृद्धीदर १.२% आणणे.

जगातल्या एकूण दारिद्री लोकसंख्येपैकी १/३ लोकसंख्या भारतात राहते. हे लक्षात घेऊन बँकेने भारताला घ्यावयाच्या कर्ज आणि आर्थिक मदतीत लक्षणीय वाढ करणे गरजेचे आहे. बँकेने आपल्या कार्याचे पुर्नविलोकन करण्याची वेळ आली आहे.

### ४.२.३ आशियाई विकास बँक : (ADB)(Asian Development Bank)

#### अ) पार्श्वभूमी :

आशियाई विकास बँक ही आंतरराष्ट्रीय वार्षिक संख्या असून आशिया खंडातील देशांच्या आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात कार्य करते. सप्टेंबर १९६३ मध्ये आशिया व सुदूर-पूर्व या करिता ECAFE (Economic Commission for Asia and Far East) या आर्थिक आयोगाने एक विशेष समितीची स्थापना केली. या समितीत एका बँकेची समिती स्थापना करण्याचा प्रस्ताव मांडला व त्यानुसार एप्रिल १९६५ मध्ये आयोगाच्या बैठकीत आशियाई बँकेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. ह्या निर्णयानुसार बँकेची स्थापना २६ नोव्हेंबर १९६६ मध्ये होऊन १९ डिसेंबर १९६६ पासून या बँकेच्या कार्याला सुरूवात झाली. या बँकेचे मुख्य कार्यालय मनिला (फिलिपीन्स) येथे आहे. या बँकेच्या एकूण भांडवलापैकी ६०% पेक्षा अधिक भांडवल आशियाई देशांनी पुरविले आहे. १७ जानेवारी २०२० पासून मस्तसुगूअस्कावा (Masatsugu Asakawa) अध्यक्ष असून सध्या या बँकेचे ६८ देश सभासद आहेत.

#### ब) आशियाई विकास बँकेची उद्दिष्ट्ये :

आशियाई विकास बँक एक आंतरराष्ट्रीय बँक म्हणून ओळखली जाते. या बँकेचे कार्यक्षेत्र जगाच्या आणि अतिपूर्व भूप्रदेशापुरतेच मर्यादित आहे. त्यामुळे या बँकेला या भागातील देशाच्या विकासासाठी आपले प्रयत्न तीव्र आणि अधिक वेगाने करावे लागत आहे. या बँकेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) आशिया खंडातील व सुदूर पूर्व देशांचा आर्थिक विकासाकरिता सार्वजनिक व खाजगी भांडवलाच्या गुंतवणूकीस उत्तेजन देणे.

२) सदस्य देशांच्या विकासाकरिता त्यांचा राष्ट्रीय, क्षेत्रीय, उपक्षेत्रीय विकास कार्यक्रम लक्षात घेऊन विकासाकरिता संसाधने उपलब्ध करून देणे.

३) सदस्य देशांची विकास धोरणे व योजना यांच्यात समन्वय साधण्याकरिता साहाय्य करणे. यामुळे विकसनशील देश उपलब्ध संसाधनांचा योग्य पद्धतीने उपयोग करू शकेल व विदेशी व्यापाराचा संतुलित विकास साधता येईल.

४) सदस्य देशांच्या विकास योजना व कार्यक्रमांची निर्मिती करणे, वित्त व्यवस्था करणे व त्यांच्या कार्यात तांत्रिक साहाय्यता देणे.

५) संयुक्त राष्ट्रसंघ व त्याच्याशी संलग्न संस्था तसेच इतर राष्ट्रीय खाजगी व सार्वजनिक संस्थांशी सहकार्य करून विकासाची गती वाढविणे.

६) सदस्य देशांच्या उद्दिष्ट पूर्तीकरिता साहाय्यक ठरतील अशी सर्वच प्रकारची कार्ये व सेवा प्रधान करणे.

७) आशियाई देशांना त्यांच्या आर्थिक वृद्धीचा दर योग्य त्या प्रमाणात ठेवण्यासाठी सहकार्य करणे.

८) आशिया खंडातील श्रीमंत आणि गरीब देशातील अंतर कमी करणे.

अशाप्रकारे आशियाई विकास बँकेची स्थापना आशियाई देशातील आर्थिक विकासाला उत्तेजन व गती देण्याकरिता करण्यात आली. आशियाई विकास बँकेच्या चार्टरमध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, ही बँक आशिया व सुदूर पूर्व देशांमध्ये परस्पर सहकार्य व विकास ह्यांना मूर्त स्वरूप देईल व विकसनशील सदस्य देशांच्या सामूहिक एवं वैयक्तिक आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गतिमान बनविण्याकरिता सहकार्य देईल.

**इ) सदस्यत्व :**

आशियन विकास बँकेचे सदस्यता केवळ आशिया महाद्वीपाच्या देशांपुरतीच मर्यादीत नाही तर आशियाई महाद्वीपाच्या बाहेर असलेल्या देशांनाही सदस्य केले आहे. अधिक संसाधने उपलब्ध व्हावीत व विकसीत देशांशी संपर्क साधता यावा हा त्यामागचा उद्देश आहे. हाच उद्देश समोर ठेऊन अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रिया, बेल्जियम, कॅनडा, डेन्मार्क, जर्मनी, इटली, स्वीडन, नार्वे इत्यादी देशांनाही सदस्यत्व देण्यात आले आहे. प्रारंभी बँकेची सदस्य संख्या ३२ होती ती वाढून ६८ इतकी झाली आहे. यापैकी १६ देश आशिया बाहेरील विकसीत देश आहेत. बाकीचे आशिया खंडातील आहेत.

**ई) व्यवस्थापन :**

आशियाई विकास बँकेचे व्यवस्थापन पाहण्यासाठी प्रशासकीय मंडळ कार्यरत आहे. प्रत्येक सदस्य देशातर्फे २ प्रतिनिधी बँकेवर पाठविण्यात येतात. अशाप्रकारे आलेले हे सर्व प्रतिनिधी प्रशासन मंडळाचे प्रतिनिधित्व करतात. या प्रशासकीय मंडळात १२ संचालकांची निवड होते. या संचालकामधून बँकेच्या अध्यक्षाची निवड करण्यात येते. हा अध्यक्ष आशियाई देशांमधून असतो.

**उ) आशियाई बँकेचे वित्तीय स्त्रोत :**

**१) साधारण भांडवली साधने (OCR) :** यात सदस्यांकडून मिळालेले अभिदत्त भांडवल, बँकेला कर्जाद्वारे मिळालेली रक्कम, दिलेल्या कर्जावर मिळालेले उत्पन्न व इतर उत्पन्न समाविष्ट असते.

**२) विशेष निधी संसाधने (Special Funds Resources - SFR) :** यात तुलनात्मकरित्या विकसीत देशांचे योगदान असते. यात विशेष कोष गुंतवणूकीपासून मिळालेली रक्कम, तसेच (OCR) पासून

विशेष रूपाने मिळालेला निधी अंतर्भूत असतात. ह्या कोषांचा उपयोग सवलतींचे कर्ज देण्याकरिता होतो. दोन प्रकारचे विशेष निधी आहेत.

अ) आशियन विकास निधी (ADF) व

ब) तांत्रीक साहाय्यता विशेष निधी (TAST) (Technical Assistance Special fund)

**इ) आशियन विकास बँकेची कार्ये :**

**१) विकसनशील देशांना कर्ज :** या बँकेचे प्रमुख कार्य कर्जाची सोय करून देणे होय. कर्ज देण्याच्या प्रक्रियेचे दोन भाग आहेत.

अ) साधारण प्रक्रिया ब) विशेष प्रक्रिया

साधारण प्रक्रियेच्या अंतर्गत कर्ज हे बँकेच्या साधारण भांडवली साधनांमधून देण्यात येते. विशेष योजनांच्या खर्चात समाविष्ट विदेशी मुद्रा किंवा स्थानीय मुद्रा यांच्या मागणीची पूर्ती करण्याकरिता देण्यात येते. फार छोट्या योजनांकरिता अधिकोष प्रत्यक्ष कर्ज न देता देशाच्या विकास बँक किंवा इतर संस्था यांच्यामार्फत कर्ज देण्यात येते.

विशेष प्रक्रियेच्या अंतर्गत कर्ज हे विशेष प्रकारच्या कोषांमधून देण्यात येते. अशा प्रकारची कर्जे ही बँक देशाच्या स्थितीनुसार उच्च विकासाच्या प्राथमिक योजनांकरिता दीर्घकालाकरीता देण्यात येते. ह्या कर्जावरील व्याजदर साधारण कर्ज प्रक्रियांच्या तुलनेत कमी असतो व कर्जफेडीचा अवधीही जास्त असतो. बँक आपल्या भागभांडवलाचा १०% हिस्सा विशेष कोषात ठेवू शकते. ह्याचा उपयोग सुलभ कर्जाकरिता करण्यात येतो.

विकसनशील देशांना त्यांच्या विकासयोजना पूर्ण करण्याकरिता आशियाई विकास बँक कर्ज देते. आशियाई विकास बँक सरकारला कर्ज देते. त्यामधून वाहतूक, दळण-वळण ऊर्जा, कृषी कृषी परिवहन उद्योग यांनाच प्राधान्याने कर्ज देण्यात आले आहे.

**२) तांत्रीक साहाय्यता :** सदस्य देशांची सरकारे त्यांच्या एजन्सिज व त्यांच्या क्षेत्राच्या खाजगी फर्म्स व संस्था यांना ही बँक तांत्रीक बाबतीत साहाय्यता देते. ते पुढील प्रमाणे.

अ) राष्ट्रीय अथवा क्षेत्रीय विकास योजनांकरिता प्रस्ताव तयार करणे, आर्थिक अंदाज घेणे व ह्या योजनांना कार्यरूप देणे.

ब) शेती उद्योग व सार्वजनिक क्षेत्रात नवीन एकक निर्माण करण्याकरिता साहाय्यता देतो व प्रचलित एककांना, (पेढ्यांना, उद्योग संस्थांना) तांत्रीक साहाय्यता देते.

क) तांत्रीक साहाय्यता देण्याकरिता आशियाई विकास बँक संबंधित देशांना संमतीने विशेषतज्ञांचे पथक पाठवते. तांत्रीक मदत कर्ज किंवा अनुदानाच्या रूपात देण्यात येते. अनुदान रूपाने मदत दिली असल्यास त्याची परतफेड करावी लागत नाही.

**३) हमीची सोय :** सदस्य देशांनी विविध योजनांकरिता अन्य स्त्रोतांकडून घेत असलेल्या कर्जाबद्दल व हे विकत असलेल्या बाँडस्च्या बाबत आशियाई विकास बँक हमी देते किंवा जामीन घेत असते. त्यामुळे कर्जाचा खर्चही बराच कमी होतो.

**४) खाजगी उद्योगांना कर्ज :** १९८६ पासून आशियाई विकास बँकेने सरकारी हमी नसतानाही खाजगी उद्योगांना व वित्तीय संस्थांना कर्ज देण्यास सुरूवात केली आहे. विकसनशील देशातील खाजगी क्षेत्रातील विविध योजनांकरिता गेल्या काही वर्षात बँकेने मोठ्या प्रमाणात कर्ज दिले आहे.

**५) गरिब देशांना मदत :** आशियाई विकास बँक नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक अडचणीच्या काळात गरिब देशांना वेगवेगळ्या प्रकारची मदत करते. त्यामधून गरिब देशांतील संकटाची स्थितीचे निवारण करण्यात मदत झाली आहे.

**ऊ) मुल्यमापन :** आशियाई विकास बँकेने निर्बळ व दरिद्री अशा विकासोन्मुख देशांना आर्थिक तांत्रीक अशी विविध प्रकारची मदत करून त्यांच्या आर्थिक उत्पादनाला मदत केली आहे. हे मान्य करावे लागेल असे असले तरी काही तज्ञांच्या मते, आशियाई विकास बँकेच्या कार्यप्रणालीवर आक्षेप घेतला आहे. जागतिक बँकेच्या आशियाची शाखेला समर्थन करूनच आशियाई विकास बँक आपली उद्दिष्टे पूर्ण करू शकते असे टिकाकारांचे म्हणणे आहे. आशियाई देशाच्या गरजा इतक्या विविध व विशाल आहेत की आशियाई विकास बँकेसारखीच क्षेत्रीय बँक त्या पूर्ण करू शकते.

काही टिकाकारांच्या मते, अमेरिकेसारख्या गैरक्षेत्रीय देशांचे भांडवल व मताधिकार जास्त असल्यामुळे बँकेची 'आशियन प्रवृत्ती' नष्ट होऊ शकते. परंतु ह्या आक्षेपातही फारसे तथ्य आहे कारण ह्याबाबत बँकेनी आपले नियम वैशिष्टपूर्ण असे केले आहेत.

आशियाई विकास बँकेच्या स्थापनेपासून या बँकेने आर्थिक विकासाकरिता कित्येक वर्षापासून असलेली मदत व प्रोत्साहन दिले आहे. परंतु मागासलेल्या देशांची मागणी एवढी प्रचंड आहे की या बँकेची संसाधने ही अपूरी पडतात. म्हणून विकसीत व संपन्न देशांनी या बँकेला अधिकाधिक साहाय्य करावे. असे झाल्यास या बँकेला सवलतीच्या दराने मागास देशांना आर्थिक साहाय देऊन त्यांच्या विकासाला बहुमोल मदत करू शकेल.

**ई) आशियाई विकास बँक व भारत :**

आशियन विकास बँकेची स्थापना करण्यात भारताचा पुढाकार होता. भारत हा बँकेचा प्रथमपासूनच सदस्य आहे व भारताला संचालक मंडळात स्थायी संचालक नेमण्याचा अधिकार असल्यामुळे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**भारत : संचयी कर्ज व (ADB) द्वार विशेष अर्थसाहाय्य क्षेत्रवाईज (१९६६-२०१३)**

| अ.नं. | क्षेत्र | संख्या | एकूण रक्कम द.ल.डॉलर्समध्ये | % |
|---|---|---|---|---|
| १. | शेती व नैसर्गिक संसाधने | ७ | २८१.३६ | ०.८९ |
| २. | शिक्षण | १ | १००.०० | ०.३२ |
| ३. | ऊर्जा | ७३ | १०७७१.२९ | ३४.०४ |
| ४. | वित्त | १९ | २६२०.०० | ८.२८ |
| ५. | आरोग्य आणि सामाजिक संरक्षण | १ | २०.०० | ०.०६ |
| ६. | उद्योग आणि व्यापार | ५ | २७५.०० | ०.८७ |
| ७. | मल्टी सेल्टर | १७ | ३१७९.०० | १०.०५ |
| ८. | सार्वजनिक क्षेत्र व्यवस्थापन | ९ | १४५०.०० | ४.५८ |
| ९. | परिवहन आणि आयसीटी | ४९ | १०१४२.०० | ३२.०५ |
| १०. | पाणीपुरवठा आणि इतर नगरपालिका पायाभूत सुविधा | ३० | २८०५.९६ | ८.८७ |
| | **एकूण** | **२११** | **३१६४५.५७** | **१००.००** |

संदर्भ - www.---.org/countries/india/publications

आशियाई विकास बँकेने भारतीय लोकांच्या धोरणात्मक ध्येयांचे समर्थन केले आहे. सरकारने वेगवान आर्थिक विकास साधला आहे. यापुढे अशाच प्रकारे जलद आर्थिक विकास साधण्यासाठी महत्त्वपूर्ण तीन अजेंडाचा समावेश केला आहे. त्यामध्ये समावेशकांसाठी समर्थन वाढ, पर्यावरणीय शाश्वत विकास आणि प्रादेशिक एकत्रीकरण यावर भर देण्याचे आव्हान केले आहे. याशिवाय भक्कम पायाभूत सुविधा निर्माण करून रोजगार निर्मिती आणि प्रादेशिक कनेक्टिव्हिटी इत्यादीवर भर दिल्यास भारताचा जलद विकास होईल. त्यासाठी आशियाई विकास बँकेने भारताला भरीव अशी मदत देण्याची आवश्यकता आहे.

### ४.२.४ जागतिक व्यापार संघटना : (WTO) (World Trade Organisation)

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय सहकार्य संपुष्टात आल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये प्रचंड प्रमाणात घट झाली. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारात अनेक अडचणी निर्माण होऊ लागल्या. बहुतेक देशांनी या काळात

संकुचित राष्ट्रवादाचा अवलंब केला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक व्यवहारात क्लिष्टता निर्माण झाली. या सर्वांतून मार्ग काढण्यासाठी हॅवनायेथे १९४७ मध्ये जागतिक परिषद झाली. या परिषदेमध्ये २३ राष्ट्रांनी एकत्र येऊन जकात व व्यापाराबातचा सर्वसामान्य करार (GATT) गॅट करण्यात आला. गॅटचा भारत हा संस्थापक सदस्य आहे. गॅटच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदस्य राश्ट्रात व्यापार सुरू झाला. १९८५ नंतर गॅटच्या व्यवहाराबाबत सदस्य राष्ट्रात प्रचंड प्रमाणात मतभेद निर्माण झाले. त्यातून आर्थर डंकेल यांनी एक प्रस्ताव तयार केला. तो डंकेल प्रस्ताव म्हणून प्रसिध्द आहे. या प्रस्तावाला सुरुवातीला विकसनशील देश, कामगार संघटना व अन्य घटकांनी प्रचंड विरोध दर्शविला. या प्रस्तावातील त्रुटी दूर करण्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या चर्चेच्या एकूण ८ फेऱ्या झाल्या. १९९३ मधील उरूग्वे फेरीत या प्रस्तावाला अंतिम रूप देण्यात आले. १९९४ मध्ये भारतासह जगातील एकूण १२४ देशांनी या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या आणि जानेवारी १९९५ मध्ये ‘‘जागतिक व्यापार संघटना’’(WTO) ची स्थापना झाली. सध्या या संघटनेमध्ये १६४ राष्ट्रे सभासद आहेत.

**अ) जागतिक व्यापार संघटनेचे व्यवस्थापन :**

**क) मंत्री परिषद (Ministerial Conference) :**

जागतिक व्यापार संघटनेच्या रचनेमध्ये मंत्रीपातळी वरील परिषद हे सर्वोच्च पातळीवर कार्य करणारी यंत्रणा आहे. मंत्री परिषदेमध्ये सभासद देशाचे व्यापार मंत्री सदस्य म्हणून कार्य करतात. मंत्रीपातळीवरील परिषद ही सर्व बाबीसंबंधी अंतिम निर्णय घेते.

**ख) सर्वसाधारण मंडळ (Genenal Council) :**

जागतिक व्यापार संघटनेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता अनेक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामध्ये सर्वसाधारण मंडळ हे सर्वात महत्त्वाचे मानले जाते. कारण हे मंडळ मंत्रीपातळीवरील परिषदेला कामकाजाचा अहवाल देण्यास बांधिल असते. सर्वसाधारण मंडळांतर्गत दोन स्वतंत्र मंडळे कार्यरत असतात. त्यापैकी एक देशादेशात व्यापारातून निर्माण झालेले विवाद मिटविण्याचे कार्य करते तर दुसरे मंडळ व्यापार धोरणाचा आढावा घेण्याचे कार्य करित असते.

**ग) वादविवाद मंडळ (Dispute Settlement Body) :**

सर्वसाधारण मंडळ आपल्या कार्याची जबाबदारी इतर तीन स्वतंत्र मंडळावर विभागून देते. त्यापैकी

१) वस्तूच्या व्यापारासाठी मंडळ – **(Trade in Goods)**

२) सेवांच्या व्यापारासाठी मंडळ – **(Trade in Service)** आणि

३) बौद्धिक संपदा अधिकारासाठी मंडळ – **(Trade Related Aspects of Intellectual Property Right)**

ही तिन्ही मंडळे सर्वसाधारण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतात आणि सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतात.

**ब) व्यापारधोरण आढावा मंडळ (Trade Policy Review Body) :**

वरील स्वतंत्र तीन मंडळाबरोबरच व्यापार धोरणाचा आढावा घेण्यासाठी सर्वसाधारण मंडळाकडून स्वतंत्र ातीन समित्या नियुक्त केल्या आहेत. त्यापैकी

१) व्यापार आणि विकास समिती (Committee of Trade and Revelopment)

२) व्यवहार तोलावर नियंत्रण ठेवणारी समिती (Committee on Balance of Payment Restriction)

३) अंदाजपत्रक वित्त व्यवहार आणि प्रशासन सांभाळणारी समिती (Committee on Budgef, Finance and Administetion Rwvelopment)

ही समिती जागतिक व्यापारसंघटना आणि सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडते.

**अ) जागतिक व्यापार संघटनेचे (WTO) चे सचिवालय :**

जागतिक व्यापार संघटनेचे प्रशासन डायरेक्टर जनरल प्रमुख असलेल्या सचिव पातळवरील मंडळामार्फत पाहिले जाते. डायरेक्टर जनरलची नियुक्ती मंत्रीपातळीवरील परिषदेमार्फत केली जाते. त्यांची मुदत चार वर्षाची असते. त्याला मदत करण्यासाठी चार स्वतंत्र डेप्युटी डायरेक्टर्स असतात. जे विविध सभासद देशांचे प्रतिनिधीत्व करीत असतात. जागतिक व्यापार संघटनेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते अंदाजपत्रक वित्त व प्रशासक मंडळाला आढावा घेण्यासाठी सादर केले जाते. त्याला अंतिम मंजुरीसंबंधी शिफारशी करण्यासाठी सर्वसाधारण मंडळाकडे पाठविले जाते.

**इ) जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे :**

१) बहुपक्षीय व्यापार पद्धतीचा विस्तार करणे.

२) आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धींगत करणे.

३) रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.

४) विकसनशील देशांना विकासासाठी सहाय्य करणे.

५) अत्यल्प विकसीत देशांना विकासाची संधी मिळावी यासाठी सकारात्मक उपाय योजना करणे.

६) सदस्य देशांतील उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करून त्यांच्या देशातील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

७) जगातील नैसर्गिक साधनसामग्रीच्या पर्याप्त वापराने चिरंतर विकास करणे.

८) विकसनशील देशांमध्ये आर्थिक विकासाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून त्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा वाढविणे.

९) आंतरराष्ट्रीय व्यापारातील भेदभाव नष्ट करून व्यापारातील जकाती व इतर निर्बंध कमी करणे.

१०) आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी देशांची स्पर्धाशक्ती वाढवून त्यातून जागतिक एकात्मता निर्माण करणे.

**ई) जागतिक व्यापार संघटनेची कार्ये :**

१) बहुपक्षीय करारांचे प्रशासन आणि अंमलबजावणी करण्याचे कार्य करते.

२) करातील शुल्कातील व्यापार चर्चेतून संमत करण्यात आलेल्या सवलतीची अंमलबजावणी करते.

३) आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना म्हणून सदस्य राष्ट्रांच्या व्यापारी धोरणावर लक्ष ठेवण्याचे कार्य करते.

४) सदस्य राष्ट्रांच्या व्यापारविषयक तक्रारीचे निराकरण करते.

५) सदस्य राष्ट्रातील देशांना कठोर नियमावलीच्या आधारे समान वागणूक देण्याचे कार्य करते.

६) WTO एक व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून कार्य करते.

७) आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटाघाटी घडवून आणण्यासाठी व्यासपीठ म्हणून कार्य करते.

८) सदस्य देशांतील व्यापारात निर्माण झालेले वाद सोडविण्याचे कार्य करते.

९) जागतिक व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना सहकार्य करण्याचे कार्य करते.

**उ) जागतिक व्यापार संघटनेचे करार/प्रमुख तरतुदी :**

**१) शेतमालाचा आधार :** गॅट करारामध्ये शेतमाल व्यापाराचा समावेश नव्हता. जागतिक व्यापार संघटनेमध्ये शेतमाल व्यापाराचा समावेश करण्यात आला. त्यामध्ये विकसीत देश, विकसनशील देश व अत्यल्प विकसीत देश असे वर्गीकरण करण्यात आले. त्यानुसार हळूहळू नजीकच्या १० वर्षात जकातीमध्ये घट केली पाहिजे. या तरतुदीमुळे शेतमाल व्यापाराचा विस्तार घडून आला. शेतमाल व्यापारासंदर्भात विविध तरतूदी करण्यात आल्या. त्या पुढील प्रमाणे

**क) देशांतर्गत अर्थसाहाय्यात घट :** विकसनशील देशांनी शेतमालावर एकूण अर्थसाहाय्य देताना शेतमाल किंमतीच्या १०% पेक्षा अधिक असू नये. त्यासाठी देशातील आधार किंमती विचारात घेतल्या पाहिजेत. भारतामध्ये हे अर्थसाहाय्य ५.२% दिले जाते.

**ख) निर्यात अनुदानात घट :** विकसनशील देशांकडून निर्यातीला जे प्रत्यक्ष अर्थसाहाय्य दिले जाते. त्यामध्ये येत्या ६ वर्षात मोठी घट केली पाहिजे. ती अंदाजपत्रकी खर्चाच्या ३६% व संख्यात्मकदृष्ट्या २४% असावी. विकसनशील देशांनी १० वर्षात ती २४% व १४% पर्यंत कमी केली पाहिजे.

**ग) सार्वजनिक वितरण व्यवस्था :** सरकारने अन्नधान्याचे साठे निर्माण करण्यासाठी धान्य बाजारातून हे चालू किमतीला विकत घ्यावे व त्याची प्रत्यक्ष विक्री बाजार किंमतीपेक्षा कमी किंमतीला केली जाऊ नये. देशातील गरजू गरिबांनाच फक्त सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध करून दिले जाते. त्यावरील अर्थसाहाय्य

हळूहळू कमी करण्यात यावे.

**घ) बी–बियाणे आणि सुक्ष्मजीव यासाठीचा विशेष हक्क :** WTO मध्ये वनस्पतीच्या बी–बियाणे पेटंटचा अधिकार संशोधन कार्यात २० वर्षे राहिला. तो व्यापाराशी निगडीत बौद्धिक संपदा अधिकाराबाबत आहे.

**२) सुती कापड आणि तयार कपडे :** WTO मध्ये सुती कपडे आणि तयार कपडे यांच्या निर्यातीबाबत तरतूद करण्यात आली. या तरतूदीनुसार बहुविध सुती व्यापारांचे करार करण्यात आले. अल्पकालीन व दीर्घकालीन व्यवस्था करण्यात आली. तर सुती व्यापार करार करण्यात आले. उदा– अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांनी या वस्तुंच्या आयातीवर बंधने घातली होती. अशी बंधने घातलेल्या देशांनी WTO च्या स्थापनेनंतर ६० दिवसांच्या आत इतर सदस्य देशांना कळवावयाचे आहे. यामधून कापड उद्योग विकसीत होण्यास मदत झाली.

**३) बुद्धिसंपदा मालमत्तेचे रक्षण करणे (TRIPS) पेटंट :** या पेटंटमध्ये एकूण ९ प्रकारची बुद्धिसंपदा अपेक्षित आहे. वनस्पती जन–जातीच्या बीयाणांच्या पेटंटचा यामध्ये समावेश आहे. पेटंटचा अधिकार संशोधन कार्यात २० वर्ष राहिल. बौद्धिक संपत्ती ही व्यक्तीची खाजगी मालमत्ता असल्याने तिला संरक्षण मिळावे, संबंधिताला त्याचा आर्थिक लाभ मिळावा हा प्रमुख हेतू आहे.

संशोधनासाठीचा हा हक्क नसून त्याचा प्रथम वापर करण्याबाबतचा हा हक्क होय. यामध्ये कॉपीराईट, ट्रेड सिक्रेट, औद्योगिक संकल्प, चित्रे, भौगोलिक निर्देशक वनस्पती, सूक्ष्म जीवामध्ये बॅक्टेरिया, बुरशी, रोगजंतू, पाण्याजवळ वाढणारी हिरवी वनस्पती, लहान वनस्पती, पशू इत्यादी बाबत नवीन तंत्रपद्धती शोधून काढणाऱ्या यापासून हक्क प्राप्त होतो. त्याला पेटंट असे म्हणतात. मात्र सार्वजनिक हिताच्या व स्वाथ्याच्या विरोधात असणारे मनुष्य, पशू वा वनस्पतीच्या सुरक्षिततेला किंवा पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या नवीनतेला पेटंट पद्धतीतून वगळण्यात आले आहे.

**४) सेवांचा समावेश :** जागतिक व्यापार संघटनेमध्ये विविध सेवांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये विमा, बँकिंग, वाहतूक, टेलिकम्युनिकेशन्स, सल्लाविषयक, पर्यटन, वित्तीय सेवा, हवाई वाहतूक, जहाज वाहतूक, करमणूक इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार सेवाविषयक व्यापारात भेदाभेद न करणे, विदेशी व्यक्ती व संस्था यांना देशांतर्गत संस्थाप्रमाणे सोई–सवलती देणे व सेवा बाजारपेठ सर्वांसाठी खुली करणे यांचा समावेश केला आहे.

**५) अवपुंजनाविरोधी उपाय (Anti Dumping Measures) :** अवपुजन म्हणजे एखाद्या देशाची बाजारपेठ काबीज करण्याच्या हेतूने वस्तू अत्यंत कमी किमतीला विकणे होय. त्याचा परिणाम संबंधित देशातील त्या वस्तुचे उत्पादन करणारे कारखाने बंद पडतात. व नंतर त्याच देशात वस्तू अधिक किमतीने विकल्या जातात. जे देश आंतरराष्ट्रीय व्यापारात अवपुंजनाचा स्वीकार करतील त्यांच्या विरोधात कायदेशीर करवाई करता येते. व्यवहारात पारदर्शकता येते. या विरोधात कोठे किती काळ कृती करायची हे ठरविता येते. ही कृती पाच वर्षापर्यंत चालू ठेवता येते.

**६) क्षेत्रीय व्यापारी गट :** गेल्या काही वर्षात आंतरराष्ट्रीय व्यापारात अनेक क्षेत्रीय गट निर्माण झाले आहेत. उदा- अमेरिकेचा मुक्त व्यापार करार (NAFTA) , युरोपियन समूह (European Community) , तेल उत्पादक व निर्यातदार देश (OPEC) , दक्षिण-पूर्व आशियाई संघ (ASIAN) इत्यादी. अशा अनेक संस्थांचा हेतू सभासद देशात व्यापार खूला राहावा हा आहे. या क्षेत्रीय गटातील देश परस्परांना ज्या सवलती देतील त्या त्यांना जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांनाही घ्याव्या लागतील. जर एखाद्या देशाला या सोईसवलती दिल्या नाहीत तर हे प्रकरण तंट्याचा निवाडा करणाऱ्या व्यवस्थेपुढे नेता येते व चुका करणाऱ्या देशाला दंड केला जातो.

**७) अर्थसाहाय्य :** निर्यातीसाठी कोणतेही अर्थसाहाय्य देता येणार नाही. म्हणजे मालाच्या वाहतूक खर्चासाठी सवलत, कर-सवलत इ. मात्र भारतासारख्या विकसनशील देशांना या अटी लागू नाहीत. पुढील ८-१० वर्षांनी त्यांनी या सवलती टप्प्याटप्प्याने कमी करून शेवटी संपुष्टात आणावयाच्या आहेत. निर्यात अर्थसाहाय्य देताना सभासद देशांच्या व्यापाराला हानी पोहोचणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

**ऊ) जागतिक व्यापार संघटना आणि भारत (WTO and India) :**

भारत हा जागतिक व्यापार संघटनेचे संस्थापक देश आहे. त्यामुळे सुरूवातीपासून जागतिक व्यापार संघटनेच्या यशापयशात भारताचा वाटा आहे. जागतिक व्यापार संघटना WTO आणि भारत यांच्यामध्ये कशा प्रकारचा सहसंबंध निर्माण झाला आहे ते पाहणे उचित ठरेल.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार केल्यास जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. उदा. १९९० मध्ये भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा ०.५% होता. तो २००२ मध्ये ०.८% झाला. भारताची १९९० मध्ये एकूण निर्यात १८१४३ द.ल डॉलर्स वरून २००३-०४ मध्ये ६३८४३ द.ल डॉलर्स पर्यंत वाढली.

सन २००१-२००२ मध्ये भारताची आयात २४१९२९ कोटी रू. वरून २००३-०४ मध्ये २९९१०८ कोटी रूपयापर्यंत वाढली. जागतिक व्यापार संघटनेमुळे जकाती आणि इतर निर्बंध इ. कमी झाल्याने भारताची व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. २००१ मध्ये भारतातून तांदूळ, चहा, मसाल्याचे पदार्थ, लोह, धातू, हिरे आणि हिरेजडित दागिने इत्यादीची निर्यात ३६२५ द.ल डॉलर्स एवढी वाढली.

जागतिक व्यापार संघटनेमुळे भारताला अनेक क्षेत्रात लाभ झाला. उदा- बहुविध सुती कापड करार, सेवा क्षेत्र खुले, परकीय वाढती गुंतवणूक, बौद्धिक संपदा अधिकार इ. जागतिक व्यापार संघटनेतील कृषी विषयक तरतूदीमुळे शेतीला दिले जाणारे अंशदान कमी केले गेले. परंतु भारतात अतिशय कमी अंशदान दिले जाते. परिणामी भारतीय शेतीच्या उत्पादनावर फारसा परिणाम झाला नाही. तसेच भारतात सार्वजनिक वितरण --- मार्फत कमी किंमतीत जीवनावश्यक वस्तुंचा जो पुरवठा केला जातो त्यावरील अंशदान चालू ठेवण्यात भारताला काहीही अडचण आली नाही. कारण नव्या करारानुसार उत्पादन मुल्याच्या १०% पर्यंत अंशदान देता येते.

## ४.३ सारांश :

आंतरराष्ट्रीय पातळी वित्तीय सुविधा पुरविण्यासाठी आणि विकसनशील देशांना आर्थिक मदत करण्यासाठी दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या वित्तीय संस्था स्थापन झाल्या त्याचे कार्य आपण वरील प्रमाणे पाहिले आहे. या संस्थामुळे विकसनशील देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लागला आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) :**

दुसऱ्या महायुद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारी संस्था असावी म्हणून २७ डिसेंबर १९४५ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना झाली. या संस्थेचा मुख्य हेतू जागतिक शांतता आणि सहकार्य निर्माण करणे हा होता. नाणेनिधीचे सध्या १८९ सदस्य देश आहेत. नाणेनिधी सदस्य देशांकडून विशिष्ट प्रमाण वर्गाच्या स्वरूपात भांडवल जमा करते. त्यातून गरजू देशांना मदत करण्याचे कार्य करते. २००४ मध्ये नाणेनिधी आपला कारभार कार्यकारी मंडळाद्वारे पाहते. नाणेनिधी विनिमय दर निश्चित करणे, अल्पकालीन मदत, दुर्मिळ चलनाचे वाटप, प्रतिपुरक वित्तीय सुविधा, नैसर्गिक आपत्तीत मदत, वित्त व्यवस्था सुविधा, विकसनशील देशांना सल्ला व मार्गदर्शन इत्यादी प्रकारची कार्य करते.

**जागतिक बँक (World Bank) :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी प्रमाणे जागतिक बँक आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणारी एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. जागतिक बँकेची स्थापना २७ डिसेंबर १९४५ मध्ये झाली. जागतिक बँकेची अधिकृत भांडवल २१००० द.ल डॉलर्स इतके आहे. त्यापैकी केवळ १०% वसूल भांडवल आहे. जागतिक बँकेची कामकाज संचालकाद्वारे पाहिले जाते. जागतिक बँकेची एकूण सदस्य संख्या १८९ इतकी आहे. या बँकेने आतापर्यंत विविध कार्ये केली आहेत. त्यामध्ये दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेल्या देशांची उभारणी, सदस्य देशांना कर्ज पुरवणे, नियोजन यंत्रणा, विकसनशील देशांना विशेष मदत, तांत्रीक सल्ला व मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय वादविवाद सोडविणे, सामाजिक-आर्थिक संशोधन प्रकल्प इत्यादी कार्ये केली आहेत.

**आशियाई विकास बँक (ADB) :**

आशियाई देशांचे विविध प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी या बँकेची स्थापना १९६६ मध्ये झाली. या बँकेने निर्बंध व दरिद्री अशा विकासोन्मुख देशांना आर्थिक तांत्रिक अशी निविदा प्रकारची मदत करून त्यांच्या आर्थिक उत्पादनाला हातभार लावला आहे. आशियाई विकास बँकेच्या स्थापनेपासूनच या बँकेने आर्थिक विकासाकरिता कित्येक वर्षापासून असलेली मदत व प्रोत्साहन दिले आहे. परंतू मागासलेल्या देशांची मागणी एवढी प्रचंड आहे की या बँकेची संसाधने ही अपूरी पडतात म्हणून विकसीत व संपन्न देशांनी या बँकेला अधिकाधिक साहाय्य करावे. असे झाल्यास या बँकेचा सवलतीच्या दराने मागास देशांना आर्थिक साहाय्य देऊन त्यांच्या आर्थिक विकसाला बहुमोल मदत करता येईल.

**जागतिक व्यापार संघटना :**

पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारात घट होण्यास सुरूवात झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रचंड प्रमाणात घट झाली. अनेक देशांना आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध बंधणे घातली. आंतरराष्ट्रीय व्यापारात झालेली प्रचंड घट नष्ट करण्यासाठी १९४४ मध्ये गॅट सारखी आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविणारी संघटना स्थापन करण्यात आली. गॅटमुळे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात व्यापार वाढला असला तरी गॅट सदस्य देशांत प्रचंड प्रमाण मतभेद निर्माण झाले. हे मतभेद मिटविण्यासाठी ८ फेऱ्या झाल्या पण मतभेद मिटले नाहीत. शेवटी उरुग्वे येथिल परिषदेमध्ये सर्वाचे एकमत होऊन गॅट ऐवजी जागतिक व्यापार संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. जानेवारी १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली. सध्या या संघटनेमध्ये १६४ देश आहेत.

जागतिक व्यापार संघटने सदस्य देशांमध्ये व्यापार वाढ करण्यासाठी व्यापारावरील अनेक निर्बंध दूर केले. या संघटनेचे कामकाज मंत्रीपरिषदेमार्फत चालते. या संघटनेने सुती कापड निर्यात करार, आयात, निर्यात बाजारपेठ करार, विदेशी गुंतवणूक करार, बौद्धिक संपदा करार, पॅकिंग, विमा, पर्यटन सेवाविषयक करार व तंटानिवारण विषयक करार या ७ कराराच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीस प्रोत्साहन दिले आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**केन्स योजना :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य वाढून शांतता प्रस्थापित करण्यासाठी जागतिक पातळीवर एखादी संघटना असावी. यासाठी जे. एस. केन्स यांनी एक योजना मांडली होती तिला 'केन्स योजना' म्हणतात.

**व्हाईट योजना :** आंतरराष्ट्रीय पातळीवर वित्तीय स्थिरता आणि नियंत्रण करणारी एखादी संघटना असावी, यासाठी अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ व्हाईट यांनी आंतरराष्ट्रीय स्थिरीकरण निधी स्थापण्याची योजना मांडली तिला 'व्हाईट योजना' म्हणतात.

**विशेष उचल अधिकार (Special Drawing Rights) :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने १९९७ मध्ये एका कृत्रिम जिंदगी (Assets) ची निर्मिती केली. या जिंदगीची निर्मिती सोन्याला पर्याय म्हणून केली असल्यामुळे त्याला कागदी सोने असेही म्हणतात. त्या जिंदगीला (SDR) असे म्हणतात. यांच्या एका एककाचे मूल्य ०.८८६७१ ग्रॅम शुद्ध सोन्याबरोबर करण्यात आले.

**अंशदान (Subsidy) :** सरकारकडून जी आर्थिक मदत केली जाते त्यास अंशदान किंवा अर्थसाहाय्य म्हणतात. ही मदत परत करायची नसते त्यावर व्याजही आकारले जात नाही.

**पेटंट :** एखाद्या नवीन संशोधना संदर्भात ज्याने ते संशोधन केले आहे त्यांची कायदेशीर नोंदणी करून त्याबाबत हक्क प्राप्त करणे होय.

## ४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडा.**

१. जुलै १९४४ मध्ये ब्रेटन वुडस येथे जगातील ------ देशांच्या प्रतिनिधीची बैठक झाली.

अ) ४४ ब) ४५ क) ४६ ड) ४७

२. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना ------ मध्ये झाली.

अ) १९४४ ब) १९४५ क) १९९५ ड) १९९७

३. जागतिक बँकेची स्थापना ------ मध्ये झाली.

अ) १९४५ ब) १९४६ क) १९९१ ड) १९९४

४. गॅटची स्थापना ------ मध्ये झाली.

अ) १९२० ब) १९२५ क) १९४४ ड) १९९४

५. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना ------ मध्ये झाली.

अ) १९९१ ब) १९९२ क) १९९३ ड) १९९५

६. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्यामध्ये सध्या ------ सभासद देश आहेत.

अ) १२० ब) १५० क) १८९ ड) १९५

७. जागतिक व्यापार संघटनेची सभासद संख्या ------ आहे.

अ) ८० ब) १२० क) १५० ड) १६४

८. आशियाई विकास बँकेची स्थापना ------ मध्ये झाली.

अ) १९५० ब) १९६६ क) १९७६ ड) १९९०

९. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे अध्यक्ष ------ हे आहेत.

अ) क्रिस्टालिना जॉर्जियावा ब) अर्मथ सेन क) मस्तसुगू अस्कावा ड) जार्ज बुश

१०. WTO चे मुख्य कार्यालय ------ येथे आहे.

अ) जिनिव्हा ब) टोकिओ क) काटमांडू ड) नवी दिल्ली

११. आशियाई विकास बँकेचे सध्याचे अध्यक्ष ------ आहेत.

अ) मस्तयुगू अस्कावा ब) नरेंद्र मोदी क) इम्रान खान ड) डॉ. मनमोहन सिंग

१२. आशियाई विकास बँकेचे मुख्य कार्यालय ------ येथे आहे.

अ) नवी दिल्ली ब) मनिला क) टोकिओ ड) ढाका

१३. जागतिक बँकेचे मुख्य कार्यालय ------ येथे आहे.

अ) वाशिंग्टन ब) मास्को क) दिल्ली ड) पॅरिस

**४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

| | | |
|---|---|---|
| १ - अ-४४ | ६ - क-१८९ | ११ - अ-मस्तसुगू अस्कावा |
| २ - ब-१९४५ | ७ - ड-१६४ | १२ - ब-मनिला |
| ३ - अ-१९४५ | ८ - ब-१९६६ | १३ - अ-वाशिंग्टन |
| ४ - क-१९४४ | ९ - अ-क्रिस्टलिना जॉर्जियावा | |
| ५ - ड-१९९५ | १० - अ-जिनिव्हा | |

**४.७ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची पार्श्वभूमी सांगून तिची कार्ये स्पष्ट करा?

२. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे मुल्यमापन करा?

३. जागतिक बँकेची पार्श्वभूमी सांगून तिची कार्ये स्पष्ट करा?

४. जागतिक बँकेचे मुल्यमापन करा?

५. जागतिक व्यापार संघटनेची पार्श्वभूमी सांगून तिची उद्दिष्टे व कार्ये स्पष्ट करा?

६. जागतिक व्यापार संघटनेच्या विविध तरतूदी स्पष्ट करा?

७. जागतिक व्यापार संघटनेचे मुल्यमापन करा?

८. आशियाई विकास बँकेची कार्ये स्पष्ट करा?

९. आशियाई विकास बँकेचे मुल्यमापन करा?

**आ) टीपा लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे व्यवस्थापन

२. जागतिक बँक

३. जागतिक व्यापार संघटना

४. आशियाई विकास बँक

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. जयप्रकाश (२०००) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली ११०००२ ISSN ८१-७४८७-०१७-०२

२. कायंदे पाटील गंगाधर वि. (जुलै २०००) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' आंतरराष्ट्रीय व्यावसायिक पर्यावरण चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक १३

३. महाजन धनश्री (जून २००५) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपूरा, औरंगाबाद.

४. साठे मधुसूदन (२००८) 'व्यापार आणि व्यापार संघटना' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

५. बापट ल. ग. (१९८२) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६. देशपांडे श्री. आ. व देशपांडे वि. श्री (२००४) 'वित्तीय संस्था आणि वित्तीय बाजार' मुंबई.

७. कुलकर्णी बी. डी. व ढमढेरे एस. व्ही (२००७) 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

८. देसाई व भालेराव (२०११) 'भारतीय अर्थव्यवस्था' निराली प्रकाशन, पुणे.

९. झामरे जी. एन. (२०१०) 'भारतीय अर्थव्यवस्था' विकास व पर्यावरण अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स नागपूर.

१०. Mathur Reeta (2002) 'Internatnonal Economics' Sublime Publications Jaipur.

११. Dash L. N. (2000) World Bank and Economic Development of India A. P. H. Publishing Corporation, New Delhi..


***